५४ ६९१

# माझी वाटचाल

( माझ्या जीवनांतील निवडक आठवणी )

म. ग्रं. सं. ठाणें
विषय — चरित्र
सं. नं.



REFBK-0068224

— द. रा. पिंगे

# माझी वाटचाल

( माझ्या जीवनांतील निवडक आठवणी ).

प्रस्तावना—श्री. वि. स. खांडेकर



ग्रंथ संग्रहालय ठाणे
1224

१०८७

REFBK-0008224

—द. रा. पिंगे

प्रकाशक—

**द. रा. पिंगे**

१३, म्युनिसिपल ऑफिस रोड

इंदूर ( मध्यभारत ).

मुद्रक—

**द. का. पानसे**

मालक ' दत्त प्रिंटिंग वर्क्स '

६३, कबूतरखाना, नंदलालपुरा, इंदूर.

सर्वाधिकार—

श्री. सौ. सीताबाई पिंगे

यांचे स्वाधीन.

मूल्य - **अडीच रुपये.**

राष्ट्राच्या होतकरू आणि उत्साही
तरुणांस सादर समर्पण.

—द. रा. पिंगे

अनुक्रम ९२००९ ... क्र. ६०९ नं. दि. २७१११५४

# अनुक्रमणिका


प्रकरण क्रमांक

'दोन शब्द'–श्री. वि. स. खांडेकर ... ... १–७
लेखकाचें निवेदन ... ... ९–१०

## टप्पा पहिला

### कुरुंदवाड

१ शिक्षणाचा ओनामा ... ... १
२ खिलमीचा धूर ... ... २
३ घी देखा लेकिन् .. ... ... ३
४ तिळगूळ घ्या, गोड बोला ... ... ५
५ देव तारी त्याला कोण मारी ? ... ... ७

### राजापूर

६ ओले काजूगर ... ... ८
७ नाटकांत नाटक ... ... १०
८ औट घटकेचें स्वातंत्र्य ... ... ११

### जत

९ व्यापाराचा श्रीगणेश ... ... १५

### धार

१० असंगाशीं संग ... ... १७
११ नाट्यलेखन ... ... १८
१२ पेरूंची किंमत ... ... २१
१३ संघटनेचें पहिलें पाऊल ... ... २२
१४ बालसभा ... ... २६
१५ काव्यांकुर ... ... २७
१६ चतुर्भुज ... ... २९

| प्रकरण क्रमांक | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १७ | पाळणा | ... | ... | ३२ |
| १८ | महाविद्यालयाचें प्रवेशद्वार | ... | ... | ३४ |
| १९ | माझे आद्यस्नेही | ... | ... | ३६ |
| २० | अरण्यरुदन | ... | ... | ३७ |

## टप्पा दुसरा

**इंदूर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | नवी सृष्टि | ... | — | ४० |
| २ | सोवळे ओवळयांत आले | ... | ... | ४१ |
| २३ | हाय जंप | ... | ... | ४३ |

**वढवाय-धरगांव**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४ | कारावास | ... | ... | ४५ |

**इंदूर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | अनभ्यासे विषं वारि | ... | ... | ४८ |
| २६ | वाईटांतून चांगलें | ... | ... | ५० |
| २७ | क्रान्ति | ... | ... | ५३ |

**मुंबई**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | सत्यसंकल्पाचा दाता नारायण | ... | ... | ५७ |
| २९ | शान्तिसदन | ... | ... | ६० |
| ३० | उदारात्मा | ... | ... | ६१ |
| ३१ | खिस्ती-नव्हे-ख्रिस्त | ... | ... | ६३ |
| ३२ | कठिण समय येतां... | ... | ... | ६५ |
| ३३ | मतलबकी दुनिया | ... | ... | ६८ |
| ३४ | प्लेगची झोंपडी | ... | ... | ७४ |
| ३५ | सोडचिठ्ठी | ... | ... | ७७ |
| ३६ | पुनरागमन | ... | ... | ८० |

प्रकरण क्रमांक पृष्ठ

**धार**

३७ विमा एजन्सी ... ... ८३
३८ नर्मदास्नान ... ... ८५
३९ दैवो दुर्बल घातकः ... ... ८७
४० श्रीमंतांची दिवाळी ... ... ९०

## टप्पा तिसरा

**कामटी**

४१ गुलामगिरीस प्रारंभ ... ... ९३
४२ पाहुणा दोन दिवसांचा ... ... ९५
४३ नवल ... ... ९७
४४ कारकून ... ... ९८
४५ नदी-किनारीं ... ... १००
४६ गौप्यस्फोट ... ... १०२
४७ अन्नपूर्णाश्रम ... ... १०४
४८ गुलकंद ... ... १०८
४९ मानवी जीवनांतील स्वर्ग ... ... ११०
५० संत ... ... ११४
५१ सॉव्हरिन्स ... ... ११८
५२ ऊन्ह-पाऊस ... ... १२०
५३ सत्य–असत्याचा संघर्ष ... ... १२२

**नागपूर**

५४ एकच प्याला ... ... १२६
५५ A LIE ... ... १२८
५६ माझे स्नेही ... ... १३१
५७ ‘ ते कोण कीं दुर्मति ’ ... ... १३४
५८ ‘ साहसे श्रीः प्रतिवसति ’ ... ... १३६
५९ दोन पत्रें ... ... १३८

प्रकरण क्रमांक | पृष्ठ

## टप्पा चौथा

### इंदूर


| | | |
|---|---|---|
| ६० | सेव्य-सेवक कीं पिता-पुत्र | १४२ |
| ६१ | स्वर्गसुख | १४४ |
| ६२ | वादळ | १४६ |
| ६३ | विकार आणि विचार | १४९ |
| ६४ | आपला धर्म | १५२ |
| ६५ | समाजसेवा | १५४ |
| ६६ | हृदयपालट | १५६ |
| ६७ | भजनीमंडळ | १५९ |
| ६८ | ' लोभ मूलानि पापानि ' | १६० |
| ६९ | मृत्यूच्या दाढेंतून | १६२ |
| ७० | त्रिकोण | १६४ |
| ७१ | पुन्हा सोवळें | १७५ |
| ७२ | सेवाधर्मः परम गहनो | १७७ |
| ७३ | मरणं प्रकृतिः शरीरिणाम् | १७९ |
| ७४ | वारसा हक्क | १८१ |
| ७५ | विफलाशा | १८८ |
| ७६ | वैराग्य | १९२ |
| ७७ | संधि | १९५ |
| ७८ | स्वार्थलोलुप | १९७ |
| ७९ | जिवाचा साथी | २०० |

# दोन शब्द

पांच वर्षांपूर्वी मी इंदूरला तिथल्या शारदोत्सवासाठीं गेलों होतों. अध्यक्ष या नात्यानें त्या उत्सवांत मी काय बोललों तें आतां मला नीटसें आठवत नाहीं. पण त्या उत्सवाच्या निमित्तानें ज्या अनेक स्नेह्यांचा लाभ मला झाला त्यांचें विस्मरण अद्यापि मला झालेलें नाहीं. पुढे होणारहि नाहीं. साहित्यिक होण्यांत फारसे फायदे नसले तरी हा एक मोठा लाभ असतो. त्याच्या लेखनामुळें-लेखनगुणांमुळें असें म्हणण्याचें धाडस मी करीत नाहीं—तो जिथें जाईल तिथें लोक त्याला ओळखतात, त्याच्यावर आपुलकीचा वर्षाव करतात. त्यांच्या चार दिवसांच्या सहवासानें जणूं कांहीं त्या स्नेह्यांची व आपली अनेक वर्षांची ओळख आहे असें पाहुण्याला वाटूं लागतें. इंदूरच्या त्या मुक्कामांत असेंच झालें. प्रि. बोरगांवकर, डॉ. ठाकूर, श्री. रामभाऊ दाते, प्रा. कवीश्वर, श्री. काळेले, श्री. पिंगे, श्री. ( आतां प्रा. ) कवठेकर, श्री. उपासनी, श्री. आठल्ये, श्री. पोतदार वगैरे मंडळीच्या सौहार्दाचा लाभ मला इंदूरला झाला. त्यांच्यापैकीं कित्येकांची गेल्या पांच वर्षांत गांठभेट होऊं शकली नाहीं. पण त्यांच्या सहवासांतले गोड क्षण अद्यापि माझ्या मनांत टवटवीत आहेत.

त्यामुळें गतवर्षी श्री. पिंगे कोल्हापूरला माझ्याकडे आले तेव्हां मी मोठ्या आनंदानें त्यांचें स्वागत केलें. पण ते नुसता आनंदच बरोबर घेऊन आले नव्हते. त्यांनीं एक आश्चर्यहि आणलें होतें. बोलतां बोलतां त्यांनीं एक हस्तलिखित माझ्या हातांत दिलें. श्री. पिंगे यांचें साहित्यप्रेम मला परिचित होतें. पण त्यांचा व्यवसाय अक्षरांपेक्षां आंकड्यांशीं संबद्ध असल्यामुळें तें हस्तलिखित पाहतांच क्षणभर मला नवल वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं त्या नवलाची जागा समाधानानें घेतली. श्री. पिंगे यांनीं आठवणींच्या रूपानें लिहिलेलें आत्मचरित्र होतें तें.

९८०.८ ... ५८९ नं. दि. २६७९९

समाधान या शब्दाचा थोडासा खुलासा केला पाहिजे. गेलीं पंधरा वीस वर्षें तरी मला तीव्रतेनें एक गोष्ट जाणवत राहिली आहे. ती म्हणजे आपल्या वाङ्मयांतील आत्मचरित्रांचें दुर्भिक्ष. प्रसिद्धीच्या पडद्यापुढें येऊन प्रकाशांत उभीं राहिलेलीं अनेक माणसें आपण पाहतों. त्यांना आपण चाहतों. त्यांच्या कर्तृत्वाचें आपणांला आदरमिश्रित कौतुक वाटतें. पण त्यांच्या अंतरंगांत शिरण्याची आपली इच्छा तशीच अतृप्त राहते. आगरकर आणि लोकमान्य यांनीं आपले सर्व अनुभव लिहून ठेवले असते तर? हरिभाऊ आपटे, गडकरी आणि गणपतराव जोशी यांचीं आत्मवृत्तें उपलब्ध असतीं तर? केशवसुत व बालकवि यांचीं निदान अशीं कांहीं टिप्पणें मिळालीं असतीं तर? 'तर' हा 'पण' पेक्षांहि कोशांतला अधिक क्रूर शब्द आहे. कारण जें होणें शक्य असून होऊं शकलें नाहीं त्याचें दुःख माणसाला नेहमीच अधिक वाटतें.

मोठमोठ्या विचारवंतांचीं आणि कलावंतांचीं आत्मवृत्तें आपल्याकडे नाहींत. त्यामुळें जीवनाचें खरेंखुरें दर्शन करून देणारें मराठी वाङ्मयांतलें एक महत्वाचें दालन थोडेंफार रिकामेंच राहिलें आहे. पण मला तें अधिकच ओकें ओकें वाटतें. याचें कारण त्यांत प्रसिद्ध माणसांचीं आत्मवृत्तें विपुल प्रमाणांत नाहींत हें नसून प्रसिद्धीच्या प्रकाशांत न आलेल्या माणसांचीं आत्मवृत्तें जवळ जवळ मुळींच नाहींत हें होय. जीवनाचें चित्रपटाशीं या एका बाबतींत तरी फार मोठें साम्य आहे. चित्रपटांत पडद्यावर अभिनय करणाऱ्या माणसांइतकेंच पडद्याआड काम करणाऱ्या माणसांचें महत्व असतें. हीं दोन प्रकारचीं माणसें म्हणजे गाडीचीं दोन चाकें होत. त्यांच्या सहकार्यामुळेंच चित्रपट तयार होतो. जीवनहि असेंच आहे. प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध, पडद्यापुढच्या आणि पडद्यामागच्या, हजारों लोकांच्या सभा आपल्या वक्तृत्वानें उत्स्फूर्त करून सोडणाऱ्या आणि चार भिंतींच्या आंत निमूटपणें आपलें काम करीत राहणाऱ्या, रणांगणावर तलवार गाजविणाऱ्या आणि दहा फूट गुणिले बारा फूट अशा क्षेत्रफळाच्या खोलींत कविता करीत बसणाऱ्या, खेडेगांवांतल्या बाळगोपाळांना शिकविणाऱ्या आणि राजधानींतून राजकारणाचीं सूत्रें हलविणाऱ्या, नटी या नात्यानें लाखो लोकांचें मनोरंजन

करणाऱ्या आणि अकालीं वैधव्य आल्यावर हिंमत न सोडतां रक्ताचें पाणी करून आपलीं चिमणीं पाखरें वाढविणाऱ्या, असंख्य स्त्रीपुरुषांच्या सुखदुःखांनीं, आशा आकांक्षांनीं आणि गुणदोषांनींच तें घडविलें जातें. म्हणूनच या सर्वांचे अनुभव वाङ्मयरूपानें ग्रथित होणें आवश्यक असतें.

श्री. पिंगे यांच्या आत्मवृत्ताचें हस्तलिखित पाहून मला समाधान वाटलें तें यामुळें. तें वाचल्यानंतर माझें समाधान द्विगुणित झालें. त्यांतील अनेकविध आठवणींतून स्पष्ट दिसणारा प्रांजळपणा, ज्यांत काव्य किंवा नाट्य नाहीं अशी सर्वसामान्य ललित लेखकाची समजूत होईल अशा अनुभवांतून दिसून येणाऱ्या काव्याच्या अथवा नाट्याच्या छटा, आयुष्याच्या साध्या, सरळ रस्त्या-वरहि नाहीं म्हटलें तर किती उंचसखल भाग असतो हें दाखविणारे अनेक कडूगोड अनुभव, या सर्वांमुळें त्यांचें हें आत्मवृत्त रोचक आणि उद्बोधक झालें आहे.

'माझी वाटचाल' हें आत्मवृत्ताचें नांव मोठें मार्मिक आहे. जीवन म्हणून बाळपणीं आपण ज्याचीं अद्भुतरम्य स्वप्नें पाहतों आणि तरुणपणीं ज्याला मोठ्या आसक्तीनें आपल्या बाहुपाशांत कवटाळतों, तो सारा काळ-पुरुषाच्या हातांत हात घालून केलेला प्रवास होता असेंच संध्याकाळच्या सावल्या पडूं लागल्यावर माणसाला वाटूं लागतें. एक प्रकारची अलिप्तपणाची छटा त्याच्या मनोवृत्तींत प्रवेश करते. प्रेक्षकांत बसून रंगभूमीवरलें नाटक पाहावें तसा तो आपल्या गतजीवनाकडे पाहूं लागतो. त्यांतील अनुभवाचे रंग आतां थोडे फिकट होतात. त्यांची जागा सात्विकता घेते. अशा मनःस्थितींत एखाद्यानें उलगडून दाखविलेला आपला जीवनपट गडद रंगांनीं रंगला नसला, त्याची वीण अर्धरेशमी नसून साधीच असली, त्याच्यावर तऱ्हतऱ्हेचीं सुंदर फुलें काढलीं नसलीं, तरी झोंबणाऱ्या थंडीवाऱ्यापासून माणसाच्या मनाचें संरक्षण करण्याच्या कामीं त्याचा काय थोडा उपयोग आहे

'माझी वाटचाल' हें श्री. पिंगे यांचें आत्मवृत्त मी मोठ्या गोडीनें वाचलें याचें कारण हेंच आहे. तें वाचतांना माझ्या व माझ्यासारख्या लाखों माणसांच्या साध्यासुध्या सुखदुःखांचीं प्रतिबिंबें मी त्यांत पदोपदीं पाहात होतों. पृष्ठ ११ वर सुरू होणारें 'औट घटकेचें स्वातंत्र्य' हें या पुस्तकांतलें प्रकरण पाहावें. आठ दहा वर्षांच्या मुलाच्या मनांत केव्हां ना केव्हां तरी ध्रुवाचा संचार होतोच! आईवर रागावून, वडिलांवर चिडून किंवा शाळेला कंटाळून ही स्वारी पलायनाचा बेत करते. क्वचित् तो अंमलांतहि आणते. पण या नाहीं त्या कारणानें या आधुनिक ध्रुवाची तपश्चर्या चारदोन दिवसांतच संपुष्टांत येते. हें सारें प्रकरण वाचीत असतांना मला राहून राहून माझ्या बालपणाची आठवण होत होती. त्यावेळीं मी बटाट्याच्या भाजीचा परमभक्त होतों. एके दिवशीं मी ती आईला करायला सांगितली. पानावर बसल्यावर ताटांत बटाट्याची भाजी नाहीं हें पाहून माझें पित्त भडकलें. मी तस्सा उपाशीं उठलों. अगदीं ध्रुवासारखा गृहत्याग करायचा निश्चय करून उठलों. ध्रुवाला वैराग्य प्राप्त व्हायला सावत्र आई तरी कारणीभूत झाली होती. पण इथें माझी सख्खी आई माझा बटाट्याच्या भाजीचा हट्ट पुरवायला तयार नव्हती! अशा संसारांत राहण्यापेक्षां राना-वनांत गेलेलें काय वाईट? पुन्हा या घराचें तोंड पाहायचें नाहीं अशा निश्चयानें त्या दिवशीं मी घराबाहेर पडलों. पण बालजीवनांतलें असलें नाटक कसें ना कसें सुखान्त होतेंच. तसेंच माझेंहि झालें.

बालमन व बालजीवन यांच्यावर प्रकाश टाकणाऱ्या अशा अनेक मजेदार आठवणी श्री. पिंगे यांच्या आत्मवृत्तांत आहेत. या घ्या किंवा या पुस्तकां-तील दुसऱ्या कोणत्याहि आठवणी घ्या, त्या एकेरी नाहींत. म्हणजे केवळ त्या त्या प्रसंगाच्या वर्णनानें मर्यादित झालेल्या नाहींत. जातां जातां त्यांतून अनेक हृदयंगम छटांचें दर्शन होतें. याच आठवणीच्या अनुषंगानें पृष्ठ १२–१३ वर त्यांनीं एका मोळीवाल्या महारणीचें जें चित्र रेखाटलें आहे तें साध्या साध्या गोष्टींत किती माणुसकी असते व अगदीं सामान्य मानलीं

जाणारीं माणसें ही माणुसकी किती सहजतेनें प्रगट करतात याच्यावर कसें प्रकाश टाकतें तें पाहावें. ' मानवी जीवनांतील स्वर्ग ' या प्रकरणांत डॉक्टर असलेल्या आपल्या एका स्नेह्यांचें शब्दचित्र श्री. पिंगे यांनीं काढलें आहे तें मोठें मनोज्ञ असून असेंच माणुसकीचें दर्शन घडविणारें आहे. या प्रकरणांतलें पुढील वर्णन वाचून जीवनांतल्या मंगलतेच्या अस्तित्वाबद्दल ज्यांची खात्री होणार नाहीं असा वाचक सहसा मिळणार नाहीं. तें वर्णन असें आहे:– ' कोणीहि केव्हांहि डॉक्टरांना बोलवावें, नकार असा त्यांच्या तोंडून येतच नसे. अंगांत एकशेंएक डिग्री ताप असतांहि ते आजाऱ्याला पाहायाला गेलेले मला माहीत आहे. गरीब असो वा श्रीमंत असो, कोणाकडेहि व्हिजिटला गेले तरी व्हिजिट फीची चुकूनहि कधीं ते मागणी करीत नसत. असें असूनहि रात्रीं साडेनऊ दहा वाजतां ते घरीं परत येत त्यावेळीं त्यांचा खिसा भरलेलाच असावयाचा. आलेल्या पैश्यांची मोजदाद त्या गृहस्थानें कधींहि केली नाहीं. घरीं आले कीं पॅन्टच्या खिशांत हात घालावा व सर्व पैसे न मोजतांच कुलूप नसलेल्या एका ट्रन्केंत टाकावे हा त्यांचा नित्यक्रम असे. कोणी फी न दिली तरी त्याच्या औषधोपचारांत कधींहि हयगय किंवा कुचराई व्हावयाची नाहीं. त्यांच्या संगतींत गेलेला अडीच तीन वर्षांचा काल म्हणजे माझ्या आयुष्यांतील सुखाचा परमोच्च बिंदु होता. '

जीवनावरली श्रद्धा वाढविणाऱ्या अशा अनेक आठवणी श्री. पिंगे यांच्या या आत्मवृत्तांत आहेत. माणुसकीच्या या दर्शनामुळें वाचकाचें मन निवतें. त्याला धीर मिळतो. पण माणसाला या उज्ज्वल बाजू प्रमाणें एक छाया असलेली बाजूहि आहे हेंहि लेखकानें तितक्याच स्पष्टपणानें सांगितलें आहे. किंबहुना श्री. पिंगे यांचें हें आत्मवृत्त वाचून शेवटीं आयुष्याचें खारट तुरट, कडूगोड आणि चित्रविचित्र असें, संमिश्र स्वरूपच डोळ्यांपुढें उभें राहतें. जीवन हें सुसंगत व एकरूप असावें अशी आपली इच्छा असते. पण तें मुळांतच विसंगत आणि बहुरुपी असल्यामुळें ही इच्छा सहसा सफल होत नाहीं. श्री. पिंगे यांच्या आत्मवृत्तांत चित्रित झालेली त्यांच्या वडिलांची

स्वभावरेखा थोडीशी सूक्ष्मतेनें पाहावी. म्हणजे नव्या जुन्या पिढींतील झगडा हा कळत नकळत कसा अपरिहार्य होऊन बसतो आणि माणसें नात्यानें कितीहि जवळचीं असलीं तरी मनानें एकमेकांपासून किती दूर असतात व या विचित्र, स्वभावजन्य दूरत्वामुळें सर्वांनाच कसें दुःख भोगावें लागतें याची सहज कल्पना येईल. पृष्ठ ८९ व ९७ यांवरील पायमोजांचे प्रकरण बाह्यतः अगदीं साधें असलें तरी मनुष्यस्वभावावर मोठा प्रकाश टाकणारें आहे असें मला वाटतें. याच्या जोडीनें 'हृदय पालट' ( पृष्ठ १५६ ) हें प्रकरणहि वाचलें पाहिजे. त्याशिवाय जीवन किती बहुरंगी आहे हें कळणार नाहीं.;

मनुष्यस्वभावांतली अंध आत्मनिष्ठा आणि दुसऱ्याच्या जागीं आपण आहों अशी कल्पना करून घेऊन त्याचें दुःख जाणण्याची अपात्रता या गोष्टी जशा कौटुंबिक जीवनांत नित्य लहानमोठीं दुःखें निर्माण करतात, त्याप्रमाणें त्यांच्यामुळें सामाजिक जीवनांतहि उद्वेग आणणारीं दृश्यें नित्य दिसतात. पृष्ठ ९१ वरील 'श्रीमंतांची दिवाळी' हें प्रकरण व पृष्ठ ११४ वर सुरू होणारें 'संत' हें प्रकरण या दृष्टीनें वाचनीय आहेत. श्री. पिंगे यांनीं या संतमहाशयांचा श्मश्रूसमारंभ मोठ्या खुमासदार रीतीनें वर्णन केला आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना या समारंभाची हकीगत माहीत असती तर त्यांनीं आपल्या 'साधुसंत' या सुप्रसिद्ध विनोदी लेखांत तिचा भरपूर उपयोग करून घेतला असता.

पृष्ठ ८५ वरली तोतया विमा कंपनी, पृष्ठ १२६ वरील मोहाचा प्रसंग, पृष्ठ १०८ वरील गुलकंदाचा गमतीदार भाग, पृष्ठ ११८ वरील सॉव्हरिन्सची गोष्ट इत्यादि आत्मवृत्तांतलीं स्थळें जणूं कांहीं तीं आपल्या आयुष्यांतलींच आहेत असें वाचकाला वाटण्याइतकीं प्रत्येकाला परिचित आहेत. साधी, घरगुती वर्णनशैली आणि जें जसें अनुभवलें तें तसें वर्णन करण्याची हातोटी यांच्यामुळें या सर्व आठवणी जितक्या रंजक तितक्याच उद्बोधक झाल्या आहेत. त्यांतून प्रगट होणारें श्री. पिंगे यांचें व्यक्तिमत्वहि वेधक वाटतें.

त्याच्याभोवतीं कोणत्याहि प्रकारचें तेजोवलय नाहीं. पण आयुष्य ही सुंदर नौकेंत बसून प्रवाहाबरोबर वाहत जात जात केलेली सहल नसते. आयुष्याचा अर्थ कांहीं वेळां प्रवाहाबरोबर तर अनेकदां प्रवाहाविरुद्ध पोहणें हा आहे. या पोहण्यांतच माणसानें मौज मानली पाहिजे. कथाकादंबऱ्यांतून आढळणाऱ्या व तरुण मनांना आकर्षित करणाऱ्या स्वप्नसृष्टीपेक्षां जीवन किती भिन्न आहे हें श्री. पिगे यांच्या या आठवणींवरून दिसून येईल. त्याचबरोबर जीवनांत विफलता आणि अमंगलता यांचेंच साम्राज्य असतें असा जो एक सूर अलीकडे वाङ्मयांतून ऐकूं येतो तो कितपत सत्य आहे याचीहि कल्पना त्याच्यावरून व्हायला हरकत नाहीं. जीवनाच्या प्याल्यांत एकच प्रकारचा रस कधींहि नसतो. आपल्याला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या विविध रसांचें संमेलन करून नियति एक पेय बनविते व तें आपल्या आयुष्याच्या पेल्यांत ओतते. घोटाघोटाला या पेयाची रुचि बदलत असते. या पेयाचा घोट आवडता असो अगर नावडता असो, माणसाला तो घ्यावाच लागतो. हे सर्व घोट घेत असतांना सर्वसामान्य माणसानें आपली हिंमत कशी कायम ठेवावी, प्रतिकूल परिस्थितीशीं कसें झगडावें आणि जीवनांतलीं उच्च मूल्यें कशीं संभाळावींत हें ‘ माझी वाटचाल ’ दाखवीत आहे. जगापुढें चमकणाऱ्या मोठ्या माणसांचीं चरित्रें हीं आकाशांत लखलखणाऱ्या विजेसारखीं असतात. त्या विजेचें तेज मोठें. पण पृथ्वीवर अंधारांत चालणाऱ्या माणसाला त्या तेजाचा विशेष उपयोग होऊं शकत नाहीं. त्यासाठीं त्याला विजेरीच बाळगावी लागते. ‘ माझी वाटचाल ’ ही अशी विजेरी आहे. सर्वसामान्य वाचकांना तिचा उपयोग होईल अशी खात्री वाटत असल्यामुळें मी या आठवणींचें मनःपूर्वक स्वागत करतों.

कोल्हापूर
१८–११–१९५४

वि. स. खांडेकर



दत्तात्रय रामचंद्र पिंगे



सौ. सीताबाई पिंगे

# निवेदन

बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकारांच्या आंकडेमोडींत आणि कीर्दें, खतावण्या वगैरेसारख्या लठ्ठ लठ्ठ पुस्तकांच्या ओझ्याखालीं जन्म घालविलेल्या मजसारख्या माणसानें स्वतःची कुवत न ओळखतां साहित्याच्या क्षेत्रांत पाऊल टाकण्याचें धाडस करावें हा वेडेपणा खराच. परंतु वृद्धापकाल ही एक वेडाचीच अवस्था असते असें म्हणतात.

सुहृदांच्या संगतींतील नित्य संभाषणाचे ओघांत आयुष्यांतील अनेक बऱ्यावाईट प्रसंगांची पुष्कळ वेळां उजळणी होत असते. हे प्रसंग केवळ स्मृतिसंपुटांतच कोंडले न ठेवतां त्यांना प्रकाशांत आणावें अशी इच्छा माळव्यांतील प्रसिद्ध कवि व ' मालव साहित्य ' या त्रैमासिकाचे प्रमुख संपादक माझे मित्र श्रीयुत दादा आपटे व श्री. म. रा. उपासनी यांनीं अनेक वेळां व्यक्त केली. साहित्याचा व्यासंग अगदींच तोकडा, लेखनाचा सराव नाहीं, भाषेचें भांडवल बेताबाताचें अशा स्थितींत मी त्यांच्या आग्रहाला बळी पडलों, आणि आश्चर्य असें कीं माळव्यांतले ज्येष्ठ व श्रेष्ठ कवि आणि टीकाकार श्री. नरहर शंकर रहाळकर, ' मराठी साहित्य समालोचन ' या विख्यात ग्रंथाचे लेखक आमदार श्री. विनायक सीताराम सरवटे आणि ' नीति आणि कलोपासना ' व ' गीता तत्व-दर्शन ' या ग्रंथांनीं महाराष्ट्रास सुपरिचित झालेले प्रा. ग. वा. कवीश्वर यांच्यासारख्या विद्वान् व अधिकारी मंडळींनींहि माझ्या या वेडाला उचलून धरिलें !

मजसारख्या सामान्य मनुष्याच्या जीवनांत विशेष तें काय असणार ? तथापि आयुष्याचे मार्गावरील आपले बरेवाईट अनुभव आठवणें म्हणजे गतायुष्याचें सिंहावलोकनच नव्हे का ? निदान मला स्वतःला तरी या सिंहावलोकनापासून—आत्मनिरीक्षणापासून—अपरिमित, अवर्णनीय आनंद होत आला आहे, इतकेंच काय पण माझ्या मित्रांनाहि, अनेक प्रसंगीं या गतस्मृतींच्या कथाश्रवणापासून मनमोकळा आनंद झालेला मी अनुभविला आहे. मग

त्याच निवडक आठवणींचा थोडासा रसास्वाद इतर रसिकांनाहि चाखावयास देण्याची संधि मिळाल्यास त्या आनंदांत भरच पडेल हा स्वार्थी हेतूहि या धाडसामागें दडला नसेलच असें नाहीं.

हा धाडसी प्रयोग प्रकाशांत आणण्याचे कामीं ज्यांनीं प्रेमानें व आपुलकीनें, पुस्तक लिहावयास घेतल्यापासून तों छापखान्यांतून तें बाहेर पडेपावेतों, सतत व हरप्रकारें मला सहाय्य केलें ते माझे मित्र श्री. दादा आपटे यांच्याविषयीं काय आणि किती लिहावें ?

महाराष्ट्रांतील ख्यातनाम साहित्यिक आणि मार्मिक समीक्षक श्री. वि. स. ऊर्फ भाऊसाहेब खांडेकर यांनीं माझ्या या साध्यासुध्या कृतीला, प्रकृतीचें अस्वास्थ्य, कौटुंबिक अडचणी व अनेक कामांचा व्याप मागें असतांहि अत्यंत आत्मीयतेनें प्रस्तावना लिहिण्याचा मजवर अनुग्रह करून मला जन्माचें ऋणी करून ठेवलें आहे.

मुद्रितें तपासण्याचे किचकट पण महत्वाचे कामीं माझे मित्र श्री. प्र. गो. घाटे यांनीं आपलेपणानें केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे.

महाराष्ट्रापासून दूर असलेल्या इंदूरसारख्या हिंदी भाषीय प्रदेशांत छपाईचें काम पुण्या-मुंबईसारखें उत्कृष्ट होणें शक्य नसलें तरी ‘ दत्त प्रिंटिंग वर्क्स ’ चे मालक श्री. पानसे यांनीं केवळ व्यावहारिक दृष्टि न ठेवतां छपाईचें काम आपुलकीनें व शक्य तितकें सुबक करण्याचे श्रम घेतले याबद्दल त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

थकल्या भागल्या जीवास ‘ माझी वाटचाल ’ थोडातरी विरंगुळा देऊं शकल्यास मी स्वतःला कृतार्थ समजेन.

१३ म्युनिसिपल ऑफिस रोड
इंदूर ( मध्यभारत )
२८ डिसेंबर १९५४

–द. रा. पिंगे

# माझी वाटचाल

( माझ्या जीवनांतील निवडक आठवणी )

# माझी वाटचाल

1228

## टप्पा पहिला

### शिक्षणाचा ओनामा

असें सांगतात कीं माझा जन्म आश्विन वद्य १३ शके १८०७, तारीख ४ नवंबर १८८५ रोजीं रत्नागिरी जिल्ह्यांतील मालवण तालुक्यांतील आचरें या गांवीं माझ्या आजोळीं झाला. माझ्या मातापित्यांचा मी पहिला मुलगा. पहिल्या मुलावर आई-बाप आजा-आजी यांचें विशेष प्रेम असतें असा सर्वसाधारण अनुभव आहे. परंतु कां कोणास ठाऊक हें भाग्य माझ्या वाट्याला आलें नाहीं !

मी त्यावेळीं ३–३॥ वर्षांचा असेन. पण ती गोष्ट अजूनहि माझ्या स्मरणांत अगदीं स्पष्ट आणि ताजी आहे. मी त्यावेळीं कुरुंदवाड येथें माझ्या वडिलांपाशीं होतों. आपला मुलगा शिकून मोठा विद्वान् व्हावा, वकील बॅरिस्टर व्हावा अशी त्यांची महत्वाकांक्षा असावी आणि म्हणूनच इतक्या लहान वयांत त्यांनीं मला त्या काळच्या एका तात्या पंतोजीच्या शाळेंत घातलें. ही शाळा आम्ही रहात होतों त्या घराचे तळमजल्यावर होती. आम्ही दुसऱ्या मजल्यावर रहात होतों. त्यावेळच्या तात्या पंतोजींच्या शाळा ज्यांनीं पाहिल्या असतील किंवा अशा शाळांत ज्यांनीं प्रत्यक्ष शिक्षण घेतलें असेल त्यांनाच त्या शाळांची यथार्थ कल्पना येऊं शकेल. पंतोजीचें तें दरडावणें, कानपिचक्या देणें, उठाबशा काढविणें, अंगठे धरविणें, कोलदांडा घालणें, घोडीवर टांगणें, खुर्ची देणें, छडीनें बेदम चोपणें, इत्यादि, इत्यादि शिक्षणाचीं अनेक साधनें पाहिल्यावर कोणतें मूल त्या शाळेंत सुखासमाधानानें

आणि स्वेच्छेनें शिक्षणाचा रसास्वाद घ्यावयास गेलें असेल व शिकलें असेल देव जाणे !—अलीकडील मॉन्टेसरी अथवा किंडरगार्टन् पद्धतीचीं बालमंदिरें व शिशुविहार कोठें आणि वरील विविध आयुधांनीं सज्ज अशा तात्या पंतोजींच्या त्या काळच्या शाळा कोठें ! परंतु दुर्दैवानें तो काळ बालमंदिरांचा नव्हता आणि आमच्या वडिलांना तर आम्हाला लवकर शहाणें करावयाचें होतें; तेव्हां असलेल्या साधनांचाच उपयोग करून घेणें त्यांना भाग होतें.

एके दिवशीं शाळेंत न जाण्याचे इराद्यानें आमची स्वारी दडून बसलेली आमच्या वडिलांचे दृष्टीस पडली. मग काय विचारतां ? एक दोन दरडावण्यांनींहि मी जागचा हालत नाहीं हें पाहतांच त्यांनीं आम्हांस बखोटीस धरून रागारागानें जिन्यापावेतों ओढीत नेलें व तेथून जी एक जोराची लाथ मारली ते आम्ही गडगडत – विनाश्रमानें – जिन्याच्या खालच्या पायरीशीं – म्हणजे शाळेच्या दारांत – येऊन दाखल झालों ! असा आहे आमच्या शिक्षणाचा 'ओनामा' !

## चिलमीचा धूर : २ :

लहान मुलांची वृत्ति अनुकरणशील असते. मोठ्या माणसांचें अनुकरण करण्यांत मुलांना अतीव आनंद होत असतो. अनुकरणाचा असाच आनंद चाखण्याची मला एकदां तीव्र इच्छा उत्पन्न झाली. पूर्वीचे काळीं विड्या अथवा सिगारेट्स विशेष प्रचारांत आल्या नव्हत्या. आमचे वडील त्यावेळीं ( अंदाजें सन १८९० ) चिलमीचा उपयोग करीत असत. एके दिवशीं दुपारचें जेवण आटोपून वडिलांनीं कोर्टांत जाण्यापूर्वीं नित्यक्रमानुसार चिलीम रिकामी केली, तींत तंबाखू भरली, साफी भिजवून चिलमीला नेसाविली आणि वर निखारा ठेवून झुरके घेत घेत धूर काढावयास सुरवात केली. ही गम्मत मी आडून पहात होतों. विशेषतः चिलमींतला धूर पोटांत घेऊन नाकातोंडावाटें बाहेर काढण्याच्या त्या विलक्षण कौशल्याबद्दल माझ्या बालमनांत कुतूहल निर्माण झालें तर नवल नव्हतें. वडील केव्हां जातात याची आतुरतेनें वाट पहात मी तेथेंच आड उभा होतों. वडिलांनीं चिलीम

कोपऱ्यांत ठेवली, अंगरखा घातला, डोक्यास रुमाल चढविला आणि आपले कागदपत्र घेऊन ते कचेरीस गेले. आतां आमचेंच राज्य होतें. संध्याकाळ-पावेतों ते परत येणार नाहींत याबद्दल माझी खात्री होती. ते गेलेले पाहतांच मी हळूच लपत छपत, दबकत दबकत चिलमीजवळ गेलों, ती उचलली, ऐटीनें डाव्या हातांत धरली, उजव्या हातानें तिला नीट सावरून - तोंडाशीं नेली आणि धूर काढण्याचा कसून प्रयत्न करूं लागलों. परंतु काय असेल तें असो, चिलमींतून धूर काढण्याचें तंत्र कांहीं जमेना. फिरून यत्न करण्यांत मी अगदीं गढून गेलों होतों. चिलमींतून धूर काढण्याचे प्रयत्नांत सफलता मिळत नसल्यानें मी अगदीं कावून गेलों आणि वैतागून व कंटाळून चिलीम पुन्हां जागच्या जागीं ठेवावी या इरायानें बाजूस वळलों तोंच–अरे बाप रे !! माझे वडील इंगळासारखे लाल डोळे करून माझ्यासमोर उभे ! त्यांना पाहतांच माझी काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी. मी अगदीं गर्भगळित होऊन गेलों होतों. अनुकरणाचा आनंद कोठल्या कोठें अंतर्धान पावला होता आणि पुढें वाढून आलेल्या प्रसंगानें माझ्या काळजाचें पाणी पाणी झालें होतें ! पुढें काय प्रकार घडला असेल हें सांगण्याची आवश्यकताच आहे का ? आमच्या अनुकरणशीलतेचें कौतुक अथवा चोज बाजूलाच राहिलें पण आमच्या पाठीचा मात्र खरपूस समाचार घेतला गेला !

## घी देखा, लेकिन्... : ३ :

लग्नमुंजीचे दिवस. घरासमोर किंवा जवळपास कोणाच्याहि घरीं ताशेवाजंत्री वाजत असलीं तर लहान मुलें आणि तरुणच काय पण वृद्ध-देखील तीं पहावयास ओटीवर अथवा सज्जांत धावतात. आमच्या शेजारच्या घरीं लग्नमुंजीचें असेंच कांहीं कार्य होतें. ताशेवाजंत्री चौघडा झडत होता. साहजिकच तिकडे जाण्याची माझ्यासारख्या पांच सहा वर्षांच्या मुलाला इच्छा झाली तर त्यांत नवल असें कांहींच नव्हतें. वेळ दोनप्रहरीं ३॥–४ची असेल. वडील कोर्टांत गेलेले. आई माजघरांत डाळ तांदूळ निवडीत

बसलेली. मी बाहेर अंगणांत खेळत होतों. सनईचे कोमल मधुर सूर कानीं पडतांच मी शेजारच्या मांडवांत पोंचलों व सनई चौघडा ऐकण्यांत रंगून गेलों. व्याहीभोजनाची पंगत नुकतीच बसली होती आणि हा सनई-चौघडा त्यावेळचा होता. त्या घराचे मालक पंक्तींतून फिरत होते. शेजारच्या वकीलांचा मुलगा समोर उभा असलेला पाहून त्यालाहि पंक्तींत सामिल करून घ्यावें अशी त्यांना साहजिकच दुर्बुद्धि ( ? ) झाली व त्यांनीं मला जेवावयास बसण्याचा आग्रह केला. मी हो–ना केलें. पण घरमालकांचा आग्रह, समोरचें पंक्तीचें लोभनीय दृश्य व मिष्टान्नें पाहून माझ्यासारख्या अल्पवयीन बालकाचा आपल्या मनावर ताबा राहणें कितपत शक्य होतें ? मी त्यांच्या आग्रहास बळी पडलों आणि पानावर जाऊन बसलों. पुढील परिणामाची कल्पनाहि त्यावेळीं माझ्या मनास शिवली नाहीं. घी देखा लेकिन् बडगा नहीं देखा ! पांच-चार मिनिटेंहि झालीं नसतील इतक्यांत माझे वडील माझ्या मागावर आले, मी जेवावयास बसलेलों पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकास पोंचली होती. वडील रागावलेले पाहून घरमालकांनीं त्यांचेपाशीं मजबद्दल बरीच रदबदली केली. जेवावयास बसण्यांत माझी कांहींच चूक नसल्याचें वडिलांस परोपरीनें सांगून पाहिलें. ‘ तो नाहींच म्हणत होता परंतु आपल्या विशेष आग्रहावरूनच तो बसला ’ असेंहि सांगितलें, परंतु त्याचा कांहींदेखील उपयोग झाला नाहीं आमच्या वडिलांनीं भर पंक्तींतून मला दरदरां ओढलें, दोन-चार श्रीमुखांत भडकावल्या; परंतु तेवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. अंगणांत एक एरंडाचें झाड होतें त्याची एक डहाळी त्यांनीं तोडली व गुरासारखें बडवीत बडवीत मला घरापावेतों आणलें ! हा खाऊ मला पुढें महिना सव्वा महिना पुरला. कारण एरंडाच्या फोकानें झालेली जखम भरून यावयास एवढा कालावधि लागला आणि या घटनेची कायमची आठवण म्हणून पैशाएवढी एक माव माझ्या उजव्या मांडीवर अजूनहि दिसत आहे ! आगंतुक म्हणून कोठें जाऊं नये हा धडा मला इतका महाग पडला !

## तिळगुळ घ्या, गोड बोला !! 

लहान मुलांचा उत्साह केव्हां केव्हां इतका उतास जातो कीं त्यांना भोंवतालच्या परिस्थितीचें भानच रहात नाहीं. मकर संक्रांतीचा दिवस. आम्ही रहात असलेल्या गांवच्या रिवाजाप्रमाणें आम्ही समवयस्क दहाबारा मुलें सकाळीं ८॥–९ चे सुमारास तिळगुळानें भरलेले रंगीबेरंगी कागदी पुडे हातांत घेऊन प्रथम तेथील प्रसिद्ध श्रीरामचंद्रास आणि नंतर इतर अन्य देवतांस तिळगुळ देण्याकरितां म्हणून बाहेर पडलों. राम, शंकर, विष्णु, विठोबा, गणपति, मारुती करतां करतां गांवांतील अनेक देवदेवतांचीं दर्शनें आम्ही बालगोपालांनीं घेतलीं आणि त्यांचेपुढें भक्तिभावानें तिळगूळ ठेवून नवस केले कीं, ' देवा, तिळगूळ घ्या, गोड बोला आणि आम्हाला सुखी ठेवा.' परंतु हे आमचे अंतःकरणपूर्वक केलेले नवस एक तर त्या देवांनां, आम्हा बालकांच्या कोत्या आवाजामुळें, ऐकूं गेले नसावे, किंवा आम्ही त्यांचेपुढें ठेवलेल्या तिळगुळांत कांहीं वैगुण्य तरी असावें असा माझा अजूनहि समज आहे. कारण इतक्या देवदेवतांना तिळगुळाचा भोग अर्पण करूनहि आमचा भोग उभा राहिला तो राहिलाच. बारा साडेबारा वाजतां आम्ही घरीं येतों तों मजपुढें निराळेंच ताट वाढून ठेवलें होतें ! घराकडे पाय वळतांच इतका उशीर झाल्याबद्दल हृदयांत कालवाकालव सुरू झालीच होती. चोराच्या पावलांनीं मी दरवाजांत प्रवेश करतों तोंच ' कां रे , इतका वेळ कुठें होतास ? ' अशी दरडावणीच्या स्वरांत आमच्या वडिलांनीं पृच्छा केली. अनपेक्षित उशीर झाल्यामुळें अगोदरच पोटांत धाकधुक होत होतें, त्यांत या दरडावणीनें तर मी अगदीं गर्भगळितच होऊन गेलों. माझ्या तोंडावाटें शब्दहि फुटेना. ' वाचा बसली का ? मी कोणास विचारतों आहे ? इतका वेळ कुठें होतास ? ' पुन्हां दरडावणी झाली. पण यावेळीं ती नुसती दरडावणीच नव्हती, तर त्या दरडावणीबरोबरच आमच्या श्रीमुखांत काडकन् एक थप्पडहि बसली होती. कसें तरी त–प त–प करीत ' रामाच्या देवळांत ' एवढे शब्द मी उच्चारले मात्र, लागलीच दुसरी जोराची थप्पड गालावर आदळली ! इतका प्रकार होतो तों माझी आजी ( वडिलांची आई ) व मातोश्री बाहेर आल्या. आजीनें म्हटलें

'अरे, जाऊं दे, पोरवय आहे. गेला असेल इतर मुलांबरोबर. वेळेचें भान राहिलें नाहीं. पुरे झालें आतां. आज सणाचा दिवस, पोराला किती मारा-वयाचें ? ' आजीनें इतकें म्हणतांच ' पोर ? कसला आला आहे पोर ? बारा वाजले तरी घरीं येण्याची शुद्ध नाहीं ' असें म्हणत तिसरी थप्पड आमचे गालावर थडकली ! इतकें झालें पण आमच्या आजीची अथवा आईची वडि-लांचे हातून मला सोडवून घेण्याची प्राज्ञा नव्हती. ' याला आतां आज जेवण वगैरे कांहीं नाहीं, याला बांधूनच घातलें पाहिजे म्हणजे पुन्हां हा बाहेर जाणार नाहीं. ' असें गर्जून वडिलांनीं लागलीच एक दोरी काढली, माझे हात-पाय करकचून बांधून माझी मोटली वामकुक्षीकरतां पसरलेल्या बिछान्याच्या उशाशीं आदळली आणि ते आरामानें पांघरूण घेऊन बिछान्या-वर आडवे झाले ! मी मनांत म्हटलें ' हे देवाधिदेवा, इतक्या अनन्य भक्ति-भावानें सकाळींच येऊन तुला तिळगूळ अर्पण केला व ' गोड बोला ' असें विनविलें त्याचें हेंच फळ का ? ' पोटांत भुकेनें काहूर माजविलें होतें आणि थपडा खाऊन खाऊन गाल अगदीं सुन्न होऊन गेले होते. पंधरा वीस मिनिटांत आमच्या वडिलांचा डोळा लागला आणि मला वाटतें माराच्या श्रमानें माझाहि डोळा लागला असावा. इतक्यांत माझ्या हाता-पायाला बांध-लेल्या दोऱ्या कोणीतरी सोडीत असल्याचा मला भास झाला. जागा होऊन पाहतों तों खरेंच. माझी आजी हलक्या पावलांनीं येऊन माझ्या हाता-पायाला बांधलेल्या दोऱ्या सोडीत होती. मी मोकळा झालों. आजी मला घरांत नेऊं लागली. परंतु माझा स्वाभिमान दुखावला होता. घरांत जाण्यास मी मानेनेंच नकार दिला. आजीनें मला उचलून घरांत नेलें. पाहतों तर तेथें तीन वाढलेलीं ताटें तशींच सुकत होतीं ! आजीनें मला जेवण्याचा अतिशय आग्रह केला, नानापरीनें समजावलें परंतु माझ्या मानी–हट्टी–मनानें न जेवण्याचा दुराग्रह कायमच ठेवला. अखेर आजी कंटाळली आणि ' मर मेल्या ' असें म्हणून पुन्हां मला तिनें वडिलांच्या उशाशीं नेलें आणि पूर्ववत् चतुर्भुज करून ठेवलें ! चार वाजतांचे सुमारास वडील जागे झाले. माझी बांधलेली मोटली तशीच उशाशीं पडलेली होती. आजी हळूच आली व वडिलांना म्हणाली

' अरे, आतां तरी सोड त्याला. दिवसभराचा उपाशी, कळवळला असेल पोर अगदीं. ' ' मरूं दे शिंच्याला ' असें म्हणून आमचे वडील तेथून उठून गेले आणि नंतर आजीनें आम्हांला त्या बंधनांतून कायदेशीरपणें मुक्त केलें !

पुन्हां देवाला तिळगूळ म्हणून द्यावयाचा नाहीं असा मी तेव्हांपासून मनाशीं निश्चय केला.

## देव तारी त्याला कोण मारी ? :५:

दत्तजयंतीचा दिवस. आम्ही रहात असलेलें गांव प्रसिद्ध नरसोबाच्या वाडीपासून अवघ्या दीड दोन मैलांच्या अंतरावर होतें. दूरदूरचे लोक दत्त-जयंतीची पर्वणी साधून श्री दत्तात्रेयाचे दर्शनाकरतां लोटतात, मग इतके नजिक असणारांनीं ही संधि वांया कशी घालवावयाची ? आम्हीहि ( मी, माझी आई व धाकटा भाऊ ) भल्या पहांटे स्नानें वगैरे उरकून नरसोबाचे वाडीस पायींच निघालों. प्रातःकाळची शांत सुरम्य वेळ, दत्तदर्शनाची उत्सुकता आणि विशेषतः खूप मोकळें हिंडाफिरावयास व गंमत करावयास मिळणार म्हणून झालेला आनंद यामुळें आम्हां दोघां बंधूंच्या कानांत वारें भरल्यासारखें झालें होतें आणि रस्त्यानें जात असतां आम्हां दोघांसहि आवरणें आमच्या आईस अतिशय बिकट होत होतें. आमचें गांव आणि नरसोबाची वाडी यांमधून कृष्णा नदी वहाते. नदीचें पात्र बरेंच रुंद आहे. त्यावेळीं (१८९२) नदीवर पूल बांधला नव्हता. नदी पार करूनच पलीकडे जावें लागे. नदीला पाणी अगदीं कमी—गुडघ्यापेक्षांहि कमी-व तें कांचेसारखें निर्मळ-स्वच्छ-होतें. तळाची वाळू, दगड अगदीं स्पष्ट दिसत होते. नदीच्या पात्राजवळ येतांच आईनें आम्हां दोघांस दोन हातांनीं धरलें व आम्ही नदी उतरूं लागलों. पायांना पाण्याचा स्पर्श होतांच माझ्या हृदयांत जणूं विद्युत्संचार झाल्यासारखें झालें आणि पायानें पाणी उडवीत चालतां चालतां मी एकदम झटक्यानें आईचा हात सोडून पाण्यांत इच्छेस येईल तिकडे धावूं लागलों. ' अरे, इकडे ये, अरे इकडे ये, पलीकडे जाऊं नकोस ' असें आई ओरडतच होती. पण तिकडे कोणाचें लक्ष होतें ? पाणी गुडघ्याचे वर

नसल्यानें आणि खालची वाळू अगदीं स्पष्ट दिसत असल्यानें मी वाट फुटेल तसा धांवतच होतों. असें करतां करतां मी आईपासून १०–१२ यार्ड दूर गेलों असेन, आणि अरे बाप रे !! माझा पाय अकस्मात् खोलांत गेल्यासारखा मला वाटला. दुसऱ्याच क्षणाला ' अग, आई ग ! ' असें ओरडत आमची स्वारी कृष्णास्नान करती झाली ! झालें, एकदम आईची किंकाळी व जवळपास असणाऱ्या इतर लोकांच्या 'अरे मुलगा पडला, मुलगा बुडाला' अशा आरोळ्यांनीं वातावरण भरून गेलें. लोक नुसते ओरडत होते. माझी आई तर हतबुद्धच होऊन गेली होती. काय करावें हेंच तिला सुचेना. 'अहो त्याला काढा हो, अहो त्याला वांचवा हो' असें ती केविलवाण्या स्वरांत सर्वांस विनवीत होती. परंतु मला वर काढण्याकरतां त्या तमासगिरांपैकीं एकहि प्राणी पुढें सरसावला नाहीं ! मी तर एक दोन गटंगळ्या खाऊन खालीं खालीं वहात चाललों होतों. आणखी एक दोन मिनिटें विलंब लागला असता तर मला तेथेंच जलसमाधि मिळाली असती आणि या आठवणी लिहिण्याचा प्रसंगच आला नसता. परंतु तसें व्हावयाचें नव्हतें म्हणूनच कीं काय पलीकडील डोहांत आपल्या म्हशींना धूत असलेल्या एका गुराख्याच्या मुलाचें मजकडे लक्ष्य गेलें. तो डोहांतून तीरासारखा वेगानें पोहत आला व एका क्षणांत त्यानें मला वर काढलें आणि तीरावर आणलें ! दत्तदर्शनाचे ऐवजीं यमदर्शनच व्हावयाचें परंतु तें टळलें. दत्तदर्शनाला मी मुकलों परंतु कृष्णास्नानाचें अविस्मरणीय पुण्य मात्र भरपूर पदरीं पडलें !

## ओले काजूगर : ६ :

शाळेत जाणारीं सात आठ वर्षांचीं मुलें घरून निघून सरळ शांतपणें शाळेला गेलीं तर तीं मुलेंच कसलीं ? बरोबरच्या सोबत्यांपैकीं कोणाची टोपीच उडवितील, रस्त्यावरील कुत्र्याचें शेपूटच ओढतील, उकिरड्यावरच्या एखाद्या कोंबड्याला दगड मारतील, आंब्याच्या झाडावरील कैऱ्याच तोडून खातील, अशा एक ना दोन अनेक प्रकारच्या खोड्या करीत करीत तीं शाळेंत गेलीं नाहींत तर तीं मुलेंच नव्हत.

आम्हीहि एक दिवस असेच शाळेला जात होतों. रस्त्यानें दुतर्फा काजूचीं झाडें हिरव्या, पिवळ्या, शेंदरी रंगाच्या चंबूवजा सुंदर फळांनीं आपल्या सुंदरतेंत अधिकच भर घालून आम्हांला जणूं आपल्याकडे बोलावीत होतीं. ते सुंदर बोंडू आणि त्यांना बिलगून लोलकाप्रमाणें खालीं लोंबणारे व डौलानें मिरविणारे काजू पाहून आमचीं मनें लालचावलीं असल्यास नवल नाहीं. शाळेला निघालेलीं मुलें भराभर झाडावर चढलीं, पाच पन्नास बोंडू तोडून खालीं टाकले, दगडांनीं काजूच्या बिया फोडून त्यांतील बदामासहि लाजविणारे ओले रुचकर गर खाऊन फस्त केले आणि नंतर आम्ही कच्चे पक्के बोंडू खिशांत कोंबून शाळेंत पोंहोचलों.

काजूच्या बियांना एक प्रकारचा चीक असतो. काजू फोडतांना तो हातास लागला तर हातांना फोड येतात याची आम्हांस शुद्धहि नव्हती! वरील घटनेनंतर तीन चार दिवसांनीं माझ्या दोन्ही हातांवर पुरळ दिसूं लागला: दोन्ही हात लालबुंद झाले. अर्थात् तें आतां लपविणें शक्यच नव्हतें. आजीला तो पुरळ दाखविला. मकडी वगैरे हातांनीं नकळत चिरडली गेली असावी असा तिनें तर्क केला. आजोबांचे कानांवर ही गोष्ट गेली. त्यांनीं माझ्या हाताचे तळवे पाहिले आणि ते लागलीच आजीला म्हणाले, ' अहो, ही मकडी कसची? हा तर काजीचा चीक आहे. ' आजीला असें म्हणून त्यांनीं दरडावणीच्या स्वरांत मला विचारलें ' काय रे, शाळेच्या वाटेवर काजूचीं झाडें आहेतना? मग तूं किती बिया फोडून खाल्यास? ' ' नाहीं, मी नाहीं काजी फोडल्या ' असें मीं उत्तर दिलें मात्र, माझे दोन्ही हात लालबुंद झाले होतेच, त्यांचे जोडीला डावा गालहि लालबुंद झाला! ' बोल, किती काजी फोडून खाल्यास! ' पुन्हां आजोबांकडून जोराची दरडावणी आली. ' तीन चारच ' मी उत्तर दिलें. ' मग खोटें कां बोललास? ' असें गर्जून पुन्हा एक थप्पड बसली! ' आतां नाहीं करणार ' अशी कबूली दिल्यावर आमची सुटका झाली! काजूगरांनीं आमची खोडी आणि चोरी दोन्ही उघडकीस आणिल्या! चोरी नि लबाडी करण्याला कौशल्य व बुद्धि

लागते हें तर खरेंच; पण ती पचवावयाला त्याहूनहि अधिक कौशल्याची आणि बुद्धिमत्तेची आवश्यकता असते हें तत्त्वहि ध्यानीं आलें !

## नाटकांत नाटक.　　: ७ :

सन १८९५–९६ चे सुमारास नाटक-कंपन्या फारशा नव्हत्याच आणि थोड्याबहुत असल्या तरी त्या भिकार कोंकणांतल्या एखाद्या क्षुल्लक तालुक्याच्या गांवीं येणें तर शक्यच नव्हतें. आमची नाटकाची भूक देवळांच्या प्राकारांत होणाऱ्या ललितांवरच आम्हांस भागवावी लागे. अशा वेळीं आमच्या गांवांतील एका हौशी दागदरास ( हे गृहस्थ वास्तविक काम्पाउन्डर असून त्या गांवीं डॉक्टरीचा धंदा करीत असत आणि त्यांना डॉक्टर म्हणूनच संबोधिलें जात असे ) ' हरिश्चन्द्र तारामति ' नाटक बसविण्याची स्फूर्ति झाली व ते नाटक बसविण्याचे तयारीस लागले. सर्व पात्रें मिळालीं परंतु हरिश्चन्द्र तारामतीचा मुलगा रोहिदास याच्या बालमित्राचें पात्र बिचाऱ्यास मनासारखें मिळेना. बरीचशी खटपट केल्यानंतर त्याला हें पात्र मिळालें. परंतु त्यांत एक मोठी अडचण होती. त्या पात्राच्या पालकाची नाटकांत काम करावयास संमति मिळणें अतिशय दुर्घट–नव्हे अशक्य–होतें. शेवटीं उपरोक्त दागदर व हें बालमित्राचें पात्र यांनीं एक कट रचला आणि नाटकाच्या तालमीला सुरवात झाली.

नाटक बसलें. रंगीत तालीमहि झाली. प्रयोग उद्यांवर आला आणि त्याचे आदले दिवशीं माझ्या आजोबांकडे तीन फ्री पास आले. एक खुर्चीचा, एक स्त्रियांचा व एक ओट्याचा. आजोबा नाटकाचे कट्टर विरोधी, परंतु फ्री पास आलेले आणि शिवाय ते दागदरांकडून, म्हणजे ज्यांच्या घरांत आम्ही भाड्यानें रहात होतों अशा गृहस्थाकडून– व त्यांना दुखविणें अनेक कारणांनीं इष्ट नव्हतें; तेव्हां नाइलाजानें त्यांनीं नाटकास जावयाचें ठरविलें. आमचीहि अर्थात् आपोआपच वर्णी लागली. आजी नाटकास गेल्या नाहींत. आजोबा खुर्चीवर बसले. मी ओट्यावर गेलों. नाटक सुरू झालें. पहिले तीन अंक छान

१८०८८ ११ ४०७ ९१९

रंगले. चवथा अंक रोहिदास आपल्या सवंगड्याबरोबर अरण्यांत जातो व त्याला सर्पदंश होतो त्या प्रसंगाचा. तिसरा अंक संपतांच लोक बाहेर आले त्यांचेबरोबर मीहि बाहेर आलों होतों. चवथ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशाकरितां पडदा वर गेला. रोहिदासाबरोबर त्याचा जो सवंगडी रंगभूमीवर आला. त्याला पाहतांच आजोबा कमालीचे बेचैन झालेले दिसले. त्यांनीं बसल्या ठिकाणींच विलक्षण चुळबुळ केली परंतु त्यांना त्यावेळीं कांहींच करतां येण्याजोगें नव्हतें! नाटक संपलें. नाटकांतलें नाटकहि संपलें. घरीं आल्यावर आम्हाला नाटकाचा भरपूर प्रसाद मिळाला हें सांगण्याची आवश्यकता नाहीं!

## औट घटकेचें स्वातंत्र्य. : ८ :

स्वातंत्र्य हा मनुष्यप्राण्याचा जन्मसिद्ध हक्क आहे. या हक्कावर एका विशिष्ट मर्यादेपेक्षां अधिक दडपण येऊं लागलें कीं त्याच्या सुप्त शक्ति बंड पुकारतात आणि आपलें जन्मसिद्ध स्वातंत्र्य हस्तगत करतात. मानसशास्त्रज्ञ मानवाचे विकासांत बालकाच्या या स्वतंत्र वृत्तीस यत्किंचित्हि न खुडतां उलट शक्य तितकें पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रत्यहीं आटापीटा करीत आहेत आणि आजकालचीं बालमंदिरें याच विचारधारेमधून उगम पावत आहेत. परंतु सन १८९४-९५ चे कालांत ही विचारधारा दुर्मिळच होती. 'छडी लागे छम् छम्' हाच त्यावेळचा सर्वसामान्य दंडक आणि माझें शिक्षण व माझा मनोविकास (?) याच धोरणानें चालू होता! परंतु घरीं आणि दारीं उपयोगांत आणल्या जाणाऱ्या बुद्धिविकासाच्या या कठोर साधनांचा माझ्या बालमनाला अत्यंत तिटकारा आला. माझ्या अल्प विचारशक्तीला शक्य तितका ताण मी देत होतों व या आपत्तींतून कशी सुटका करून घ्यावी ह्याविषयीं मनाशीं बेत रचित होतों. शेवटीं या सर्वमान्य शिक्षणप्रथेशीं माझ्या बालमनानें बंड पुकारण्याचा निश्चय केला व स्वतंत्र वातावरणांत विहार करण्याच्या इरायानें एका सुप्रभातीं घरांतील मंडळी उठण्यापूर्वींच आमची स्वारी घराला राम राम ठोकती झाली! (अंदाजें सन १८९५)

मी घराबाहेर पडलों तो जवळ जवळ संधिप्रकाशांतच. अंगावरील कपडे म्हणजे पैरण ( सदरा ), इजार, कोट आणि टोपी. यांशिवाय बरोबर कांहीं-एक नव्हतें. नाहीं म्हणावयास मनाचे श्लोकांचें एक लहानसें चोपडें माझ्या खिशांत होतें. पहाटेची संधिप्रकाशाची वेळ, मंद शीतल वारा वाहत असलेला, पक्षी झाडांवर किलबिल करूं लागलेले आणि आतां मीं स्वतंत्र झालों या भावनेनें मन उल्हसित झालेलें अशा मनःस्थितींत मी वाट चालूं लागलों. कोठें जावयाचें, काय करावयाचें ह्याविषयीं कांहींदेखील निश्चित कल्पना मनाशीं ठरविलेली नव्हती. घरांतून—माझ्या त्यावेळच्या समजुतीप्रमाणें यमयातनांतून—निसटलों एकदांचा, या आनंदानेंच सारें मन भारून गेलेलें. इतर विचारांची छायाहि अशा वेळीं मनास शिवणें शक्य नव्हतें. सूर्य उगवला. हळू हळू क्षितिजावर येणाऱ्या सूर्यबिंबाचें तें अप्रतिम हृदयंगम दृश्य पाहून मी आनंदसागरांत पोहूं लागलों. वाटचाल चालूच होती. सूर्य हळू हळू आणखी वर आला आणि सारी पृथ्वी सुवर्णरसानें न्हाऊन निघाली. ऊन्ह चढत गेलें तों तों चालण्याचे श्रम थोडे थोडे जाणवूं लागले होते, पण घरापासून दूर दूर जावयाचें ही एकच एक कल्पना डोक्यांत ठाण मांडून बसली असल्यानें त्या श्रमांचें कांहींच वाटत नव्हतें. सूर्य आणखी वर आला. उन्हाचे तडाखे विशेष जाणवूं लागले. माझी गति थोडी मंदावली. तरीहि रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दाट वृक्षांच्या छायेतून मी वाट चालतच होतों. अशी वाट चालतां चालतां १०॥–११ वाजले असावे. उन्हाची प्रखरता आतां बरीच वाढली होती आणि मला सपाटून तहानहि लागली होती. आतां पाणी कोठें मिळेल हा प्रश्न माझेसमोर उभा राहिला. इतक्यांत लाकडें विकावयास कांहीं मोळीवाल्या महारणी बाजारास जात असलेल्या माझ्या दृष्टीस पडल्या. ‘ काय गे बाय, माकां तान लागलीसा, हंयसर पाणी खंय मिळात ? ’ असें मी एकीला विचारलें. माझा प्रश्न ऐकून त्या बाया थोड्याशा विस्मयचकितच झाल्या. कारण त्या महारणी होत्या आणि महारणींना ‘ काय गे बाय ’ या बहुवचनी संबोधनानें कोणी कधींच संबोधित नसे. ‘ काय गो ! ’ या एकवचनानेंच त्यांना नेहमीं संबोधिलें जाई. तेव्हां हा बामनाचा पोर त्यांना

'काय गे वाय' म्हणतो हें त्यांचे दृष्टीनें केवढें आश्चर्य ! माझ्या या बहुवचनी संबोधनाचा परिणाम मात्र इष्ट असाच झाला. 'कोणाचो रे तूं ?' त्या बाईनें विचारलें. आतां काय सांगावयाचें ? मोठीच समस्या मजपुढें उभी राहिली. फार वेळ विचारांत न घालवितां मी तात्काळ तिला उत्तर दिलें कीं, मी एक मातृ-पितृहीन असा गरीब मुलगा असून पोटाच्या मागें भटकतों आहे. हें माझें उत्तर ऐकून ती माउली खरोखरच कळवळली. आई-बापाविरहित ८-९ वर्षांचें कोवळें पोर, अशा उन्हातान्हांतून पोटार्थी वणवण भटकत असलेलें पाहून त्या माउलीचे पोटीं दयेचा पाझर फुटला. 'अरेरे !' असा उद्गार काढून ती म्हणाली 'बामणाकडेन रवशीत ?' मी म्हणालों 'खंय पण रवान्.' त्या बाईनें लागलीच आपल्या बरोबरच्या बायांस पुढें जाण्यास सांगितलें आणि ती मला म्हणाली 'चल, बामणाच्या घराक् जांवयां.'

मोठी सडक सोडून एका पायवाटेनें ती बाई पुढें व मी मागें असे जाऊं लागलों. मी मूळचा कोठला, माझे आई-बाप कोठें होते, काय करीत होते, मी इतके दिवस कोठें होतों, काय करीत होतों इत्यादि, इत्यादि अनेक प्रश्न तिनें मला विचारले आणि मला जीं कांहीं त्यावेळीं सुचलीं तीं उत्तरें मी तिला दिलीं. सर्वांचा निष्कर्ष मात्र एकच कीं त्या माझ्या उत्तरांनीं माझ्याविषयीं तिच्या मनांत अधिकच अनुकंपा उत्पन्न झाली. जवळ जवळ अर्धा तास पावेतों अशी वाटचाल केल्यावर आम्ही एका सुंदर नारळी-पोफळीच्या वाडींत येऊन पोंहोचलों. मध्येंच एक टुमदार हवेली होती आणि हवेलीच्या चोहोंबाजूस डुलत असलेली नारळी, पोफळी, फणस, रातांबे यांची चित्तोहार राई तेथील प्रसन्न वातावरणांत अधिकच भर घालीत होती हवेलीच्या सोप्यावर वाडीचे मालक एका लाकडी कोचावर बसले होते. महारणीस पाहतांच 'काय गो ?' म्हणून संबोधित मालकांनीं ती कुणीकडे आली आहे व बरोबर हा मुलगा कोण आहे म्हणून विचारलें. महारणीनें थोडक्यांत माझी सारी हकीकत मालकास सांगितली. वाडीचे मालक एक कोंकणस्थ ब्राह्मण होते. आईबापाविरहित असा एक ब्राह्मणाचा ( मी जातीनें शेणवी आहें याची

ज्याणीत्र मालकाला न देण्याची अर्थात् मी सावधगिरी बाळगली होती. नाहींतर त्या काळांत कोंकणस्थ ब्राह्मणाचे घरांत शेणव्याच्या मुलाला प्रवेश मिळणेंच अशक्य होतें ! ) मुलगा केवळ अन्नावारी राबवून घ्यावयास मिळतो ही सुवर्णसंधि हे कोंकणस्थ भाई हातची थोडीच दवडणार ? मालकांनीं माझी जुजवी चौकशी केली. झाडांना पाणी लावशील का ? धोतरें धुशील का ? वगैरे प्रश्न विचारले आणि मला ठेवून घेऊन महारणीस रवाना केलें. मी महारणीस ( मनानेंच ) धन्यवाद दिले. महारीण गेली. मी हातपाय धुतले, तांब्याभर पाणी प्यालों आणि मालकाचे पुढील हुकमाची वाट पहात तेथेंच उभा राहिलों. मी आतां ' अनंता कुळकर्णी ' किंवा ' अंतू ' झालों होतों. मालकांनीं मला घरांत नेलें, घरांतील मंडळीशीं माझा परिचय करून दिला. माझें स्नान झालें, जेवणहि झालें आणि बाहेर सोप्यावर येऊन एका गोणपटावर मी पहुडलों.

दोनप्रहरीं रहाटावर बसून माडांस व पोफळींस पाणी लावण्याचा मालकांनीं मला हुकुम केला. पायरहाटावर बसून पाणी ओढण्याची मला कधींच सवय नव्हती. मात्र रहाटावर बसून पाणी कसें ओढतात तें मी डोळ्यांनीं पाहिलेलें होतें. मला रहाटाचें पाणी ओढण्याचा सराव नाहीं असें मालकास सांगणें मला कमीपणाचें वाटलें. मी सरळ जाऊन रहाटाचे फळीवर बसलों व रहाटाच्या आडव्या दांड्या एकामागून एक कष्टानें ओढूं लागलों. प्रथम थोडीशी अडचण वाटली, परंतु ' निश्चयाचें बळ ' फळास आलें आणि पाणी यशस्वी रीतीनें ओढलें गेलें. एक बाई तें झाडांस देत होती. रहाट ओढीत असतां त्याचेंहि अवलोकन चाललेंच होतें. कारण आज रहाट ओढणें माझेकडे आलें तर उद्यां झाडांना पाणी लावणें मजकडे येणार होतें. रहाटाचें पाणी ओढण्याचें माझ्याएवढ्या लहान मुलाचें कौशल्य पाहून मालक बेहद्द खुश झाले. संध्याकाळ झाली. दिवेलावणी मीच केली. पाटपाणी केलें. जेवणें झालीं. बाहेरच्या ओटीवरच मी निद्रासुखाचा अनुभव घेण्यासाठीं पहुडलों. मात्र त्यापूर्वी मनाचे श्लोकांचा पाठ करावयास विसरलों नाहीं.

अशा रीतीनें तीन चार दिवस सुखांत गेले. माझ्या कामावर आणि वर्तणुकीवर माझे मालक निहायत खुश होते. मीहि आनंदांत होतों. इतक्यांत एके दिवशीं सकाळींच कोर्टाचे एक बेलिफ कांहीं कामाकरतां म्हणून मालकाकडे आले. त्यांना गूळपाणी घेऊन येण्याकरतां 'अंतूला' ओटीवरूनच मालकांची आज्ञा झाली आणि त्याप्रमाणें एका हातांत गुळाची वाटी व दुसऱ्या हातांत पाण्याचें तांब्याभांडें घेऊन 'अंतू' ओटीवर आला आणि समोर पाहतो तों 'अंतू'च्या परिचयाचे, 'अंतू'च्या आजोबांचे स्नेही श्री. आवळेगांवकर बसलेले! 'अंतूच्या' हातांतील तांब्याभांडें एकदम गळून पडलें! आणि तो आंत पळणार तोंच 'अरे दत्ताराम, तूं शेवटीं इथें सांपडलास!' असें आवळेगांवकर उद्गारले! या प्रश्नानें माझी काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी! आमचें स्वातंत्र्य इथेंच संपुष्टांत आलें आणि पुनश्च आम्ही आमच्या पूर्वीच्याच बंदिवासांत येऊन पडलों! देहदंड मात्र चुकला. आवळेगांवकरांची कृपा!

## व्यापाराचा श्रीगणेश :९:

कोणी पाहुणे घरीं आले म्हणजे मुलांना तो एक पर्वणीच असते. रोजच्या ठराविक कार्यक्रमांत शैथिल्य येतें. वडील माणसांचें लक्ष पाहुण्यांकडे गुंतल्यानें मुलांना मोकळेपणा मिळतो; मार मिळण्याची धास्तीहि कमी होते व घरांत खाण्यापिण्याची चंगळ असते. आमचे आतोबा श्री. हरिभाऊ राजाध्यक्ष कोल्हापुराहून आमच्या वडिलांस भेटावयास म्हणून आले होते. त्यामुळें घरांतील वातावरण बरेंच थंड होतें. आम्ही मुलें थोडी मोकळीक मिळाल्याकारणानें आनंदांत होतों. पाहुणे बरेच दिवस मुक्काम करतील तर किती बहार होईल, असें आम्हांस अंतःकरणापासून वाटत होतें. परंतु ते फार दिवस राहिले नाहींत. आले त्याचे तिसरे दिवशीं पहाटेस ते परत जावयास निघाले. आम्हीं मुलें बिछान्यांतच होतों. मी जागा आहें असें पाहून 'हें घे तुला खाऊला' असें म्हणून आतोबांनीं दोन अधेल्या माझ्या हातावर ठेवल्या. मी उठून अत्यंत आदरानें त्यांना नमस्कार केला.

कधीं नव्हे त्या एकदम दोन अधेल्या माझ्या हातांत पडलेल्या! घरांतील इतर कोणाला त्याचा मागमूस देखील नव्हता. वास्तविक त्या अधेल्या मी सरळ आईकडे नेऊन द्यावयास पाहिजे होत्या, पण द्रव्यलोभ कोणास नसतो? कधीं एक पैसा देखील हातांत न पडणाऱ्या माझ्यासारख्या मुलाला या दोन अधेल्या म्हणजे कुबेराचा खजिनाच वाटला. त्या अधेल्या कोणास न कळत मी माझ्या दप्तरांत लपवून ठेवल्या. डोक्यांत त्या दोन अधेल्यां-व्यतिरिक्त अन्य विचारच नव्हता. घाईघाईनें कसें तरी जेवण उरकून शाळेंत पळालों. शाळा सुरू व्हावयास अर्ध्या तासाचा अवकाश होता. एका जीवश्च कंठश्च मित्रास बाजूस नेऊन आपलें गुपित त्याला कथन केलें. या दोन अधेल्यांचें आतां पुढें काय करावयाचें, याबद्दल त्याच्याशीं वरीच भवति न भवति केली. माझ्या वयाच्या ९।१० वर्षाच्या मुलांना खाद्यवस्तूंशिवाय दुसरें काय प्रिय असणार? मित्रानें साहजिकच चिरमुऱ्याचे लाडू, पेढे, बर्फी, पेरू, काकड्या इत्यादींचा पाढा मजपुढें वाचला. पण तें मला मुळींच पटेना. माझें मन दुसरीकडेच धांव घेत होतें. अशाश्वतापेक्षां शाश्वताकडे मला तें ओढीत होतें. मी मित्राला म्हटलें 'छे गड्या, यांत काय अर्थ आहे? अशानें तर हे पैसे एक दोन दिवसांतच खलास होतील. तें कामाचें नाहीं. हे कसे वाढतील याची मला विवंचना लागली आहे.' 'आणखी कोणी पाहुणे येणार आहेत कीं काय?' मित्रानें विचारलें. 'हा मूर्खा' मी म्हणालों. 'दुसरा पाहुणाच कशाला पाहिजे? मला एक नामी युक्ति सुचली आहे. ती अमलांत आणल्यास थोडेच दिवसांत दोन अधेल्यांच्या चारच काय पण दहा अधेल्याहि होतील.' हें ऐकून तो बुचकळ्यांत पडला आणि प्रश्नार्थक मुद्रेनें मजकडे पहात राहिला. मी त्याला माझी कल्पना सांगतांच त्यानें एकदम माझ्या हातावर जोरानें टाळी दिली आणि म्हणाला 'हां गड्या, ही तर छान युक्ति आहे.' लागलीच आम्ही दोघे जवळच्याच एका लेखनसामुग्री (स्टेशनरी) च्या दुकानांत जाऊन कांहीं स्टेशनरी सामान खरेदी केलें आणि भागीदारीचे अटीवर आमची 'स्टेशनरी सप्लाय कंपनी' स्थापन झाली. विक्रीहि झपाट्यानें होऊं लागली. आमचा माल वडिलांचे धाकामुळें मला घरीं नेतां येणें शक्य नव्हतें

तेव्हां तो सांभाळण्याचें काम अर्थात् माझ्या भागीदार मित्राकडे होतें. आमची कंपनी शाळेंतील गरजू मुलांना स्टेशनरी पुरविण्याचें काम जोरानें करूं लागली. आमच्या नफ्याचा आढावा आम्ही–मी व माझा भागीदार–रोज संध्याकाळीं शाळा सुटल्यावर एकीकडे जाऊन घेत असू. आठ दिवसांचे आंत आम्हांस एकूण चार आणे नफा झाला होता! आता मात्र माझ्या मित्राची जीभ त्याला स्वस्थ बसूं देईना. अर्धा नफा मुद्दलांत जमा करून उरलेला अर्धा नफा खाण्यांत खर्च करण्यास मी नाइलाजानें संमति दिली. दोन आण्याचे पेरू घेतले. कांहीं तेथेंच फस्त केले आणि कांहीं तसेच खिशांत कोंबून घरीं आलों. परंतु हें सगळें करण्यांत घरीं येण्यास नेहमीपेक्षां बराच उशीर झाला. उशीराचें कारण अर्थातच मला विचारण्यांत आलें. कांहींतरी उडवा-उडवीचें उत्तर दिलें व कपडे काढावयास गेलों. कोट काढला व खुंटीवर फेकला, परंतु तो खुंटीवर न अडकतां खालीं पडला आणि दुर्दैवानें खिशांतील पेरू घळघळत जवळंच उभ्या असलेल्या माझ्या बंधूच्या पायाला लागला! झालें! आमचें कर्म लागलीच उभें राहिलें!! त्यानें तो पेरू उचलला, त्याची वर्दी आमच्या मातोश्रीला दिली आणि तेथून ती वडिलांचे कानां-पावेतों पोंचली. व्यापाराचा अंकुर अंगीं असणें हा गुन्हा ठरला! मार! तो तर पांचवीला पुजलेलाच!!

## असंगाशीं संग. : १० :

मुलांना घरीं धाक अवश्य असला पाहिजे परंतु त्याला कांहीं सीमा आहे. अति कडक शिस्तीनें व अमर्याद धाकानें मुलांच्या कोंवळ्या मनोवृत्ति खुरटून जातात, मनमोकळेपणाला तीं पारखीं होतात, आईबापापासून दुरावतात, एवढेंच नव्हे तर त्यांच्या मनावर त्याचे अनिष्ट परिणामहि घडतात.

मी इंग्रजी दुसरी अथवा तिसरींत असेंन ( सन १८९८ ). माझ्या वर्गांतील एक विद्यार्थी आमचे घराशेजारींच रहात असे. तो आणि मी

मिळूनच रोज शाळेला जात असूं. आमची दोघांची -बरीच गट्टी जमली व शाळेंत जातांना आणि येतांना त्याच्या घरींहि मी बरेच वेळां जाऊं येऊं लागलों. एके दिवशीं असाच त्याच्या घरीं गेलों असतां मी त्याला विडी ओढतांना पाहिलें. कडक शिस्तींत वाढलेल्या माझ्या मनाला तें दृश्य पाहून कसेसेंच वाटलें. मी त्याबद्दल त्याचा निषेधहि केला, परंतु त्याचे मनावर माझ्या निषेधाचा कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट हंसत हंसतच तो मला म्हणाला ‘ विडींत काय मजा आहे हें तुला कसें कळणार ! तिची लज्जत तर पहा. ’ असें म्हणून ओढीत असलेली विडीच त्यानें मजपुढें केली. बराच वेळपावेतों मी नाहीं नाही म्हटलें खरें, परंतु शेवटीं त्याच्या आग्रहाला किंवा जुलमाला म्हणा, मी बळी पडलों इतकेंच नव्हे तर थोडेच दिवसांत विड्या ओढण्यांत मी त्याच्या इतकाच तरबेज झालों ! घरच्या लोकांना अर्थातच या माझ्या पराक्रमाची दाद नव्हती व असणें शक्यहि नव्हतें. विड्या मात्र माझा मित्रच मला पुरवीत असे. कारण घरून आम्हाला एक पैसादेखील कधीं हातखर्चाला मिळत नसे आणि हातचलाखीच्या प्रयोगांत मी सर्वस्वी अनभ्यस्त होतों. आपण एक चेला तयार केला या विजयानंदांतच माझा मित्र धुंद होता आणि मुक्तहस्तानें मला विड्या पुरवीत होता. हें व्यसन मला कायमचेंच जडलें असतें. परंतु योगायोग निराळा होता. वार्षिक परीक्षेंत माझा मित्र नापास झाला. मी वरच्या वर्गांत गेलों. स्वाभाविकच त्याची माझी मैत्री पूर्वीइतकी दाट राहिली नाहीं व पुढें पुढें तर ती तुटलीच. परिणामतः मला लाभणारा विड्यांचा अखंड झराहि आटला आणि माझें विडीचें व्यसन सुटलें तें कायमचेंच.

## नाट्यलेखन :११:

मी इंग्रजी चौथींत होतों ( सन १८९९ ). वाचनाचाहि मला बराच नाद लागला होता. माझ्याहून चार-पांच वर्षांनीं वडील असलेले माझे चुलते वाचनाचे–विशेषतः मराठी वाचनाचे–अत्यंत शोकी होते. मराठींत कोणतेंहि

चांगलें पुस्तक प्रसिद्ध झालें आणि तें त्यांनीं कोठून ना कोठून हरप्रयत्नानें वाचावयास आणलें नाहीं असें बहुधा होत नसे. अर्थात् घरीं येणाऱ्या प्रत्येक पुस्तकाचा मीहि फडशा पाडीत असें. आमच्या काकांना वाचनाबरोबर लेखनाचाहि नाद होता. मधून मधून लहानसहान स्फुटें ते तत्कालीन वर्तमानपत्रांतून लिहीत असत. साहजिकच त्यांचें अनुकरण करण्याची मला इच्छा झाल्यास नवल नव्हतें.

आमच्या वर्गाला त्यावेळीं होमरचें ईलियड ( Illiad ) ही इंग्रजी कविता होती. इंग्रजी गद्य म्हणून लॅम्ब्स टेल्स ( Lamb's Tales ) –शेक्सपिअरच्या नाटकाचीं संक्षिप्त गद्य कथानकें–हें पुस्तक होतें. होमरनें ईलियडसारखें महाकाव्य लिहिलें. आपणांस महाकाव्य लिहिण्याची पात्रता नसली तरी त्याच्या महाकाव्याचें मराठी रूपांतर करून त्याचा रसास्वाद मराठी भाषिकांना आपण कां देऊं नये ? असा विचार माझ्या मनांत आला, आणि लागलीच आभाळाला गवसणी घालण्याचे उद्योगाला आम्ही लागलों ! ईलियडसारखें महाकाव्य इंग्रजी चवथ्या इयत्तेतील मुलाला तें काय कळणार ? तें शिकविणाऱ्या शिक्षकाला तरी त्यांतील रहस्य व मर्म कितपत कळलें असेल कोण जाणे ! आमचें मराठी काव्यमय ईलियड प्रत्यहीं प्रगति करीत होतें. त्याचें वाचन मात्र मर्यादित क्षेत्रांत–म्हणजे आमच्या निवडक मित्रमंडळींतच–होत असे. श्रोत्यांपैकीं प्रत्येकजण माझी तोंडभरून प्रशंसा करीत होता आणि मी अभिमानानें फुलून जात होतों.

ईलियड लिहून पूर्ण झालें. गंगेंत घोडे न्हाले. आमची उमेदहि पुढें पुढें धांवूं लागली. काव्य झालें, आतां नाट्यप्रांतांत प्रवेश करावा असें मनानें घेतलें. मनांत कल्पना येण्याचाच अवकाश, निरनिराळ्या प्लॉट्सचे आराखडे तयार झाले. परंतु त्यांतील एकहि मनास येईना. शेवटीं स्वतंत्र रचना न करतां ईलियडप्रमाणें नाट्यांतहि उसनवारी करण्याचें निश्चित झालें. लॅम्ब्स टेल्स समग्र वाचून काढल्या आणि मर्चन्ट ऑफ व्हेनिस् (Merchant of Venice ) चें संगीत रूपांतर करण्याचें नक्की केलें. मर्चन्ट ऑफ व्हेनिस ह्या

मूळ नाटकाची प्रत मिळविण्यांत आली व नाट्यलेखनाचा नारळहि फुटला. पण मुख्य गोष्ट सांगावयाची राहिलीच. हें आमचें सर्व लेखन घराच्या चार भिंतींच्या बाहेरच होत असे. घरीं अभ्यासाव्यतिरिक्त असल्या फालतू गोष्टी करण्याची आमची छातीच नव्हती.

दोन अंक लिहून तयार झाले. तिसऱ्या अंकाला नुकती कोठें सुरवात झाली होती. शिक्षक वर्गांत शिकवीत होते आणि मी मागच्या बाकावर बसून क्लास नोट्सच्या वहींत नाटकाची वही ठेवून तिसरा अंक लिहिण्यांत अगदीं गर्क होऊन गेलों होतों. इतक्यांत शिक्षकाचें लक्ष आमच्याकडे गेलें. माझें लक्ष वर्गांत चाललेल्या विषयाकडे नसून तें दुसरीकडे गुंतलें असल्याचें त्यांचे ध्यानीं आलें. त्यांनीं 'काय पिंगे, काय चाललें आहे ?' म्हणून दरडावून विचारलें. अनपेक्षित व अवचित आलेल्या या प्रश्नानें मी एकदम दचकलों आणि वही बंद करून 'कांहीं नाहीं सर' असें उत्तरलों परंतु या उत्तरानें त्यांचें समाधान थोडेंच होणार होतें ? 'इकडे आण ती वही आण पाहूं इकडे' असें म्हणून त्यांनीं वहीची मजकडे मागणी केली. वही नेऊन देण्या-शिवाय अन्य मार्गच नव्हता ! वही दिली, पण कृतापराधाचे जाणिवेनें माझा चेहरा अगदीं उतरून गेला होता ! मास्तरांनीं वहीचीं पानें चाळलीं आणि 'अरे वा ! तूं तर मोठा कवि आणि नाटककार दिसतोस ! ' ते उपहासात्मक स्वरांत मला म्हणाले व नंतर सर्व वर्गांत त्यांनीं माझी जी टर उडविली तीमुळें तर मी मेल्याहूनहि मेल्यासारखा झालों !

हें प्रकरण इतक्यावरच थांबलें असतें तर मी धन्यता मानली असती; परंतु तसें व्हावयाचें नव्हतें. वरील शिक्षक महाशय हे आमच्या वडिलांचे स्नेही होते. दररोज संध्याकाळीं त्यांच्या गांठीभेटीहि होत असत. अर्थात् आमचें नाट्यलेखन आमच्या वडिलांचे कानांपावेतों पोंचलें, आणि नंतर !!... व्हावयाचें तेंच झालें ! वडिलांकडून आमची यथेच्छ पूजा झाली इतकेंच नव्हे तर आमच्या नाट्य-लेखनाच्या वहीचे तुकडे तुकडे होऊन ते अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडले ! आमचें नाट्यलेखन तेथेंच विराम पावलें !!

## पेरूंची किंमत. : १२ :

शाळेंत जाणारीं मुलें एकत्र जमलीं म्हणजे त्यांच्या उत्साहास ऊत येत असतो. त्या उत्साहाचे भरांत तीं कोठें वाहवत जातील याचा नेम नसतो. कोणी एखादा नवा बूट काढण्याचाच अवकाश, कीं मागचा पुढचा विचार न करतां तो सिद्धीस नेण्याच्या मार्गास तीं लागलींच म्हणून समजावें.

मी त्यावेळीं ( सन १९०० ) इंग्रजी पांचवींत होतों. मधल्या सुट्टीची वेळ. मैदानांत आम्ही सर्व मुलें खेळत होतों. एक पेरूवाला पेरू विकावयास आला. मुलें त्याच्या भोंवतीं जमलीं. इतक्यांत आमच्या वर्गांतील एक मुलगा म्हणाला ' लेको, हे शिळे पेरू काय घेतां ? पेरूच खावयाचे आहेत तर चला शेजारच्या बागेंत. तेथें उत्कृष्ट पेरू आहेत. वेळहि भरपूर आहे. ' ' चला तर, चला तर ' असें गर्जत आम्ही—आमच्या वर्गातील बारा पंधरा मुलें—बागेच्या रस्त्याला लागलों देखील. बागेंत पेरूचीं झाडें फळांनीं डंवरलीं होतीं आणि फळेंहि मोठालीं व उत्कृष्ट होतीं. ही टोळधाड आलेली पाहून बागवानास भीतीच वाटली, पण आम्ही त्याच्या भीतीचें वरकरणीं निराकरण केलें. आम्ही एक रुपयाचे उत्तमांतले उत्तम पेरू काढून देण्यास त्याला सांगितलें. बागवान पेरू काढीत असतां कबूल केल्याप्रमाणें आमची वानरसेना थोडा वेळ स्वस्थ बसून राहिली होती, परंतु नंतर हळू हळू ती बागेंत सगळीकडे पांगू लागली व हाताला लागेल तो पेरू आपल्याच काकाचा असें मानून पेरूंवर यथेच्छ हात मारूं लागली ! चोरून खाल्लेल्या त्या पेरूंची गोडी कांहीं और नि अवीट होती यांत शंकाच नाहीं ! बागवानाचे नजरेस हा प्रकार येतांच तो खूप रागावला व मुलांचे मागें लागला. परंतु त्याच्या हातीं लागण्याइतके आम्ही दुधखुळे नव्हतों. प्रत्येकानें अगोदरच आपापले खिसे गच्च भरून घेतले होते. बागवान मागें लागतांच आम्हीं सर्वजण त्याचे हातावर तुरी देऊन सही सलामत बागेच्या आवाराबाहेर निसटलों व तडक शाळा गांठली. पण मधल्या सुट्टीची वेळ केव्हांच संपली होती. वर्गांत अगदीं शुकशुकाट होता. वर्गशिक्षक पुस्तक वाचण्यांत गढून गेले होते. सुट्टीनंतरचा तास संपण्याचे सुमारास आम्ही

दबकत दबकत एकामागून एक वर्गांत येऊन बसलों. शिक्षकांनीं आम्हां सर्वांस उभें राहण्यास फर्माविलें आणि 'इतका वेळ कुठें होतां ?' म्हणून प्रत्येकास दरडावून प्रश्न केला. 'बागेंत सर,' पहिल्या मुलानें उत्तर दिलें आणि त्याचीच री सर्वांनीं ओढली. 'तुमचें हें वर्तन शाळेच्या शिस्तीस सोडून आहे याकरतां तुम्हांस शिक्षा करणें भाग आहे' शिक्षक रागानेंच म्हणाले. सर्व वर्ग अगदीं स्तब्ध होता. शिक्षकांनीं एक लांबसडक वेताची छडी घेऊन प्रत्येकाच्ने दोन्हीं हातांवर सपासप दोन दोन छड्या लगावल्या. एकानेंहि हूं का चूं केलें नाहीं. 'बसा खालीं' शिक्षक गरजले आणि बाहेर तास संपल्याची घंटा झाली !!

## संघटनेचें पहिलें पाऊल : १३ :

'अल्पानामपि वस्तूनाम् संहतिः कार्यसाधिका.'

—हितोपदेश

संघशक्ति हें जगांतील एक अमोघ आणि प्रबल अस्त्र आहे. सर्वस्वी अशक्य वाटणारीं कित्येक बिकट कार्यें संघशक्तीचे बळावर यशस्वी करतां येतात.

मी इंग्रजी सहावींत असतांनाची ( सन १९०१ ) गोष्ट. त्यावेळीं सेन्ट्रल-इंडिया स्कूलसच्या जूनिअर व मिडूल सर्टिफिकेट्सच्या परीक्षा होत असत. आम्ही मिडूलच्या परीक्षेस बसणारीं मुलें. प्रिलिमिनरी परीक्षा जवळ आलेली. परीक्षेपूर्वी अजमासें सात आठ दिवस शाळेच्या सूचनाफलकावर एक नोटिस झळकली कीं जूनिअर व मिडूलचे परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे छापणावळीबद्दल प्रत्येकीं चार आणे द्यावे लागतील. ही नोटिस म्हणजे मिडूल व जूनिअरचे विद्यार्थ्यांवर अन्याय होता. कारण त्याच वेळीं सातवीचीहि प्रिलिमिनरी परीक्षा होती, परंतु सातवीच्या मुलांकडून मात्र प्रश्नपत्रिकांचे छपाईच्या फीची मागणी करण्यांत आली नव्हती. असें असतां सहावीच्या व पांचवीच्या वर्गांकडून मात्र ही फी कां वसूल केली जावी, हें आमच्या ध्यानीं

येईना. वर्गशिक्षकाकडे आम्ही आमची तक्रार नेली. परंतु ' मी यांत कांहीं करूं शकत नाहीं, तुम्ही हेड्मास्तरांना भेटा ' असा रोकडा जबाब त्यांचेकडून मिळाला. अर्थात् आम्ही हेडमास्तरांना भेटलों व आमची तक्रार त्यांचेपुढें मांडली. ' नोटिस लावली ती पूर्ण विचारांतीं लावली आहे; तीप्रमाणें परीक्षेस बसावयाचें तर तुम्हांस छापणावळीची फी द्यावी लागेल ' असा हेड्मास्तरांनीं अखेरचा निर्णय दिला. आम्ही निराश होऊन परत आलों.

त्याच दिवशीं शाळा सुटल्यावर आमच्या वर्गातील सर्व मुलांची एका मुलाचे घरीं बैठक झाली व पुढें काय करावयाचें याविषयीं बरीच भवति न भवति होऊन कांहीं निर्णयहि घेण्यांत आले. परीक्षेचा दिवस उगवला. दहा वाजले. परीक्षेच्या दालनांत फक्त जूनिअरचीं मुलें हजर होतीं. मिड्लचे वर्गातील एकहि विद्यार्थी परीक्षेच्या हॉलमध्यें उपस्थित नव्हता. हेडमास्तर व इतर शिक्षक आश्चर्यचकित झाले. जूनिअरचे विद्यार्थ्यांस प्रश्नपत्रिका दिल्या गेल्या.

इकडे, परीक्षेच्या तयारीनें आम्हीं घरून बाहेर पडलों ते पूर्वी ज्या मुलाचे घरीं बैठक घेतली होती त्याचे घरीं जमलों. दोनप्रहरपावेतोंचा वेळ तेथेंच घालविला. शाळेंत काय काय झालें असेल हें जाणण्याची उत्सुकता होतीच. साडेचारचे सुमारास आम्हीं सर्वांनीं शाळेकडे मोर्चा वळविला. शाळेच्या नजिकच आम्हाला आमचे वर्गशिक्षक भेटले. आम्ही दिवसभर कोठें होतों, परीक्षेस कां आलों नाहीं, याबद्दल त्यांनीं चौकशी केली. प्रश्नपत्रिकांचे छपाईबद्दल सातवीचे वर्गाकडून फी न घेतां आमच्याकडून मात्र फी घेणें हा केवळ पक्षपात आणि अन्याय आहे आणि म्हणून त्याचे प्रतिकारार्थ परीक्षेला न बसण्याचें सर्वांनीं ठरविलें आहे असें आम्हीं त्यांना मोकळ्या मनानें सांगितलें. त्यांनींहि शांतपणें ऐकून घेतलें व आम्हां सर्वांना त्यांनीं आपल्या घरीं नेलें. आम्हांस सर्व प्रकारें समजावण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. ' या वर्तनाबद्दल तुम्हांस परीक्षेस बसावयाची बंदी ( Rusticate ) करण्यांत येईल' असा धाकहि घातला. शिवाय ' पैसे देण्याचा प्रश्न हा तुमचा नसून

तुमच्या पालकांचा आहे ' असाहि मुद्दा त्यांनीं आमचे समोर मांडला व 'तुम्ही उद्यां परीक्षेस बसाल तर प्रश्नपत्रिकांच्या फीबद्दल आपण स्वतः मध्यस्थी करूं ' असें त्यांनीं आम्हांस आश्वासन दिलें. मात्र अट ही होती कीं आम्ही दुसऱ्या दिवशीं परीक्षेस बसलें पाहिजे. त्यांच्या या आदेशानुसार व त्यांच्या आश्वासनावर विसंबून दुसऱ्या दिवसापासून आम्ही परीक्षेस बसलों.

परीक्षा संपली. आमच्यापैकीं बहुतेकजण पास झाले. फॉर्म भरावयाचा दिवस जवळ येऊन ठेपला आणि या प्रकरणाच्या द्वितीय कांडास सुरवात झाली. संस्थानांतील त्यावेळच्या एका अत्युच्च पदाधिकाऱ्याचे चिरंजीव नुकतेच अलाहाबाद विश्वविद्यालयाचे बी. ए. होऊन घरेस आले होते व ते आम्हांस शिकविण्याकरतां म्हणून रोज शाळेंत येत असत. वर वर्णिलेला प्रकार त्यांना अवगत होताच. त्यांच्या आग्रहावरून आमचेवर एक चौकशी समिति बसविण्यांत आली. हेडमास्तरांना हा मार्ग पसंत नव्हता. परंतु एका मोठ्या पदाधिकाऱ्याच्या मुलाचा आग्रह ! गुन्ह्याच्या रीतसर चौकशीला सुरवात झाली. या महाशयांचा मुख्य हेतु हा होता कीं या प्रकरणांतील म्होरक्यांना कडक शिक्षा व्हावी व त्यांना निदान एक वर्षाकरतां तरी परीक्षा-बंदी ( rusticate ) करण्यांत यावी. चौकशी कमिशनचे प्रमुख अर्थात् हेच महाशय होते. आम्हां सर्वांना पट्टाऱ्याचे एका खोलींत अडकविण्यांत आलें आणि क्रमाक्रमानें एकेकाला बोलावून त्याची जबानी घेण्यास सुरवात झाली. जबानी झालेल्या मुलांना जबानी न झालेल्या मुलांत मिसळण्याची बंदी करण्यांत आली होती. प्रत्येकाला वेगवेगळे प्रश्न विचारण्यांत आले, परंतु प्राधान्येंकरून प्रत्येकाला कटाक्षानें ' तुमच्यांतला प्रमुख कोण ? ' हा प्रश्न विचारण्यांत येई. प्रमुख पुढाऱ्याचें नांव सांगितल्यास शिक्षा माफ होईल असें प्रलोभनहि दाखविण्यांत येई. परंतु या प्रश्नास आमच्यापैकीं प्रत्येकाचें ठराविक उत्तर ' सर, प्रमुख पुढारी मीच आहें ' हें असे. सर्व मुलांच्या जबान्या. आटोपल्या परंतु जंग जंग पछाडूनहि पुढारी कोण याचा पत्ता या

महाशयांना मुळींच लागला नाहीं! या मुलांचें आतां पुढें काय करावयाचें हा प्रश्न हेडमास्तरांपुढें शिल्लकच राहिला.

वरील सर्व जबान्या संपण्यास रात्रीचे आठ वाजले. दिवेलागणीस घरीं हजर असण्याबद्दलची आमच्या घरची सक्त ताकीद. आठ वाजेपर्यंतोंहि मी घरीं न आलेला पाहून आमच्या घरचें वातावरण बरेंच गरम झालें होतें. मी घरीं येतांच वडिलांनीं उशीराचें कारण विचारलें. 'हेडमास्तर परीक्षेचा फॉर्म देत नाहींत' मी उत्तर दिलें. 'प्रिलिमिनरींत तूं पास झाला होतास ना? मग फॉर्म कां देत नाहींत?' वडिलांनीं विचारलें. 'तें मला माहित नाहीं' मी उत्तरलों. वडिलांनीं लागलीच दऊत-लेखणी घेतली, १०-१२ पानांचें एक लांबलचक पत्र लिहिलें व 'आत्तांचे आत्तां हें पत्र हेडमास्तरांना दे आणि त्यांचेकडून याचें उत्तर घेऊन ये' असें मला फर्माविलें. रात्रीं ९॥ चे सुमारास मी हेडमास्तरांना झोंपेंतून उठविलें व तें पत्र त्यांना दिलें. त्यांनीं शांतपणें पत्र वाचलें व 'मी उद्यां व्यवस्था करीन असें तुझ्या वडिलांस सांग' असें मला सांगितलें. घरीं येऊन हेडमास्तरांचा निरोप वडिलांचे कानांवर घातला आणि नंतर जेवण उरकून मी झोंपी गेलों.

नित्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं शाळेंत गेलों. फॉर्म भरण्याचा तो शेवटचा दिवस होता. वर्गशिक्षक वर्गावर आले, 'तुम्ही केलें हें योग्य केलें नाहीं, तथापि तुमच्या अपरिपक्व बुद्धीचा विचार करून हेडमास्तरांनीं यावेळीं तुम्हां सर्वांस क्षमा केली आहे. पुन्हा मात्र असें करूं नका' असें सांगून परीक्षे-करतां भरावयाचे फॉर्म त्यांनीं सर्वांस दिले. संघशक्तीचा विजय झाला! पण मुस्कटदाबीच्या धोरणाचा ...?

या प्रकरणांतील म्होरक्या कोण होता हें गुपित आतां इतके वर्षांनंतर लपवून ठेवण्याचें कांहींच कारण नाहीं. इतर दोघांबरोबर या प्रकरणांतील मुत्सद्दी म्होरक्याचा मान—पण छे, गुलदस्तच बरा.

लहान मुलांचे मनोविकासास सहाय्यभूत होणारीं प्रमुख स्थानें दोन, एक त्यांचें घर व दुसरें शिक्षणसंस्था. परंतु मनोविकासाचे दृष्टीनें किती मुलांचें पालक विचारपूर्वक प्रयत्न करतात हा प्रश्नच आहे. शिक्षणसंस्थांतून देखील या दृष्टीनें आजहि पूर्ण लक्ष दिलें जात आहे असें दिसत नाहीं.

आमचे त्यावेळचे (सन १९०१) एज्युकेशन् सुपरिन्टेन्डन्ट पूज्य गुरुवर्य कै. काशीनाथ कृष्ण लेले हे मात्र माझ्या वरील विधानांना अपवाद होते. आपल्या शिक्षणसंस्थेंत ( आनंद हायस्कूलमध्यें ) येणाऱ्या प्रत्येक मुलाचा सर्वांगीण विकास करण्याचे हेतूनें ते आपल्या प्रयत्नांची शिकस्त करीत. कोणाहि मुलामध्यें किंचित्‌हि विशेष गुण आढळून आल्यास त्या गुणाची वाढ करण्याचे कामीं ते त्याला हरप्रकारें तनमनानें व धनानेंहि उत्तेजन देत. निरनिराळ्या हस्तव्यवसायांकडे मुलांचें लक्ष वेधून घेऊन त्यांच्यांतील सुप्त शक्तींना चालना देण्याचें काम ते मोठ्या कौशल्यानें करीत. पन्नास पंचावन वर्षांपूर्वींच्या कालांत गायनाचे वर्ग, सुतारकाम व इतरहि हस्तव्यवसायांचे वर्ग क्वचितच कुठल्या शाळेंत आढळले असते. अशा ध्येयवादी शिक्षकाचे हाताखालीं शिकण्याचा व निकट सान्निध्यांत येण्याचा लाभ मला मिळाला हें मी माझें महद्भाग्य समजतों. माझ्या आयुष्याला जें कांहीं योग्य वळण लागलें त्यांत गुरुवर्य लेले यांच्या सहाय्याचा व अमूल्य मार्गदर्शनाचा फार मोठा वांटा आहे. हें ऋण सादर मान्य करणें माझें परम कर्तव्य आहे.

मिडलची परीक्षा उत्तीर्ण होऊन ( १९०२ ) आम्ही आतां एन्ट्रन्स (मॅट्रिक) चे वर्गांत गेलों होतों. मिडलच्या प्रिलिमिनरी परीक्षेच्या वेळची घटना गुरुवर्य लेले यांच्या स्मृतींत अगदीं ताजी होती. संपाचा पुढारी कोण हें आम्हांपैकीं कोणीहि बाहेर फोडलें नसलें तरी चाणाक्ष बुद्धीच्या आणि मुलांच्या मनाचा अचुक ठाव घेणाऱ्या लेलेमास्तरांच्या ध्यानीं तें आल्याविना राहिलें नाहीं. इतर कोणी सामान्य शिक्षक असता तर त्यानें अशा

मुलांना कडक रीतीनें वागविलें असतें. परंतु लेलेमास्तरांची तऱ्हा कांहीं वेगळीच होती. पुढारी कोण होते हें तर त्यांनीं हेरलेंच परंतु त्यांच्या सुप्त शक्तींना योग्य वळण दिल्यास त्यांचा खास सदुपयोग करून घेतां येईल हेंहि त्यांनीं ओळखिलें आणि त्या दृष्टीनें त्यांनीं आपलें पुढचें पाऊल टाकलें.

एके दिवशीं त्यांनीं मला व माझ्याबरोबरच्या आणखी कांहीं निवडक मुलांना आपल्या कचेरींत बोलाविलें. आम्ही भीतभीतच तेथें गेलों, कारण कोणत्या प्रसंगास अनुलक्षून हें वॉरन्ट असावें याची कांहींच कल्पना आम्हांस येईना. तेथें जातांच त्यांनीं आम्हांस बसावयास सांगितलें. आमच्या संपाचा ओझरता उल्लेख करून त्यांतील दोषस्थळें त्यांनीं आम्हांस दाखविलीं व त्या बरोबरच आमच्या एकोप्याची व केलेले निर्धार कटाक्षानें पाळण्याची प्रशंसाहि केली. नंतर हळूच ते म्हणाले ' हें सर्व खरें, परंतु केवळ वर्गाचेच पुढारी नव्हे तर तुम्ही सर्व शाळेचे पुढारी व्हावें अशी माझी उत्कट इच्छा आहे. तुमच्या एकोप्याला व संघटनाचातुर्याला सुव्यवस्थित रूप देऊन सर्व शाळेच्या सर्वांगीण उन्नतीकरतां मुलांचीच एक संस्था स्थापन केल्यास ती तुमच्या शाळेची एक आदर्श बाब होईल. लागा तर तयारीला.' त्यांच्या मनाचा मोठेपणा व कुशल कर्णधारित्व पाहून आमचीं हृदयें कृतज्ञतेनें भरून आलीं व अभिमानानें फुलून गेलीं आणि या तेजस्वी प्रेरणेंतूनच आमच्या 'बालसभे'चा जन्म झाला. या बालसभेनें पुढें कित्येक वर्षेंपावेतों अनेक सभा-समारंभ केले व समाज-जीवनांतील आचरणाचे कित्येक पाठ घेतले व घालून दिले.

## काव्यांकुर : १५ :

लहान वयांत मुलांमध्यें आढळून येणाऱ्या नैसर्गिक सुप्तशक्तींचें सूक्ष्म अवलोकन करून व त्यांना योग्य वळण देऊन वाढीस लावणें ही सहजसाध्य गोष्ट नाहीं. या बीजांकुरांची योग्य जोपासना व वाढ न झाल्याकारणानें अनेक तरुणांचें जीवन कर्तृत्वहीन-सत्वहीन-किंबहुना मातीमोल झालेलें आढळतें. श्रेष्ठ

दर्जाचा स्थापत्य-विशारद अथवा मेकॅनिकल एन्जिनियर झाला असता अशा तरुणावर खर्डेघाशी करीत बसण्याचा प्रसंग येतो, गायनकलेंत गंधर्वांप्रमाणें चमकली असती अशी व्यक्ति कवडीचुंबक मारवाड्याचे पेढीवर व्याजाचे दोकडे चढवीत बसते, प्रतिभावान् कवि होण्याची पात्रता असणारा इसम किचकट आकडेमोडींत आपलें डोकें खुपसून बसतो, आपल्या कलाविलासानें अखिल मानवांचीं हृदयें उचंबळवूं शकला असता तो गिरणींत माग चालवीत असतो तर रणांगणावर पराक्रमाची व शौर्याची पराकाष्ठा करून दाखविली असती असा झुंजार वीरपुरुष नांगर हाकीत आपलें कंटाळवाणें जिणें जगत असतो ! या दारुण परिस्थितीकडे पालकांचें, शिक्षणतज्ज्ञांचें व शासनसंस्थांचें लक्ष जाईल तो सुदिन !

परंतु पन्नास वर्षांपूर्वीचे: काळीं या विषयांत लक्ष घालणाऱ्या तुरळक व्यक्तींत गुरुवर्य लेलेमास्तर यांची गणना प्रामुख्यानें व ठळकपणें करावी लागेल. लेलेमास्तरांच्या प्रेरणेनेंच दिवंगत भास्करराव तांब्यांसारखा प्रतिभावान् व प्रथितयश कवि बृहन्महाराष्ट्रांत उदयास येऊन कीर्तिमंदिराचे शिखरावर विराजमान होऊं शकला. त्यांच्याच प्रोत्साहनानें शिवरामभाऊ ओकांसारखा एक सामान्य कारकून इतिहाससंशोधक म्हणून पुढें आला. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील.

गुरुवर्य लेले यांच्या प्रेरणेनें आणि प्रोत्साहनानें आम्ही ' बालसभा ' स्थापन केली. बालसभेचें सहामाही संमेलन साजरें करण्याचें ठरलें. समारंभाचे सुरवातीस ईशस्तवन व स्वागतपर पद्यांची गरज होती. स्वतः गुरुवर्य उत्तम मराठी व इंग्रजी काव्य करणाऱ्यांपैकीं होते. साहजिकच आम्ही त्यांचेकडे धांव घेतली. हंसत हंसत मला उद्देशून ते म्हणाले ' या पद्यांकरतां तूं मजकडे कां आलास ? ' ' सर, या कामीं आपणांशिवाय आम्हांस दुसरा कोण मदत करणार ? ' मी म्हटलें. पुन्हा हंसत हंसत ते म्हणाले ' तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा भुललासी. ' मला कांहींच बोध होईना. मी म्हटलें ' सर, आपलीं हीं पद्यें आमचेकडे नाहींत. ' गुरुवर्य हंसून म्हणाले

'अरे वेड्या, पद्यें मी कशास द्यावयास हवींत ? तुझा तूं समर्थ आहेस. जा, पद्यें कर आणि ज्यां मला दाखवावयास घेऊन ये मला माहित आहे कीं, तूं चांगली कविता करतोस.' मी आश्चर्यचकित झालों ! मी कविता करतों, नाटक लिहितों म्हणून माझे वडील मजवर रागावतात, माझीं हस्तलिखितें चुलींत फेंकतात, तर त्याचे उलट मी कविता करावी म्हणून लेलेमास्तर मला उत्तेजन देतात ! एक पूर्ण निरुत्साह तर दुसरा मूर्तिमंत उत्साह ! लेले मास्तरांच्या आग्रहाखातर मी पद्यें केलीं, त्यांना दाखविलीं, तीं त्यांना पसंतहि पडलीं आणि आनंदाची व अभिमानाची गोष्ट अशी कीं हीं पद्यें पुढें कित्येक दिवसपावेतों आनंद हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या तोंडीं घोळतहि राहिलीं !

यानंतर पुढेंहि गुरुवर्य लेले मला कविता लिहिण्याविषयीं सतत प्रोत्साहन देत असत. कविवर्य भास्करराव तांबे यांची परंपरा मी पुढें चालवावी अशी त्यांची उत्कट इच्छा, परंतु भवितव्यता निराळी होती !

## चतुर्भुज : १६ :

विवाह हा मनुष्याच्या आयुष्यांतील एक फार महत्वाचा, इष्ट आणि श्रेष्ठ संस्कार आहे. मुलामुलींच्या विवाहाची वयोमर्यादा काळमानानुसार व परिस्थितिजन्य कारणांनीं आजकाल बरीच पुढें गेली आहे, एवढेंच नव्हे तर विवाह जुळविण्याचे किंवा जुळण्याचे तंत्रांतहि आज इष्ट असें बरेंच परिवर्तन झालेलें आहे. पन्नास वर्षांपूर्वींचा काल निराळा होता. प्रेमविवाह, सहवासोत्तर विवाह इत्यादि प्रकार त्यावेळीं विशेषसे अस्तित्वांत नव्हते. कांहीं थोडे अपवाद सोडल्यास मुलीनें आपला वर पसंत करण्याची प्रथा अजूनहि विशेष परिणत अवस्थेंत नाहीं, परंतु विवाहापूर्वी आपली वधू 'पाहण्याची' जी संधि आजकाल मुलांना मिळूं लागली आहे तीहि पन्नास वर्षांपूर्वी त्यांना बहुधा मिळत नसे. आपली भावी वधू काळी आहे कीं गोरी आहे, देखणी आहे कीं कुरूप आहे, शिक्षित आहे वा निरक्षर आहे, सुदृढ आहे कीं पाप्याचें पितर आहे याची उठाठेव ( ? ) मुलाला करण्याचें कांहीं

कारण नाहीं अशी प्रौढांची समजूत होती. ' सून पहावी सासऱ्यानें आणि जांवई पसंत करावा सासूनें ' हाच मुळीं त्यावेळचा दंडक. अर्थात् मुलगी पसंत करावयाची ती वर-पित्यानें-ज्याच्याशीं तिचें पुढचें सर्व आयुष्य जावयाचें-त्यानें नव्हे ! तद्वतच जांवई पसंत करावयाचा तो सासूनें किंवा फार तर सासऱ्यानें. खुद्द जिचा विवाह व्हावयाचा तिचा या अत्यंत महत्वाचे बाबीशीं काडीइतका देखील संबंध नसावयाचा ! विवाह हा त्या काळांत तरी निश्चित जुगार होता. दान ठीक पडलें तर भाग्य, नाहींतर सर्वनाश हा ठेवलेलाच !

इसवी सन १९०२ मध्यें मी मॅट्रिकचे वर्गांत होतों. एके सुप्रभातीं माझे वर्गावरील एक शिक्षक श्री. गोविंद गणेश बारपुते हे आपल्याबरोबर एका वृद्ध गृहस्थास घेऊन आमचे घरीं आले. वडिलांनीं त्यांचें यथोचित स्वागत केलें. थोड्या वेळानें मला समोर बोलाविण्यांत आलें. त्या वृद्ध गृहस्थांनीं एकवार मला आपादमस्तक न्याहळून पाहिलें. आमच्या शिक्षकांनीं त्या वृद्ध गृहस्था-पुढें माझी भरमसाट स्तुति करण्यास सुरवात केली. मला तो विशेषसी रुचली नाहीं. मी थोडा गोंधळलों—गांगरलों. हें प्रकरण काय असावें तें प्रथम माझे ध्यानीं येईना. पण नंतर प्रकाश पडला आणि मी घरांत निघून गेलों. थोड्या वेळानें आलेले पाहुणे व बारपुतेमास्तरहि गेले.

अकरा वाजतां मी शाळेंत पोंचतों तों वर्गांतील सर्व मुलांनीं मला घेरून घेतलें व ' पेढे आण, पेढे आण ' म्हणून तीं माझ्यामागें लागलीं. माझा वर्गबंधु विष्णु बारपुते ( बारपुतेमास्तर यांचा भाऊ ) यानें वरील गोष्टीची वाच्यता केली असल्याचें माझ्या निदर्शनास आलें. माझा विवाह ठरल्याची वार्ता मला माझ्या मित्राकडून कळली. घरच्या कोणाकडून नव्हे !

विवाहसंस्काराचें गांभीर्य किंवा विवाहोत्तर अंगावर पडणाऱ्या प्रचंड जबाबदाऱ्या यांची पुसट देखील कल्पना नसलेला सोळा सतरा वर्षांचा मी अजाण व अल्लड युवक, परंतु माझा विवाह होणार हें कळल्यापासून मनांतून

मला अमर्याद आनंद झाला होता हें लपविण्यांत स्वारस्य नाहीं. माझी भावी वधू कशी असेल, आपण तिला अनुरूप असूं किंवा नाहीं, आपला संसार तिच्या सांगातीं सुखावह होईल किंवा नाहीं याबद्दलचा लवमात्रहि विचार माझे मनास त्यावेळीं शिवला नाहीं! पत्नीचा लाभ होणार, चार दिवस ऐटीनें मिरविण्यास सांपडणार, चिवडा, लाडू, जिलब्या, मसालेभात इत्यादीं-वर ताव मारावयास मिळणार, इंदूर पहावयाची संधि लाभणार या आनंदांतच मी अगदीं चूर होतों. ह्याव्यतिरिक्त कोणत्याहि भावना माझ्या मनांत त्यावेळीं उद्भूत झाल्याचें मला स्मरत नाहीं.

लग्नाचे सामानाची सर्व तयारी झाली. पाहुणे मंडळी जमूं लागली आणि एके दिवशीं भल्या पहाटेस २५-३० बैलगाड्या स्त्री-पुरुष-मुलें इत्यादींचें भलें मोठें वऱ्हाड घेऊन इंदुरास जावयास निघाल्या. आजच्या मोटारीच्या युगाशीं त्या काळच्या बैलगाड्यांची तुलना करणें योग्य होणार नाहीं. गाड्यांची ती रांगच रांग, बैलांच्या गळयांतील घंटा-घुंगुरांचा तो संमिश्र मधुर नाद, गाडीवानांचे हेंगाड्या गाण्याचे सूर, गाड्यांत बसलेल्या स्त्री-पुरुषांचे आपसांतील स्वैर संवाद, मुलांचें हंसणें खिदळणें, प्रातःकाळचें प्रशांत व सुखमय वातावरण हें सारें दृश्य खरोखरच नितान्त मनोहर आणि आल्हादकर होतें. मात्र या सर्व सुखद वातावरणांत एकच शल्य माझ्या मनास टोंचत होतें, तें हें कीं बरोबर असलेल्या या शें-सव्वाशेंच्या समुदायांत मी मनमोकळेपणानें गुजगोष्टी करूं शकेन असा एकहि स्नेही मजबरोबर नव्हता! माझ्या अमुक स्नेह्यास मी बरोबर घेऊं का? असें वडिलांस विचारण्याची प्राज्ञा नव्हती आणि त्यांच्या-कडून अशी विचारणा येण्याचा संभवच नव्हता!

रात्रीं बेटम्यास मुक्काम करून दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८-९ चे सुमारास आम्ही इंदूरचे सीमेवर ( लाबऱ्यामेरू ) येऊन पोंचलों. व्याहीमंडळी आमचे स्वागतार्थ तेथें हजर होती. प्राथमिक सीमान्तपूजनविधीनंतर तेथून मल्हार-गंजापावेतों हत्तीवरून आमची जंगी मिरवणूक काढण्यांत आली. अकराचे सुमारास आम्ही जानोशावर पोंचलों. पुढील सर्व विधि यथासांग पार पडले

व गुरुवार, माघ वद्य ५ संवत् १९५८ ( फेब्रुवारी १९०२ ) रोजीं गोरज मुहूर्तावर मंगलाष्टकांच्या गजरांत आणि ताशे वाजंत्र्यांचे कोलाहलांत आम्हाला यथाविधि चतुर्भुज करण्यांत आलें. अशा प्रकारें आम्ही गृहस्थाश्रमांत पदार्पण करते झालों. त्या काळच्या चालीरीतींस अनुसरून विड्या तोडणें, सुपाऱ्या लपविणें, घांस देणें-घेणें इत्यादि सर्व सोपस्कारहि झाले आणि दोन दिवसांनंतर आम्ही सपत्नीक स्वगृहीं परतलों. चार आश्रमांपैकीं सर्वांत महत्वाच्या 'दुसऱ्या' आश्रमांत माझा आतां प्रवेश झाला आहे आणि त्याबरोबरच माझ्या शिरावर कांहीं अनिवार्य जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत याची त्यावेळीं तरी मला तिळमात्र जाणीव नव्हती हें प्रांजलपणें मान्य केलें पाहिजे.

## पाळणा : १७ :

काल आणि परिस्थिति माणसांत कल्पनातीत परिवर्तन घडवून आणतात. सन १८९९ मध्यें मी कविता करणें किंवा नाटक लिहिणें हा आमच्या वडिलांचे दृष्टीनें अक्षम्य गुन्हा व अव्यापारेषु व्यापार होता. तोच सन १९०२ मध्यें गुण ठरण्याचा एक प्रसंग घडला.

धारेस सारस्वत ब्राह्मणांचीं घरें फक्त दोन, पण त्या मानानें इंदुरांत सारस्वत ब्राह्मणांची वस्ती बरीच होती. ज्ञातींतील बरेच सद्गृहस्थ त्यावेळीं संस्थानांत उच्चपदाधिकारी होते. 'सारस्वत ब्रह्मसमूह' या नांवाची एक ज्ञातिसंस्था ज्ञातींतील कांहीं प्रमुख व वजनदार व्यक्तींनीं सन १८९८-९९ चे सुमारास स्थापन केली होती आणि या संस्थेच्या वार्षिकोत्सवाकरतां म्हणून आमच्या वडिलांना आमंत्रण आलें होतें. वडिलांनी मला बोलाविलें व या प्रसंगास अनुरूप अशा कांहीं कविता करण्यास मला सांगितलें ! मला जणूं विजेचा धक्काच बसला. ज्यांनीं तीन वर्षांपूर्वी माझ्या लिखाणाचे तुकडे तुकडे करून रागारागानें चुलींत फेकले होते तेच माझे वडील आज आपण होऊन मला कविता करावयास सांगत होते ! केवढें आश्चर्य !!

३३५०
नों. दि. २८/९

मी कविता करून माझे वडिलांबरोबर समारंभाचे प्रवर्तकांकडे पाठविल्या आणि समारंभांत त्यांचा यथोचित गौरवहि झाला. या कवितांचा उल्लेख आणि कौतुक पुढें बारा तेरा वर्षांनीं माझे परम मित्र कै. केशवराव कोल्हटकर यांनीं मजजवळ केलें त्यावेळीं मला विशेष मौज आणि धन्यता वाटली असल्यास नवल नाहीं. त्या वेळीं केशवराव म्हणाले होते ' तुमचा परिचय सन १९०२ मध्येंच तुमच्या कवितांनीं झाला होता. प्रत्यक्ष परिचय मात्र आतां ( सन १९१५ मध्यें ) होण्याचा योग आला. '

दुसरा प्रसंगहि असाच पण थोडा वेगळ्या स्वरूपाचा होता. त्या वेळचे धारचे संस्थानाधिपति श्रीमंत उदाजीराव पवार यांना कन्यारत्न झालें ( १९०८ ). सर्व शहरांत आनंदीआनंद झाला. गुढ्या-तोरणें, पताका इत्यादींनीं सर्व शहर शृंगारलें गेलें. संस्थानाधिपतींवर प्रजाजनांकडून अभिनंदनांचा पाऊस पडूं लागला. राजकन्येच्या नामकरणविधीचा दिवस उगवला. माझ्या खोलींत मी कांहीं पुस्तक वाचीत बसलों होतों; इतक्यांत वडिलांची हांक आली. धडधडत्या अंतःकरणानेंच मी समोर जाऊन उभा राहिलों. ' नामकरणविधीला तुम्ही जाणार आहां का ? ' वडिलांनीं विचारलें. त्यांच्या आवाजांत आज नेहमींचा करडेपणा नव्हता. ' आपण म्हटलें तर जाऊं ' मी उत्तर दिलें. ' बरें, एखादा चांगलासा ' पाळणा ' तूं लिहूं शकशील का ? ' वडिलांनीं प्रश्न केला. मी स्तंभितच झालों ! सात आठ वर्षांपूर्वींच्या घटनेचें मला याहि वेळीं स्मरण झालें. तथापि मी म्हटलें ' आपली इच्छा व अनुमति असेल तर करीन. ' ' मग लवकर कर तर ' ते म्हणाले.

मी माझ्या खोलींत आलों तों श्रीमंत उदाजीराव पवारांचे एक नातेवाईक व संस्थानांतील उच्चपदाधिकारी श्रीमंत मल्हारराव पवार यांजकडून माझे नांवाची एक जरूरी ' ऑफिस नोट ' येऊन थडकली. त्यांनीहि ह्या प्रसंगास अनुरूप अशीं कांहीं पद्यें करून तांतडीनें मागविलीं होतीं. माझ्या आनंदास पारावार उरला नाहीं. मी ' पाळणा ' लिहिला. इतर पद्येंहि केलीं.

तीं सर्व स्टेट प्रेसमधून लागलीच छापून निघालीं, एवढेंच नव्हे तर नामकरण-विधीचे प्रसंगीं तीं सर्व गायिलीं गेलीं आणि त्याप्रीत्यर्थ दरबारांतून मला बक्षीसहि मिळालें. माझ्या या कृतीचें प्रेमभरानें आणि पाठ थोपटून कोणी खरें कौतुक केलें असेल तर तें गुरुवर्य लेलेमास्तर यांनीं; आणि त्यायोगें माझे अंगावर मूठभर मांस चढलें!

## महाविद्यालयाचें प्रवेशद्वार : १८ :

तरुणांच्या जीवनाला योग्य कलाटणी मिळण्याचा मॅट्रिकची परीक्षा हा पहिला टप्पा. पांढरपेशांच्या मुलांना ही परीक्षा म्हणजे नोकरीच्या दालनांत प्रवेश मिळविण्याचा परवानाच असतो. विशेषतः पांढरपेशा वर्गातील आई-बापांचें सर्व लक्ष्य आपला मुलगा 'शिक्षित' होण्यापेक्षां तो मॅट्रिक, बी. ए., एल्एल्. बी. इत्यादि छाप आपल्या नांवामागें केव्हां लावतो इकडे केंद्रित झालेलें असतें. शिक्षणाचें ध्येय उद्यांचा जबाबदार नागरिक निर्माण करणें हें असावयास पाहिजे. शिक्षणक्षेत्रें व विद्यापीठें हीं वास्तविक मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासाचीं प्रमुख तीर्थस्थानें झालीं पाहिजेत. विद्यापीठांतून बाहेर पडणारा प्रत्येक छात्र ज्ञानसंपन्न, शीलसंपन्न व चारित्र्यसंपन्न असा सर्वांगपरिपूर्ण होऊन बाहेर पडला तर राष्ट्राचा अभ्युदय होणें कितीसें कठिण आहे? पण— !!

युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचे छाप आपल्या मुलाच्या नांवामागें लागावे, आपल्या प्रमाणेंच आपला मुलगा नामांकित वकील म्हणून प्रसिद्धीस यावा अशी आमच्या वडिलांची इच्छा असणें स्वाभाविक होतें. मी स्वतः मंद बुद्धीचाहि नव्हे किंवा विशेष तरल व तैल बुद्धीचाहि नव्हे. मी एक सामान्य श्रेणीचा विद्यार्थी होतों नापासाचा शिक्का मात्र आजवर मला लागला नव्हता. पण प्रवेश परीक्षा ( मॅट्रिकची परीक्षा ) मला दगा देणार आणि वडिलांच्या आशा आकांक्षा मुळांतच करपून जाणार अशी मला मनांतून भीति वाटत होती. इंग्रजी, मराठी व गणित या विषयांबद्दल मला मुळींच काळजी नव्हती.

पण संस्कृत आणि भूगोल या दोन विषयांसंबंधानें मला खात्री नव्हती. आमचे संस्कृतचे शिक्षक आपल्या विषयांत चांगले पारंगत होते व त्यांची शिकविण्याची धाटीहि उत्तम होती. परंतु वर्ग सुरू झाला कीं 'वाचा रे' असें मुलांना सांगून त्यांनीं टेबलावर जें डोकें टेकावयाचें तें 'सर, तास संपला' असें त्यांना जागें करून आम्ही उठवीपावेतों ! भूगोलाचे शिक्षकांना स्वतःला भूगोल येत होता कीं नाहीं याचीच वानवा, मग ते आम्हाला काय शिकविणार ? अशी परिस्थिति असूनहि मी माझेकडून शक्य ती मेहनत घेत होतों. संस्कृताकरतां त्यावेळीं आम्हांस भांडारकरांचें दुसरें पुस्तक व हितोपदेश हीं दोन पुस्तकें नेमलीं होतीं. पैकीं भांडारकरांचे पुस्तकांतील एकहि धडा मला समजला असेल तर शपथ. ह्यामुळें संस्कृतचे प्रश्नपत्रिकेपैकीं अर्ध्या मार्कांस मुकणें मला भागच होतें. राहतां राहिला हितोपदेश, आणि त्यावरच सर्व भर देण्याचें मीं ठरविलें. पहाटे तीन वाजतां उठावें व हितोपदेशाच्या पहिल्या ओळीपासून शेवटच्या ओळीपर्यंत संध्ये-सारखी संथा घ्यावी असा क्रम मी ठेविला आणि संस्कृतचे मार्क भरून काढण्यास हा उपाय प्रभावी ठरला. भूगोलाचे ऐवजीं इतिहासाची अशींच पारायणें करावीं लागलीं.

जसजशी परीक्षेची तारीख जवळ येत चालली तसतशी मनाला एक प्रकारची हुरहुर वाटूं लागली. धारला त्यावेळीं परीक्षेचें केन्द्र नव्हतें. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांस इंदुरास जावें लागे. आपण आतां एन्ट्रन्सच्या परीक्षेस बसणार या अभिमानानें अंतःकरण फुलून गेलें होतें, आणि तशांत इंदुरास जावयास मिळणार या सुखद विचारानें मन उल्हसित झालें होतें. यथा-समय आम्ही इंदुरास येऊन दाखल झालों. माझा मुक्काम, साहजिकच श्वशुर-गृहीं होता. घराचे बंदिस्त वातावरणांतून बाहेर पडलेला मी, एन्ट्रन्सच्या परीक्षेसारखें महत्कृत्य करावयास निघाल्याचा अहंभाव व श्वशुरगृहींचा सुखमय निवास या त्रिवेणी संगमामुळें माझ्या आनंदाला आणि सुखाला भरती आली होती.

आमचें परीक्षाकेन्द्र कॅनेडियन् मिशन् कॉलेजमध्यें होतें. कॉलेजचा तो भव्य हॉल, टेबलांची व्यवस्थित व शिस्तवार मांडणी, नितांत स्तब्धता व गंभीर वातावरण यांनीं प्रारंभीं मन थोडेसें बावरल्यासारखें झालें, पण तें क्षणभरच. पेपर्स बरे गेले. तथापि पास होईनच अशी हमखास खात्री देणें मात्र मला शक्य नव्हतें. त्यामुळें निकालाची धाकधुक मनांत होतीच. तीन महिन्याचे दीर्घ कालावधीनंतर जून १९०३ मध्यें परीक्षेचा निकाल लागला आणि सुदैवानें परीक्षेच्या चरकाच्या या पहिल्या लाटेंतून आम्ही सही सलामत पार पडून पहिला ‘ छाप ’ हस्तगत केला.

## माझे आद्यस्नेही : १९ :

माझा मित्रपरिवार फार मोठा असा कधींच नव्हता. आतांपावेतों मला जे सोबती लाभले त्यांत प्रामुख्यानें काशीनाथ दामोदर शुक्ल, विष्णु गणेश बारपुते, सखारामजी दिघे व लक्ष्मण काशीनाथ ऊर्फ भाऊ चितळे या चौघांची गणना करावी लागेल. या चौघांपैकीं प्रत्येकाचे स्वभावांत कांहीं वैशिष्ठ्यें होतीं. त्यांच्यांत कांहीं वैगुण्येंहि होतीं. परंतु वैगुण्यांचा स्नेहावर परिणाम न होऊं देतां केवळ वैशिष्ठ्यांनाच प्राधान्य देऊन आम्ही आज-तागाईत स्नेही म्हणून आहोंत. यानंतरच्या वर्ष दोन वर्षांत ज्यांच्यांशीं माझा संबंध आला व ज्यांना माझ्या स्नेह्यांत मी समाविष्ट करूं शकलों अशा व्यक्ति म्हणजे भय्यासाहेब शिर्केनवीस व खंडेराव पांडुरंग वैद्य हे होत.

वरील सहा जणांत श्री. खंडेराव वैद्य हे माझ्या विशेष प्रेमास आणि आदरास पात्र होते. खंडेराव हे एक कर्तबगार आणि कर्तृत्वशाली पुरुष होते. घरची अत्यंत गरीबी, शिक्षण अगदींच बेतावाताचें, इंग्रजीचा गंधहि नाहीं, अशा प्रकारचा कारकुनींत कसा तरी कष्टानें काळ कंठित असलेला हा गृहस्थ वरिष्ठाचें व आपलें जुळत नाहीं, त्याची हांजी हांजी करण्यांत आपल्या स्वाभिमानाला धक्का पोहोंचतो हें पाहतांच पंधरा रुपयांच्या कार-

कुनीला त्यांनीं लाथ मारली व फडके वॉचमेकरसारख्या एका हुशार परंतु अत्यंत कडक स्वभावाच्या व कसून काम घेणाऱ्या इसमाची वर्ष दोन वर्षं बिनावेतन दिवसरात्र शागिर्दी केली आणि थोडासा हुन्नर हातीं येतांच स्वतःचे पायावर उभें राहण्याच्या हेतूनें त्यांनीं आपलें स्वतःचें घड्याळ-दुरुस्तीचें दुकान थाटलें; इतकेंच नव्हे तर स्वतःच्या बुद्धीची पराकाष्ठा करून हा गृहस्थ पहिल्या प्रतीचा कुशल मेकॅनिक् म्हणून उदयास आला. त्यानंतर त्यानें टॅक्सीज भाड्यानें चालविणें, दंतवैद्याचें काम, पिठाची गिरणी, इत्यादि अनेक जोडधंदेहि यशस्वीपणें हाताळले. वचनाचा सच्चा, स्वभावानें निगर्वी, सरळ आणि प्रेमळ, व्यवहारांत अत्यंत दक्ष व प्रामाणिक, प्रसंगीं लागेल ती मदत करण्यास स्वयंस्फूर्तीनें पुढें येणारा आणि मनानें उदार असा हा एकच स्नेही माझ्या आयुष्याच्या पहिल्या टप्प्यांत मला लाभला आणि मला मोठा अभिमान वाटतो कीं त्याचा व माझा सन १९०१–२ चे सुमारास जडलेला हा स्नेह दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन त्याचे अंतकालपावेतों ( ५ ऑगस्ट १९३७ ) कायम टिकला.

## अरण्यरुदन : २० :

मनुष्य आपल्या मनांत अनेक मनोरे रचित असतो, परंतु विधिघटना निराळीच ठरलेली असते. या विपरीत विधिघटना मनुष्याच्या कर्तृत्वशक्तीवर कठोर प्रहार करतात. अशा प्रकारें आपल्या उद्दिष्ट ध्येयाप्रत पोंचण्यास असमर्थ ठरल्यानें प्रवाहपतिताप्रमाणें तो कोठेंतरी भलतीकडेच वाहात जातो, त्याच्या इच्छा-आकांक्षा चक्काचूर होतात आणि शेवटीं त्याला आमरण निःसत्व, नीरस असें आयुष्य कंठावें लागतें ! दैवदुर्विलास तो हाच !!

सन १९०३ च्या जूनचे अखेरीस मी एन्ट्रन्स परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. आतां पुढें काय करावयाचें हा अर्थात् मजपुढें आणि माझ्या वडिलांपुढें प्रश्न होता. मला कॉलेजांत पाठवावयाचें व प्रथम बी. ए. करावयाचें असें वडिलांनीं आपल्या मनाशीं ठरविलें व कोणत्या

कॉलेजांत पाठवावें याचा विचार ते करूं लागले. या संबंधांत माझें मन समजून घेण्याची आवश्यकता त्यांना मुळींच भासली नाहीं! धारेपासून नजिक अवघ्या ३६–३७ मैलांवर इंदुरास त्यावेळीं असलेलीं कॉलेजें दोन. एक होळकर कॉलेज व दुसरें कॅनेडियन् मिशन् कॉलेज ( सध्याचें क्रिश्चियन् कॉलेज ). होळकर कॉलेजचा त्यावेळीं विशेष बोलबाला होता. शिस्त, प्राध्यापकवर्ग, बोर्डिंगची व्यवस्था वगैरे सर्व दृष्टींनीं होळकर कॉलेजची त्यावेळीं फार ख्याति होती. मजबरोबर पास झालेले कांहीं विद्यार्थी त्या कॉलेजांत जाणार होते. अर्थात् मीहि त्याच कॉलेजांत जावें असें वडिलांनीं ठरविलें आणि आमच्या मातोश्रीमार्फत मला त्यांनीं तसें कळविलें.

माझे बरोबरच पास झालेला हुशार परंतु गरीब कुटुंबांतील माझा निकटचा स्नेही काशीनाथ दामोदर शुक्ल यानें कमी खर्चाचे हेतूनें मुळींच फी नसलेल्या जयपूरच्या महाराजा कॉलेजमध्यें जाण्याचें निश्चित केलें होतें. इंदूरचीं कॉलेजें त्यावेळीं कलकत्ता विश्वविद्यालयाचे कक्षेखालीं होतीं आणि जयपूरचें कॉलेज अलाहाबाद विश्वविद्यालयाच्या कक्षेखालीं होतें. होळकर कॉलेजमध्यें जावें लागल्यास अन्य सर्व विषयांबरोबर संस्कृत घेणें मला अनिवार्य ( compulsory ) होणार होतें. जयपूरला गेल्यास संस्कृत वगळून अन्य ऐच्छिक विषय घेण्याची तेथें सोय होती. शिवाय शुक्लासारख्या सुस्वभावी, हुशार व अभ्यासू मित्राची सोबत व मदत मिळणार होती. संस्कृतचे विषयांत माझी किती प्रगति होती याचें वर्णन मागें आलेंच आहे. एन्ट्रन्सचे वेळीं संस्कृतचे महासागरांतून येनकेन प्रकारेण आम्ही कसेंतरी पार पडूं शकलों खरें पण पुढें तसें धकणें अशक्य होतें. संस्कृत वगळून अन्य कोणताहि ऐच्छिक विषय घ्यावा असें साहजिकच मला वाटत होतें आणि म्हणून जयपूरला महाराजा कॉलेजमध्यें जाण्याची माझी उत्कट इच्छा होती. परंतु या इच्छेला वाचा कशी फोडावयाची ? धीर करून हा विचार मी मातोश्रीला कळविला व तिचेमार्फत तो वडिलांचे कानांपावेतों पोंचविला. वडिलांना हा विचार मान्य होणें असंभव होतें. तोंडावाटें एकदां निघालेला

शब्द परत माघारा घेणें त्यांचे बाबतींत अशक्य होतें; त्यांचा शब्द म्हणजे काळ्या दगडावरील रेघच ! जें ठरलें तें ठरलें. 'त्याला आईबापाच्या नजरेखालीं रहावयाला नको, बोकळावयाला पाहिजे, दूर जाऊन मोकाट चैन करावयास पाहिजे' इत्यादि इत्यादि सबबींवर माझ्या सूचनेची बोळवण करण्यांत आली ! माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें, पण उपयोग काय ? मी हताश होऊन विचार करूं लागलों कीं आतां पुढें काय करावें ? वडिलांवर वजन पडेल, ज्यांचें म्हणणें ते शांतपणें ऐकून तरी घेतील अशा व्यक्ति एकदोनच होत्या. त्यांपैकीं एकाकडे म्हणजे श्रीयुत सदाशिव लक्ष्मण बापट वकील, यांजकडे जाऊन त्यांना सर्व प्रकार समजावण्याचा मी प्रयत्न केला व वडिलांस दोन शब्द सांगून त्यांची समजूत घालण्याची खटपट करण्याची त्यांना विनंती केली. त्यांनीं वडिलांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम झाला म्हणून म्हणा अथवा अन्य कांहीं कारणानें म्हणा पण जयपूरला जाण्याला वडिलांनीं संमति दिली. हर्षातिरेकानें मी फुलून गेलों. लागलींच आमचे दोघांचेहि ॲडमिशन् फॉर्म ( प्रवेश पत्रिका ) जयपूरला पाठविण्यांत आले. कपडे पुस्तकें इत्यादींची बांधाबांध सुरू झाली. पेटी बिछाना बांधून तयार झाला. निघण्याची वेळा येऊन ठेपली. मी देवाला वडिलांना व मातोश्रीला नमस्कार केला आणि प्रफुल्लित मनानें आतां टांग्यांत जाऊन बसणार इतक्यांत वडिलांनीं मला फर्माविलें 'जयपूरला जाण्याला कबूली दिली होती खरी परंतु पुनर्विचारांतीं तूं जयपूरला न जातां इंदूरलाच जावें अशी माझी इच्छा आहे, ह्याकरतां तूं इंदूरलाच जा; जयपूरचा बेत रहित कर.' हे शब्द कानीं पडतांच माझ्या हृदयावर वज्राघातच झाला ! सर्व इच्छा, सर्व आकांक्षा, सर्व उमेदी जळून खाक झाल्या !! मी व शुक्ल या उभयतांनीं रचलेले सर्व मनोरथ जमीनदोस्त झाले ! हृदय संतापानें दग्ध झालें, डोळे डबडबून आले ! व्यथित अंतःकरणानें कोणाशीं एक शब्दहि न बोलतां मी निमूटपणानें टांग्यांत जाऊन बसलों आणि टांगा महूच्या रस्त्याला लागला ! 'मनसा चिंतयेत् कायम् दैवमन्यत्र चिंतयेत्' हेंच खरें !!

# टप्पा दुसरा

## नवी सृष्टि



कॉलेजचें आयुष्य म्हणजे तरुणांचे जीवनांतील अत्यंत महत्वपूर्ण आणि सुखमय कालखंड असतो. केवळ पुस्तकांतील किडा ( book-worm ) होणें हें ध्येय नसणाऱ्या प्रत्येक तरुणाला भावी आयुष्यांत उपयुक्त ठरणाऱ्या अनेक बहुमोल गुणांचा लाभ करून घेण्याची या काळांत उत्तम संधि असते. कॉलेजसारख्या विद्यामंदिरांत उगम पावणाऱ्या ज्ञानगंगेतूनच राष्ट्राचे भावी नागरिक निर्माण व्हावयाचे असतात. ज्ञानसंपन्न आणि शीलसंपन्न गुरुजनांचें सान्निध्य व मार्गदर्शन, निष्काळजी जीवन, मोकळें आणि प्रसन्न वातावरण, तारुण्यांतील अमोघ उत्साह आणि उमेदी, दुर्दम्य आशावाद इत्यादींनीं तेथील वातावरण भारलेलें असतें. अशा सुखद परिसरांत घालविलेला काळ हा आयुष्यांतील एक अविस्मरणीय आणि लोभनीय कालखंड असतो.

जयपूरचें प्रस्थान ठेवून इंदूर गांठावें लागल्यानें खिन्न व उद्विग्न मनानेंच मी होळकर कॉलेजांत प्रवेश केला. अगोदरपासून अर्ज केला नसल्यानें आयत्यावेळीं कॉलेज व बोर्डिंगमध्यें प्रवेश मिळण्यास अडचण होती, परंतु थोड्या प्रयत्नांतीं सर्व कांहीं व्यवस्थित झालें व आमच्या कॉलेज जीवनास प्रारंभ झाला. आजच्या कॉलेज जीवनाशीं मी विशेषसा परिचित नाहीं, परंतु आमच्या वेळचें ( सन १९०३ ) होळकर कॉलेज म्हणजे खरोखरच एक आदर्श कॉलेज होतें. प्रिन्सिपॉल चमले यांच्यासारखा सुस्वभावी, चतुरस्त्र, विद्वान, विशाल बुद्धिमत्तेचा आणि शिस्तप्रिय प्रिन्सिपॉल, प्राध्यापक शंकरराव गोखले यांच्यासारखे कुशाग्र बुद्धीचे आणि विद्यार्थ्यांशीं समरस होणारे विज्ञानाचे प्रोफेसर, प्रा. शांताराम अनंत देसाई यांच्यासारखे व्यासंगी व उच्चश्रेणीचे तत्त्वज्ञानी साधुपुरुष तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर,

प्रा. आठवल्यांसारखे श्रेष्ठ गणितज्ञ आणि प्रा. घाटे यांच्यासारखे विद्वान् व रसिक संस्कृतचे प्रोफेसर अशांच्या हाताखालीं शिक्षणामृताचें सेवन करण्याचें सौभाग्य ज्या विद्यार्थ्यांना लाभलें ते खरोखरच मोठे दैववान् होत.

त्यावेळचें आमचें कॉलेज म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञानसंपादनाचें क्षेत्र नसून तें जणूं एकजिनसी कुटुंबच होतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. जूनियर व सीनियर इन्टरमीजिएट आणि बी. ए. चे वर्ग मिळून आम्ही फार फार तर १५०–२०० विद्यार्थी असूं. परंतु कॉलेजच्या आवारांत पदार्पण करतांच आम्ही निरनिराळया ठिकाणचे विद्यार्थी असूनहि जणूं कांहीं एकाच कुटुंबांतील मुलें आहोंत हीच भावना सर्वांच्या अंतःकरणांत प्रादुर्भूत होई आणि प्रत्येकाचे वर्तनांत ती प्रत्यहीं अनुभवास येई. एखाद्या कुटुंबांतील चार वर्षांनीं वडील असलेल्या आपल्या भावाबद्दल त्याच्या लहान भावाचे ठायीं जें प्रेम व जो आदरभाव असतो त्याच आदरभावानें आणि आत्मीयतेनें आम्ही आमच्या सीनियर विद्यार्थी बंधूंशीं वागत असूं आणि आपल्या लहान भावंडांना ज्या प्रेमानें व आपुलकीनें वडील बंधु वागवितात तीच वागणूक आम्हालाहि आमच्या सीनियर वर्गबंधूंकडून सतत मिळत असे. या एकंदर परिस्थितीमुळें घरच्या कुंद वातावरणांतून मी एका नव्या जगांतच प्रवेश केला आहे या भावनेनें बेहोष होऊन गेलों व सुखसागरांत पोहूं लागलों.

## सोवळे ओवळयांत आले ! : २२ :

'ऐसें कैसें रे सोवळें, शिवतां होतसे ओवळें '

—रामदास.

आमची कॉलेजची दिनचर्या अगदीं रेखीव व बांधलेली असे. सकाळीं ६ ते ७ व्यायाम, ७ ते ९॥ अभ्यास, ९॥ ते १० भोजन, १०॥ ते ४ कॉलेज, ४॥ ते ६॥ व्यायाम, ७ ते ८ जेवण आणि ८ ते १० अभ्यास. रात्रीं १० वाजतां दिवे मालविलेच पाहिजेत असा बोर्डिंगचा कडक नियम असे.

जेवणाची व्यवस्था आमची आम्हीच आळीपाळीनें पाहात असूं. सहकारितेच्या शिक्षणाचा तो ओनामा होता. बाजारहाट करणें, नोकरांवर देखरेख ठेवणें, काटकसरीनें खर्च करणें इत्यादि अनेक कामांचे धडे घेण्याची ती प्राथमिक शाळाच होती म्हटलें तरी चालेल. शिवाय कमी खर्चांत सुग्रास अन्न मिळण्याचा तो एक सुलभ मार्ग होता.

आमचा क्लब ( महाराष्ट्र क्लब ) हा सोवळ्या ओवळ्याची विशेष कदर बाळगणारा सनातनी सभासदांचा क्लब होता. सर्व सभासद एकजात सोवळें नेसणारे. त्रिसुपर्णाचा गजर झाल्याशिवाय जेवावयास मिळणेंच अशक्य ! तीस बत्तीस सभासदांपैकीं आम्ही एकदोघेच काय ते पुरोगामी मताचे होतों. सोवळें आणीपावेतों मला व माझ्या जोडीदाराला सोवळ्याच्या पंक्तीबाहेर बसावें लागे. या बाबतींत सत्याग्रह करण्याची आमची तयारी नसल्यामुळें म्हणा अथवा नवीनपणाच्या जाणिवेनें उद्भवणारा भित्रेपणा म्हणा पण वेगळें बसावें लागल्याबद्दल प्रतिकार करण्याचें धैर्य आम्हां दोघांपैकीं एकासहि झालें नाहीं हें खरें. मी गांवांतून माझ्या श्वशुरगृहीं निरोप पाठवून एक सोवळें पैदा केलें आणि अनिच्छेनें कां होईना पण सोवळ्या पंक्तींत सामिल झालों व हाच क्रम पुढें एक वर्षपावेतों चालू ठेवला.

पुढच्या वर्षी नवीन विद्यार्थी आमच्या क्लबामध्यें दाखल झाले. या नवागतांमध्येंहि एकदोन आमच्याच पंथाचे होते व त्यांपैकीं एकाचा मनोनिग्रह दांडगा होता. आपण सोवळें नेसणार नाहीं असा स्पष्ट पुकारा त्यानें पहिल्या दिवशींच केला. सक्ती कोणालाच करतां येणें शक्य नव्हतें. यामुळें आमचे हे नवे स्नेही ओवळ्यानेंच बसण्याच्या निर्धारानें वेगळे बसूं लागले. माझ्या कमकुवत मनाची मला लाज वाटली व मग मात्र मीहि त्याच्याच जोडीला ओवळ्यानें बसूं लागलों. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं पहिली टर्म संपण्याचे पूर्वी बत्तिसांपैकीं अर्धेअधिक सभासद आमच्या गोटांत येऊन मिळाले; एवढेंच नव्हें, पण दुसऱ्या टर्मचे अखेरीस तर बत्तिसांपैकीं केवळ दोनतीनच सभासद सोवळ्या पंक्तींत शिल्लक राहून बाकीचा सर्व क्लब ओवळा झाला !

माझी शरीरयष्टि मूलतःच कृश आणि प्रकृतीनेंहि मी अशक्तांपैकींच. कॉलेजमध्यें प्रवेश करीपावेतों व्यायाम किंवा तालीम यांची व माझी तोंड-ओळख देखील नव्हती. मी कधीं गोट्या खेळलों नाहीं, पतंग उडविले नाहींत, गुल्लीदंड्या ( विटीदांडू ) खेळलों नाहीं, आट्यापाट्या खेळलों नाहीं मग क्रिकेट-फूटबॉल, हॉकी तर दूरच राहिले. भोंवरा फिरविण्याचें तंत्र मात्र मला थोडेसें हस्तगत झालें होतें खरें, परंतु तें घरांतल्या घरांतच. अशा परिस्थितींत भल्या पहाटे उठून जिमनॅशियमचे अनिवार्य ( compulsory ) तासाला रांगेत जाऊन उभें राहणें आणि डबल बार हॉरिझॉन्टल बार, ट्रॅपेझ, रिंग्ज यांसारख्या व्यायामांत भाग घेणें म्हणजे मला भयंकर शिक्षाच वाटत असे. माझ्या जिमनॅशियम् शिक्षकानें मला या व्यायामांत प्रवीण करण्याची आपल्याकडून पराकाष्ठा केली, परंतु तीन वर्षे सक्त मेहनत घेऊनहि तो बिचारा शेवटीं अपयशीच ठरला ! क्रिकेट, फूटबॉल व हॉकी या खेळांचीहि मला आवड अशी कधींच उत्पन्न झाली नाहीं. खेळाचे तासांत खेळलेंच पाहिजे असा कॉलेजचा दंडक असल्यानें मी या खेळांत भाग घेत असें, इतकेंच. परंतु वरील तीन्हींपैकीं एकाहि खेळांत मला गोडी अशी कधींच वाटली नाहीं, मग प्राविण्य तर दूरच राहिलें. टेनिस या एकाच खेळांत मला थोडी बहुत गोडी वाटे आणि स्वतःच्या पाळीव्यतिरिक्त जेव्हां केव्हां वेळ व संधि मिळे तेव्हां तेव्हां मी टेनिस मात्र मनापासून खेळत असें. परंतु या खेळांतहि प्राविण्य असें मी कधींच संपादन करूं शकलों नाहीं.

जिमनॅशियमचे तासांत डबलबार, सिंगलबारचे व्यतिरिक्त इतरहि निरनिराळे व्यायाम करून घेत असत. त्यांत हायजंपचा ( उंच उडीचा ) व्यायाम कधीं कधीं असे. या व्यायामांत मी भाग घेई. त्यांत मला थोडें बहुत यशहि आलें होतें, परन्तु हा अपवादहि दैवाला मानवला नाहीं ! एके दिवशीं हायजंपची तालीम चालू होती. माझ्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांनीं चपळाईनें झपाझप् उड्या घेतल्या. माझी पाळी आली. हायजंपच्या फळीच्या

टोंकापावेतों मी वेगानें जाऊन पोंचलों. जवळच उभ्या असलेल्या जिमनॅशियम् शिक्षकानें ' हप् ' करून इशारा दिला. मी उडी घेतली, परंतु उडी मारण्याच्या तंत्रांतील एका भागाचें अवधान न राहिल्यानें माझ्या उजव्या पायाचा अंगठा लाकडी घोड्याच्या पाठीला चाटून गेला व असा मुरगळला कीं मी पलीकडील गादीवर सपशेल कोलमडलों ! मला उभेंच राहतां येईना. दोघांनीं उचलून मला माझ्या खोलींत आणलें; मुचकल्या जागीं टिंक्चर आयोडीन वगैरे प्राथमिक उपचार केले, परंतु अंगठा एकसारखा दुखूं लागला व पायांवर उभें राहणें मला अगदीं अशक्य झालें. अशा मुचकण्यावर भिलावा ( बिब्बा ) लावतात एवढें मला माहित होतें. लागलीच भिलावे आणले आणि चाकूनें त्यांतील तेल काढून त्याचा भरपूर लेप अंगठ्यावर दिला. अपुरें ज्ञान हें केव्हांहि घातकच ! अंगठा अधिकच ठणकूं लागला. रात्रभर झोंप आली नाहीं. सकाळीं उठून पाहतों तों अंगठा मनस्वी सुजलेला व आंत पू झालेला ! माझे काका त्यावेळीं इंदूरच्या सेन्ट्रल इंडिया मेडिकल स्कूलमध्यें डॉक्टरी शिकत होते, त्यांना बोलावून आणलें. त्यांनीं आम्हांला टांग्यांत घालून मेडिकल स्कूलच्या दवाखान्यांत नेलें व मेजर रॉबर्ट्सना माझा पाय दाखविण्यकरतां म्हणून मला आउट-पेशन्ट रूममध्यें बसविलें.

कोणतीहि नवी केस मेडिकल स्कूलचे आवारांत आली कीं सगळे मेडिकल विद्यार्थी तीव्र गिधाडासारखे तुटून पडतात. मी तेथें पोंचल्यापासून प्रत्येक विद्यार्थ्यानें यावें, माझा अंगठा वर खालीं आडवा तिडवा हालवावा आणि आपलें स्वतःचें मत बनवावें, असा प्रकार सारखा चालू होता. कमींत कमी ४०–५० विद्यार्थ्यांनीं तरी माझ्या अंगठ्याचे असे हाल हाल केले असतील ! माझा प्राण अगदीं कासावीस होऊन गेला; इतक्यांत मेजर रॉबर्ट्स आले आणि या घोर आपत्तींतून माझी एकदांची सुटका झाली. मुलांनीं रिपोर्ट केला कीं जखम हाडापावेतों जाऊन पोंचली आहे व फ्रॅक्चरहि आहे. अंगठा बहुधा कापावा लागेल. मेजर रॉबर्ट्सनीं अंगठा

वरवर तपासला व अधिक पाहाणीसाठीं मला ऑपरेशन् रूममध्यें घेऊन जाण्याचा हुकूम दिला. ॲम्प्युटेशन्‌चें ( अंगठा कापण्याचें ) नांव ऐकतांच माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला. मी स्वच्छ नकार दिला. ॲम्प्युटेशन् न केल्यास पुढें भोगाव्या लागणाऱ्या त्रासाचें व दुष्परिणामाचें भडक चित्र काका माझ्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करूं लागले, तथापि मी माझ्या निश्चयापासून रेसभरहि ढळलों नाहीं.

मला ऑपरेशन थिएटरकडे नेणार इतक्यांत डॉक्टर सरजूप्रसाद तेथें आले. आमच्या काकांनीं त्यांनाहि माझा अंगठा दाखविला व मेजर रॉबर्ट्‌सनीं मला ऑपरेशन् थिएटरमध्यें नेण्याचा हुकुम दिला असल्याचें व मी ॲम्प्युटेशन्‌ला तयार नसल्याचेंहि त्यांना सांगितलें. डॉक्टर सरजूप्रसाद यांनीं अंगठा नीट तपासून पाहिला, क्षणमात्र गंभीर चेहरा केला व ते काकांना म्हणाले ' कोन कहता है कि ॲम्प्युटेशन् करना चाहिये ? ' आणि नंतर माझ्या पाठीवर हातानें थोपटून हंसत हंसत ' बाबू, घबराना नहीं, ठीक आठ दिनमें तुम अच्छे चलने फिरेन लग जाओगे ' असें म्हणून त्यांच्या वॉर्डमध्यें मला घेऊन जाण्यास त्यांनीं सांगितलें. सोसवेल तितक्या कढत पाण्यांत दिवसभर पाय ठेवणें व रात्रीं लेड् लोशन्‌ची ओली पट्टी ठेवणें यापलीकडे कांहींहि उपचार करावयास त्यांनीं सांगितलें नाहीं आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्यांनीं म्हटल्याप्रमाणें बरोबर आठव्या दिवशीं मी उभा राहून चालूंहि लागलों !

हायजंप घ्यावयाला जिमनॅशियम् शिक्षकानें मला पुन्हा केव्हांहि सांगितलें नाहीं हा कांहीं लहान सहान फायदा नव्हता !

## कारावास : २४ :

बाल्यावस्था संपून यौवनावस्थेंत पदार्पण झालें कीं माणसामध्यें कांहीं उपजत व नैसर्गिक भुकांचा व भावनांचा उद्गम होतो. अशा वेळीं त्याचें

मन आणि दृष्टि चौफेर धावूं लागतात. त्याच्या वृत्तींत एक प्रकारची चंचलता व अस्थिरता उत्पन्न होते. विचारांपेक्षां विकार प्रबळ होतात.

सन १९०३ च्या ऑक्टोबर-नवंबरमधील गोष्ट. इंदुरास प्लेगची साथ जोरांत सुरू झाल्याकारणानें गांवांतील लोक भराभर बाहेर जाऊं लागले. आमचें कॉलेज गांवापासून बरेंच दूर असल्यानें आम्ही सुरक्षित होतों, परंतु थोड्याच दिवसांत नोकर लोकांच्या खोल्यांत उंदीर पडूं लागले व कॉलेजच्या अधिकाऱ्यांना कॉलेज बंद करणें भाग पडलें. त्यामुळें आतां कोठें जावें हा मजपुढें प्रश्न येऊन पडला. धारला जावें तर तें शक्य नव्हतें; कारण इंदुरास प्लेग असल्यानें इंदूरच्या कोणाहि इसमास धारच्या हद्दींत प्रवेश करण्याची सख्त मनाई होती. प्लेगमुळें माझ्या श्वशुरगृहींची मंडळी बडवायला गेली होती. साहजिकच मीहि तिकडे जावयाचें ठरविलें आणि वडिलांना तसें कळवून मी बडवायला रवाना झालों.

बडवाय इंदूरहून ४६ मैल दूर आहे. माझा तेथील मुक्काम अतिशय सुखांत आणि आनंदांत गेला. श्वशुरगृहींचा निवास, मोकळें वातावरण, वाचावयाला भरपूर पुस्तकें, गप्पासप्पांना बरोबरीचे दोन मेहुणे, आजू-बाजूची रम्य वनश्री, नर्मदामाईचें प्रत्यहीं घडणारें पुण्यदर्शन आणि हें दर्शन घेण्याकरतां रोज घडणारा ४–५ मैलांचा अनिवार्य व्यायाम यांमुळें माझ्या प्रकृतींत चांगलाच फरक पडला. परंतु दैवाला आमचें हें सुख फार दिवस पाहवलें नाहीं ! सोप्याच्या कठड्यावरून पडल्याचें निमित्त होऊन माझ्या सर्वांत लहान मेहुण्याला धनुर्वात झाला आणि शक्य ते सर्व उपाय करूनहि त्यांतच त्याचा शोचनीय अंत झाला ! आमच्या सर्व सुखावर आणि आनंदावर विरजण पडलें ! यांत भर म्हणूनच कीं काय तेथें प्लेगची तुरळक लागणहि सुरू झाली. वरील दोन्ही कारणांमुळें लागलीच बडवायहून मुक्काम हालविणें आम्हांस भाग झालें व आम्ही माझे चुलतसासरे श्रीयुत रामचंद्र अंबाजी, धरगांवचे त्यावेळचे अमीन, ( मामलेदार ) यांचे येथें येऊन दाखल झालों.

घरगांवलाहि आमचा काल सुखांत जात होता. खेड्यांतील शांत आणि प्रसन्न वातावरण, उगवत्या व मावळत्या सूर्यबिंबदर्शनाचें नयनरम्य दृश्य, पनघटावर जाणाऱ्या ग्रामीण रमणींचे गोड हास्यविनोद, उघड्या नागड्या खेडवळ बालकांचें धुळींतील स्वैर खेळणें बागडणें, सायंकाळीं धमनींतून अथवा पायीं होणारा मोकळया हवेंतील फेरफटका व गांवांतील लोकांचीं उदार आणि प्रेमळ अंतःकरणें या सर्वांनीं आमच्या सुखाला आणि आनंदाला ऊत येत होता. अशा परिस्थितींत माझ्या वडिलांकडून माझ्या मेहुण्यांना एक व मला एक अशीं दोन पत्रें आलीं. माझ्या पत्रात सर्वांच्या खुशाली-पलीकडे कांहीं नव्हतें, परंतु मेहुण्याच्या पत्राबरोबर एक लहानशी साखरेची पुडी होती. पत्र वाचून आणि ती पुडी पाहून माझे मेहुणे मुस्करत मुस्करत मला म्हणाले ' दत्तोपंत, तुम्हाला धारचें बोलावणें आलें आहे, कधीं जातां ? ' मला याचा उमज पडेना. माझ्या पत्रांत तसा कांहींच उल्लेख नव्हता. मी विस्मयानें माझ्या मेहुण्याचे तोंडाकडे पाहात राहिलों. मेहुणे मजकडे पाहून गालांतल्या गालांत हंसत होते व माझी उत्सुकता वाढवीत होते. मला राहवेना. शेवटीं त्यांच्या हातून पत्र घेऊन वाचलें तेंव्हां साखरेची पुडी कशाची होती याचा लख्ख प्रकाश पडला. ही बातमी वाचून मला मनांतून गोड गुदगुल्या होणें अगदीं स्वाभाविक होतें. या आनंददायक बातमीनें धारचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें व धारेस जाण्याकरतां मन ओढ घेऊं लागलें. परंतु त्याबरोबरच नाना शंका कुशंकांनीं मन व्यग्र होऊन गेलें. धारला जाण्याची मनाला जबर ओढ लागली खरी परंतु वडिलांनीं ' ये ' म्हणून स्पष्ट म्हटलें नसतां धारला जाणें कसें योग्य होईल ? शिवाय इंदूरचे लोकांना धारचे हद्दींत येण्यास बंदी आहे त्याचें कसें काय करावयाचें ? हे दोन प्रश्न समोर उभे राहिले. आपल्याच घरीं जावयाचें त्याला वडिलांनीं ' ये ' म्हणून लिहिण्याचीच काय आवश्यकता आहे ? असा मनानें पहिल्या प्रश्नाचा निकाल दिला. परंतु दुसरा प्रश्न कसा सोडवावयाचा ? इतक्यांत कोणीतरी म्हणालें कीं इनॉक्युलेशन् करवून घेतल्यास धारेस जाऊं देतात. बुडत्यास काडीचा आधार ! वरील माहितीचा

आधार घेऊन लागलीच मी इनॉक्युलेशन् करवून घेतलें आणि त्याचे दुसरे किंवा तिसरे दिवशीं आमची स्वारी धारेस जावयास निघाली.

धारच्या पांच मैल अलीकडे येऊन पोंचतों तों निराळेंच ताट मजपुढें वाढून ठेवलेलें ! आमचा टांगा पुढें न जाऊं देतां तेथेंच थांबविण्यांत आला; आम्ही कोठून आलों, कोणाकडे जाणार वगैरेची रीतसर चौकशी व नोंद करण्यांत आली, डॉक्टरी तपासणीहि केली गेली आणि शेवटीं आम्हांला समोरची एक तट्ट्याची झोंपडी दाखविण्यांत येऊन तेथें तब्बल २१ दिवस-पावेतों मुक्काम करण्याचा हुकुम देण्यांत आला ! मी इनॉक्युलेशन् करून घेतलें असल्याचा दाखला कामावर असलेल्या डॉक्टरास दाखविला परंतु त्याचा कांहीं उपयोग न होतां एकवीस दिवसांचा क्वॉरंटाइन्चा विकट कारावास भोगण्याचा प्रसंग मात्र मजवर ओढवला ! झालें !! आमची ओढ, आमच्या इच्छा, आमची उत्कटता अंतःकरणांतील प्रबल मनोवृत्ति ह्या सर्वांचा चक्काचूर झाला !!

## अनभ्यासे विषं वारि : २५ :

‘असाध्य तें साध्य करितां सायास’

—तुकाराम.

कोणत्याहि कलेंत प्राविण्य व प्रभुत्व मिळविण्याला तपश्चर्या लागते. सन १९०४ मधील प्रसंग. डीनची परवानगी घेऊन शनिवारीं सायंकाळीं मी बोर्डिंगमधून गांवांत श्वशुरगृहीं आलों होतों. शनिवारची रात्र नाटक पाहण्यांत आणि रविवारचा सर्व दिवस खाण्यापिण्यांत व शालकांबरोबर गप्पासप्पा करण्यांत मजेंत घालविला व रविवारीं सायंकाळीं परत कॉलेजवर जाण्याचे तयारीनें कपडे चढविले. गांवापासून कॉलेज जवळ जवळ तीन मैल दूर असल्यानें इतक्या लांब मी पायीं जावें हें आमच्या सासूबाईस प्रशस्त वाटेना. घरचा घोडा होताच. अर्थात् आम्ही घोड्यावरून जावें व मोतद्दारानें पुढें

कॉलेजवर जाऊन घोडा परत आणावा असें ठरलें. मला घोड्यावर बसण्याचा मुळींच सराव नव्हता. आमचे दोन्ही मेहुणे घोड्यावरून वीस वीस मैलांची रपेट सहज तास दीड तासांत लीलेनें करून येत. ‘ घोड्यावर बसण्याचा मला सराव नाहीं, मी पायींच जातों ’ असें मी म्हणतांच मेहुण्यांनीं माझी थट्टाच आरंभिली व ‘ त्यांत काय आहे ? घोड्यावर बसणें तर अगदीं सोपें, त्यांत कठिण अथवा भिण्यासारखें कांहींच नाहीं; आमचा घोडाहि अगदीं गरीब आहे ’ इत्यादि इत्यादि गोष्टी सांगून मला त्यांनीं हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याचा प्रयत्न चालविला. मीहि हुरळून गेलों आणि धाडस करून पहावें असें मला वाटूं लागलें. मी त्यांच्या सूचनेला भीतभीतच संमति दिली. लागलीच घोड्यावर खोगीर कसलें गेलें. मोतद्दार पुढें रवाना झाला. आमची स्वारी घोड्यावर आरूढ झाली व डाव्या हातांत लगाम आणि उजव्या हातांत बारिकशी वेताची छडी घेऊन भोरकुव्याकडे जाणाऱ्या रस्त्याला लागली. जुन्या इंदूरच्या लेव्हल्-क्रॉसिंग पावेतोंची आमची सफर सुरक्षित पार पडली. रेल्वेचें लेव्हल् क्रॉसिंग ओलांडलें आणि थोडासा पुढें जातों तों सडकेवर स्टीम रोड-रोलर चालू असलेला ! रोलरच्या एन्जिनचा तो खडखडाट कानीं पडतांच व रोलरचें तें अजस्र धूड दृष्टीस पडतांच आमचे अश्वराज बिचकले. त्यांनीं आपले कान टवकारले, एकदोनदां फुरं फुरं केलें आणि आपली गति मंदावून आडरस्त्याला वळण्याचा ते प्रयत्न करूं लागले ! माझें धाबें दणाणलें ! तोंडचें पाणी पळालें ! पुढें काय करावें हें कांहीं सुचेना. मी अगदीं भांबावून गेलों आणि त्या भांबावलेल्या मनःस्थितींतच घोड्याला थांबवावें या हेतूनें त्याचा लगाम मी जोरानें ओढला. त्याबरोबर त्यानें पुढचे दोन्ही पाय उंचावून जी एकदम उडी घेतली ती सडकेच्या बाजूस असलेल्या शेताच्या कांटेरी कुंपणांत. या उडीबरोबर घोडेस्वार धाडकन् धरणीतलावर आदळले !!

सुदैवानें घोडेस्वारास फारशी दुखापत झाली नाहीं. अश्वराज मात्र चौखूर उधळले व बाजूच्या शेतांतून त्यांनीं भोरकुव्याचे बाजूस धांव घेतली. याच

वेळीं कॉलेजमधील माझे एक सहाध्यायी श्रीयुत अनंतराव चितळे कॉलेजवर जात होते त्यांनीं दुरून हें दृश्य पाहिलें. अश्वराजहि रोलरपासून बरेच दूर गेल्यानें, निर्भय झाल्याचे जाणिवेनें, रस्त्याच्या कडेला उभे राहिले होते. श्रीयुत चितळे यांनीं प्रथम घोड्याला चुचकारून त्याचा लगाम धरला आणि नंतर ते आमच्या समाचाराला आले. मला विशेष दुखापत झाली नसून मी पायीं कॉलेजवर जाऊं शकेन अशी खात्री झाल्यावर मला विचारून ते घोड्या-वर स्वार झाले व त्यांनीं घोडा तीरासारखा भरधांव फेकला. तें दृश्य पाहून मी थक्कच झालों !!

इकडे मोतद्दार कन्हैया घोडा परत नेण्यासाठीं कॉलेजवर माझी वाट पाहात बसला होता. मी पायींच येत असलेला पाहून तो बुचकळयांत पडला. मी त्याला सर्व हकीकत सांगणार इतक्यात श्रीयुत चितळे पांढऱ्या सफेत फेसानें तर्र झालेल्या घोड्यासह माझ्या खोलीसमोर येऊन दाखल झाले आणि माझ्यासारख्या नवशिक्याला अशा घोड्याच्या स्वाधीन केल्याबद्दल त्यांनीं बिच्याऱ्या मोतद्दाराचीच हजेरी घेतली. मी मात्र पुन्हा घोड्यावर म्हणून बसावयाचें नाहीं अशी शपथ घेतली ! अनभ्यासे विषं वारि !!

## वाईटांतून चांगलें : २६ :

दुराराध्य दुराग्रहाचे दुष्परिणाम माणसाला जन्मभर भोगावे लागतात ! वडिलांचे दुराग्रहानें मला इंदुरास होळकर कॉलेजमध्यें दाखल व्हावें लागलें एवढेंच नव्हे तर संस्कृतसारखा न झेंपणारा कठिण विषय मला अनिवार्य ( compulsory ) म्हणून घेणें भाग पडलें. संस्कृतचे विषयांत मी किती पारंगत होतों याचा उल्लेख मागें आलाच आहे. मॅट्रिकचे परीक्षेंत संस्कृतचे पेपरमधून हितोपदेशाच्या घोकंपट्टीचे बळावर मी कसा तरी निभावलों होतों, परंतु इन्टरमीजिएटमध्यें तसें मुळींच धकण्याजोगें नव्हतें. रघुवंशाचे सहा सर्ग आणि संपूर्ण भट्टीकाव्य हीं दोन्ही झेंपणें मला अगदीं अशक्य होतें; परंतु आमचे वडील ही परिस्थिति समजून घ्यावयास मुळींच तयार

क्र. नं. 2228

नव्हते. संस्कृतच्या तासाला नियमितपणें जावें, तेथें माशा मारीत बसावें आणि तास संपतांच कोरेच्याकोरे निघून यावें असा—अगदीं अक्षरशः असा—क्रम वर्षभर चालू होता. वार्षिक परीक्षेत अर्थातच याचा जो प्रकाश पडावयाचा तो पडून मला शंभरांपैकीं फार तर पांच सहा मार्क मिळाले असतील ! परंतु इतर विषयांत मार्क्स बरे मिळाले असल्यानें दुसऱ्या वर्षाचे वर्गांत माझी बढती होऊं शकली.

दुसऱ्या वर्षाची पहिली टर्म सुरू झाली. आम्ही सर्व मुलें संस्कृतच्या वर्गांत जाऊन बसलों. प्रो. घाटे यांनीं मागच्या वर्षीं झालेल्या अभ्यासाचें थोडक्यांत सिंहावलोकन केलें, आणि तें करीत असतांनाच गेल्या वार्षिक परीक्षेत ज्यांनीं संस्कृतचे पेपर्स उत्तम सोडविले होते त्यांची प्रशंसा केली. त्या मुलांना या प्रशंसेनें मूठभर मांस चढलेसें दिसलें, परंतु ही प्रशंसा ऐकत असतां माझ्या हृदयाचे ठोके मात्र जोरजोरानें पडूं लागले होते ! वरील स्तुतिवर्षाव पूर्ण होतो न होतो तोंच प्रो. घाटे मला उद्देशून म्हणाले 'पिंगे, तुमचा पेपर मात्र फारच वाईट होता. तुम्हांला संस्कृत व्याकरणाचे ठोकळ नियमदेखील माहीत असलेले दिसत नाहींत. तुम्ही मॅट्रिक तरी कसे पास झालां ?' मी याला काय उत्तर देणार ? मी अत्यंत खजिल झालों. माझ्या तोंडावाटे शब्दहि फुटेना. एवढ्यावरच थांबलें असतें तर मी माझें भाग्य समजलों असतों. परंतु प्रो. घाटे यांनीं माझा पेपरच काढला आणि मी लिहिलेल्या उत्तरांची ते वर्गांत अगदीं निर्दयतेनें चिरफाड करूं लागले ! मला मेल्याहूनहि मेल्याप्रमाणें झालें. माझा चेहरा अगदीं उतरून गेला. सर्व वर्गाचें लक्ष्य मजवर केंद्रित झालें. भर वर्गांत माझ्या डोळ्यांवाटे खळखळ अश्रुप्रवाह सुरू झाला ! हें पाहून प्रो. घाट्यांनाहि वाईट वाटलें. त्यांनीं तो विषय तेथेंच थांबविला व आपल्या लेक्चरला प्रारंभ केला.

तास संपला. प्रो. घाटे यांनीं मला एकीकडे बोलाविलें व माझ्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले 'पिंगे, तुमचा पाणउतारा करावा असा माझा मुळींच हेतु नव्हता. तुम्हांला दुःख झाल्याचें पाहून मला फार वाईट वाटलें. परंतु

तुम्ही आमचें संस्कृत सुधारलें पाहिजे एवढें खास. कसून मेहनत करा, अडचण पडेल तेथें पन्नास वेळां मला विचारा. मी केव्हांहि तुम्हाला लागेल ती मदत करावयास तयार आहे. जा, घाबरूं नका.'

केवढा मोठा दिलासा होता हा! सहारा वाळवंटांतील हिरवळच! या उत्तेजनानें प्रोत्साहित होऊन भांडारकरांच्या पहिल्या पुस्तकापासून मी पुन्हा अभ्यास करावयास प्रारंभ केला. प्रो. घाटे माझ्या पाठीशीं होतेच. त्यांनीं यत्किंचित्हि न कंटाळतां अत्यंत प्रेमानें आणि अंतःकरणपूर्वक जितकी कांहीं मदत करतां येणें शक्य होतें तितकी केली. परंतु चार वर्षें अभ्यास करून जें ज्ञान प्राप्त व्हावयाचें तें केवळ सहा महिन्यांचे अवधींत आत्मसात् करून घेण्याइतकी तीव्र बुद्धिमत्ता माझेठायीं नव्हती हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. अर्थात् माझ्या परिश्रमांना आणि प्रो. घाटे यांच्या प्रयत्नांना विशेषसें यश आलें नाहीं! सहामाही परीक्षेंत पांचाचे ऐवजीं शंभरांपैकीं दहाबारा किंवा फार तर पंधरा सोळा मार्क मिळाले असतील; परंतु तेवढ्यानें कार्यभाग होण्याजोगा नव्हता. मग आतां पुढें काय? हा प्रश्न मजपुढें आ वासून उभा राहिला. प्रो. घाट्यांनीं तर आतां जवळ जवळ हात टेकले होते. शेवटीं मॅट्रिकमध्यें अवलंबिलेला प्रयोग येथेंहि करून पहावयाचें मी ठरविलें, आणि दुसऱ्या टर्मच्या पहिल्या दिवसापासून पहांटे तीन वाजतां उठून रघुवंशाचा एक एक सर्ग—त्यांतील श्लोक, त्या श्लोकाच्या इंग्रजी व संस्कृत अर्थासहित—तोंडपाठ करण्याचा सपाटा चालविला. परीक्षेला आतां फक्त सहा महिने उरलेले, इतरहि विषयांची तयारी करावयाची, तेव्हां रघुवंश पाठ करून करून मी किती करणार? तरीहि रघूचे तीन सर्ग त्यांतील श्लोकांच्या संस्कृत व इंग्रजी अर्थासह मी मुखोद्गत केले. पण तेवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. शेवटीं पूर्व ( प्रिलिमिनरी ) परीक्षेंत मी संस्कृतमध्यें नापास व्हावयाचा तो झालोंच! परंतु इतर विषयांनीं चांगली साथ दिल्याकारणानें आणि संस्कृतची त्रुटि मी राहिलेल्या अवधींत भरून काढूं शकेन या भरंवशानें मला युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस बसण्याचा फॉर्म मिळाला.

केव्हां केव्हां वाईटांतूनहि चांगलें निघतें असें म्हणतात. माझेंहि तसेंच झालें. आमचें कॉलेज त्यावेळीं कलकत्ता युनिव्हर्सिटीला जोडलेलें असल्यानें रघुवंशावरील नोट्सचीं पुस्तकें कलकत्त्याचे बंगाली प्रोफेसरांनीं लिहिलेलींच आम्हांला घ्यावीं लागत. या पुस्तकांत श्लोकांच्या इंग्रजी आणि संस्कृत अर्थाबरोबरच बंगालींतहि अर्थ दिलेला असे. बंगाली भाषेचें वाङ्मय त्यावेळेसहि फार समृद्ध असल्याचें मी ऐकिलें होतें. त्या वाङ्मयाचा आपण परिचय करून घ्यावा अशी उत्कंठा मनांत उद्भूत झाली. देवनागरी लिपि आणि बंगाली लिपि यांचें पुष्कळच साम्य आहे वरील नोट्समधील संस्कृत अर्थ पाठ करीत असतां हें साम्य चटकन् नजरेंत भरे. या साम्याचा तुलनात्मक अभ्यास करून मी बंगाली वर्णमाला आत्मसात् केली. एवढेंच नव्हे तर इंग्रजी आणि संस्कृत अर्थाबरोबरच प्रत्येक श्लोकाचा बंगाली अर्थ वाचण्याचाहि मी प्रघात ठेवला. हें करीत असतांनाच एक हस्तलिखित बंगाली-मराठी कोशहि मी तयार केला. एवढें करूनच मी थांबलों नाहीं तर पुढें परीक्षा संपल्यानंतर बंगालींतील ख्यातनाम कादंबरीकार बाबू बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या सर्व बंगाली कादंबऱ्या मी वाचून काढल्या. त्यांच्या एका लहानशा गोष्टीचा मी मराठींत अनुवादहि केला आणि पुढें कांहीं दिवसांनीं दुसऱ्या एका प्रसिद्ध बंगाली कादंबरीकाराच्या कादंबरीचें स्वैर रूपांतरहि केलें. मात्र या रूपांतराला सूर्यप्रकाश दाखविण्याची इच्छा मला कधींच झाली नाहीं.

संस्कृतवर प्रभुत्व मिळालें नाहीं तरी बंगालीसारख्या श्रेष्ठ भाषेशीं परिचय करून घेण्याची संधि मला संस्कृतनें आणून दिली हा कांहीं लहान सहान आणि उपेक्षणीय फायदा नव्हे. वाईटांतूनहि कधीं कधीं चांगलें निघतें तें असें.

## क्रांति

: २७ :

सन १९०५ च्या मार्च महिन्यांत मी इन्टरमीजिएटच्या परीक्षेस बसलों. विपरीत परिस्थितीचे भोंवऱ्यांत सांपडलेला असूनहि अभ्यासांत मी कधींच

कुचराई केली नाहीं. परंतु आडांतच नाहीं तें पोहऱ्यांत कोठून येणार ? कमालीचे प्रयत्न करूनहि शेवटीं परीक्षेंत अपयश यावयाचें तें आलेंच ! परीक्षेचा निकाल ऐकून वडिलांचा मजवर किती रोष झाला असेल याची कल्पनाच केलेली बरी. मान खालीं घालून बोलतील तें निमूटपणें ऐकून घेण्यापलीकडे मला अन्य मार्गच नव्हता ! या निकालानें तरी थोडाबहुत उमज पडून माझ्या अभ्यासक्रमांत बदल करून घेण्याची संधि वडिलांकडून मला मिळेल अशी एक अंधुकशी आशा मी मनांत बाळगून होतों; परंतु तीहि फोल ठरून मला पुन्हा होळकर कॉलेजमध्येंच जावें लागलें ! पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या ! पुनश्च रघु, पुनश्च भट्टीकाव्य आणि फिरून भांडारकर यांचें पीठ पाडण्याचा वर्षभर मी कसून प्रयत्न केला. परंतु भवितव्यता निराळी होती ! याहि खेपेस परीक्षेंत अपयशच पदरीं आलें आणि मग वडिलांचा जो भयंकर भडिमार सुरू झाला तो 'न भूतो न भविष्यति !!'

त्यांचे ते कठोर अप्रस्तुत व किळसवाणे शब्द ऐकून माझ्या हृदयाचें पाणी पाणी झालें ! जीव विटून गेला. आपण जन्मास तरी कशास आलों ? त्यापेक्षां जन्मतांच मेलों कां नाहीं ? आपलें जिणें खरोखरच इतकें निर्माल्यवत् आहे का ? तसें असल्यास जगण्यांत अर्थ तरी काय ? अशा नानाप्रकारच्या विचारांनीं माझें मस्तक अगदीं भणाणून गेलें. जेवणखाण कांहींहि सुचेना. कोणाशीं बोलणें चालणेंहि रुचेना. एकांतांत बसून एकसारखें विचारभ्रमण चालू झालें. रात्रीच्या रात्री झोंप कशी ती मला माहीत नव्हती. कोणाचा सल्ला घ्यावा तर जीवाभावाचे कोणी मित्रहि नव्हते. पुढें काय करावयाचें हा एकच एक विचार रात्रंदिवस भेडसावीत होता !

वडील आतां माझ्या शिक्षणाप्रीत्यर्थ एक पै देखील खर्च करण्यास तयार नव्हते. तसें त्यांनीं निःसंदिग्धपणें बोलूनहि दाखविलें होतें. मेल्या अन्नाचे तुकडे तोडण्याची माझी पण तयारी नव्हती. तें माझ्या रक्तांतच नव्हतें. आतांपावेतों मिळविलेल्या शिदोरीवर अथवा शक्य तर तींत भर घालून कोणाचाहि मिंधा न होतां मी स्वतःचे पायांवर उभा राहून स्वाभिमानानें

ग्रं. ५५
नों. क्रि. ७९९१

आपला उदरनिर्वाह करूं शकेन एवढा आत्मविश्वास माझ्यांत खचित होता. शेवटीं मी मनाशीं कांहीं निर्धार केला. परंतु तो अमलांत कसा आणावयाचा ? वडिलांसमोर जाण्याची माझी छाती नव्हती, मग माझा निर्धार त्यांना मी होऊन सांगणें फारच दूर! वडिलांनीं बोलावल्याशिवाय त्यांच्यासमोर गेल्याचें माझ्या आयुष्यांत मला एकदांहि आठवत नाहीं. फारच अडलें तर आमची मध्यस्थी आमच्या मातोश्री करीत. परंतु प्रस्तुतचें वातावरण इतकें प्रक्षुब्ध झालेलें होतें कीं माझ्या बाबतींत कांहींहि गोष्ट वडिलांकडे काढण्यास मातोश्रीची हिंमतच झाली नसती. शिवाय माझा प्रस्तुतचा प्रश्न इतका बिकट आणि विस्फोटक होता कीं त्यांत ती कांहींच बोलूं शकली नसती. पण या अडचणींतून तांतडीनें मार्ग काढणें मला नितांत आवश्यक होतें. शेवटीं मी पुन्हा एकदां श्रीयुत बापट वकील व श्रीयुत रामचंद्र केशव नगरकर, पोस्टमास्तर यांची कांस धरली. माझा बेत वडिलांचे गळीं उतरविण्याचें सांकडें मी त्यांना घातलें. दोघांनींहि मला माझ्या निश्चयापासून परावृत्त करण्याची शिकस्त केली. 'वडिलांचा राग दोन दिवसांनीं निवळेल व ते तुला पुन्हा कॉलेजांत पाठवितील ही खात्री बाळग आणि एवढ्याकरितां भलता अविचार करूं नकोस' असें मला समजावण्याचा त्यांनीं प्रयत्न केला, पण मी माझ्या निर्णयापासून ढळलों नाहीं. 'आपण माझें काम करीत नसाल किंवा तसें करण्यास आपणास कांहीं अडचण वाटत असेल तर मला अन्य कांहीं मार्गाचा अवलंब नाइलाजानें करावा लागेल' असें मी त्यांना निक्षून सांगितलें. माझा निर्धार पाहून दोघांनींहि माझी विनंती मान्य केली व माझा बेत वडिलांचे कानांवर घालून त्यांची संमति मिळविण्याचा त्यांनीं कसोशीनें प्रयत्न केला; माझा बेत वडिलांना पसंत पडणें शक्य नव्हतें. त्यांनीं या द्वयीसमोरहि माझी यद्वातद्वा हजेरी घेतली व शेवटीं ते म्हणाले 'त्याला जें कांहीं करावयाचें असेल तें करूं दे. तो काय दिवे लावणार तें दिसतेंच आहे. त्याला पाहिजे तेथें जाऊं दे. मी त्याचें पुन्हा तोंडहि पाहणार नाहीं. माझा एक मुलगा मेला असेंच मी समजेन.' दोघांनींहि पुन्हा वडिलांस

समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले ‘ तो म्हणतो आहे त्याप्रमाणें करून दाखविण्याची तुम्ही त्याला एकदां संधि तर देऊन पहा. त्यांत तो यशस्वी झाला तर उत्तमच. परंतु अपयशी ठरला तर त्यालाहि धडा मिळेल. तो आपण होऊन तुमच्याकडे परत येईल आणि पुनश्च असा अविचार करणार नाहीं. ’ शेवटीं हो-नाहीं करतां अनिच्छेनेंच पण वडिलांनीं त्यांच्या म्हणण्यास रुकार दिला. नंतर मला समोर बोलावण्यांत आलें व ‘ तुझें काय म्हणणें आहे तें यांना सांग ’ असें त्या द्वयीनें मला सांगितलें. मी त्यांना म्हटलें ‘ माझें सर्व म्हणणें मी आपणां दोघांस सांगितलेंच आहे तथापि आपली इच्छाच असली तर मी पुन्हां सांगतों :—

१. मला घर सोडण्याची व अकाउन्टन्सीच्या शिक्षणाकरतां मुंबईस जाण्याची परवानगी असावी.

२. माझ्या शिक्षणाचे खर्चाकरतां म्हणून मी यापुढें वडिलांकडे एक कपर्दिकहि मागणार नाहीं.

३. मुंबईस जाण्याचे वाटखर्चासाठीं आणि तेथील एक महिन्याचे उदरनिर्वाहाकरतां मला फक्त तीस रुपये देण्यांत यावे.

४. वरील रकमेनंतर उदरनिर्वाहाकरतां किंवा माझे संसाराकरतां मी वडिलांकडे एक पैचीहि मागणी कधींहि करणार नाहीं.

५. कांहींहि झालें आणि कोणत्याहि परिस्थितींत असलों तरी वडिलांच्या कीर्तीला आणि नांवाला कलंक लागेल असें कोणतेंहि कृत्य मजकडून कदापि घडणार नाहीं. ’

वापट आणि नगरकर यांच्या दडपणानें व आग्रहानें वडिलांना माझ्या वरील योजनेला अनुमति देणें भाग पडलें आणि पडत्या फळाची आज्ञा घेऊन सन १९०६ च्या जून अथवा जुलई महिन्याच्या एके सुप्रभातीं नशीबाची परीक्षा पाहण्यासाठीं मी होळकर कॉलेजला, धारला आणि वडिलांच्या आश्रयालाहि कायमचा रामराम ठोकला !

## सत्य संकल्पाचा दाता नारायण ! : २८ :

कोणतेंहि सत्कार्य हातीं घ्यावयाचें म्हटलें कीं त्यांत संकटें उभीं ठाकतातच. परंतु अशा संकटांनीं बावरून जाण्याचें किंवा भिण्याचें मुळींच कारण नाहीं. हातीं घेतलेल्या कार्यावर अचल निष्ठा असल्यास आणि चिकाटीनें प्रयत्न व परिश्रम करीत राहिल्यास त्यांत सिद्धि ही मिळालीच पाहिजे. निष्ठा आणि चिकाटी यांचे बलावरच ध्रुवाला ध्रुवपद प्राप्त झालें.

वडील व मातोश्रीच्या चरणीं वंदन करून निश्चयाचे बळावर मी घर सोडलें. टांगा चालू झाला आणि मग मात्र मनावर उद्विग्नतेची घनदाट छाया पसरूं लागली ! आजवरचें वडिलांचें छत्र झुगारून दिलें, कोणाचा आसरा नाहीं, कोणाची सहानुभूति नाहीं, कोणी मायेचें नाहीं, कोणी धीर देणारा नाहीं कीं कोणी बरेंवाईट सांगणारा नाहीं ! जगाच्या पाठीवर मी एकटा—अगदीं एकाकी—झालों या विचारानें मन विचलित होऊन गेलें. आपण केलें हें योग्य केलें का ? भलत्याच भावनेच्या भरीं पडून सर्व आयुष्यभर पश्चात्ताप करण्याची पाळी तर आपणावर येणार नाहीं ना ? नाक मुठींत धरून पुनश्च वडिलांचे घरीं अपमानित जिणें जगण्याचा प्रसंग तर यावयाचा नाहीं ना ? अशा विचारांनीं माझ्या उद्विग्नतेंत अधिकच भर पडत होती. हेका धरून घराबाहेर पडलों तर खरा, परंतु मुंबईसारख्या अफाट आणि बकाली शहरांत मी कोठें जाणार, कोणाचे आश्रयाला राहणार, वेळीं अवेळीं मला योग्य अशी सल्ला कोण देणार इत्यादि विचारांनीं माझ्या मनांत अगदीं काहूर माजविलें आणि मन अत्यंत अस्थिर व बेचैन झालें. पण पुन्हा उलट विचारांनीं उसळी खाल्ली कीं, ‘ काय मूर्ख आणि दुबळा आहें मी ? ज्या धडाडीनें, ज्या स्वाभिमानानें वडिलांचा आश्रय झुगारून मी घराबाहेर पडलों तो काय असा हिम्मत हरावयाला ? माझ्यांत धमक असेल, कांहीं कर्तृत्व असेल तर अशा भेकड कल्पनांना मनांत थारा न देतां त्यांना धुडकावून लावून मी त्यांवर विजय कां नाहीं मिळविणार ? ‘ हिम्मते मर्दा, तो मदत-ए खुदा. ’ हिम्मत धर आणि चल पुढें ! ’ या विचारांनीं माझी उद्विग्नता बरीच मावळली आणि मनाला थोडा हुरूपहि आला.

दुसरे दिवशीं मी मुंबईस दाखल झालों. धारहून मुंबईस पोंचेपावेतोंचे कालावधींत मुंबईस कोठें उतरावयाचें, काय करावयाचें ह्याविषयींचे सर्व बेत मी मनाशीं आंखून ठेवले होते. त्याप्रमाणें गाडींतून उतरतांच व्हिक्टोरिया करून—माझ्या सख्ख्या वहिणीचें बिऱ्हाड मुंबईत असतांहि—मी सरळ बनामहॉल लेनमध्यें राहात असलेले माझ्या वडिलांचे स्नेही श्रीयुत गणबा घोलकर यांचे बिऱ्हाडीं जाऊन उतरलों. आगाऊ कांहीं सूचना नसतां मला आकस्मिक आलेला पाहून घोलकरांना आश्चर्य वाटलें. मी सर्व गोष्टींचा थोडक्यांत खुलासा केला.

गणबा घोलकर मूळचे कोकणांतले राहणारे. एकटा एक प्राणी. परंतु त्यांचा प्रपंच फार मोठा होता. मुलगा नाहीं म्हणून जवळ बाळगलेला चोवीस पंचवीस वर्षांचा एक तरुण, त्याची वृद्ध माता, पत्नी, दोन अडीच वर्षांचा चुणचुणीत मुलगा आणि या लहान मुलाचा एक मामा एवढें मोठें घोलकरांचें कुटुंब होतें. घोलकरांचा धंदा बुकबाइंडरचा आणि ह्या धंद्यानिमित्तच ते धारला आमचेकडे आले असतां त्यांचा व माझा परिचय झालेला. याच परिचयाचे जोरावर मी माझें वस्तान सरळ त्यांचेकडे ठेविलें. मनुष्य मनानें दिलदार व अंतःकरणानें अत्यंत प्रेमळ. माझी हकीगत ऐकतांच त्यांनीं मला धीर दिला आणि जागेची कमालीची टंचाई असतांहि आपल्या घरीं राहण्याची त्यांनीं मोकळ्या मनानें मला परवानगी दिली. माझा पहिला मुख्य प्रश्न अशा रीतीनें सहजीं सुटला.

जागेचा प्रश्न तात्पुरता सुटला तरी अजून बरेचसे प्रश्न सुटावयाचे होते. आपला निर्धारित हेतु साध्य करावयाचा, अकाउन्टन्सीचा डिप्लोमा घ्यावयाचा तर कोर्सची फी भरावयास पैसा पाहिजे. वडिलांकडून आणलेल्या तीस रुपयांतून दहाबारा रुपये वाटखर्चांत गेले होते, राहिलेल्या सतराअठरा रुपयांत फीची गरज भागणें अशक्य होतें. त्यावेळीं (१९०६) युनिव्हर्सिटीचें कॉमर्स कॉलेज अस्तित्वांत नव्हतें. अकाउन्टन्सीचें शिक्षण देणाऱ्या त्यावेळच्या प्रमुख अशा संस्था किंवा शाळा फक्त दोनच; एक दावरचें कॉलेज

ऑफ कॉमर्स, व दुसरी के. एस. अय्यर आणि कंपनी. परंतु या दोन्ही संस्थांची फी जबर होती व ती सर्वच्या सर्व आगाऊ द्यावी लागे. तें मला शक्यच नव्हतें माझ्या खिशांत फक्त अठरा रुपये शिल्लक होते, तेव्हां मी एक-आंखी २५०।३०० रुपये देणार कोठून ? अर्थात् या संस्थांचा विचार सोडून देणें मला भाग होतें. राहतां राहिले इतर किरकोळ व लहान प्रमाणांतील ह्या शिक्षणाचे वर्ग. ह्या वर्गांचे चालकहि फीच्या सर्व रकमेची मागणी आगाऊच करीत. परंतु शेवटीं प्रयत्न करतां करतां व माझी परिस्थिति निवेदन करतां एका संस्थेच्या चालकांनीं दरमहा दहा रुपयेप्रमाणें फी घेणें मान्य केलें. परंतु हे दहा रुपये तरी त्याला द्यावयास मजजवळ होते कोठें ? त्याला दरमहा दहा रुपये द्यावयाचे तर मला दरमहा प्राप्तीचें कांहीं साधन उपलब्ध करून घेणें आवश्यक होतें आणि म्हणून जागेचा प्रश्न सुटतांच मी प्रथम त्या उद्योगास लागलों.

ज्याला खावयास नसेल त्यानें मुंबईस जावें आणि पोट भरावें अशी पूर्वीं एक म्हण होती आणि ह्या म्हणीचा प्रत्यय मला आतां पाहावयाचा होता. धारचे माजी एज्युकेशन सुपरिन्टेन्डन्ट श्रीयुत वासुदेव त्रिंबक कापशे यांचे एक नातेवाईक श्रीयुत जगन्नाथ रघुनाथ ऊर्फ नानासाहेब घारपुरे मुंबईस प्रसिद्ध वकील होते. धारहून निघतांना कापशे यांजकडून नाना-साहेबांस देण्याकरतां म्हणून मी एक पत्र घेतलें होतें. हें पत्र घेऊन मी नानासाहेबांच्या घरीं गेलों. त्यांना मी पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें. मी गेलों त्यावेळीं ते उघडेच होते. त्यांची उंच, धिप्पाड व मजबूत शरीरयष्टि, भरदार मिशा आणि रुबाबदार चेहरा पाहतांच आदर व भीति या संमिश्र भावनेनें मी थोडासा गांगरून गेलों, परंतु क्षणार्धांत मी मला सावरलें व आदरानें नमस्कार करून श्रीयुत कापशे यांजकडून आणलेलें पत्र त्यांना दिलें. पत्र वाचून होतांच ते म्हणाले 'तुम्हांस कसली नोकरी पाहिजे ?' मी म्हटलें, कसलीहि; कारकुनाची, शिक्षकाची, पट्टेवाल्याची, झाडू मारण्याची किंवा भांडीं घासण्याची, कसलीहि नोकरी मला चालेल. आपण जें काम द्याल तें करण्यास मी तयार आहें.' नानासाहेबांनीं क्षणभर माझ्या चेहऱ्याकडे निरखून

पाहिलें, माझें शिक्षण कोठपावेतों झालें आहे याची चौकशी केली आणि दोन दिवसांनीं पुन्हां येऊन भेटण्यास सांगितलें. मी हर्षभरित मनानें बाहेर पडलों. दोन दिवसांनीं नानासाहेबांस मी पुन्हां जाऊन भेटलों तेव्हां त्यानीं विचारलें 'येथील एका शाळेंत शिक्षकाची जागा रिकामी आहे, मात्र त्या जागेचा पगार फक्त अठरा रुपये आहे. तुम्ही ती जागा पत्करावयास तयार आहां का ?' मी म्हटलें 'अठराच काय पण पंधरा असले तरीहि मी ती जागा खुशीनें पत्करावयास तयार आहें.' लागलीच त्यांनीं आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या प्रिन्सिपॉलच्या नांवानें एक चिठ्ठी मजजवळ दिली, आणि मी त्याच दिवसा-पासून-मुंबईंत पाय ठेवल्यापासून आठ दिवसांचे आंतच-त्या शाळेंत दरमहा अठरा रुपये पगारावर शिक्षक म्हणून रुजू झालों. नानासाहेब घारपुरे यांनीं माझे पहिले अन्नदाते व आश्रयदाते होण्याचें श्रेय घेतलें !

दुसऱ्याच दिवशीं पूर्वकथित अकाउन्टन्सी क्लासांत मी नांव दाखल केलें आणि माझ्या नियोजित मार्गाचे प्रवासास प्रारंभ झाला.

## शान्ति-सदन : २९ :

कांहींहि पूर्वसूचना न देतां मुंबईस येतांच मी जवळजवळ हक्कानेंच घोलकर यांचे बिऱ्हाडीं माझें चंबूगवाळें टाकलें आणि त्यांनींहि आपल्या स्वाभाविक सौजन्यानें माझें स्वागत करून मला ऋणी केलें परंतु या त्यांच्या सौजन्याचा अवास्तव फायदा घेणें उचित नव्हतें. ऊंस गोड लागला म्हणून तो मुळापासून खाणें केव्हांहि शहाणपणाचें नसतें. दुसऱ्यानें आपल्या अडचणीच्या वेळीं मदतीचा हात पुढें केला त्याचा गैरफायदा घेऊन त्याच्या चांगुलपणा-बद्दल त्याला पश्चात्तापाची पाळी आणणें हा निव्वळ कृतघ्नपणा होय. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते. या मर्यादेचें अतिक्रमण करणें अनुचित असतें व क्वचित् तें आपल्या अपमानासहि कारणीभूत होतें. म्हणून नोकरीची सोय लागतांच मी बिऱ्हाडाकरतां जागेच्या शोधाला लागलों घोलकरांच्या चिरंजीवाचे शालक हणमंत विश्राम मसूरकर यांच्या सहाय्यानें एकदोन

दिवसांतच जागेची सोय लागली. घोलकर यांच्या घराशेजारींच असलेल्या एका घराच्या तिसऱ्या मजल्यावर एक लहानशी दहा फूट लांबीरुंदीची खोली होती. एनॅमलिंगचें काम शिकत असलेला एक विद्यार्थी आणि रासायनिक प्रयोग करण्याकरतां कधीं कधीं येणारा डॉक्टरी शिकणारा एक विद्यार्थी अशा दोघांनीं मिळून ही खोली भाड्यानें घेतली होती. मसूरकरांचे शिफारशीनें मला या खोलींत भागीदार म्हणून महिना दोन रुपये भाड्यावर सामिल करून घेण्यांत आलें. लागलीच माझें सामान-ट्रंक व बिछाना घोलकरांचे घरून मी या खोलीवर आणलें. माझ्या दोन्ही भागीदारांच्या संमतीनें या आमच्या निवासस्थानाचें 'शान्ति-सदन' असें नामकरण करण्यांत आलें व माझ्या भागीदारानें मुद्दाम तयार केलेली एनॅमलची 'शान्तिसदन' अशी सुंदर अक्षरांची पाटी आमच्या निवासस्थानावर झळकूं लागली.

आमच्या खोलीला कुलूप असें कधीं नसेच. दाराला कडी लावून एक मोडकें, परंतु दुरून पाहिलें असतां बंद भासणारें कुलूप नुसतें कोयंड्यांत अडकवावयाचें म्हणजे झालें. आम्हां तिघांपैकीं कोणीहि केव्हांहि यावें, हें लटकें कुलूप उघडावें, खोलींत प्रवेश करावा आणि बाहेर जातेवेळीं पुन्हा तसेंच बंद करून ठेवावें, हा आमचा नित्याचा प्रघात असे.

सकाळीं पांच वाजतां उठावें, प्रातर्विधि उरकून जवळच्या कोपऱ्यावर असलेल्या इराण्याच्या हॉटेलमध्यें चहा घ्यावा, लागलीच नळाखालीं थंड पाण्यानें स्नान करावें, धोतर धुवावें व आपल्या उद्योगास लागावें. संध्याकाळीं क्लासमधून आलों कीं चौपाटीवर फिरावयास जावें, फिरून आल्यावर भोजन व नंतर झोंप, हा माझा तेथील नित्यक्रम होता. मात्र निजण्यापूर्वी दासबोधाचे पांच समास आणि भगवद्गीतेचा एक अध्याय मी नित्यनेमानें वाचीत असें.

## उदारात्मा : ३० :

हें विशाल जग कंटकमय आणि विपुल खांचखळग्यांनीं व्याप्त आहे तरीहि निर्हेतुक प्रेम करणारे कांहीं दयाशील प्राणीहि क्वचित् कोठें कोठें

आढळतात व आपलें कष्टमय दुःख हलकें करतात; आणि अशांचें स्मरण झालें म्हणजे अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येतें.

नोकरीची सोय लागली, शिकण्याची व्यवस्था झाली, राहावयाला सोईची जागाहि मिळाली. आतां प्रश्न काय तो जेवण्याचा शिल्लक उरला होता. ह्या बाबतींतहि घोलकर कुटुंबावर निष्कारण बोजा पडावा अशी माझी मुळींच इच्छा नव्हती आणि म्हणून दुसरी कांहींतरी व्यवस्था करणें मला प्राप्त होतें. वडिलांकडून आणलेल्या तीस रुपयांपैकीं मजजवळ अठरा रुपये शिल्लक होते. पण शक्य तों या रकमेला हात लावण्याची माझी मनीषा नव्हती. होणाऱ्या प्राप्तींतच माझा खर्च मला भागवावयाचा होता. मला महिना १८ रुपये मिळत होते. त्यांतून दहा रुपये फी व दोन रुपये घरभाडें वजा जातां मजजवळ केवळ सहा रुपये शिल्लक रहात. आणि सहा रुपयांत दोन्ही वेळ साधारण बऱ्यापैकीं अन्न देईल अशी एकहि ब्राह्मणाची खाणावळ त्यावेळीं मुंबईत नव्हती. चांगल्यापैकीं खाणावळीचा त्यावेळचा दर कमींत कमी १२ ते १५ रुपये होता. शोध करतां करतां सारस्वत ब्राह्मणाची एक खाणावळ महिना नऊ रुपये घेतें असें मला कळलें. मला मोठा आनंद झाला. ही खाणावळ गिरगांवांत खोताचे वाडींत 'नारायणाची खाणावळ' ह्या नांवानें प्रसिद्ध होती. मी त्या खाणावळीचा चालक नारायण यास जाऊन भेटलों व त्याला खाणावळीचा दर विचारला. 'नऊ रुपये' त्यानें सांगितलें. 'एक वेळ जेवावयाचें झाल्यास ?' मी प्रश्न केला. माझ्या प्रश्नाचें उत्तर न देतां नारायण माझ्या चेहऱ्याकडे विस्मयानें पाहातच राहिला. क्षणभरानें त्यानें विचारलें 'दुसऱ्या वेळेस काय करणार ?' मी म्हटलें 'उपास. कारण, मजकडे एक वेळच्या जेवणापुरतेच पैसे आहेत; तेव्हां दिवसांतून एकच वेळ जेवावयाचें मी ठरविलें आहे.' यावर नारायण म्हणाला 'काय वेडे आहांत हो तुम्ही ? असें कोठें झालें आहे ? तुमच्यासारख्या तरुण माणसाला निदान दोन वेळां भरपूर जेवण पाहिजेच. पैसे काय, आज नसतील तर उद्यां येतील. पैशाची काळजी करूं नका. पैसे जेव्हां येतील तेव्हां द्या पण दोन्ही वेळां जेवावयास येत जा.'

त्याचे हे शब्द ऐकून माझे डोळे पाणावले. नारायणाची व माझी ओळख ना देख. मी लफंगा आहें कीं साव आहें याची यत्किंचित् देखील क्षिति न बाळगतां तो मजवर एवढा विश्वास टाकतो व आपल्या उपकारांची पाखर मजवर घालतो! केवढें हें मनाचें औदार्य! मुंबईसारख्या बकाली शहराच्या काळ्या खडकांतहि असे बहुमोल हिरे कोठें कोठें आढळतात याची पहिली साक्ष मला पटली; आणि खिशांत पैसे नसतांहि माझी दोन वेळच्या जेवणाची समाधानकारक व्यवस्था लागली. नारायणासारख्या उदारात्म्याची एक पै देखील मी बाकी ठेवली नाहीं, ही गोष्ट वेगळी

## खिस्ती-नव्हे खिस्त! : ३१ :

राहावयाला निवाऱ्याची जागा आणि खावयाला अन्न या मनुष्याच्या प्राथमिक गरजा. ह्यांची सोय लागली खरी, परंतु तेवढ्यानें माझें समाधान होण्यासारखें नव्हतें. नारायण खाणावळवाल्यानें संध्याकाळींहि जेवून जात जा म्हणून उदार अंतःकरणानें सांगितलें आणि मीहि तें नाइलाजानें मान्य केलें, परंतु तेंव्हांपासून मनाला सारखी टोंचणी मात्र लागली. नारायणानें औदार्य दाखविलें हा त्याचा थोरपणा पण आपण अशा औदार्याचा फायदा घेणें योग्य होईल का? नाहींपेक्षां ह्यांतून कांहींतरी मार्ग काढलाच पाहिजे असें मनास सारखें वाटूं लागलें. ह्यांतून मार्ग काढावयाचा एकच उपाय होता आणि तो म्हणजे माझ्या सांप्रतच्या उत्पन्नांत वाढ करून घेणें. मी कसून त्या प्रयत्नास लागलों. त्यावेळचें माझें परिचित असें फक्त एक घोलकर कुटुंब. माझा हेतु मी घोलकरांचे मानलेले चिरंजीव श्रीयुत भाऊ नेवरेकर यांच्या कानांवर घातला आणि एक दोन दिवसांचे आंतच त्यांनीं तेथील वुइल्सन् हायस्कूलमध्यें शिक्षकाची एक जागा रिकामी असल्याची बातमी आणली. लागलीच त्या जागेकरितां मी अर्ज पाठविला. खुद्द नेवरेकरहि सदरहु हायस्कूलचे त्यावेळचे सेक्रेटरी श्रीयुत बी. वाय. खिस्ती यांनां भेटून त्यांचेजवळ माझी शिफारस करून आले. खिस्ती यांनीं नेवरेकर यांना सांगितलें कीं 'त्या एका जागेकरितां

जवळजवळ ३००–३५० अर्ज आले आहेत, त्यांतून चांगल्या अर्जदारांची प्रथम छाननी केली जाईल आणि ह्या निवडीच्या चाळणींतून तुमचे पाहुणे वर आले तर पुढें काय करतां येईल तें पाहूं.' ह्या प्राथमिक निवडीच्या चाळणींत साडेतीनशें पैकीं फक्त दहा बारा अर्जदारच काय ते शिल्लक राहिले. सुदैवानें मीहि त्या बारांपैकीं एक होतों. त्यानंतर खिस्ती यांनीं नेवरेकरांनां व मला भेटीस बोलाविलें. खिस्तींनीं माझी थोडी प्राथमिक चांचणी घेतली आणि नंतर ते म्हणाले 'तुमचा अर्ज पहिल्या बारांमध्यें आला एवढ्यानें संपलें नाहीं. या सर्वांना आमचे प्रिन्सिपॉल भेटीला बोलावतील व प्रत्येका-कडून वर्ग शिकवून घेतील. या दोन्ही परीक्षांत जो सरस ठरेल त्याची शेवटीं निवड केली जाईल. परंतु एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा कीं ज्यावेळीं ते तुम्हाला वर्ग घ्यावयास सांगतील त्यावेळीं कोणाहि मुलास हाक मारावयाची झाल्यास 'यू' ( you ) या सर्वनामाचा उपयोग मात्र चुकून करूं नका. दुसऱ्या कोणत्याहि प्रकारानें त्याला हाक मारा. 'यू' या सर्वनामानें मुलांना संबोधणें प्रिन्सिपॉलनां मुळींच खपत नाहीं.' या बहुमोल सूचनेबद्दल आम्ही दोघांनींहि त्यांचे हार्दिक आभार मानले.

दोन चार दिवसांचे आंतच भेटीकरतां मला प्रिन्सिपॉलचें बोलावणें आलें. प्रिन्सिपॉलचीं व माझीं प्राथमिक आणि सर्वसाधारण प्रश्नोत्तरें झाल्यावर त्यांनीं मला एका वर्गाचा भूगोलाचा तास घेण्यास सांगितलें. माझ्या भूगोलाच्या ज्ञानासंबंधी मागें ( स्मृति १८ ) उल्लेख आलाच आहे. वर्गात मुलांशिवाय अन्य कोणी नसतें तर मी कशीहि वेळ मारून नेली असती, परंतु माझ्या शेजारींच हायस्कूलचे प्रिन्सिपॉल व सेक्रेटरी बसलेले; अशा परिस्थितींत निव्वळ वेळ मारून नेणें मला शक्यच नव्हतें. असलेल्या तुटपुंज्या भूगोलाचे ज्ञानावर आणि अनुमानधक्क्याचे व तारतम्याचे ( common sense ) जोरावर तासभर मी वर्ग घेतला आणि घामाघूम होऊन वर्गाबाहेर पडलों! निकाल मागाहून कळविला जाईल असें सेक्रेटरींनीं मला सांगितलें. धडधडत्या अंतःकरणानेंच मी घरीं परतलों. परंतु नवलाची गोष्ट अशी कीं तीनचार

दिवसांतच दरमहा २५ रुपयांवर माझी नेमणूक केली असल्याचें पत्र मला आलें. माझ्या आनंदाला पारावार राहिला नाहीं. खिस्तीचे रूपानें खिस्तच मदतीस आल्याबद्दल मी खिस्ताला मनोमन शतशः धन्यवाद दिले.

अठराचे ऐवजीं दरमहा पंचवीस रुपयांची नोकरी मिळाली म्हणून मी आनंदलों खरा परंतु लागलीच एक अडचणहि पुढें उभी राहिली. नेमणुकीचे पत्रांत तात्काळ कामावर हजर व्हावें असा आदेश होता. दुसऱ्या एका शाळेंत मी नोकर आहें हें मी खिस्ती यांना सांगितलें नव्हतें. ज्या शाळेंत नानासाहेब घारपुरे यांच्या शिफारशीनें मला नोकरी मिळाली होती त्यांना अवचित सोडून जाणें योग्य झालें नसतें. तसेंच दरमहा सात रुपये अधिक मिळणार त्याचा लोभ सोडणेंहि मला शक्य नव्हतें. आर्यनचे प्रिन्सिपॉलनां मी ही परिस्थिति सरळ व उघड मनानें निवेदन केली, परंतु ते मला सोडावयास तयार होईनात. माझें नुकसान होत आहे आणि महिना सात रुपये बुडविण्यास मी तयार नाहीं असें मी त्यांना स्पष्ट सांगितलें परंतु ते कांहीं केल्या ऐकेनातच. शेवटीं दुसरा—माझ्या इतकाच, किंबहुना माझ्याहूनहि अधिक शिकलेला आणि अधिक हुशार व गरजू असा—श्रीयुत खिस्ती यांनीं सुचविलेला, इसम ऐवजी म्हणून आणून दिल्यावर आर्यनमधून माझी एकदाची सुटका झाली आणि अठराचे ऐवजीं आम्ही दरमहा पंचवीस रुपये मिळवूं लागलों.

## ' कठिग समय येतां... ' : ३२ :

' हीं तूं जाण मावेचीं । अवघीं सोयरीं सुखाचीं
हीं तुझ्या दुःखाचीं । सांगाती नव्हती '

—दासबोध, ३।१०।४६

मला आतां दरमहा पंचवीस रुपये पगार मिळत होता. यांतून दहा रुपये फी, दोन रुपये भाडें, नऊ रुपये खाणावळ व न्हावी, धोबी, चहा इत्यादि-साठीं रुपये दोन मिळून तेवीस रुपये खर्च होत आणि दरमहा दोन रुपये मी

नित्यनेमानें पोस्टल् सेव्हिंग्ज बँकेंत जमा करीत असे. सेव्हिंगमध्यें टाकलेल्या पैशांना मी चुकूनहि हात लावीत नसे. अडीअडचणीच्या वेळीं आपल्या हातीं थोडे तरी पैसे असावे हा त्यामागील हेतु होता. या अल्पशा प्राप्तींत माझें सर्व कांहीं सुव्यवस्थित चाललें होतें.

एकदां मी तापानें आजारी पडलों. ती महिन्याची २०–२१ तारीख असावी. अंगांत ताप असल्यानें खाणावळींत जाण्याइतकें त्राण अंगीं नव्हतें. तापामुळें अन्नावर वासनाहि नव्हती. डॉक्टरकडून औषध आणावें तर खिशांत फुटकी कवडीदेखील नव्हती. खोलीवर राहावयास आल्यापासून जवळपासच्या चार समवयस्कांशीं माझा थोडाफार स्नेह झाला होता. केव्हां केव्हां ते मजबरोबर माझ्या पैशानें चहाचिवडाहि खात असत. औषधासाठीं लागणाऱ्या पैशांकरितां, दहा दिवसांनीं परत करण्याच्या बोलीवर ह्या चार पांचजणांपैकीं प्रत्येकाकडे मी मदतीची याचना केली. सर्व इसम चांगल्या सधन कुटुंबांतील. कांहींजण तर मिळवतेहि होते. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं प्रत्येकानें कांहींना कांहीं सबबीवर नन्नाचा पाढा वाचला! इतर वेळीं ह्याच लोकांनीं बसल्या बैठकीला चहाचिवड्यामध्यें रुपया दोन रुपये सहज फस्त केले असते! परंतु माझी लहानशी गरज भागवावयास त्यांपैकीं कोणाकडेहि त्यावेळीं पैसे नव्हते हें आश्चर्य!! मी मोठ्या विवंचनेंत पडलों. औषधालाच पैसे नाहींत मग पथ्याकरतां मोसंबी वगैरेचा विचार तर दूरच राहिला. बिना औषधानेंच मी ताप अंगावर काढला, पण पोट स्वस्थ बसू देईना. पोटाची आग शमविणें भाग होतें. शेवटीं लाचारी पत्करून त्यांच्याचपैकीं एकाकडे पुन्हा पैशाकरतां याचना केली आणि त्यानें मोठ्या उदार अंतःकरणानें मला आठ आण्याचे पैसे उधार दिले! आठ आण्यांत मोसंबीं किती येणार व तीं मला किती दिवस पुरणार? आणि दोन दिवसांत ताप नाहीं राहिला तर पुन्हा अन्नाला पैसे कोण देणार? या विचारानें मोसंबीं आणण्याची कल्पना सोडून देणें मला भाग पडलें. पण मग खावयाचें काय? पोटाची भूक शमवायची कशी? शेवटीं ताप असेपावेतोंचे दिवस मी

साबूदाण्यावर काढण्याचें ठरविलें. एक आण्याचा साबूदाणा आणला. बाकी राहिलेल्या सात आण्यांतून मलई काढून घेतलेलें दूध, ( skimmed milk ) त्यांत भरपूर साखर घालून, अर्ध्या आण्याला पावशेर या दरानें त्यावेळीं मिळत असे, त्यांतलें सकाळीं पावशेर दूध आणावें व त्यांत थोडें पाणी व साबूदाणा घालून तें शेगडीवर उकळवावें आणि तो पावशेर दीड पावशेर साबूदाणा पिऊन सबंध दिवस काढावा, असा क्रम सतत सात आठ दिवस चालविला! सात आठ दिवसांनीं माझा ताप उतरला. पहिली तारीखहि उगवली. पगार मिळाला आणि माझ्या त्या दयाळू सावकाराचे सबंध आठ आण्याचे पैसे धन्यवादाचे व्याजासह मी लागलीच फेडून टाकले.

वरील घटनेनंतर थोड्याच दिवसांची गोष्ट. कांहीं आकस्मिक अडचणीमुळें मला वीस पंचवीस रुपयांची गरज लागली. वडिलांकडून पैसे न मागविण्याची तर मी प्रतिज्ञाच केली होती. खोलीवरील स्नेह्यांचा अनुभव नुकताच आला होता. मुंबईस असलेल्या माझ्या मेहुण्यांकडे पैसे मागितले असते तर कदाचित् मिळालेहि असते, परंतु त्यांच्याकडे तोंड वेंगाडावें असें माझी मनोदेवता मला सांगेना. राहतां राहिले माझे इतर नातेवाईक, म्हणजे माझे शालक व साडू. या दोघांकडे धांव घेण्याचा मी विचार केला व त्याप्रमाणें सविस्तर हकीगतीचीं पत्रें लिहून निदान पंचवीस रुपये तरी कांहीं दिवसांकरतां कर्जाऊ म्हणून पाठविण्याची त्यांना विनंति केली. परंतु आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट अशी कीं प्रत्येकाचा हात कांहींना कांहीं कारणानें अडचणींत असल्याचीं मला दोघांकडूनहि दिलगिरीप्रदर्शक उत्तरें आलीं! पुन्हा कोणाकडेहि—विशेषतः नातेवाइकांकडे—पैशांकरतां तोंड वेंगाडावयाचें नाहीं असा मी मनाशीं निर्धार केला आणि ह्या क्षणापावेतों तरी हा निश्चय मी कटाक्षानें पाळिला आहे.

पुढें कित्येक वेळां मी मात्र त्या लोकांच्या गरजा वेळींअवेळीं स्वतःची अडचण सोसूनहि भागविल्या आहेत, हेंहि तितकेंच खरें!

# मतलबकी दुनिया !                                                    : ३३ :

दैनंदिन व्यवहारांत विविध प्रकारच्या व विविध स्वभावाच्या लोकांशीं आपला संबंध येतो आणि त्या संबंधांतून पदोपदीं भले बुरे अनुभवहि आपल्याला येत असतात. केव्हां केव्हां हे अनुभव फार महाग पडतात. पण आपली जीवनयात्रा सुखद करण्याचे कामीं या अनुभवांचा दीपस्तंभां-सारखा उपयोग होतो. या दीपस्तंभांकडे दुर्लक्ष केल्यास आयुष्याचें तारूं दुःखाचे खडकावर आपटून त्याचीं शकलें शकलें होतात !

माझें उत्पन्न अगदीं तुटपुंजें असतांहि माझा काल सुखांत जात होता. माझा अभ्यासहि चांगला चालला होता. मला कोणतीहि विवंचना नव्हती. प्रकृतीहि उत्तम होती. 'थेंबें थेंबें तळें सांचे' या न्यायानें पोस्टल्-सेव्हिंग्ज-बँकमध्यें थोडीबहुत रक्कम सांचली होती, त्यामुळें मनास एक प्रकारचें समाधान होतें. आतांपावेतों आलेला कटु अनुभव जमेस धरून शक्य तितक्या कमी गरजा व काटकसरीचें धोरण ठेवून दुसऱ्याकडे तोंड वेंगाडण्याचा प्रसंग न येऊं देण्याबद्दल कटाक्षानें दक्षता घेतली जात होती. खासगी किंवा गुप्त असें मजजवळ कांहींच नसल्यानें माझ्या आयव्ययाबद्दल व शिलकेबद्दल खोलीवरील सर्व स्नेह्यांनां पूर्ण कल्पना होती.

मला वाटतें ती एप्रिलची बावीस अथवा तेवीस तारीख असावी. ऐन प्रातःकाळींच एक स्नेही मजकडे आले. थोड्याबहुत औपचारिक गप्पागोष्टी झाल्यावर अगदीं काकुळतीस येऊन मजजवळ पंचवीस रुपये त्यांनीं उधार मागितले. मी आश्चर्यानें थक्कच झालों. सागरानें डबक्याकडे पाण्याची याचना करावी, गंगेनें उलटें वहावयास लागावें त्यांतलाच हा प्रकार होता ! हे इसम स्वतः नोकरी करीत असून त्यांना सत्तर-पंचाहत्तर रुपये पगार होता. त्यांच्या बंधूंना पन्नास-साठ रुपये मिळत असत. त्यांची एक बहीण मुलींच्या एका इंग्रजी शाळेंत शिक्षिका असून तीहि महिना नव्वद-शंभर रुपये कमवीत होती. शिवाय त्याच्या स्वतःच्या घराचें २००–२५० रुपये दरमहा घरभाडें

येत होतें तें वेगळेंच; असें असतांहि हा गृहस्थ माझ्यासारख्या अकिंचनाकडे पंचवीस रुपये उधार मागतो काय ! मी अर्थातच माझी असमर्थता प्रगट केली आणि म्हटलें ' मिस्टर, आपण माझी थट्टा तर करीत नाहीं ? माझें उत्पन्न तें काय ? माझा सर्व खर्च तुमचेपासून लपलेला नाहीं; असें असतां तुम्ही मजकडे पैसे मागतां ह्याला काय म्हणावें ? मजजवळ पैसे कुठून येणार? माझी स्थिति तुम्हाला माहीत नाहीं का ? ' यावर ते गृहस्थ म्हणाले ' तुमची स्थिति मला पूर्णपणें माहीत आहे आणि म्हणूनच तर मी तुमच्याकडे आलों. मी सध्या अत्यंत अडचणींत आहें आणि मला आज पैशांची अत्यंत निकड आहे. माझ्या अब्रूचा प्रश्न आहे, तेव्हां नाहीं म्हणूं नका. ' मी म्हटलें ' तुमची निकड मी अमान्य करीत नाहीं. परंतु तुम्हाला द्यावयाला मजजवळ पैसे हवेत ना ? ' ते गृहस्थ म्हणाले ' मिस्टर पिंगे, तुम्ही आपल्याकडे पैसे नाहीं म्हणतां हें मोठेंच आश्चर्य आहे. तुम्ही असें सांगाल असें मला कदापि वाटलें नव्हतें. ' मी म्हटलें ' अहो मी खोटें सांगतों असें का तुमचें म्हणणें आहे ? ' ' खोटेंच नाहीं तर काय ? ' ते गृहस्थ एकदम उद्गारले ! धडधडीत खोटें बोलण्याचा आरोप मजवर केलेला पाहून मला राग आला. अडीअडचणीचे वेळीं कामीं पडावे, कोणाकडे याचना करण्याचा प्रसंग येऊं नये या हेतूनें ज्या रकमेला हातहि लावावयाचा नाहीं असा मी निर्धार केलेला त्या गड्डयालाच या गृहस्थानें हात घातला होता. माझ्या तुटपुंज्या उत्पन्नांतून मी किती खर्च करतों व काय वाचवितों याची खडा न् खडा माहिती माझ्या सरळपणामुळें म्हणा अथवा बावळटपणामुळें म्हणा या गृहस्थाला होती; तिचा हा असा गैरफायदा तो घेऊं इच्छित असलेला पाहून मला संताप आला मी म्हटलें ' राव, ते पैसे माझे नव्हेतच असें मी समजतों हें तुम्हास माहीत नाहीं काय ? ' यावर ते गृहस्थ म्हणतात ' अहो, ते रुपये बँकेंतच आहेत असें तुम्ही निश्चित समजा. पहिल्या तारखेस पगार येतांच तुमची रकम मी परस्पर न चुकतां, न सांगतां बँकेंत भरून देईन याची खात्री बाळगा, पण आतांची गरज तुम्हीं भागविलीच

पाहिजे. मी पुष्कळ आढेवेढे घेतले, परंतु गृहस्थ इतका गळीं पडला कीं माझा अगदीं निरुपाय झाला व शेवटीं नाइलाजानें पैसे काढण्याचे फॉर्मवर सही करून पासबुक व तो फॉर्म मी त्याचे स्वाधीन केला ! पहिल्या तारखेस न चुकतां पैसे बँकबुकांत जमा करण्यास त्याला मी पुनः पुन्हा बजाविलें. माझे त्रिवार–नव्हे शतशः–आभार मानून व न चुकतां पहिल्या तारखेस पैसे पोस्टांत भरण्याचें तीन तीनदां आश्वासन देऊन स्वारी रवाना झाली.

पुढच्या महिन्याची दोन तारीख उजाडली. व्याजाचें नुकसान होऊं नये ह्या दृष्टीनें मी बँकेंत टाकावयाची रकम दरमहा चार तारखेचे आंत पोस्टांत जमा करीत असें. त्याप्रमाणें पासबुक आणण्यासाठीं मी त्यांचेकडे गेलों पण त्यांची भेट झाली नाहीं. मी त्यांचे घरीं निरोप ठेवून आलों. तीन तारीख उलटली, चारहि ढळली आणि पांच तारीख उजाडली ! मी मनांत बराच अस्वस्थ झालों व पास बुकासाठीं पुन्हा त्यांच्या घरीं गेलों. मला वाटलें होतें कीं त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें माझी रकम बँकेंत भरली असेल, परंतु पासबुक उघडून पाहतांच मी हतबुद्ध झालों ! रकम पुस्तकांत जमा केली नसल्याबद्दल, रागारागांतच, त्यांना खुलासा विचारला. माझ्या संतापाचा त्या गृहस्थाच्या मनावर यत्किंचितहि परिणाम झाला नाहीं ! जणूं कांहींच घडलें नाहीं अशा शांतपणानें आणि निर्विकार मुद्रेनें ते म्हणाले ' मिस्टर पिंगे, आय ॲम रिअली व्हेरि सॉरी. मी तुम्हला कबूल केलें होतें खरें, परंतु तशाच कांहीं घरगुती अडचणींमुळें मी रकम जमा करूं शकलों नाहीं. ' माझा संताप अनावर झाला. मी त्यांना यद्वा तद्वा तोंडास येईल तें बोललों. तरीहि ते गृहस्थ शांतिब्रह्मचे शांतिब्रह्मच ! त्यांच्या चेहऱ्यावर सळदेखील नव्हता ! एकानें खूप संतापावें आणि ज्याच्यावर तो संतापत असेल त्यानें पूर्ण शांतिस्वरूप बनावें म्हणजे त्या रागावणाराची फारच केविलवाणी अवस्था होत्ये ! त्याच्या सगळ्या रागावर जणूं बर्फाचें पाणीच पडतें ! माझेंहि तसेंच झालें. मी एकटाच बडबडत होतों. दुसऱ्या बाजूनें प्रतिशब्द निघतच नव्हता. अशा स्थितींत माझ्या रागाचा पारा चढून चढून वर

कितीसा चढणार ? उलट तो उतरण्याच्याच पंथास लागला आणि शेवटीं मी त्यांना म्हटलें ' तुमचा घरगुती अडचणीचा खेळ होतो पण माझा इकडे जीव जातो याची तुम्हाला कांहीं पर्वा नसावी याबद्दल मला तुमची कींव येत्ये ! ही माणुसकी नव्हे. निव्वळ-फसवेगिरी–लुच्चेगिरी–आहे. ' तरीहि तो गृहस्थ निर्विकारच ! उलट हंसत हंसत तो म्हणतो ' मिस्टर पिंगे, रागावूं नका. तुम्हाला कबूल केल्याप्रमाणें मी रकम जमा करूं शकलों नाहीं हें खरें आणि त्याबद्दल मला फार खेद होतो, परंतु त्याला तशींच अपरिहार्य कारणें होतीं. बहिणीचा पगार येतांच मी तुमची रकम अवश्य जमा करीन. तुम्ही निर्धास्त असा. ' मी रागारागानेंच म्हटलें ' ज्याला आपल्या शब्दांची किंमत नाहीं, जो दिलेलें वचन पाळीत नाहीं तो मनुष्य कसला ? आणि त्याच्या शब्दावर अतःपर विश्वास तरी कसा ठेवावयाचा ? तुमचा मला आतां मुळींच भरंवसा येत नाहीं. तुम्ही मला मात्र व्यर्थ फशी पाडलें. तुमच्याशीं यापुढें एक शब्दहि बोलण्याची माझी इच्छा नाहीं. तुम्हास वाटल्यास पैसे भरा अथवा भरूं नका ' असें म्हणून फणफणतच मी तडक घरीं निघून आलों.

मनुष्यस्वभावाचे नमुने कांहीं अजब असतात. माझ्या संतापाचा आणि कटु शब्दांचा थोडाबहुत परिणाम होऊन हा गृहस्थ लवकरच माझी रकम मला परत आणून देईल अशी माझी वेडी कल्पना होती, परंतु ती फोल ठरली ! दिवसामागून दिवस गेले, महिन्यामागून महिने गेले परंतु पैसे नाहीं ते नाहींच आले ! नंतर कित्येक वेळां त्यांची व माझी भेट झाली असूनहि पैशांसंबंधी त्यांजकडे एक चकारशब्दहि मी काढला नाहीं. मला त्या गृहस्थाचा तिटकाराच आला होता.

पैशासंबंधी त्यांना पुन्हा केव्हांहि विचारावयाचें नाहीं असा मी मनाशीं निर्धार केला होता. परंतु या निश्चयापासून ढळण्याचा प्रसंग दुर्दैवानें मजवर आला ! मुंबईस प्लेगचा प्रादुर्भाव झाला. लोक भराभर झोपड्यांत जाऊं लागले. माझ्या खोलींतहि एक दोन उंदीर पडले ( १४-३-१९०९ ) आणि आतां काय करावें ही विवंचना सुरू झाली. खोलींतील दुसरे भागीदार

श्री. बांवकर कोकणांत आपल्या गांवीं रवाना झाले मी एकटा त्या प्लेगनें पछाडलेल्या खोलींत भुतासारखा–जीव मुठींत धरून–दिवस कंठित होतों. माझे पैसे मजजवळ असते तर मीं ह एखादें लहानसें झोंपडें भाड्यानें घेतलें असतें परंतु पैशाचे अभावीं दैवावर हवाला ठेवून मृत्युचे खाईंतच खितपत पडण्याखेरीज मला गत्यंतर नव्हतें !

खोलींत रोज एक दोन उंदीर पडूं लागले. मीं अगदीं घाबरून गेलों. मृत्यूशीं व्यर्थ लढाई करणें शहाणपणाचें नव्हतें. पुन्हा एकदां पैशांकरतां प्रयत्न करून पहावा या विचारानें मी त्या सद्‌गृहस्थाच्या ( ? ) बिऱ्हाडीं गेलों. पहातों तर त्याच्या घराला कुलूप !! चौकशी करतां ते प्लेगकॅम्पमध्यें झोंपडीवर रहावयास गेल्याचें समजलें. मी कपाळाला हात लावला ! मला याची दादहि नव्हती. शोध करतां करतां त्यांच्या कॅम्पचा पत्ता तर मिळाला. लागलीच मी त्यांच्या झोंपडीवर पोंचलों. ती वेळ संध्याकाळची सात वाजतांची होती. मला पाहतांच त्या गृहस्थाचा चेहरा गोरामोरा झालासा दिसला. वरकरणी हंसतमुखानें माझें स्वागत करून मला त्यांनीं बसावयास खुर्ची दिली आणि मुंबईच्या रिवाजाप्रमाणें चहाचा पेला व एका बशींत एक लाडू मजपुढें आणून ठेवला. वेळप्रसंगीं उपयोगी पडावे म्हणून पोटास चिमटा घेऊन सांठवून ठेवलेल्या माझ्याच पैशांकरितां मला सोसाव्या लागणाऱ्या त्रासानें आणि मनस्तापानें मी आंतून जळून खाक झालों होतों. अशा स्थितींत तो चहा आणि तो लाडू मला कोठून गोड लागणार ? संतापाचे भरांतच मी त्या गृहस्थाला म्हटलें ‘ हें पहा, हा तुमचा पाहुणचार घेण्याकरतां मी येथें आलों नाहीं. घेऊन जा हा तुमचा चहा व लाडू. ’ इतकें म्हणूनच मी थांबलों नाहीं तर संतापाचे तिरमिरींत तो चहा व लाडू मी शब्दशः भिरकावून दिला आणि म्हणालों ‘ तुम्हाला कांही लाज वाटते का ? तुम्ही माझा विश्वासघात केलात, मला संकटांत पाडलेंत, माझा जीव धोक्यांत टाकलात आणि आपण मात्र–माझी खबर घेण्याची साधी माणुसकीहि न दाखवितां–येथें येऊन आपली सुरक्षितता पाहिलीत ! सभ्य माणसाला हें अत्यंत लांछनास्पद आहे. मी

आज येथें आलों तो या तुमच्या लाडू चहाकरतां नव्हे. माझे पैसे मला आत्तां या घटकेला मिळाले पाहिजेत. तुम्ही सुरक्षित आहांत, पण माझा जीव धोक्यांत आहे याची यत्किंचित्‌हि जाणीव तुम्हांला नसावी हें आश्चर्य आहे ! तुमच्यांत थोडी जरी माणुसकी असेल तर माझे पैसे आतांचे आतां परत करा. ' मी इतकें म्हटलें तरी पालथ्या घागरीवर पाणी !! ते म्हणाले ' मिस्टर पिंगे, सगळें खरें, तुमची अडचण मी जाणतों परंतु यावेळीं मजजवळ एक पैसाहि नाहीं. येत्या पहिल्या तारखेस मी तुमचे पैसे नक्की देईन.' मी म्हटलें ' मी तें कांहीं जाणत नाहीं. मला माझे पैसे आत्तांच्या बैठकीस मिळाले पाहिजेत; ते मिळेपावेतों मी येथून हालणार नाहीं. तुम्ही वाटेल तें करा, वाटल्यास आपला जीव गहाण टाका, पण माझे पैसे मला द्या. ' परंतु तो प्राणी अशा धमकीनें बधणाऱ्यांपैकीं थोडाच होता ? जणूं कांहींच घडलें नाहीं अशा निर्विकार मुद्रेनें तो म्हणाला ' माझा अगदीं नाइलाज आहे. आज पैसे परत करतां येणें मला मुळींच शक्य नाहीं. ' माझ्यांत ताकद असती तर हें उत्तर ऐकतांच मी त्या गृहस्थाच्या ताडकन् दोन श्रीमुखांत भडकावल्या असत्या इतका मला त्याचा संताप आला होता; परंतु माझ्या शक्तीची मला पूर्ण जाणीव होती. शिवाय इतक्या खालच्या पातळीवर उतरण्याची माझी तयारीहि नव्हती. तेव्हां मी त्याला इतकेंच म्हटलें ' तें मी कांहीं जाणत नाहीं. मला आज पैसे मिळालेच पाहिजेत. तोंपावेतों मी येथून हालणार नाहीं. ' ' तुमची मर्जी ! ' तो गृहस्थ बेशरमपणें उद्गारला आणि घरांत चालता झाला ! यावेळीं अंदाजे आठ वाजले असावे. रात्रीं दहा वाजेपावेतों मी बाहेर बसून राहिलों. घरांत गेलेल्या त्या सभ्य ( ? ) गृहस्थानें पुन्हा बाहेर तोंड दाखविलें नाहीं ! बायामाणसें घरांत असल्यानें मलाहि घरांत जाण्याची सोय नव्हती. शेवटीं कंटाळून, निराश होऊन व अपमान गिळून रिक्त हस्तांनींच मला परत यावें लागलें ! अकलेचा पहिलाच विकत घेतलेला धडा !!

पुढें थोड्याच दिवसांनीं मी मुंबई सोडली. परंतु अखेरपावेतों माझे पैसे मला परत मिळाले नाहींतच. नंतर बरेच दिवसांनीं माझ्या आतेभावानें या

सद्‌गृहस्थाचे घरीं धरणें धरून ते पैसे त्याच्या घशांतून काढले ! जें करण्यास मी सर्वथा असमर्थ ठरलों तें माझ्या अतिभावानें अवघ्या दोन तासांचे आंत पार पाडलें ! 'तुका म्हणे तेथें पाहिजे जातीचे, येरा गबाळांचें काम नोहे !! '

## प्लेगची झोंपडी : ३४ :

ह्या विशाल जगताचीं सूत्रें हालविणारी कोणी अज्ञात शक्ति आहे हें निर्विवाद सत्य आहे. दुःखांनीं व संकटांनीं गांजलेल्या अनंत जीवांना आपल्या कष्टमय जीवनाचा प्रवास हृदयशून्य व वात्सल्यहीन मानवांनीं खचाखच भरलेल्या अफाट मरुभूमींतून करावा लागतो. अशा खडतर प्रवासांत जेव्हां क्वचित् कोठें थोडी हिरवळ अथवा एखादा थंडगार व मधुर पाण्याचा झरा नजरेस येतो व त्यांच्या यातना हलक्या करतो तेव्हां त्या शक्तीचे ठायीं आदरानें व पूज्य बुद्धीनें त्यांचें मस्तक नम्र होणें स्वाभाविक असतें. असे बहुमोल झरे पृथ्वीचे पाठीवर कोठें कोठें विखुरलेले आहेत म्हणूनच मानवी जीवन थोडें तरी सुसह्य होतें.

मागील प्रकरणांत वर्णिलेल्या माझ्या ऋणकोच्या झोंपडीवरून मी फणकाऱ्यानें परतलों खरा, पण पुढें काय ? जीवाच्या भीतीनें सारी आळी निर्मनुष्य झालेली आणि मी मात्र भुतासारखा एकटा माझ्या खोलींत नाइलाजानें पडलों होतों. सारी खोली खावयाला धांवे व आपण नाहक प्लेगला बळी तर पडणार नाहीं, या भीतीनें जीव गुदमरून जाई. 'सिर सलामत तो पगडी पचास !' कांहींतरी जोराची धडपड केलीच पाहिजे अशी मनास सारखी भुणभुण लागली होती. इतर कोणाकरतां नव्हे तरी निदान आपल्या निष्पाप व निरपराध पत्नीकरतां तरी जीव जगविण्याचा प्रयत्न करणें माझें कर्तव्य होतें. शेवटीं मनाचा हिय्या केला व लोकल गांठून दादरची वाट धरली.

दादरला स्वस्त दरानें झोंपड्या मिळतात अशी मला कोणी तरी बातमी दिली होती. मी दादरला पोंचलों व चौकशी करीत करीत दादरच्या प्लेग-कॅम्पवर गेलों. क्याचशा झोंपड्या तेथें रिकाम्या असलेल्या दिसल्या. झोंपड्यांच्या मालकाची चौकशी केली. अगदीं साधा पोशाख केलेला मध्यम वयाचा एक गृहस्थ समोरच बसला होता. तोच मालक असल्याचें कोणीतरी मला सांगितलें. मी त्याला भेटलों. नमस्कार चमत्कार झाल्यावर मला झोंपडी पाहिजे असल्याचें मी त्याला सांगितलें. तो म्हणाला 'या इतक्या झोंपड्या आहेत, ह्यांतून इच्छेस येईल ती पसंत करा.' मी म्हटलें 'झोंपडी पसंत करण्याचा प्रश्न नाहीं. मला झोंपडी पाहिजे आहे परंतु तिचें भाडें द्यावयास आज मजजवळ पैसे नाहींत. हातांत पैसे येतांच मी अवश्य देईन. आपले पैसे बुडविणार नाहीं, परंतु आज मात्र मजजवळ पैसे नाहींत.' तो गृहस्थ क्षणभर मजकडे पाहातच राहिला. थोड्या वेळानें त्यानें मला विचारलें 'तुमचें नांव काय?' मी माझें संपूर्ण नांव सांगितलें. 'तुम्ही मूळचे कुठले राहणारे?' त्यांनीं पुन्हा प्रश्न केला. 'कोंकणांतील, देवगड तालुक्यांतील साळशी गांवचे' मी उत्तरलों. 'नाना साळसकरांचे तुम्ही कोण?' त्यांनीं विचारलें. 'नातू' मी उत्तर दिलें. परंतु हा प्रश्न ऐकून मी थोडा चकितच झालों. माझ्या आजोबांचें (वडिलांच्या वडिलांचें) घरगुती व त्या प्रांतीं प्रचलित असलेलें नांव या गृहस्थास कसें माहीत? या विचारांत मी होतों. इतक्यांत तो गृहस्थ पुढें म्हणाला 'नानांचे चिरंजीव म्हणजे तुमचे वडील इंदूर-धारकडे वकीली करीत असतात ना?' मी म्हटलें 'हो.' यावर ते गृहस्थ म्हणतात 'मग तुम्हाला पैशाला हो काय कमी? ते तर चांगले प्रसिद्ध वकील आहेत असें ऐकतों.' माझ्या कुटुंबांतील माणसांची या गृहस्थाला बरीच माहिती असल्याचें मला दिसून आलें. परंतु त्याचे हे शेवटचे शब्द मला तितकेसे रुचले नाहींत. मी झटक्यांतच उत्तर दिलें 'माझे आजोबा सरकारी पेन्शनर असतील आणि वडील खोऱ्यानें पैसे ओढणारे वकील असतील, परंतु झोंपडी पाहिजे आहे मला, आणि मजकडे आज पैसे नाहींत. आपणांस मज-कडे पाहून जें कांहीं ठरवावयाचें असेल तें आपण ठरवा. आपले पैसे

कदापि बुडविणार नाहीं एवढी हमी मी आपल्यास देऊं शकतों.' त्या गृहस्थानें पुन्हा एकदां मजकडे निरखून पाहिलें; मी मुंबईत कोठें राहतों, काय करतों वगैरे चौकशी केली आणि नंतर तो मला म्हणाला 'तुम्हांला यांतील वाटेल ती झोंपडी घ्या व येतील तेव्हां पैसे द्या, काळजी करूं नका.' हें उत्तर ऐकून मात्र माझे डोळे भरून आले. कृतज्ञतापूर्वक त्यांना नमस्कार करून मी त्यांचे आभार मानले आणि नंतर त्यांना त्यांचें नांव विचारलें. ते म्हणाले 'माझ्या नांवाशीं तुम्हाला काय करावयाचें आहे? मी तुमच्या आजोबांना व वडिलांना बरेच वर्षांपासून ओळखतों आणि थोड्याशाच परिचयानें मी तुम्हांलाहि ओळखिलें आहे. जा, खुशाल जा आणि वाटेल ती झोंपडी पसंत करून आपल्या ताब्यांत घ्या, संकोच करूं नका. माझें नांव 'पडवेकर.'

पडवेकर अथवा नारायण खाणावळवाले यांच्यासारखे दयाशील महात्मे मुंबईसारख्या बकाली आणि व्यवहारी दुनियेंतहि आढळतात म्हणूनच धकाधकीच्या ह्या निष्ठुर जगांत माझ्यासारख्यांचें जीवन थोडेंबहुत तरी सुसह्य होतें. पडवेकरांनीं आगाऊ पैसे न घेतां मला राहावयास झोंपडी दिली म्हणजे मला त्यांनीं नवजीवनच दिलें!

नारळीच्या झापांची (चटयांची) एक लहानशी झोंपडी मी माझ्या ताब्यांत घेतली, सुंभाच्या दोरीचें तिला कुलूप घातलें आणि संध्याकाळीं माझें सामान मी तेथें आणून टाकलें. झोंपडीचें प्लेगच्या मोसमाचें भाडें पंधरा रुपये होतें. माझ्या पासबुकांत फक्त पांच सहा रुपयेच शिल्लक होते. पडवेकरांना पंधरा रुपये कोठून द्यावयाचे या विवंचनेंत मी पडलों, परंतु मला फार वेळ विचार करावा लागला नाहीं. मी ज्या वर्गांत शिकत होतों त्याच वर्गांत बाहेरगांवचे कांहीं विद्यार्थी शिकत होते. त्यांनाहि झोंपडीची आवश्यकता होतीच. मी असे चार विद्यार्थी धुंडून काढले, प्रत्येकाकडून चार चार रुपये आगाऊ घेतले, त्यांतून पंधरा रुपये पडवेकर यांस दिले व राहिलेल्या एक रुपयाची मी एक खाट मजकरितां विकत आणिली. झोंपडी फुकटांत पडली आणि मृत्यूच्या जबड्यांतून सुटका झाल्याचा मी सुस्कारा सोडला!

## सोडचिट्ठी

सन १९०६ च्या जून–जुलई महिन्यांत वडिलांचा रोष पत्करून आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्याकरतां मी घराबाहेर पडलों त्याची हकीकत मागें (स्मृति २७) आली आहे. लंडन् चेंबर ऑफ कॉमर्सचा अकाउन्टन्सीचा डिप्लोमा घ्यावा, कुठल्या तरी चांगल्याशा व्यापारी कंपनींत अकाउन्टन्ट म्हणून काम करावें व आपला चरितार्थ चालवावा असें मी मनाशीं ठरविलें होतें; कारण तोच सर्वांत सोपा व कमी खर्चाचा मार्ग होता. दावर किंवा अय्यर यांची जबर फी आणि तीहि आगाऊ देण्याचें सामर्थ्य मला नव्हतें. आणि म्हणून मी दुसऱ्या एका स्वस्त कुळाकडे धांव घेतली होती. द्रव्याभावीं पसंती नापसंतीला वावच नव्हता.

कोणत्याहि वस्तूची निवड करतांना केवळ तिचे बाह्य स्वरूपाकडे, दिखाऊपणाकडे अथवा स्वस्तपणाकडे पाहून भागत नाहीं. तिचा टिकाऊपणा, तिची उपयुक्तता, तिचें सौष्ठव या महत्वाच्या गुणांची पारख करूनच त्या वस्तूचें मोल ठरवावें लागतें. हा साधा व्यावहारिक नियम न पाळल्यास पश्चात्ताप करण्याची पाळी येते !

मी दाखल झालों त्या वर्गांत माझ्या अभ्यासास सुरवात झाली. आमच्या अध्यापकानें बुक–कीपिंग आणि अकाउन्टन्सीचा प्राथमिक भाग आम्हांस उत्तम शिकविला आणि विषय नवीन असल्यामुळें त्यांत आम्हाला गोडीहि वाटत गेली. सन १९०७ च्या मार्च किंवा एप्रिलमध्यें मी लंडनच्या नॅशनल् यूनियन् ऑफ टीचर्सच्या बुक्–कीपिंग व अकाउन्टन्सीच्या 'इन्टरमीजिएट' परीक्षेस बसलों व पहिल्या वर्गांत पास होऊन 'डिस्टिंक्शन्'हि मिळविलें. पुढच्या (Advanced Accountancy) अभ्यासाला सुरवात झाली होती. या अभ्यासास सुरवात झाल्यावर मात्र आमच्या अध्यापकाच्या ज्ञानाची व अध्यापन-कौशल्याची खरी परीक्षा होऊं लागली. फीच्या स्वस्त दराचें खरें इंगित आतां आमचे ध्यानीं येऊं लागलें. वर्गांत

गेलों कीं त्यांनीं आम्हांस नुसतें पुस्तक वाचा, एक्झरसाइझेस् ( उदाहरणें ) सोडवा म्हणून सांगावें परंतु पुस्तक वाचीत असतां अथवा एक्झरसाइझेस् सोडवीत असतां आम्हांस कांहीं अडचण किंवा शंका उद्भवल्यास त्यांचें त्यांना निरसन करतां येत नसे. ह्यामुळें आमची विलक्षण कुचंबणा होऊं लागली. प्राथमिक भाग शिकवावयास व समजावयासहि सरळ व सुलभ होता परंतु त्या मानानें पुढील भाग समजण्यास बराच कठिण, गुंतागुंतीचा व महत्वाचा. हा भाग शिकविण्यांतच शिक्षकाचें खरें कौशल्य. परंतु ग्यानबाची मेख येथेंच होती ! आमचे शिक्षक पुढील ( advanced ) भाग समजावून देण्यास अगदींच असमर्थ दिसले. असा कठिण विषय आला कीं ते केवळ वेळ मारून नेत व आमच्याशीं निव्वळ वनवाबनवी करीत असें आम्हांस आढळून आलें. मला ह्याची अत्यंत चीड आली. आपण भलत्याच अनभिज्ञ माणसाकडे गेलों असल्याची खात्री झाली आणि मी बंड पुकारण्याचें ठरविलें.

एके दिवशीं त्यांनीं सांगितलेला एक्झरसाइझ् मी सोडवीत असतां मला त्यांत कांहीं उमज पडेना म्हणून मी त्यांजकडे गेलों व माझी अडचण त्यांना सांगितली. ती त्यांना मुळींच दूर करतां येईना तेव्हां ते चिडून मला कांहींतरी वेडेंवांकडें बोलले. त्यावरोबर धुमसत असलेल्या क्रोधाग्नीनें पेट घेतला व मी संतापानें त्यांना म्हणालों 'सर, आपणाला जर हा विषय नीट समजावून देतां येत नाहीं तर आपल्या क्लासला येण्याचे श्रम तरी आम्ही कशाला घ्यावयाचे ? व आपल्याला दरमहा दहा रुपये फी तरी कशाकरतां द्यावयाची ? आपण पुढचा भाग शिकविण्यास असमर्थ आहां हें जर मला अगोदर माहीत असतें तर मी आपल्या क्लासमध्यें दाखल झालोंच नसतों.' यावर ते म्हणाले 'तुम्ही क्लास सोडूं शकतां, परंतु राहिलेली फी मात्र तुम्हांला द्यावी लागेल.' मी म्हटलें 'तुमची राहिलेली फी तर मी देणार नाहींच परंतु तुमची कीर्ति मात्र मी चव्हाट्यावर आणल्यावांचून राहणार नाहीं.' या उत्तरानें मात्र आमचे अध्यापक किंचित् वरमले आणि ती गोष्ट त्या दिवशीं तेवढ्यावरच राहिली. मी नंतरहि थोडे दिवस वर्गाला नियमित

जात होतों, परंतु तो केवळ कालापव्यय होता. कारण अभ्यासांत मला पुढें कांहींच प्रगति करतां येइंना व माझे अध्यापकहि मला धडपणें कांहीं सांगेनात.

पुढील महिन्याची पहिली तारीख उगवली. महिन्याच्या दुसऱ्या अथवा तिसऱ्या तारखेस मी माझी मासिक फी भरीत असें, परंतु ह्या खेपेस दहा तारीख उलटून गेली तरीहि मी फी भरली नाहीं. अकरा तारखेस अध्यापकांनीं फीची मागणी केली तेव्हां मी सांगितलें कीं जोंपावेतों आपण आम्हाला समाधानकारकपणें शिकविणार नाहीं तोंपावेतों मी फी देणार नाहीं व क्लासला येणेंहि बंद करणार नाहीं. यावर रागारागांतच ते म्हणाले 'तुम्हाला याचे परिणाम भोगावे लागतील.' मी म्हटलें 'त्याला माझी तयारी आहे.'

आणखी कांहीं दिवस गेले. मी वर्गाला नियमितपणें जात असे खरा, परंतु त्यापासून प्रत्यक्ष असा कांहीं फायदा होत नव्हता. माझ्याप्रमाणें इतरहि बरेच असमाधानी वृत्तीचे विद्यार्थी वर्गांत होते. मनांत एक दुष्ट विचार आला आणि टिफिनचे सुट्टींत मी एक उद्योग आरंभिला. या असंतुष्ट विद्यार्थ्यांना फितूर करण्याचा व या इसमाच्या क्लासला रामराम ठोकण्याकरतां त्यांचीं मनें वळविण्याचा प्रयत्न मी करूं लागलों. ज्यांनीं आपली सर्व फी आगाऊ भरली होती ते या गोष्टीला—मनांतून असंतुष्ट असूनहि—कबूल होईनात; परंतु इतर विद्यार्थ्यांना ही गोष्ट पटली व त्यांनीं त्यांचा क्लास सोडून देण्याचें ठरविलें. आमचा हा बेत चालू असतां कोणातरी पंचमस्तंभीयानें ही बातमी अध्यापकांच्या कानांपावेतों पोंचविली आणि मी क्लासला परत येतों तोंच ते मजवर कडाडले 'मिस्टर पिंगे, तुम्ही वर्गाच्या बाहेर जा. आजपासून तुम्ही माझ्या वर्गांत पाय ठेवतां कामा नये.' असा प्रसंग केव्हांतरी यावयाचाच हें भविष्य मी यापूर्वींच वर्तविलें होतें. आमच्या अध्यापकाचा दरडावणीचा हुकुम ऐकतांच मी म्हटलें 'तें तर मीं पूर्वींच ठरविलें होतें, परंतु आपल्या तोंडून मी या हुकुमाची वाट पहात होतों. आपण मला क्लासमध्यें येण्याची, कांहींहि कारण न दाखवितां मनाई केली आहे आणि त्याला हे आठ दहा विद्यार्थी साक्ष आहेत. तेव्हां आतां

पुढें काय करावयाचें हें मी पाहून घेईन. या आपल्या अन्याय्य हुकुमामुळें माझें जें कांहीं नुकसान होईल त्याला सर्वस्वी आपण जबाबदार आहां हें लक्ष्यांत ठेवा व त्याचा जाब देण्यास तयार रहा.' एवढें बोलून उत्तराची वाट न पाहतां क्षणकाऱ्यानेंच मी वर्गाबाहेर पडलों !

भावनेच्या भरीस पडून व ईर्षेस पेटून मी वर्गाबाहेर पडलों तो तडक युनिव्हर्सिटी गार्डनमध्यें येऊन एका बांकावर बसलों. समुद्रावरून येणारा थंडगार वारा डोक्यास लागतांच मस्तक थोडें शांत झालें आणि मग विकाराची जागा विचारानें घेतली. मी अशा रीतीनें क्लास सोडला हें योग्य केलें कां ? क्लासमध्यें राहिलों असतों तर थोडीबहुत तरी मदत वर्गाचे अध्यापकाकडून मिळूं शकली असती तिलाहि मी मुकलों नाहीं का ? बुक-कीपिंग आणि अकाउन्टन्सीचा डिप्लोमा मिळविण्याच्या आपल्या अंतिम ध्येयावर या माझ्या अविचारी कृतीनें कुऱ्हाड पडली नाहीं का ? दुसऱ्या एखाद्या चांगल्या क्लासांत जावयाचें म्हटलें तर आवश्यक तें द्रव्यबल आपणाकडे आहे का ? इत्यादि इत्यादि अनंत विचारांनीं मला भंडावून सोडलें. सर्व गोष्टींचा साकल्यानें विचार करतां माझ्या मनानें असा निकाल दिला कीं या गृहस्थाच्या क्लासमध्यें अतःपर जाणें म्हणजे आपल्या स्वाभिमानाची राखरांगोळी करणें होय. त्याजकडून अधिक ज्ञान मिळण्याची यत्किंचित्हि आशा नाहीं. क्लास सोडला तरी डिप्लोमा मिळविण्याचें आपलें ध्येय मुळींच सोडावयाचें नाहीं. या गृहस्थाच्या वर्गामार्फत परीक्षेस बसतां न आलें तरी घरींच तयारी करून खासगी रीतीनें आपण परीक्षेस बसूं, इतकेंच नव्हे तर डिप्लोमाहि मिळवूंच मिळवूं. हा निश्चय कायम झाल्यानें मन थोडें शांत झालें आणि मी विऱ्हाडाची वाट धरिली.

: ३६ :

## पुनरागमन.

मानव हा परिस्थितीचा दास आहे. तिजवर मात करून विजय मिळविणारा एखादाच. सर्वसाधारण मनुष्याला परिस्थितीपुढें नमावेंच लागतें

व आपले निर्धार, आपल्या इच्छा आकांक्षा, आपलीं ध्येयें या सर्वांवर तिलांजलि द्यावी लागते !

परिस्थितीचे टक्के टोणपे खात खात व त्यांतून आपला बचाव करीत करीत मी माझे दिवस आनंदांत घालवीत होतों. अकाउन्टन्सी क्लासच्या अध्यापकाशीं तंटा करून त्याला राम राम ठोकला तरी आम्ही ( मी व माझा एक सहाध्यायी श्री. एन्. एस्. खोले ) अॅडव्हान्सड बुक्-कीपिंगच्या परीक्षेची तयारी जोरांत चालविली होती.

दीड दोन वर्षें मुंबईत काढूनहि माझा मित्रपरिवार मुळींच वाढला नाहीं, याचें कारण मुख्यतः माझी मुखदुर्बळ व अबोल वृत्ति. उगाच वायफळ बडबड करीत बसणें माझ्या स्वभावांतच नव्हतें. जगाच्या कुटाळक्या करीत बसण्यांत मला स्वारस्य वाटत नसे. खोटेपणाची व दांभिकतेची–ढोंगीपणाची–मला मनस्वी चीड असे. आपल्या उच्च संस्कृतीपासून आपण खालीं येऊं अशी कोणतीहि गोष्ट करणें मला रुचत नसे. शिवाय माझ्या सहवासांत येणाऱ्या इतरेजनांत समानशीलता आढळत नसे तोंपावेतों सहवास वाढविण्याची मला कधीं इच्छाच होत नसे. त्यापेक्षां एकलकोंडें जीवन जगणें मला अधिक प्रिय व सुखावह वाटे, आणि म्हणून मित्रांचा विशाल तांडा असण्याची हांव मी कधींच बाळगली नाहीं. मित्रत्वाच्या माझ्या कांहीं विशिष्ट अपेक्षा होत्या आणि त्या अपेक्षांस उतरेपावेतों मी मित्र म्हणून कोणालाच जवळ करीत नसें व माझें त्यावांचून कांहीं अडतहि नसे. आपलें काम करावें, वेळ असल्यास चांगलीं पुस्तकें वाचावीं किंवा फिरावयास जावें हा बहुधा माझा रोजचा कार्यक्रम असे.

माझे दिवस अशा रीतीनें सुखासमाधानांत व्यतित होत होते. पुढील अभ्यासहि चालू होता, इतक्यांत पुन्हा ( एप्रिल–मे १९०८ ) मुंबईस प्लेग सुरू झाला आणि पुन्हा झोंपडींत राहावयास जाण्याचा प्रसंग मजवर आला. यावेळीं पैशाची अडचण नव्हती म्हणून दादरसारख्या दूरच्या ठिकाणीं न जातां मी जवळच मरीन लाइन्स कॅम्पमध्यें एक झोंपडें घेतलें. भागीदार वगैरे

शोधण्याच्या भानगडींत यावेळीं मी पडलों नाहीं. झोंपडीवर राहावयास जाऊन आठ दहा दिवस झाले नाहींत तोंच मला ताप येऊं लागला. कांहीं दिवस मी ताप अंगावर काढला, परंतु तो कमी न होतां वाढतच गेला. औषध घेत होतों परंतु ताप कमी होण्याचें चिन्ह दिसेना. तापाशीं झगडत दिवस रात्र मी झोंपडींत एकटा पडून असें. दिवसेंदिवस प्रकृति खालावतच चालली. ताप विषमावर गेला व त्यांत आणखी निमोनियाचा विकार झाला मला ताप येत असल्याची व मी अत्यवस्थ असल्याची बातमी कोठून तरी आमच्या मेहुण्यास कळली असावी. ते एक दिवस अचानक माझ्या समाचारास आले. माझी अवस्था पाहून त्यांनीं मला आपल्या घरीं चलण्याविषयीं आग्रहहि केला परंतु मी त्यांना स्पष्ट नकार दिला.

वरील घटनेच्या तिसरे दिवशीं मी बिछान्यावर कण्हत पडलों असतां झोंपडीचें दार उघडलें गेलें. मी वळून पाहतों तों माझे वडील मेहुण्यासह दत्त म्हणून माझ्यासमोर उभे ! माझी दशा पाहून वडिलांच्या डोळ्यांस पाणी आलें. मीहि गहिंवरून गेलों. वडील माझे बिछान्याशीं आले, त्यांनीं माझे पाठीवरून हात फिरविला. त्यांच्या डोळ्यांवाटे अश्रु वहातच होते. भावनेचा भर थोडा ओसरल्यावर ते म्हणाले ' इतका आजारी झालास तर घरीं कळवावयाचें नव्हतें का ? ' माझ्या तोंडून शब्द निघेना. माझ्याहि डोळ्यांवाटें अश्रु वहातच होते. ते पुढें म्हणाले ' मी तुला घरीं घेऊन जाण्यासाठीं आलों आहें. तुझें काय सामान वगैरे असेल तें यांना ( माझ्या मेहुण्यांना ) सांग म्हणजे ते आवरतील. ' माझ्याच्यानें बोलवत नव्हतें तरीहि धारला त्यांच्या-बरोबर जाण्याची माझी मुळींच इच्छा नसल्यानें मी त्यांना सांगितलें. ' माझें जें काय व्हावयाचें असेल तें येथेंच होईल परंतु मी धारला चलावयास तयार नाहीं ' असें मी म्हटलें. माझे वडील किती तापट स्वभावाचे होते याचा उल्लेख मागें अनेक ठिकाणीं आलेला आहे. माझ्या ह्या शब्दांनीं त्यांना राग येणें स्वाभाविक होतें, परंतु सारा राग गिळून ते एवढेंच म्हणाले ' तूं मूर्ख आहेस तुला कांहीं समजत नाहीं. मी सांगतों तें मुकाट्यानें ऐक. हूं कीं

चं करावयाचें नाहीं.' अधिक उणें बोलण्याची मला त्यावेळीं ताकदच नव्हती. धारला जाण्याची माझी मुळींच इच्छा नव्हती, परंतु प्रतिकार करण्याचीहि पण माझ्यांत शक्ति नव्हती. मी स्तब्ध राहिलों 'मौनं संमतिलक्षणम्' या न्यायानें माझ्या मेहुण्यांनीं माझें सर्व बाड बिस्तर आवरलें, एक व्हिक्टोरिया आणली, आमच्या स्वारीला उचलबांगडी करून कसें तरी कष्टानें तींत निजविलें आणि अशा रीतीनें आमच्या दैवानें आम्हांला आमच्या इच्छेविरुद्ध पुन्हा वडिलांच्या घरीं आणून टाकलें !

## विमा एजन्सी : ३७ :

दैवाचे फटकाऱ्यानें मी पुन्हा वडिलांकडे येऊन पडलों हें वर आलेंच आहे. माझ्या अगतिकपणाची मला अगदीं चीड आली शरीरव्याधीमुळें मनानें हि मला दुबळें केलें पण त्याला इलाज नव्हता काळजीपूर्वक झालेली औषधयोजना व घरच्या माणसांची शुश्रूषा यांमुळें मी लवकरच बरा झालों. थोडीशी शक्ति अंगांत येतांच मनानें पुन्हा उचल खाल्ली. अकाउन्टन्सी क्लास सोडला तरी खानगीरीत्या परीक्षेस बसून डिप्लोमा मिळवावयाचा राहिलाच होता आणि तो मिळविणें हें माझें आद्य कर्तव्य होतें. थोडेसें बरें वाटतांच पुन्हा मुंबईस जाण्यास मी उत्सुक झालों होतों. माझा बेत मातोश्रीमार्फत मी वडिलांच्या कानांवर घातला. मुंबईच्या राहणीनें माझ्या प्रकृतीवर झालेल्या अनिष्ट परिणामाकडे पाहून वडील मला पुन्हा मुंबईस जाऊं देण्यास राजी नव्हते. धारलाच राहून पुढील अभ्यास पूर्ण करून परीक्षेस बसावें असें त्यांचें म्हणणें होतें. मी वडिलांच्या घरीं राहून मेल्या अन्नाचे तुकडे तोडावयास मुळींच तयार नव्हतों; राहावयाचेंच झालें तर माझ्या स्वतःच्या कमाईचेंच खाऊन मी राहीन हा माझा निर्धार होता. आमची अशी रस्सीखेंच चालू होती इतक्यांत माझे काका डॉक्टरीच्या शेवटच्या परीक्षेस बसणार होते त्यांचें तारीख १० जुलई १९०८ चें एक खानगी (confidential) पत्र मला आलें. या पत्रांत त्यांनीं आपण पुढें काय

करावयाचें ठरविलें आहे याचें साद्यंत विवेचन केलें होतें व त्या कामीं माझ्या सहाय्याची मागणी केली होती. त्यांचा बेत संक्षिप्तांत असा होता कीं खांडवा मुक्कामीं त्यांनीं खानगी दवाखाना काढावयाचा, दवाखान्याला जोडून एक केमिस्टस व ड्रगिस्ट्चें दुकान चालवावयाचें, त्याबरोबरच फोटो स्टूडियो व फोटो मटीरियल आणि विमा एजन्सी अशा दोन शाखाहि त्याला जोडावयाच्या आणि या सर्वांवर माझी देखरेख राहावयाची. हा सर्व बेत दिसावयाला अत्यंत गोंडस होता आणि अमलांत आला तर किफायतशीरहि झाला असता, परंतु त्याची व्यावहारिक बाजू मात्र आमच्या काकांनीं मुळींच लक्षांत घेतली नव्हती. आमचे काका अत्यंत सरळ, सुस्वभावी व प्रेमळ, परंतु त्यांना व्यावहारिक दृष्टि थोडी कमीच. ह्यामुळें त्यांच्या सबंध आयुष्यांत त्यांना पुढें अनेक कष्ट व हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या !

व्यावहारिक दृष्ट्या वरील सर्व योजनेंत पुष्कळ त्रुटि होत्या; त्या मी त्यांच्या नजरेस आणिल्या आणि त्यामुळें ती योजना प्रत्यक्षांत आली नाहीं, परंतु त्यांच्या पत्रानें विमा एजन्सीसारखा बिनभांडवली धंदा सुरू करण्याची कल्पना माझ्या डोक्यांत आली व लागलीच पत्रव्यवहार करून कलकत्ता येथें नुकत्याच स्थापन झालेल्या ' हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी ' ह्या विमा कंपनीची जनरल एजन्सी घेऊन मी कामास प्रारंभ केला ( २४-९-१९०८ ).

हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीची एजन्सी मी घेतली होती, परंतु हाच धंदा अधिक विस्तृत प्रमाणावर करण्याच्या दृष्टीनें आमच्या काकांच्या शिफारशीनें थोड्याच दिवसांनंतर कलकत्त्यास नवीनच निघालेल्या दुसऱ्या एका विमा कंपनीची मध्यहिंदुस्थान व मध्यप्रांताची चीफ एजन्सी ' पिंगे ब्रदर्स ' ह्या नांवानें आम्ही घेतली व तिचें ऑफिस तारीख १८ मे १९०९ रोजीं धार बझार रोडवर थाटलें. अशा रीतीनें मोठा विमा एजंट बनून मी रीतसर धंद्याला लागलों. खळघाट, धरमपुरी, महेश्वर, मंडलेश्वर, बढवाय, इंदूर इत्यादि ठिकाणीं दौरेहि निघूं लागले. कंपनीकडून ऑफिसचे

खर्चाची रकम नियमितपणें येत होती. एजन्सीचें काम दोन तीन महिने सुरळीत व चांगलें चाललें; परंतु चवथ्या महिन्याला कंपनीकडून खर्चाची रकम वेळेवर आली नाहीं. अनेक पत्रें व स्मरणपत्रों पाठवूनहि उत्तर नाहीं, असा प्रकार चालू झाला. कडक भाषेंत व धमकीवजा पत्रें पाठवून पाहिलीं पण त्यांचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं असें उघडकीस आलें कीं ही कंपनी म्हणजे भुरट्या चोरांची एक सोनेरी टोळी होती! आमचे काका व्यावहारिक दृष्टीचे अभावीं त्यांच्याशीं योग्य करारमदार करून न घेतल्यानें त्यांच्या लबाडीला बळी पडले होते! ऑफिस थाटल्यापासून अवघ्या चार महिन्यांच्या आंतच आम्हांला आमच्या ऑफिसला टाळें लावावें लागलें !!

## नर्मदास्नान : ३८ :

आपली स्वतःची कुवत ओळखून कोणत्याहि कामास हात घालणें शहाणपणाचें असतें. माझा विमाव्यवसाय चालू असतांनाची गोष्ट. मी नेमाडचा दौरा करावयास निघालों होतों. धरमपुरी, खळघाट, महेश्वर, मंडलेश्वर वगैरे ठिकाणचा दौरा संपवून मी बडवायला आलों. माझा मुक्काम कॉलेजमधील माझे सहाध्यायी त्यावेळचे बडवायचे मुन्सफ श्रीयुत लक्ष्मण बळवंत जांभेकर यांचे घरीं होता. जांभेकरांना पोहण्याचा विशेष षोक होता. रविवार (ता. १० मे १९०९) चा सुटीचा दिवस. श्रीयुत जांभेकर व त्यांचे कांहीं स्नेही संध्याकाळीं ४–४॥ चे सुमारास नर्मदेवर जावयास निघाले. एकटाच घरीं बसून राहण्यापेक्षां मीहि त्यांच्याबरोबर फिरावयास म्हणून गेलों. गप्पागोष्टी करीत करीत आम्ही नर्मदातीरावर पोंचलों. सर्वांनीं स्नानाचे तयारीनें कपडे काढले. मी घाटावरच बसून राहिलों. जांभेकरांनीं मलाहि पोहावयास चलण्याविषयीं आग्रह केला. मला विशेष चांगलें पोहतां येत नव्हतें. धारला गांवाच्या आजूबाजूस कितीतरी मोठमोठ्या बावड्या (विहिरी) आहेत आणि उन्हाळ्याचे दिवसांत वृद्ध, तरुण व लहान लहान मुलें देखील या विहिरींवरच बहुधा स्नानाला जात असत. घरच्या कडक

शिस्तीमुळें आम्हाला मात्र या सुखाचा स्वाद कधींच चाखावयास मिळत नसे. मातोश्रीमार्फत चालविलेल्या बऱ्याच वर्षांच्या प्रयत्नांनंतर आम्हांला कांहीं अटींवर पोहावयास शिकण्याची परवानगी सुदैवानें मिळाली व तिचा फायदा घेऊन पाण्यावर थोडेफार हात मारण्याइतकीच काय ती प्रगति आम्ही करूं शकलों होतों. सूर लावणें तळापावेतों बुड्या मारणें, थाळ्यावरून उड्या घेणें, हातपाय न हालावितां पाण्यावर संथपणें तरंगत राहणें वगैरे पोहण्यांतील विविध प्रकारांशीं आम्ही अनभ्यस्तच होतों. पाण्यांत पडण्याचा दुर्दैवानें प्रसंगच ओढवला तर गटंगळ्या खात एकदम तळाशीं न जातां थोडेफार हातपाय हालवितां येतील येवढीच काय ती आमची कमाई होती, आणि तीहि विहीरीच्या संथ पाण्यावर. नदींत पोहण्याचा मला जन्मांत प्रसंग नव्हता. अर्थात् जांभेकरांनीं मला कपडे काढावयास सांगतांच मला नदींत पोहण्याची सवय नसल्याच्या सबबीवर मी त्यांना नकार दिला. परंतु ते माझें थोडेंच ऐकणार होते ? 'चला हो, असे भितां काय ? आम्ही इतके लोक बरोबर असतां तुम्हांला बुडूं देऊं का ? चला, काढा कपडे' असा त्यांनीं आग्रह चालविला. सगळे लोक नदींत पोहावयास जाणार आणि आपण एकटेच घाटावर बसून राहणार यांत मला कमीपणा वाटूं लागला व जांभेकरांचा शब्दहि मोडवेना. शेवटीं कपडे काढले व मनाचा हिय्या करून आमची स्वारी पाण्यांत उतरली.

घाटासमोर नदीचें पात्र बरेंच रुंद असून सुमारें अर्ध्या-पाऊण फर्लांगावर एक लहानसा बेटासारखा उंचवटा आहे. त्याचे रोखानें नदीचा प्रवाह कापीत सर्व मंडळी लीलेनें चालली होती. पाण्याला विलक्षण ओढ होती, तरीहि मी शिकस्त करून त्यांचेमागून कसाबसा चाललों होतों. प्रवाह तोडीत जाणें महादुर्घट काम होतें. माझी छाती व हातपाय अगदीं भरून आले होते, परंतु कोणास तसें सांगणें मला—शरमेचें—लाजिरवाणें वाटलें आणि म्हणून मी माझ्या शरीराला कष्टानें कसेंबसें ढकलीत होतों. सर्व मंडळी टिब्ब्यावर ( बेटावर ) जाऊन पोंचली. दोन तीन मिनिटांनीं मीहि पोंचलों. परंतु मी इतका थकून गेलों होतों व माझी छाती इतकी भरून

आली होती कीं माझे पाय टिब्ब्याला लागले नाहींत तोंच घेरी आल्याप्रमाणें माझें डोकें गरगर फिरावयास लागून माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली व मी मटकन् खालींच बसलों. पांच दहा मिनिटें विश्रांति मिळाल्यावर मी डोळे उघडले. हा प्रकार कोणाच्याहि लक्षांत आला नाहीं. इतर मंडळी टिब्ब्यावरून नदींत व पुन्हा टिब्ब्यावर अशी कवाईत करण्यांत रंगून गेली होती. पंधरा वीस मिनिटें त्यांच्या या जलक्रीडा झाल्यावर मंडळीं परत घाटावर यावयास निघाली. आतां मात्र मला मोठी पंचाईत पडली. पुन्हा अर्धा--पाऊण फर्लांग अंतर तोडून घांट गाठणें माझ्या शक्तीबाहेरचें होतें, पण हें इतरांस सांगावयास लज्जेनें मन धजत नव्हतें. सर्वांनीं पाण्यांत उड्या घेतल्या. मीहि उतरलों, पण हात पाय काम करावयास मुळींच राजी नव्हते. त्यांच्यामध्यें त्राणच उरलें नव्हतें. इतर मंडळी सरसर पाणीं कापीत पुढें चालली. मी मात्र मागें मागेंच रेंगाळूं लागलों. माझी गति मंदावली आणि आतां आपण खास गटंगळी खाणार असें वाटतांच ‘ जांभेकर ! ’ म्हणून मी मोठ्यानें ओरडलों. जांभेकर बरेच पुढें गेले होते परंतु सुदैवानें त्यांना माझी आरोळी ऐकूं गेली. ते लागलीच मागें वळून तीरासारखे मजजवळ आले ‘ घाबरूं नका ’ असा मला धीर देऊन त्यांनीं आपल्या डाव्या हातावर मला पेलून धरलें आणि उजव्या हातानें पाणी कापीत कापीत मला तीरावर आणून सोडलें. क्षणाचा विलंब, कीं आम्हाला त्या दिवशीं जलसमाधीच मिळाली असती !

## दैवो दुर्बल घातकः

: ३९ :

आपण मनांत उंच उंच मनोरे रचावे आणि दैवानें ते जमीनदोस्त करीत जावे हा नित्याचा कठोर अनुभव आहे. मनुष्याला अशा रीतीनें हतबल, सत्वहीन व निरुत्साही करण्यांत कोणता आनंद मिळतो तें केवळ दैवच जाणे !

हिंदुस्थान को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीची जनरल एजन्सी घेतल्यानंतर व दुसऱ्या एका कंपनीची चीफ एजन्सी घेण्याच्या दरम्यानच्या कालांत नॅशनल यूनियन ऑफ टीचर्स व लंडन चेंबर ऑफ कॉमर्सच्या 'अॅड्व्हान्स्ड एक्झॅमिनेशन इन् बुक-कीपिंग अॅन्ड अकाउन्टन्सी'च्या परीक्षा अनुक्रमें २३ मार्च १९०९ व १ मे १९०९ ला देण्याकरतां मी मुंबईस जाऊन आलों. पैकीं नॅशनल यूनियनच्या परीक्षेंत मी दुसऱ्या वर्गांत पास झालों. लंडन चेंबर ऑफ कॉमर्सच्या परीक्षेंत मात्र मला यश आलें नाहीं. मूळ ध्येयापैकीं पन्नास टक्के यश पदरीं पडलें. राहिलेल्या पन्नास टक्के यशाकरतां पुन्हा प्रयत्न करणें भाग होतें, म्हणून विम्याच्या धंद्याबरोबरच त्याचीहि तयारी मी करीत होतों. परंतु विम्याच्या चीफ एजन्सीचें काम बंद पडल्या-मुळें पुन्हा चरितार्थाच्या साधनाची विवंचना जाचूं लागली. अकाउन्टन्सीची एक परीक्षा तरी पास झाली असल्यामुळें धार संस्थानामध्येंच अकाउन्टस डिपार्टमेन्टमध्यें मी नोकरी पहावी अशी वडिलांची इच्छा होती; परंतु ती मला मुळींच मान्य नव्हती. संस्थानी नोकरींत कराव्या लागणाऱ्या किळस-वाण्या हांजी हांजीचा मला मनापासून तिटकारा होता. तसेंच धारसारख्या सहा सात लाख वार्षिक उत्पन्नाच्या संस्थानामधील नोकरांचे पगारहि अगदींच क्षुल्लक! मजसारख्या होतकरू व महत्वाकांक्षी तरुणाला धारमध्यें वाव तो काय मिळणार? आणि ह्या सर्वांहून महत्वाचें कारण असें कीं तेथें राहावयाचें म्हणजे आपल्या साऱ्या स्वतंत्र वृत्ति ठार करून वडिलांच्या गुलामगिरींत खितपत पडणें मला भाग होतें. तसेंच नोकरीच करावयाची कीं इतर कोणत्या व्यापारांत पडावयाचें हेंहि मी मनाशीं निश्चित केलें नव्हतें. दुसऱ्याची गुलामगिरी करण्यापेक्षां आपण एखादा लहानसा कां होईना, पण स्वतंत्र धंदा थाटावा व हळू हळू वाढवीत तो मोठ्या स्वरूपाला आणावा अशी माझी आत्यंतिक इच्छा होती आणि त्या दृष्टीनें माझे विचार चालू होते. इंदुरास त्यावेळीं श्रीयुत शंकरराव रामचंद्र वेंगुर्लेकर व पडळकर या दोघांनीं मिळून जेलरोडवर एक लहानसा मोजे विणण्याचा कारखाना चालू केला होता. पडळकर मोजे विणण्याचीं यंत्रें विकण्याचा धंदाहि करीत

असत. विम्याच्या कामानिमित्य इंदुरास गेलों असतां या दोघांहि इसमांशीं मी बोलणें चालणें करून आलों होतों व धारला आपण एक लहानसा मोजे विणण्याचा कारखाना चालू करावा असा माझा विचार होता. पण हा विचार अमलांत आणणें मात्र वरेंच दुर्घट होतें. कारण 'सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ।' मशीन घ्यावयाचें तर पैसे पाहिजेत. माझ्याकडे शिल्लक फारच थोडी होती. आमचे वकीलामार्फत (मातोश्री मार्फत) वडिलांस विचारावें तर सर्व गोष्टी त्यांना वडिलांस नीट समजावून देतां आल्या नसत्या. माझी तर वडिलांसमोर जाण्याची छातीच नव्हती. विचार करकरून शेवटीं मी एक अभिनव उपाय शोधून काढला. माझ्या संकल्पित योजनेसंबंधीचें एक सविस्तर पत्र ता. १६ जुलै १९०९ रोजीं मी वडिलांच्या नांवानें लिहिलें. त्यांत फक्त दीडशें रुपये एक वर्षाचे आंत सव्याज फेडण्याचे शर्तीवर मला कर्जाऊ देण्याची मी त्यांना विनंति केली होती. हें पत्र बाहेरून येतांच त्यांना सहज दिसावें अशा रीतीनें मी त्यांच्या टेबलावर ठेवून दिलें.

पत्र वाचून वडिलांचें पित्त खवळून गेलें. आपल्या मुलानें मोजे विणीत बसण्यासारखें हलकें काम करण्याची इच्छा बाळगावी हें पाहून त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेला मोठाच धक्का बसला ! ते कमालीचे संतापले व त्यांनीं आकाश पाताळ एक केलें ! घरांतील सर्व वातावरण उद्विग्नतेनें भरून गेलें. मी तर खोलीबाहेर तोंड काढलें नाहीं. तीन दिवसांनीं माझ्या विनंतीअर्जाला पत्रानेंच उत्तर मिळालें. शिवराळ व मर्मभेदक शब्दांनीं तें पत्र ओतप्रोत भरलेलें होतें व माझ्या मागणीचा त्यांत स्पष्ट अव्हेर केला होता ! हें पत्र आतां माझ्या संग्रहीं नाहीं, परंतु या पत्रानें मजवर झालेल्या प्रतिक्रियेची नोंद माझ्या रोजनिशींत आढळते ती अशीः—

' *19 th July 1909*

Answer from Baba to my letter of 16th. Mind most uneasy...... What to do in future ? It

is a great question still unsolved. Some serious and immediate step must be taken in the matter "

या पत्रामुळें झालेल्या निराशेनें आणि तज्जन्य उद्विग्नतेनें मला कांहीं सुचेनासें झालें, अन्नपाणीहि गोड लागेना. मोज्याच्या कारखान्याचें स्वप्न हवेंत विरून गेलें ! मनांतील उमेदींचा व इच्छा आकांक्षांचा चक्काचूर झाला ! इतर कोणाची मदत मिळणें शक्य नव्हतें. धारला वडिलांकडे राहून मेल्या अन्नाचे तुकडे तोडण्यास मन आतां तर मुळींच तयार नव्हतें; पुढचा मार्ग माझा मलाच शोधून काढावयाचा होता. दुसऱ्या कोणावर विसंबून राहण्यास मी तयार नव्हतों. नोकरी–गुलामगिरी–शिवाय आतां गत्यंतर नाहीं अशी मनाची खात्री झाली. शेवटीं नोकरीनिमित्य धार सोडण्याचा निश्चय करून रविवार, तारीख २८ नवंबर १९०९ रोजीं वडिलांच्या घरास व धारेस मी पुनश्च राम राम ठोकला.

## श्रीमंतांची दिवाळी  : ४० :

सन १९५४ चा काल आणि सन १९०९ चा काल यांत जमीन-अस्माना इतकें अंतर होतें. महर्गतेची तीव्रता त्याकाळीं आतांसारखी हलाखीची व भयानक नव्हती. त्यावेळीं पुष्कळच सुबत्ता होती, आणि यामुळें आबाल-वृद्ध, श्रीमंत–गरीब सारेच आपापल्यापरीनें दिवाळीसारखा सण अत्यंत उत्साहानें आणि उल्हासानें साजरा करीत. शुक्रवार, तारीख १२ नवंबर १९०९. दिवाळीचा–लक्ष्मीपूजनाचा–दिवस. राजघराण्याचे आणि आमच्या वडिलांचें संबंध बरे असल्यानें दिवाळीचे दिवशीं आमचे वडील फराळाचीं ताटें घेऊन श्रीमंतांचे भेटीस जात असत. नेहमीच्या रिवाजाप्रमाणें आमचे वडील फराळाचीं ताटें घेऊन महाराजांच्या भेटीस गेले. मलाहि त्यांनीं बरोबर नेलें होतें. आम्ही बंगल्यावर पोंचलों ती वेळ संध्याकाळची पांच साडेपांचची होती. मुजरे वगैरे झाले. महाराज थोडा वेळ वडिलांशीं

बोलत बसले आणि नंतर सहल करावयास जाण्यासाठीं उठले. जातांना ते म्हणाले ' वकीलसाहेब, तुमच्या वस्तु आज आम्ही थाळ्याबरोबरच घेऊं. तुम्हीहि थाळ्याला अवश्य थांबावें अशी आमची इच्छा आहे ' असें म्हणून घोड्यावर स्वार होऊन ते रपेट करावयास निघून गेले. महाराजांची इच्छा म्हणजे तो हुकूमच. महाराज आठ वाजतांचे सुमारास परत आले. साडे-आठ नऊचे सुमारास आम्ही थाळयास बसलों. थाळ्याचा थाट राजघराण्यास साजेसाच असल्यास नवल नव्हतें. उंची उंची गालिचे, मोठ-मोठ्या सुंदर देखाव्यांच्या तसबिरींनीं शृंगारलेला भव्य दिवाणखाना, हंड्याझुंबरादि दिव्यांचा झगझगाट, मध्यभागीं शुभ्र चादर आच्छादिलेलें व नानाविध सुंदर फुलांच्या फुलदाण्यांनीं सजविलेलें लंबवर्तुळाकार मेज, त्यावर सुव्यव-स्थित मांडलेलीं चांदीचीं मोठमोठालीं ताटें, पांढरा शुभ्र पोषाख केलेले मालकाचा शब्द झेलण्यास तत्पर सेवक या सर्वांनीं त्या दिवाणखान्याला एक प्रकारचें प्रसन्न परंतु गंभीर स्वरूप आलें होतें.

भोजन झालें. लक्ष्मीपूजनाचा दिवस असल्यानें सर्व वाडा असंख्य दिव्यांनीं विशेषच शृंगारला होता. जिकडे तिकडे अगदीं लखलखाट होता. भोजनोत्तर महाराज व्हरान्ड्यांत येऊन बसले. शेजारीं आम्हासहि बसण्याचा हुकूम झाला. थोड्या वेळानें आतषबाजीस सुरवात झाली. नळे, चंद्रज्योति चक्रें, बाण इत्यादि विविध दारूकाम झाल्यावर मोठ्या-जाड्या-फटाक्यांनीं भरलेले दोन हारे आणि त्याबरोबरच लांब काढण्या लावलेले चार मजबूत अरबी घोडे व चार पांच शिकारी कुत्रे व्हरान्ड्यासमोरील मैदानांत आणले गेले. लागलीच हुजऱ्यांनीं त्या हाऱ्यांतील फटाक्यांच्या माळा त्या घोड्यांच्या व कुत्र्यांच्या शेपट्यांना, बांधतां येतील तितक्या बांधल्या आणि त्यांना पलिते लावून दिले ! मोतद्दारांच्या हातांत काढण्या बळकट धरलेल्या असल्यानें घोड्यांना विवक्षित मर्यादेबाहेर निसटून जातां येत नव्हतें. कुत्र्यांचीहि तीच गत होती. फटाक्यांच्या आवाजानें व शेपट्यांना चटके बसत असल्यामुळें घोडे चौखूर उधळत होते आणि कुत्रेहि वाट फुटेल तिकडे केकाटत धांवत

होते आणि महाराज व त्यांची प्रभावळ त्या आनंदाचा ( ? ) मजा लुटण्यांत मशगूल झाले होते. तें करुण व भयानक दृश्य पाहून माझ्या हृदयांत कालवा-कालव सुरू झाली ! तो हृदयद्रावक प्रकार माझ्याच्यानें पाहवेना ! इतरांच्या आनंदांत मला सहभागी होतां येईना व त्यांची मौजहि मला लुटतां येईना ! तोंड दाबून बुक्क्यांचा मार बसत असल्यासारखी माझी अवस्था झाली. मुक्या प्राण्यांच्या जीवाशीं सुजाण मानवांनीं चालविलेल्या त्या क्रूर लीला पाहून त्या लोकांचीं मनें कशाचीं बनलीं असावीं याची मला कल्पनाच करतां येईना. यापेक्षां मी आलोंच नसतों तर किती बरें झालें असतें असें मला वाटूं लागलें. मनुष्य आणि इतर प्राणी यांमधील मुख्य भेद म्हणजे मानवांना बुद्धि आणि मन असतें व इतर प्राण्यांना तें नसतें. दुःख, सुख आनंद, भीति, क्रोध, वासना इत्यादि विकार उभयतांमध्यें सारखेच असतात. आपल्याला जसा आपला जीव प्यारा असतो त्याचप्रमाणें तो मुक्या प्राण्यांनांहि असतो याची जाणीव किती लोक आपल्या अंतःकरणांत बाळगत असतील देव जाणे ! 'सर्वांभूतीं परमेश्वर' हें महान् तत्व केवळ बोलावयापुरतेंच असतें का ?

पेटविलेल्या फटाक्यांच्या माळा थंड झाल्या. घोडे तबेल्यांत नेण्यांत आले. कुत्रेहि आपापल्या ठिकाणीं रवाना झाले आणि महाराजांना मुजरे करून आम्ही घरीं परतलों. झोंप लागेपर्यंत–कचित् झोंपेतहि ते कावरे-बावरे घोडे, केंकाटणारे कुत्रे व खिदळणारे प्रेक्षक डोळ्यांपुढें सारखे दिसत होते !

# टप्पा तिसरा

## गुलामगिरीस प्रारंभ : ४१ :

' सेवाधर्मः परम गहनः योगिनामप्यगम्यः । '

—सुभाषित.

योग्यांनाहि अगम्य अशा या सेवाधर्माची महति काय वर्णावी! वरिष्ठांची हांजी हांजी हा सेवाधर्मांतील प्रधान गुण. सत्याची लवमात्र चाड न वाळगतां वरिष्ठ म्हणेल त्याला मान तुकविणें, वरिष्ठानें कितीहि लाथा मारिल्या तरी त्या हंसतमुखानें फुलासारख्या झेलणें, खोट्यानाट्या चहाड्या वरिष्ठाचे कानांशीं करण्यांत अग्रेसर असणें, स्वाभिमानावर तिलांजलि देण्याची तयारी ठेवणें, घर-दार, बायको मुलें, स्वास्थ्य अस्वास्थ्य, समाज, राष्ट्र कशाचें हि तमा न वाळगतां तिन्हीत्रिकाळ स्वामिकार्यार्थ देह झिजविणें, गुणावगुणांची यत्किंचितहि कदर न करतां वरिष्ठ तोंडावर फेकील त्या तुकड्यावर निमूट्यानें संतुष्ट असणें हे गुण अंगीं असले तरच सेवाधर्माचें पुण्य पदरीं पडण्याची कांहीं आशा आहे, अन्यथा आपण सेवाधर्मास सर्वस्वी नालायक म्हणून समजावें.

नोकरीनिमित्य मी घर सोडून बाहेर पडलों हें मागील प्रकरणांत आलेंच आहे. ॲडव्हान्स्ड अकाउन्टन्सीचा एक डिप्लोमा हातीं आला होता त्याचे आधारावर मुंबईसारख्या व्यापाराचे प्रमुख केंद्रीं चांगल्याशा व्यापारी कंपनींत शिरावें व आपल्या नशिबाची परीक्षा पाहावी असा माझा प्रथम विचार होता. घरून निघतांना मी मुंबईस जाण्याच्या इरायानें निघालों होतों, परंतु मुंबईची हवा मला मानवत नव्हती त्याकरतां शक्य असल्यास मुंबई टाळावी अशी एक कल्पना घर सोडल्यावर माझ्या मनांत आली. त्याप्रमाणें मी माझ्या मूळच्या बेतांत थोडा बदल केला. माझे लहानपणचे स्नेही श्री. काशीनाथ दामोदर शुक्ल—ज्यांच्याबरोबर जयपूरच्या कॉलेजांत जावयाचें मी योजिलें

होतें व ज्यांच्या संगतींत पुढील आयुष्यहि घालविण्याचे मनोरे रचिले होते–हे त्यावेळीं बी. ए. ची परीक्षा पास होऊन कामटीस ( नागपूर पासून १४ मैल ) इरिगेशन खात्यांत नोकरीस होते. प्रथम त्यांना भेटावें व त्यांच्या विचारानें पुढें काय करावयाचें तें ठरवावें असा बेत करून मुंबईचे ऐवजीं मी कामटीची वाट धरिली.

कामटीस येऊन पोंचल्यावर शुक्ल यांच्याशीं विचारविनिमय केला. मुंबईच्या हवामानाचा व राहणीचा विचार करतां आणि आम्हां दोघांची एकत्र राहावयाची इच्छाहि पूर्ण होईल या हेतूनें कामटीस किंवा फार तर नागपूरला मी नोकरी पाहावी असें दोघांच्या विचारानें ठरलें. सुदैवानें कामटीस इरिगेशन् ऑफिसमध्यें त्यावेळीं कारकुनाची एक जागा रिकामी होती. शुक्ल यांच्या सल्ल्यानें लागलीच या जागेकरतां मी अर्ज दिला. त्यावेळचे एक्झि-क्यूटिव्ह एन्जिनियर कॅप्टन् पोलार्ड लाउस्ली–जे पुढें गव्हर्मेन्ट ऑफ इंडिया कार्उन्सिलच्या पी. डब्ल्यू. डी. मेंबरच्या उच्च पदापावेतों चढले–ह्यांनीं मला भेटीस बोलाविलें. भेटींत त्यांनीं मला अनेक प्रश्न विचारिले; त्यांतील एक मोठा सूचक व खोंचदार होता. माझें मूळ गांव, वडील, आजोबा यांची व माझ्या शिक्षणाबद्दलची माहिती विचारून झाल्यावर ते मला म्हणाले 'Babu, with all your educational qualifications and your well placed parents why do you want to come to this wretched department ?' मी त्यांना म्हटलें 'मी आपल्या खात्यांत नोकरी मागतों आहें ती केवळ आपल्या ऑफिसच्या हेडक्लार्कच्या जागेपावेतों पंधरा वीस वर्षांत पोंचण्याच्या उद्देशानें नव्हे, तर दोन तीन वर्षांचे आंतच आपल्या ऑफिसचा अकाउन्टन्ट ( सर्वांत वरचा व महत्वाचा अधिकारी ) होण्याची माझी महत्वाकांक्षा आहे.' साहेब नुसते हुंकारले व त्यांनीं मला निरोप दिला. साहेबांशीं झालेल्या एकंदर संभाषणाच्या रोखा-वरून जागा मिळण्याची बरीच आशा मला उत्पन्न झाली होती, परंतु मध्येंच माशी शिंकली ! डॉसन् नांवाच्या कोणा एका युरेजिअन् इसमाचा अर्जहि

त्याच जागेसाठीं आला आणि जवळ जवळ मला मिळू घातलेली जागा—केवळ तो युरेजिअन् असल्यानें—त्याला बहाल करण्यांत आली ! माझी घोर निराशा झाली ! आतां पुढें काय करावयाचें हा प्रश्न आम्हां दोघांपुढें उभा राहिला. एक-दोन दिवस या विवंचनेंत व विचारांत असतां शुक्रवार, तारीख ३ डिसेंबर १९०९ रोजीं त्या जागेवर दरमहा तीस रुपयांवर माझी नेमणूक झाल्याचा हुकूम मला मिळाला; कारण डॉसनला जागा दिली असतांहि तो वेळेवर हजर झाला नाहीं. अशा रीतीनें मुंबईचे ऐवजीं मी कामटीचा रहिवासी व नोकरमानी झालों.

## पाहुणा दोन दिवसांचा : ४२ :

नोकरीच्या शोधार्थ ता. २९ नवंबर १९०९ रोजीं मी कामटीस गेलों. माझे मित्र शुक्ल यांचे घरीं मी माझा मुक्काम ठेवला. सुदैवानें दोन चार दिवसांचे आंतच मला नोकरी मिळाली. नोकरी मिळेपावेतों अथवा नोकरी-संबंधी निश्चित योजना आंखली जाईपावेतों शुक्ल यांच्या बिऱ्हाडीं माझा मुक्काम ठेवण्याचा मित्रत्वाच्या नात्यानें मला हक्कहि होता. परंतु आतां परिस्थिति बदलली होती. मला कामटीस कायमची नोकरी मिळाली होती आणि यापुढें शुक्ल यांच्या येथें कायमचा मुक्काम ठेवणें मला इष्ट वाटत नव्हतें. दोन दिवस पाहुणा म्हणून मी शुक्ल ह्यांच्याकडे राहिलों यांत गैर कांहींच नव्हतें परन्तु ह्यापुढें त्यांच्यायेथें कायमचा मुक्काम ठेवणें म्हणजे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबीयांवर जुलूम व अन्याय झाला असता. माझे आणि शुक्लांचे संबंध कितीहि घनिष्ट असले, त्यांना माझ्यासंबंधानें कितीहि आत्मीयता वाटत असली तरी तीच आत्मीयता त्यांच्या मातोश्रीच्या अथवा पत्नीच्या ठिकाणीं मी अपेक्षिणें बरोबर नव्हतें. अशा स्थितींत शुक्ल ह्यांना अडचणींत टाकावें अशी माझी इच्छा नव्हती. माझा हा विचार मी शुक्ल यांच्यापुढें स्पष्टपणें ठेवला व एकदोन दिवसांत माझी राहण्याची व जेवणाखाण्याची व्यवस्था मी स्वतंत्ररीत्या करणार असल्याचें त्यांना सांगितलें. माझी कल्पना

त्यांना रुचली नाहीं मी त्यांच्याच घरीं राहावें, निराळें बिऱ्हाड करूं नये अशी त्यांची उत्कट इच्छा होती, ह्यामुळें माझ्या सूचनेला त्यांनीं विरोध केला मी माझ्याकडून सर्व परिस्थिति व पुढील संभाव्य परिणामाची त्यांना यथार्थ कल्पनाहि दिली, परंतु त्यांना त्यांत कांही तथ्य वाटलें नाहीं आधीं गोड आणि मागाहून कडू होण्यापेक्षां अगोदरपासूनच सावधगिरी घेतलेली बरी, त्यांतच अधिक स्वारस्य असतें हें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा मी शक्य तितका प्रयत्न केला परंतु तेंहि त्यांना पटलें नाहीं. ते जवळ जवळ हट्टासच पेटल्यासारखे झाले होते, किंवहुना थोडे रागावलेहि. मला तेथें जाऊन पुरते चार पांच दिवसहि झाले नाहींत तोंच आम्हा दोघां स्नेह्यांत मतभेदास प्रारंभ होऊन असें विरोधाचें वातावरण निर्माण होणें योग्य नाहीं असें मला वाटलें. परंतु शुक्रांच्या म्हणण्यास सर्वस्वी मान तुकविल्यास तें सुपरिणामी होणार नाहीं असें माझी मनोदेवता मला सांगत होती. जगांत मानानें जगावयाचें असेल तर इतरांस आपलें ओझें वाटेल, आपला कंटाळा येईल, आपल्यासंबंधी तिटकारा उत्पन्न होईल असें वर्तन आपल्या हातून कदापि न घडण्याची दक्षता घेणें आवश्यक असतें. ‘ अति परिचयात् अवज्ञा ’ हें सुभाषित प्रसिद्धच आहे. दुसऱ्याकडून आपणास लाभणाऱ्या चांगुलपणाचा आपण किती फायदा उचलावयाचा यालाहि मर्यादा असते. ह्या मर्यादेचें अतिक्रमण झालें कीं त्याचा परिणाम अवज्ञा आणि अपमान यांत व्हावयाचा हें निश्चित.

शुक्र यांच्याशीं बराच उहापोह व बराच वादविवाद झाल्यानंतर शेवटीं नाइलाज म्हणून मी एक तडजोड सुचविली, ती अशी कीं राहावयासाठीं मी स्वतंत्र घर घ्यावें व जेवण शुक्र यांच्या घरीं ठेवावें. मात्र शुक्र यांनीं जेवणा-खाण्याकरतां लागणारा सर्व खर्च, स्वतः ते, त्यांच्या मातोश्री, त्यांची पत्नी व मी या चौघांत समसमान विभागून घ्यावा. ही तडजोड शेवटीं कांहींशा नाखुशीनें व रोषानेंच शुक्र यांनीं मान्य केली आणि ता. ३ डिसेंबर १९०९

पासून ( कामटीस पोंचल्याच्या पांचव्या दिवसापासून ) मी शुक्ल यांच्याकडे बोर्डर म्हणून जेवावयास जाऊं लागलों.

## नवल ! : ४३ :

असें म्हणतात कीं जगांत सात आश्चर्यें आहेत, परंतु नित्य व्यवहारांत अनंत आश्चर्यें प्रत्यहीं आपल्या नजरेस येत असतात. मनुष्यस्वभाव हा अशा आश्चर्यांचें आगर आहे !

मी कामटीस येऊन नुकता कोठें स्थिरस्थावर होत होतों. माझा अजून नीट जमहि बसला नव्हता. ऑफिसचें काम समाधानकारकपणें चाललें होतें व माझे वरिष्ठ माझ्या कामावर खुश होते. शुक्लांच्या घराशेजारींच दीड रुपया भाड्याचें एक घर घेऊन मी सुखानं कालक्रमणा करीत होतों. मला कशाचीहि वाण नव्हती. इतक्यांत गांवांत प्लेगचे उंदीर पडावयास प्रारंभ झाला. प्लेग सुरू झाला असल्याचें वृत्त पत्रानें मी घरीं कळविलें होतें. या पत्राचे उत्तरीं वडिलांकडून एक पत्र मला आलें आणि हें पत्र वाचून मला आश्चर्याचा धक्काच बसला ! पत्रांतील मजकूर असा होताः–

‘ धार, १४–१–१०

...मुंबईस दोन चार दिवस मुक्काम झाल्यांत एके ठिकणीं हॅरिसन् मेकरचें पायमोजाचें मशीन सोईवार नजरेस आल्यावरून तें खरेदी करून घेऊन आलों. ...एका माहितगार इसमास शिकविण्याकरतां ठेवून शिकण्याचा प्रयत्न मी स्वतः करीत आहें. दृष्टिमांद्यामुळें बराबर काम होत नाहीं, तत्राप प्रयत्न चालविलेला आहे...जो मनुष्य शिकविण्यास आहे त्यासच आठपासून दहा रुपये पगार ठरवून ठेवण्याचा विचार आहे...सदरहु इसमास ठेवल्यास आणखी एकादें मशीन मागवीन...हॅरिसन यांस लंडन् येथें उदईक पत्र लिहणार आहे, त्यांत एजन्सीबद्दलहि मागणी करणार आहे. ... ’

प्रतिष्ठेला बाध येतो म्हणून अवघ्या सहा महिन्यांपूर्वी ज्या माझ्या वडिलांनीं मोजाचें मशीन घेण्याकरतां फक्त दीडशें रुपये मी कर्जाऊ मागितले असतां विलक्षण अकांडतांडव केलें होतें व मला ' नादान व भिकार लक्षणी ' ठरविलें होतें त्याच वडिलांनीं सहा महिन्यांचे आंत मोजाचें मशीन विकत घ्यावें, त्यावर स्वतः काम शिकण्याचा खटाटोप करावा, आणखीहि एक दोन मशीन्स घेण्याची तयारी दर्शवावी, एवढेंच नव्हे तर या मशीनची एजन्सी घेण्यापावेतों मजल गांठावी, हें आश्चर्याहूनहि आश्चर्य नव्हे काय ?

वडिलांचा हा मतिपालट कां व कसा झाला याची चिकित्सा किंवा मीमांसा मी करीत नाहीं; परंतु केवळ आपल्या दुराग्रहानें एका होतकरू व महत्वाकांक्षी तरुणाचें—खुद्द आपल्या मुलाचें—आयुष्य मातीमोल करून टाकण्याचें पुण्य मात्र त्यांनीं पदरीं घेतलें ! असें नसतें झालें तर स्वतःच्या इच्छेविरुद्ध गुलामगिरींत जन्मभर पिचत पडणारा हा तरुण स्वतंत्र बाण्याचा कर्तबगार कारखानदार व अनेकांचा पोशिंदा होण्याचा संभव होता ! पण ' भवितव्यता बलीयसि ' हेंच खरें !!

## कारकून : ४४ :

नवीन भरती होणारा कारकून पंचवीस रुपये पगारावर नेमला जावयाचा असें असतां तीस रुपये दरमहावर माझी नेमणूक झाली यामुळें मला व शुक्रांना आनंद होणें स्वाभाविक होतें; परंतु त्या कचेरींत पूर्वीपासून काम करीत असलेल्या कांहीं कारकुनांचीं मनें मात्र त्यायोगें दुखावलीं गेलीं याची मला कल्पना नव्हती. कारकुनीच्या प्रान्तांत प्रवेश करण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. कारकुनीचे रीती-रिवाज मला मुळींच अवगत नव्हते. वेळेवर कचेरीस जावें, हातीं असलेलें काम त्वरीत व चोख करावें, व्यर्थ इकडे तिकडे भटकण्यांत अथवा वायफळ गप्पा झोडण्यांत वेळ दवडूं नये या गोष्टींवर माझा कटाक्ष असे. माझ्या सहकाऱ्यांना माझा हा मार्ग पसंत

ग्रंथालय स्टॅम्प (हस्तलिखित नोंदी)

नसावा. नवीन आलेल्या कारकून बंधूशीं सहकार करण्यापेक्षां, प्रेमानें थोडीबहुत मदत करण्यापेक्षां, त्याला मूर्ख बनविण्याकडेच पुष्कळांची प्रवृत्ति दिसली! शिवाय, सुरवातीसच दरमहा पंचवीस रुपयांचे ऐवजीं माझी तीस रुपय वर नेमणूक झालेली पाहून कित्येकांचें पोट दुखूं लागलें! परोत्कर्ष-सहिष्णुता ही सामान्य गोष्ट नाहीं. दुसऱ्याच्या आनंदानें आनंदी होणारे, दुसऱ्याच्या सुखानें सुखावणारे लोक अत्यंत विरळा. त्याला मन फार मोठें असावें लागतें. असूयेनें ग्रासलेले लोक विचाराला विन्मुख होतात आणि येनकेन प्रकारेण चांगल्या माणसाला खालीं पाडण्याच्या व मूर्ख बनविण्याच्या प्रयत्नांत व्यस्त असतात! ह्या नियमास अनुसरून मला माझ्या कारकून बंधूंकडून तीव्र विरोधच होई! पण मी तिकडे लक्षच देत नसें.

तीन चार महिने या कारकून बंधूंनीं मला सतावण्यासाठीं जंग जंग पछाडले, परंतु मी त्यांचे ते सर्व प्रयत्न धुडकावून लावले. जें काम संपवावयास ते दोन अथवा तीन दिवस लावीत तें काम मीं अवघ्या तीन चार तासांत संपवून पुन्हा काम नाहीं म्हणून स्वस्थ बसत असें. परंतु असें स्वस्थ बसणें मला बरें वाटेना. तेव्हां मी आमच्या अकाउन्टन्टकडे गेलों व मला आणखी काम देण्याविषयीं त्यांना विनंति केली. त्यांना या माझ्या वेडेपणाचें थोडें आश्चर्यच घाटलें. त्यांनीं आणखी एका कारकुनास दिवसभर पुरेल इतकें व विशेष अवघड—इतर सामान्य कारकुनास न झेंपणारें—काम मला दिलें. अशा रीतीनें दोन कारकुनांचें काम मी एकटा रोजच्या ठराविक वेळांत करूं लागलों. हें पाहून मात्र आमच्या सहकारकुनांचें कंबरडेंच मोडलें. मी त्यांच्या डोळ्यांत अधिकच सलूं लागलों. परंतु मी अशानें डगमगणारा नव्हतों. मी माझा क्रम तसाच चालू ठेवला. माझें काम अधिकाऱ्यांना पूर्ण पसंत पडलें व त्याची सर्व्हिस-रेकॉर्डमध्यें मुक्तकंठानें प्रशंसा करण्यांत आली आणि नोकरीस लागल्यापासून चवथ्याच महिन्याच्या अखेरीस, एप्रिल १९१० पासून, मला पांच रुपयांची बढती देण्यांत आली. हें पाहून मात्र माझे कारकून बंधु हताश झाले! हा प्राणी कांहीं निराळाच असल्याची त्यांची खात्री झाली व मग ते माझ्याशीं नीट वागूं लागले.

' आपदः सन्तु नः शाश्वत् देव देव जगत्पते ' अशी कुंतीनें परमेश्वराची स्तुति केली आहे. आयुष्यांत येणारीं संकटें हीं संकटें नसून ते देवाचे दूत होत. धीरानें अशा संकटांना तोंड देणें हेंच पुरुषार्थाचें लक्षण आहे. दुःखाचा अनुभव घेतल्याशिवाय सुखाची गोडी कळत नाहीं, तद्वतच संकटांना तोंड देऊन त्यांवर मात केल्याशिवाय खऱ्या आनंदाचा, सुखी जीवनाचा आस्वाद चाखतां येत नाहीं.

जानेवारी १९१० चे सुरवातीस कामटीस प्लेगचा प्रादुर्भाव झाला. जीवाच्या भयानें लोक गांवाबाहेर जागा मिळेल तेथें राहावयास जाऊं लागले. शुक्ल व मी कोठें जावें, काय करावें या विवंचनेंत पडलों. कामटींत दक्षिणी ब्राह्मणांचीं घरें काय तीं ' सेन्ट्रल इंडिया मायनिंग कंपनी ' व ' वाइनगंगा इरिगेशन् डिव्हिजन् ' या दोन कचेऱ्यांत काम करणाऱ्या दहा बारा कारकून कुटुंबांचीं. ह्यांपैकीं जे सधन होते ते एका दूरच्या बंगल्यांत राहावयास गेले. आमची गरिबांची वर्णी कोठेंच लागेना. आमच्या कचेरींतील आणखी एक दोन कारकूनहि याच विवंचनेंत होते.

आमचें ऑफिस गांवापासून तीन साडेतीन मैलांचे अंतरावर कन्हान नदीच्या कांठीं गांवाच्या एका टोंकास होतें. आमच्या शेजारचे इतर–विशेषतः सधन लोक–गांवाच्या दुसऱ्या टोंकास राहावयास गेले होते. त्यांच्याबरोबर आपण जावें तर दररोज पांच साडेपांच मैलांचें अंतर सकाळ संध्याकाळ पायीं तुडवावें लागलें असतें; म्हणून इतके दूर जाणें आम्हांस पसंत नव्हतें. कचेरीच्या जवळपास कोठेंतरी सोईवार जागा पाहणें आम्हांस भाग होतें. आमच्या कचेरीपासून सुमारें दोन अडीच फर्लांगाच्या अंतरावर नदीकांठींच विटांची एक भट्टी होती. या भट्टीला लागूनच नुसत्या विटांवर विटा रचून केलेल्या भिंती व त्यांवर छप्पर अशा दोन तीन लहान लहान झोंपड्या होत्या. ह्या झोंपड्यांच्या मालकांना आम्ही भेटलों व तीन महिन्यांच्या करारावर त्या तीन्ही झोंपड्या आम्ही भाड्यानें घेतल्या. तीन्ही कुटुंबांची कशीबशी

 दी. ... 6228 ... 

सोय लागली. मी मात्र फटिंग मात्र तसाच राहिलों! शुक्लांनी आपणाकडे ठेविलेल्या झोंपडींत स्वतः ते, त्यांच्या मातोश्री व त्यांची पत्नी ह्या तिघांचाच समावेश मोठ्या कष्टानें होण्यासारखा होता. अशा स्थितींत त्या झोंपडींत आणखी एकाचा समावेश होण्याची शक्यताच नव्हती. वरें, दुसरीकडे कोठें राहून सकाळ संध्याकाळ त्यांच्या घरीं जेवावयास जावयाचें म्हणजे फार त्रासाचें झालें असतें, तेव्हां तेथेंच जवळपास कांहींतरी सोय करणें मला प्राप्त होतें. शेवटीं मी तेथेंच नदीकांठीं उघड्यावरच आपला डेरा लावण्याचें ठरविलें. रात्रीचें असें उघड्यावर पडणें धोक्याचें आहे अशी भीति मला घालण्यांत आली, परंतु या भीतीला मी भीक घातली नाहीं. माझा निश्चय मी कायम ठेवला.

विटांवर विटा रचून केलेली एक दहाबारा फूट उंचीची भिंत जवळच होती तिच्या आसऱ्यानें मी माझी खाट मांडली. खाटेवर सामान म्हणजे फक्त माझा बिछाना व एखादें पुस्तक आणि खाटेच्या पायाशीं एक पाण्याचा खुजा एवढेंच काय तें. संध्याकाळीं कचेरींतून आलों कीं ह्या खाटेवर आडवें व्हावें, वर्तमानपत्रें किंवा एखादें पुस्तक अंधार पडेपावेतों वाचीत राहावें, सात आठ वाजले कीं शुक्ल यांचे झोंपडींत जाऊन जेवण उरकावें आणि नंतर पुन्हा खाटेवर येऊन पडावें. वर असंख्य तारकांनीं फुललेलें विस्तीर्ण नभोमंडल, पायथ्याशीं संथपणें वहात असलेली कन्हान नदी, किनाऱ्यावरून येणारा मंद शीतल वारा आणि निस्तब्ध शांतता ह्या सर्वांनीं मन हरखून जाई. खाटेवर पडल्या पडल्या शीतल सुखदायी रुपेरी चांदणें आणि आकाशांतील असंख्य तारकांचें रमणीय दृश्य पाहतां पाहतां डोळा केव्हां लागे तें कळत देखील नसे. पहाटे जाग येई ती पक्ष्यांच्या किलबिलाटानें. सकाळीं संधि-प्रकाशांतच उठावें, फिरावयास जावें, उगवत्या सूर्यबिंबाची कमनीय शोभा मनमुराद लुटावी, नदीकांठींच प्रातर्विधि उरकावे, घरीं येऊन चहा घ्यावा, स्नान करावें, जेवावें कीं कचेरी गांठावी, असा सोमवार ते शनिवारचा माझा नित्य क्रम असे. फक्त रविवारीं अथवा इतर सुटीच्या दिवशीं ह्यांत फरक एवढाच

होई कीं खाटेवर ऊन्ह येऊं लागलें कीं चार दोऱ्या चार टोंकांस बांधलेली एक चादर मी खाटेवर ताणून देई आणि उन्हापासून स्वतःचें रक्षण करीं. प्लेगचे तीन महिने कांहीं विघ्न न येतां अशा रीतीनें मी अत्यंत मौजेनें व सुखानें नदीकिनारीं काढले. या घटनेचें स्मरण झालें कीं मनाला एक प्रकारचा निरागस आनंद झाल्यावांचून रहात नाहीं.

## गौप्यस्फोट : ४६ :

मी कामटीस येऊन पांच सहा महिन्यांचे वर काल लोटला होता. कामटीस दक्षिणी ब्राह्मणांचीं कुटुंबें फक्त दहा बाराच होतीं. हीं बहुतेक कुटुंबें एकाच मोहल्ल्यांत शेजारीं शेजारीं राहात असत. मोजकींच कुटुंबें असल्यानें सर्वांना एकमेकांशीं मिळून मिसळून राहणें भाग असे. ह्या दहा बारा कुटुंबांत एक यजुर्वेदी, चार देशस्थ, दोन कऱ्हाडे, एक कोकणस्थ व चार सारस्वत ब्राह्मणांचीं होतीं. मी शुक्र यांच्याकडे जेवावयास असलों तरी जातीनें सारस्वत ब्राह्मण असल्यानें ह्या चार सारस्वत कुटुंबांकडे स्वाभाविकच माझा अधिक ओढा होता. हीं चारहि कुटुंबें माझ्या अगोदर आठ दहा वर्षांपूर्वी कामटीस आलीं होतीं व त्यांचा जमहि तेथें उत्तम बसला होता. सेन्ट्रल इंडिया मायनिंग कंपनींत चांगल्या पगारावर या कुटुंबांतील कर्ते नोकरीस असल्यानें त्या सर्वांची आर्थिक परिस्थिति बरीच समाधानकारक होती. हीं चारहि कुटुंबें मूळचीं उत्तर कर्नाटकांतलीं. मी मूळचा रत्नागिरी जिल्ह्यातला. आमच्या व त्यांच्या राहणींत व रीतीभातींत बराच फरक असे. शिवाय, आम्ही मूळचे कोंकणांतील असलों तरी देशावर आल्यापासून इकडील पुष्कळशा रीतीरिवाजांशीं आम्ही समरस होऊन गेलों होतों तसे हे कर्नाटकीय सारस्वत समरस झाले नव्हते. उलट आपल्या मूळच्या रीतीरीवाजांशीं चिकटून राहण्यांतच त्यांना भूषण व अभिमान वाटत असे. आमच्यांतील हा फरक तेथील इतर कुटुंबांच्या लक्षांत यावयास वेळ लागला नाहीं. आमचे हेडक्लार्क श्रीयुत विठ्ठलराव काशीनाथ गलांडे हे कऱ्हाडे ब्राह्मण होते. मनानें उदार,

सरळ स्वभावी आणि सर्वांशीं मिळून मिसळून गोडीगुलाबीनें वागणारे. वरील सारस्वत कुटुंबांकडे माझा विशेष ओढा असल्याचें त्यांच्या नजरेंतून सुटलें नाहीं. त्यांनीं एके दिवशीं उघडपणें ह्याचें कारण मला विचारलें. मीहि कोणताहि आडपडदा न ठेवतां ‘ ज्या प्रमाणें कऱ्हाड्यांचा कऱ्हाड्यांकडे, कोकणस्थांचा कोकणस्थांकडे किंवा प्रभूंचा प्रभूंकडे विशेष ओढा असतो त्याचप्रमाणें माझा ओढा त्यांचेकडे अधिक आहे ’ असें मी त्यांना सांगितलें. त्याबरोबर ते विस्मयचकित झालेले दिसले. मला त्यांच्या विस्मयाचें कारण समजेना. मी त्यांना म्हटलें ‘ आपण कऱ्हाडे असल्यानें आपला नावलेकरांकडे अधिक ओढा नाहीं का ? ’ ते म्हणाले ‘ हे सारस्वत आहेत असें तुम्हास कोणी सांगितलें ? ’ ‘ सांगावयास कशास पाहिजे ? आपण आपल्या भावांना ओळखत नाही का ? ’ मी म्हटलें. यावर विठ्ठलराव म्हणतात ‘ अहो, पण ते दुसरेच कोणी ब्राह्मण असल्याचें सांगतात, म्हणून मला तुमच्या म्हणण्याचें आश्चर्य वाटलें. ’ हें ऐकून मात्र मी स्तंभितच झालों ! या लोकांनीं आपली खरी जात लपविण्याचें व भलताच आभास उत्पन्न करण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. आपली जात अशा तऱ्हेनें लपवून ठेवणें सुशिक्षित आणि सुबुद्ध माणसांना केव्हांहि योग्य नव्हतें. मी मासे व मांस खातों कीं नाहीं याचीहि विठ्ठलरावांनीं मजजवळ चौकशी केली. आमच्या ज्ञातींतील बहुसंख्य लोक मासे खातात व मीहि खातों असें मी प्रांजलपणें त्यांना सांगितलें. हीं चारहि कुटुंबें त्याच पंक्तींतील होतीं व म्हणूनच त्यांनीं आपली जात लपविण्याचा प्रयत्न केला असावा.

हा खुलासा ऐकल्यावर विठ्ठलरावांना स्वस्थ बसवलें नाहीं. त्यांनीं त्या चार कुटुंबांतील प्रमुखाला याचा खुलासा विचारला एवढेंच नव्हे तर त्यांचा थोडा पाणउताराहि केला. हा गौप्यस्फोट अर्थातच त्या प्रमुखांना आवडला नाहीं. त्यांनीं मला एकीकडे बोलावून माझी कानउघाडणी करण्याचा वृथा खटाटोप केला ! मी उलट या सर्व बनावाबद्दल व भ्याडपणाबद्दल

त्यांनाच दोष दिला; परंतु त्या दिवसांपासून त्यांचा मात्र मजवर वराच रोष झाला !

## अन्नपूर्णाश्रम : ४७ :

कामटीस आल्यानंतर चवथ्या-पांचव्या दिवसापासूनच मी शुक्र यांच्या घरीं बोर्डर म्हणून राहूं लागलों हें मागें आलेंच आहे. तीन चार महिने ही व्यवस्था उत्तम प्रकारें चालली होती. सारस्वतांच्या आणि देशस्थांच्या स्वयंपाकाचे पद्धतींत पुष्कळच फरक असतो. मला तो जाणवत नसे असें नव्हे. परंतु मी तसें कधींहि दर्शविलें नाहीं. पानावर पडेल तें मी गोड मानून घेत असें. हा फरक मला जाणवूं नये म्हणून शुक्र व त्यांच्या घरची मंडळी आपल्या परीनें शक्य ती दक्षता घेत असत. प्रत्येक महिन्यांत होणारा सर्व भोजनखर्च आम्हां चौघांत आम्ही समसमान विभागून घेत होतों. तक्रारीला कोठेंहि जागा नव्हती.

ही व्यवस्था फार दिवस टिकूं शकणार नाहीं अशी सुरवातीपासूनच माझी अटकळ होती. शुक्रांचे व माझे संबंध निकट मित्रत्वाचे असले तरी त्यांच्या मातोश्री व पत्नी यांना माझ्याबद्दल तितकीच आत्मीयता वाटणें शक्य नव्हतें, आणि तें मानवी स्वभावास धरून होतें. शिक्षणाचा अभाव व मूळची गरीबी ह्यामुळेंहि वृत्तींत संकुचितपणा येणें स्वाभाविक होतें. मनुष्य आपल्या घरांत वेळपरत्वें वाटेल ती अडचण सोसतो, सकाळचें अन्न संध्याकाळीं किंवा रात्रीचें उरलेलें अन्न सकाळीं खातो, परंतु परका पाहुणा घरांत असला म्हणजे तसें करणें त्याला जड जातें. परकी मनुष्य घरांत असणें ही त्याला अशा वेळीं एक आपत्तीच वाटते. त्यांनीं मला शिळें अथवा उरलेलें अन्न वाढिलें असतें तर मी तें खावयास नकार केला असता अथवा नाक मुरडलें असतें असें नव्हे, तथापि त्यांच्या दृष्टीनें तें गृहस्थपणाला शोभण्याजोगें नव्हतें; आणि म्हणून त्या दोघांचीहि विलक्षण कुचंबणा होत होती. हळू हळू माझ्या नजरेस ही कुचंबणा येऊं लागली. तेव्हां ह्यावर काय

उपाय योजावा ह्या विचारांत मी पडलों. अतःपर मी बोर्डर म्हणून राहूं इच्छित नाहीं असें शुक्ल यांस एकाएकीं सांगणें मला प्रशस्त वाटेना. पण एके दिवशीं दुसऱ्याच एका गोष्टीवरून माझा व शुक्लांचा बराच खडाजंगी वाद झाला आणि तो इतका विकोपास गेला कीं त्या रागाचे भरांत ‘ मी आजपासून तुझ्याकडे जेवावयास येणार नाहीं ’ असें मी त्याला खाडकन् सांगून मोकळा झालों !

एकदां तोंडून बाहेर गेलेला शब्द परत घेणें मला माहीत नव्हतें. शुक्ल यांच्यायेथें जेवण घेणें रागाच्या आवेशांत मी बंद केलें खरें परंतु आतां आपल्या जेवणाची व्यवस्था काय करावयाची हा प्रश्न मजसमोर दत्त म्हणून उभा राहिला. कामटीस दक्षिणी लोकांची वस्ती फारच कमी व गांवहि मध्यमच. अशा ठिकाणीं खाणावळ कोठून असणार ? साहजिकच हातानें स्वयंपाक करणें, स्वयंपाकी ठेवणें किंवा इतर कोणाकडे जेवणाची व्यवस्था करणें ह्या तींहींपैकीं एकाची निवड करणें मला भाग होतें. हातानें स्वयंपाक करण्याचा प्रसंग आजपावेतों मजवर कधींच आला नव्हता. प्रयत्न केला असता तर तें जमलें नसतें असें नाहीं. परंतु सकाळीं उठून पन्नास साठ फूट खोल विहिरीचें पाणी ओढणें, धोतर धुणें, चुलीपाशीं बसून स्वयंपाकासारखें किचकट व त्रासदायक काम करणें, उष्टें खरकटें काढणें आणि इतकीं सर्व कष्टाचीं कामें उरकून पुन्हा रखरखीत उन्हांतून तीन साडेतीन मैल पायीं रखडत कचेरीस जाणें माझ्या अशक्त प्रकृतीस तोलण्यासारखें नव्हतें; तेव्हां तो विचार मला बाजूस सारावा लागला. इतर कोणाकडे जेवणाची व्यवस्था करावी तर त्याचा अनुभव अगदीं ताजा होता. म्हणून त्या भानगडींत पडण्याची माझी इच्छा नव्हती. राहतां राहिली तिसरी म्हणजे स्वयंपाकी ठेवण्याची व्यवस्था. ह्या व्यवस्थेंत दोन अडचणी होत्या. एकतर माझ्या तुटपुंज्या प्राप्तीला तें झेंपण्यासारखें नव्हतें व दुसरें, दक्षिणी स्वयंपाकी कामटीसारख्या कुग्रामांत मिळणें अशक्य होतें. मग काय करावयाचें ? बाजारची पुरी-भाजी नित्य पचविण्याची अंगीं ताकद नव्हती. पोटाची

कांहीं तरी व्यवस्था करणें तर भाग होतें. बऱ्याच विचारांतीं, खर्च झाला तरी पत्करला, परंतु कोणावरहि विसंबून न राहतां आपली आपण स्वतंत्र व्यवस्था करावयाचें ठरवून एका 'भय्यन्' ची स्वयंपाकाच्या कामावर आम्ही नेमणूक केली. भय्यन्नें तें सोवळें, तो चौका, तो ओंगळपणा, ते जाडे जाडे अर्धे-कच्चे रोट आणि कधीं गिचका तर कधीं अर्धकच्चा 'चावल' हा भोजनाचा थाट पाहतां, आजारी पडून अधिक त्रास करून घेण्यापेक्षां भय्यन्ला तीन चार दिवसांच्या आंतच रजा देणें मला अधिक श्रेयस्कर वाटलें.

भय्यन् गेले, पण पुढें काय हा प्रश्न शिल्लक राहिलाच. कामटीस देवधर या नांवाच्या एका कोकणस्थ गृहस्थानें नुकतेंच चहा-चिवडा-भज्यांचें एक दुकान काढलें होतें. त्याला चाचपून पाहावें या हेतूनें मी त्याच्याकडे गेलों व चहाच्या दुकानाला जोडूनच खाणावळ काढण्याची मी त्याला सूचना केली. ही सूचना त्याच्या व्यापारी मनास रुचली नाहीं. पुरेसे ग्राहक असल्याशिवाय खाणावळ चालविणें परवडणार नाहीं असें त्याचें म्हणणें पडलें; आणि तें बरोबरहि होतें. 'कमींत कमी किती ग्राहक असले तर तुम्ही खाणावळ काढाल ?' असा सवाल मी त्याला टाकला. तो म्हणाला 'चार पांचजणांनीं मजजवळ चौकशी केली होती, परंतु खाणावळ काढावयाची तर कमींत कमी दहा ग्राहक तरी पाहिजेत.' मी म्हटलें 'पांच गिऱ्हाइकांची हमी मी घेतों. बाकीचे पांच तुम्ही मिळवा व खाणावळ चालू करा. तीन चार महिने पहा आणि नंतर जसा अनुभव येईल त्याप्रमाणें पुढें खाणावळ चालू ठेवा अथवा बंद करा.' ही सूचना देवधर यांस मान्य झाली आणि पांच ग्राहक मी आणून देतांच खाणावळ चालू करावयाचें नक्की झालें.

पांच ग्राहक मिळविण्याच्या प्रयत्नास मी लागलों. माझ्याशिवाय आणखी चार ग्राहक मला मिळवावयाचे होते. तेथील सिटी डिस्पेन्सरींत डॉ. वामन रामकृष्ण राजपाठक या नांवाचे गृहस्थ काम करीत असत. त्यांचें कुटुंब प्रसूतीनिमित्त पुण्यास गेलें होतें व ते हातानेंच स्वयंपाक करून

खातात असें मी ऐकिलें होतें. दुसरे दिवशीं सकाळीं मी सरळ त्यांच्या दवाखान्यांत पोंचलों. डॉक्टरनां मी कधींच पाहिलें नव्हतें. औषधासाठीं आलेला कोणी इसम असेल अशा समजुतीनें 'काय पाहिजे' म्हणून त्यांनीं मला विचारलें. मी त्यांना म्हटलें, 'आपली व माझी ओळख नाहीं, परंतु मला आपल्याशीं कांहीं खानगी काम आहे.' डॉक्टर सज्जन व मोकळ्या मनाचे होते. ते म्हणाले 'बोला ना, काय काम आहे?' मी म्हटलें 'इतर लोकांना डॉक्टर रोगमुक्त करतात परंतु डॉक्टरनां क्लेशमुक्त करावें या उद्देशानें मी आलों आहें.' माझ्या या संदिग्ध बोलण्याचा आशय त्यांच्या ध्यानीं आला नाहीं. ते म्हणाले 'मी नाहीं समजलों.' मी म्हटलें 'डॉक्टर, तुम्ही सध्या एकटेच आहांत. तुमच्या जेवणाखाण्याचे बरेच हाल होतात असें माझ्या ऐकिवांत आहे. दवाखान्याचें काम उरकल्यानंतर दोनप्रहरीं एक दोन वाजतांच्या पुढें तुम्हांला चूल फुंकीत बसावें लागतें; या त्रासांतून तुम्हांला मुक्त करावें व त्यायोगें माझा स्वतःचाहि स्वार्थ साधून घ्यावा हा माझ्या येण्याचा हेतु आहे.' बिचाऱ्या भोळ्या डॉक्टरांना कांहीं उमज पडेना. तेव्हां मग खाणावळीची सविस्तर योजना मी त्यांना सांगितली. त्यांनीं लागलीच अत्यंत आनंदानें व कृतज्ञतापूर्वक खाणावळीचा ग्राहक होण्यास आपली संमति दिली.

मी व डॉक्टर असे दोन ग्राहक झाले. अजून तिघांची कमतरता होती. डॉक्टरच्या माहितीचे स्टेशनस्टाफवरील दोन गृहस्थ व आमच्या कचेरींतील एक इसम अशीं पांच नांवें मी देवधर यांजकडे नोंदविलीं. देवधर यांनीं स्वतः पांच ग्राहक मिळविले. अशा रीतीनें दहा ग्राहक होतांच एका शुभ मुहूर्तावर (मे १९१०) आमच्या–म्हणजे देवधरांच्या–'अन्नपूर्णाश्रमाचा' उद्घाटन समारंभ थाटामाटानें साजरा करण्यांत आला, आणि आमच्या जेवणाचा बिकट प्रश्न अत्यंत समाधानकारकपणें सुटला.

तीन चार महिने आमचा 'अन्नपूर्णाश्रम' उत्तम चालला होता. देवधर केवळ धंदेवाईक दृष्टीनें खाणावळ चालवीत नव्हते. आम्हां सर्वांना

घरची आठवण होऊं नये या प्रामाणिक बुद्धीनें अगदीं घरच्यासारखी व्यवस्था ठेवण्याची काळजी ते घेत. आम्ही सर्व आनंदांत होतों. देवधरांवर त्यांच्या उत्तम व्यवस्थेबद्दल स्तुतवर्षाव करीत होतों. तेहि आमच्या स्तुतीनें फुलून जात होते. आमचे असे सुखासमाधानांत दिवस चालले असतां डॉक्टर वामनराव यांच्या घरची मंडळी पुण्याहून परत येत असल्याचें पत्र आलें व त्यामुळें देवधरांना त्यांनीं पूर्वसूचना दिली. ह्या सूचनेनें मलाहि सावध होणें प्राप्त होतें; कारण दहापैकीं एक ग्राहक कमी झाला तर देवधर खाणावळ चालू ठेवण्यास राजी नव्हते, आणि खाणावळ बंद झाली की पुन्हा माझ्या जेवणाच्या हालांस पारावार राहणार नव्हता. नोकरीला लागून मला आतां पांच सहा महिन्यांवर काल लोटला होता, म्हणून धारहून पत्नीला पाठविण्याची मी पत्रानें वडिलांकडे प्रस्तावना केली. जुलई १९१० च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यांत आमच्या मातोश्री माझ्या पत्नी व दोन मुलांसह कामटीस येऊन दाखल झाल्या आणि देवधरांना शतशः धन्यवाद देऊन आम्ही ‘ अन्नपूर्णाश्रमाचा ’ कायमचा निरोप घेतला.

## गुलकंद

: ४८ :

सन १९१० च्या मे महिन्यांतील गोष्ट असावी. आमच्या कचेरीचे हेड्क्लार्क श्री. विठ्ठलराव गलांडे यांच्या मुलीचें लग्न निघालें. लग्नानिमित्य कचेरींतील आम्हां सर्व कारकुनांना संध्याकाळचें भोजनाचें आमंत्रण होतें. पंक्तीची–पाट पाणी रांगोळ्या इत्यादींची–सर्व व्यवस्था मजकडे सोंपविली होती. संध्याकाळीं ठराविक वेळेच्या एक तास अगोदर कचेरी सोडली व आम्ही सर्व श्री. नारायण दाजीबा पिंगळे, सब्–ओव्हरसिअर यांच्या घरीं आलों. थोड्याबहुत गप्पासप्पा व चहापान झाल्यावर आम्ही लग्नमंडपाकडे जावयास उठणार इतक्यांत पिंगळे यांनीं एक लहानसा गुलकंदाचा डबा आणिला व जमलेल्या सर्वांनां ते साधारण आंवळ्याएवढा गुलकंद देऊं लागले. हा गुलकंद भांगेचा होता. बहुतेकांनीं तो आवडी आवडीनें घेतला. शेवटीं

मजवर पाळी आली. मी जन्मांत भांगेला शिवलों नव्हतों. पिंगळे यांनीं गुलकंदाचा आंवळ्याएवढा गोळा मी नको म्हणत असतांहि आग्रहानें माझ्या हातावर ठेवला. मी तो साभार परत केला. परंतु मग केवळ पिंगळेच नव्हे तर जमलेली इतर मंडळीहि माझ्या इतकी मागें पडली कीं गुलकंद घेतल्याविना माझी सुटका नव्हती. शेवटीं सर्वांच्या आग्रहाला मी बळी पडलों व निरुपाय म्हणून वाटाण्याएवढा गुलकंद घेतला. वाटाण्याएवढा गुलकंद मी घेतला खरा, परंतु याचा परिणाम भोगावा लागणार ह्याबद्दल मला मुळींच शंका नव्हती; आणि ह्या विचारानेंच माझें मस्तक भ्रमण करूं लागलें होतें.

आम्ही सर्वजण लग्नमंडपांत पोहोचलों. मी पाट, पाणी, रांगोळ्या, पत्रावळी, उदबत्त्या वगैरेची सर्व जय्यत व्यवस्था केली. मात्र हें सर्व करीत असतांना माझें मस्तक गरगरतच होतें. पण मी त्याची पर्वा केली नाहीं किंवा कोणाला त्याची जाणीवहि दिली नाहीं.

व्याहीमंडळी आली. ज्याच्या त्याच्या इतमामाप्रमाणें त्यांना योग्य स्थानावर बसविण्यांत आलें. हरहर महादेव झाला. मी देखरेख करीत उभा होतों. माझें डोकें गरगरतच होतें. विठ्ठलरावांनीं मलाहि जेवावयास बसावयास सांगितलें. जेवणावर यत्किंचितहि वासना नव्हती. विठ्ठलरावांच्या आग्रहाखातर मी मंडपांत एका बाजूस असलेल्या कडुलिंबाचे आडोशास जेवावयास बसलों. पहिलाच घांस तोंडांत घातला मात्र, मला उलटीची भावना होऊं लागली. पानावर उलटी झाल्यास सर्व पंक्तीचा विरस होईल हें जाणून मी हळूच उठलों व विठ्ठलरावांचें लक्ष चुकवून सोवळ्यानेंच माझ्या बिऱ्हाडाकडे धांव घेतली. वाटेंतच मला भडभडून उलटी झाली. कसेंबसें बिऱ्हाड गांठलें आणि तसाच—सोवळ्यानेंच—अंगणांत पडलेल्या खाटेवर आडवा झालों तो सकाळीं साडेआठ वाजतां जागा झालों !

भलत्याच आग्रहाला बळी पडून पस्तावण्याचा हा दुसरा किंवा तिसरा प्रसंग !!

'चंदनाचे हात पायहि चंदन । परिसा नाहीं हीन कोणी अंग ।
दीप नाहीं पाठीं पोटीं अंधकार । सर्वांगें साकर अवघी गोड ।।
तुका म्हणे तैसा सज्जनापासून । पाहतां अवगुण मिळेचिना ।।
-संत तुकाराम.

कामटीस आल्यापासून सहा सात महिन्यांत औषधपाण्याकरतां म्हणून डॉक्टरकडे जाण्याचा प्रसंग मला आला नव्हता. परंतु पत्नी येतांच संसारास सुरवात झाली आणि त्याबरोबरच डॉक्टरचा पाय घरांत शिरला. माझा मोठा मुलगा प्रभाकर ऊर्फ बबन धारहून आला नाहीं तोंच उन्हाच्या त्रासानें त्याचे डोळे आले व त्यामुळें त्याला बराच त्रास होऊं लागला. अर्थात् मला डॉक्टरचे पाय धरणें प्राप्त होतें. मी मुलाला घेऊन डॉ. वामनराव यांच्या दवाखान्यांत गेलों. डॉक्टरांची व माझी अन्नपूर्णाश्रमापासून बरीच जान पछान झाली होती व त्यांच्या अंगच्या अनेक सद्गुणांचें दर्शन घडलें होतें. मुलाला घेऊन मी दवाखान्यांत आलेला पाहतांच उन्हांतून मुलाला दवाखान्यांत कां आणलें, आपल्याला घरींच कां बोलाविलें नाहीं म्हणून डॉक्टर मजवर रागावले. 'एवढ्याशा कामाकरतां घरीं येण्याचा त्रास आपणास देऊं नये असें वाटलें म्हणून त्याला येथें घेऊन आलों' असें मी सांगतांच हंसत हंसत डॉक्टर म्हणाले 'माझ्या त्रासाची तुम्ही एवढी चींव केली आणि तुम्ही माझ्यासाठीं आजपावेतों इतका त्रास घेतला तो?' मी म्हटलें 'डॉक्टर, त्यांत स्वार्थ होता.' परंतु डॉक्टरनां तें पटलें नाहीं. थोड्याशा रागांतच ते म्हणाले 'ठीक आहे, मग मजजवळ औषध नाहीं.' मी विचारांत पडलों. मी संसारी माणूस. डॉक्टरच्या मदतीची मला प्रत्यहीं गरज लागणार. कामटींत एकच डॉक्टर. त्याला नाखुष करून आपलें निभावण्यासारखें नाहीं; तेव्हां त्यांना अधिक न दुखवितां मी मुलाला तसाच घरीं घेऊन आलों. घरीं येऊन घटका अर्धी घटकाहि झाली नसेल तों डॉक्टर सायकलवरून आपला सर्व सरंजाम घेऊन माझ्या घरीं हजर! मी आश्चर्यानें

थक्कच झालों. डॉक्टरनीं गरम पाणी मागविलें, मुलाचे डोळे धुतले, डोळ्यांत औषध घातलें व ते परत जावयास निघाले. मी हळूच व्हिजिट् फी म्हणून त्यांच्या हातावर ठेवण्याकरतां दोन रुपये पुढें केले मात्र, थोड्याशा घुश्शांतच डॉक्टर म्हणाले ' कां हो, व्हिजिट् फीच्या लालचीनें मी तुमच्या घरीं आलों अशी का तुमची समजूत आहे ? ' मी म्हटलें ' डॉक्टर, तशी माझी मुळींच समजूत नाहीं. परंतु मी गृहस्थी आहे. ' डॉक्टर उसळून म्हणाले ' गृहस्थपणा मलाहि कळतो. ठेवा ते रुपये खिशांत आणि यापुढें पैशाची गोष्ट माझ्याकडे पुन्हा केव्हांहि काढीत जाऊं नका. ' मी अगदीं शरमिंदा झालों. कृतज्ञतेनें ऊर भरून आला ! मुलाचे डोळे चांगले बरे होईपावेतों डॉक्टर रोज घरीं येत असत !

डॉक्टरचे व आमचे संबंध दिवसेंदिवस अधिक निकटचे होत चालले होते. आम्हां दोन्ही कुटुंबांचा घरोबाहि बराच वाढला होता. डॉक्टर व मी एकमेकांस भेटलों नाहीं व तास अर्धा तास सुख-दुःखाच्या गोष्टी केल्या नाहींत असा एक दिवसहि जात नसे. त्याशिवाय आम्हांस चैनच पडत नसे. डॉक्टर म्हणजे खरोखर मूर्तिमंत सद्गुणच होते. नेहमीं हंसतमुख, स्वभावानें गोड व आनंदी, मनानें प्रेमळ, अंतःकरणानें उदार, निर्व्यसनी, निगर्वी, निर्लोभी, देवभोळी, पापभीरु व परोपकारी अशी ही असामान्य व्यक्ति होती. माझ्या सबंध आयुष्यांत अशा गुणसमुच्चयानें परिपूर्ण अशी दुसरी व्यक्ति अजूनपावेतों माझ्या आढळांत आलेली नाहीं कोणीहि केव्हांहि डॉक्टरांना बोलवावें, नकार असा त्यांच्या तोंडून येतच नसे. अंगांत एकशें-एक-दोन डिग्री ताप असतांहि ते आजाऱ्यास पाहावयास गेलेले मला माहीत आहे. गरीब असो वा श्रीमंत असो कोणाकडेहि व्हिजिट्ला गेले तरी व्हिजिट् फीची चुकूनहि कधीं ते मागणी करीत नसत. असें असूनहि रात्रीं साडेनऊ दहा वाजतां ते घरीं परत येत त्यावेळीं त्यांचा खिसा भरलेलाच असावयाचा. आलेल्या पैशांची मोजदाद त्या गृहस्थानें कधींहि केली नाहीं. घरीं आले कीं पॅन्टच्या खिशांत हात घालावा व सर्व पैसे न मोजतांच कुलूप

नसलेल्या एका मोडक्या ट्रंकेंत टाकावे हा त्यांचा नित्यक्रम असे. कोणी फी न दिली तरी त्याच्या औषधोपचारांत कधींहि हयगय किंवा कुचराई व्हावयाची नाहीं. त्यांच्या संगतींत गेलेला अडीच तीन वर्षांचा काल म्हणजे माझ्या आयुष्यांतील सुखाचा परमोच्च बिंदु होता. त्यांचें व माझें व्यावहारिक मित्रत्वाचें नातें केव्हांच लोप पावलें असून आम्ही उभयतां सहोदर बंधूपेक्षांहि अधिक प्रेमानें, अधिक जिव्हाळयानें व अधिक आत्मीयतेनें आमचा काल व्यतित करीत होतों. परंतु आयुष्यांत असे सुखाचे क्षण दीर्घ काल टिकत नाहींत. सन १९१२ च्या ऑगस्टच्या सुमारास डॉक्टरांची झांशीस अचानक बदली झाली. डॉक्टरांच्या आणि आमच्याहि डोक्यावर वज्राघातच झाला !

डॉक्टर लष्करी नोकरींत असल्यानें हुकमाची तामिली तत्काळ करणें भाग होतें. डॉक्टरांची झांशीस जाण्याची मुळींच इच्छा नव्हती. कामटीची जनताहि त्यांना झांशीस न जातां नोकरी सोडून कामटीसच खानगी दवाखाना सुरू करण्याविषयीं आग्रह करीत होती व त्यांना लागेल ती मदत देण्यास तयार होती. परंतु मिलिटरी हुकमाचें उल्लंघन करतां येणें त्यांना शक्य नव्हतें. शेवटीं कामटी सोडावयाचेंच त्यांनीं ठरविलें आणि आमच्या सुखमय जीवनाचा अंत झाला !

झांशीस जाण्याच्या आदल्या दिवसाची गोष्ट. माझा व पत्नीचा निरोप घेण्याकरितां संध्याकाळच्या वेळीं डॉक्टर आमच्या घरीं आले, परंतु त्यांच्या तोंडून एक शब्दहि निघेना ! भावनेच्या आवेगांत त्यांनीं एकदम माझ्या गळयाला कडकडून मिठी मारली व ' पंत, मी तुला सोडून चाललों रे ! माझें आतां कसें होईल ? ' एवढें म्हणून एखाद्या लहान मुलाप्रमाणें ते ओक्साबोक्सीं रडूं लागले ! माझ्याहि डोळयांवाटे खळखळ अश्रुप्रवाह चालू होता. जवळ जवळ तीन चार मिनिटें आमच्या मिठ्या सुटल्या नाहींत. तोंडून एक शब्दहि निघत नव्हता. अश्रुपातामुळें हृदयावरील भार हलका

होत होता. माझी पत्नी अश्रु ढाळीत जवळच उभी होती. तो करुण प्रसंग अजूनहि माझ्या डोळ्यांसमोर कालच घडल्यासारखा ताजा आहे !

दुसरे दिवशीं डॉक्टरनां निरोप देण्याकरतां मी स्टेशनवर गेलों. स्टेशनवर किती तरी लोक त्यांना निरोप देण्याकरतां आले होते. हारांमागून हार त्यांच्या गळयांत पडत होते आणि निरोप देण्यास आलेला प्रत्येकजण आपापल्या सामर्थ्याप्रमाणें त्यांना भेट म्हणून कांहीं ना कांहीं देतच होता. ह्या भेटींनीं डॉक्टरांच्या कोटाचे व पॅन्टचे खिसे गच्च भरून गेले तरीहि भेटी येतच होत्या आणि मी त्या माझ्या रुमालांत सांठवीत होतों. शेवटीं गाडी आली, पांच मिनिटें थांबली व डॉक्टरनां आम्हांपासून हिरावून घेऊन रवानाहि झाली ! माझ्या एका अत्यंत जिव्हाळ्याच्या मित्राची व माझी ताटातूट झाली ! डॉक्टरांचा व माझा पुन्हा एकत्र राहण्याचा योग आलाच नाहीं !!

पुढें कित्येक वर्षे डॉक्टरांचीं पत्रें मला येत असत. प्रत्यक्ष भेटण्याचा प्रसंगहि एक वेळ आला होता परंतु तो फारच अल्पकाळ. हैद्राबाद (सिंध), झांशी, मुंबासा ( आफ्रिका ), इजिप्त इत्यादि ठिकाणीं डॉक्टर नोकरीनिमित्य फिरून आले. एकंदरीनें त्यांचें जीवन सुखाचें होतें. परंतु अशीं देवमाणसें फार दिवस या मृत्युलोकास लाभत नाहींत. आफ्रिकेंतून परत आल्यानंतर काशी-विश्वेश्वराच्या दर्शनाकरतां म्हणून डॉक्टर बनारसला गेले होते. त्यांना अकस्मात् कॉलरा झाला आणि तेथें घांटावरच त्यांचा तडकाफडकीं अंत झाला ( १९३२ ) ! देवलोक खरोखरच असला तर डॉक्टर देवांच्या प्रभावळींत जाऊन खास बसले असतील !

* * *

' टिळा टोपी माळा देवाचें गवाळें । वागवी वोंगळें पोटासाठीं ॥
तुळशी खोवी कानीं, दर्भ खोवी शेंडीं । लटिकी धरी वोंडी नासिकाची ॥
कीर्तनाचे वेळे रडे पडे लोळे । प्रेमेंवीण गळे दाटताती ॥
कथा करूनियां दावी प्रेमकळा । अंतरीं जिव्हाळा कुकर्माचा ॥
तुका म्हणे ऐसे मावेचे मइंद । त्यांपाशीं गोविंद नाहीं नाहीं ' ॥

कामटीस आल्यापासून ज्यांच्याशीं माझा संबंध आला आणि मी विशेष मोकळेपणानें आणि आपुलकीनें वागूं लागलों त्यांत माझे ज्ञातिबंधु श्रीयुत मुरडेश्वर दत्तात्रय यांचा उल्लेख केला पाहिजे. हे गृहस्थ मूळचे उत्तर कर्नाटकचे रहिवासी. गृहस्थ सज्जन, सरळ मनाचा, पापभीरु, धार्मिक वृत्तीचा, देवभोळा, प्रेमळ व दांभिकपणाचा अंशहि अंगीं नसलेला असा होता. तेथील प्रसिद्ध, धनाढ्य व दानशूर उद्योगपति रावसाहेब डी. लक्ष्मीनारायण यांच्याकडे ते अकाउन्टन्ट म्हणून काम करीत होते. रावसाहेब डी. लक्ष्मीनारायण यांजकडे एकदां ( बहुधा सन १९११ ) संत नारायण महाराज यांचें आगमन झालें. दत्तोपंत यांनीं महाराजांच्या दर्शनास व प्रसादास येण्याविषयीं मला व माझ्या पत्नीला आग्रहाचें आमंत्रण दिलें. साधु-संतांविषयीं माझ्या मनांत अनुकूल ग्रह कधींच नव्हता. उलट जें कांहीं मी ऐकत अथवा पाहात असें त्यावरून तथा-कथित संतांविषयीं माझें मत प्रतिकूलच बनलें होतें. माझ्या पत्नीची वृत्ति मात्र थोडी निराळी होती. देवाधर्माकडे तिचा विशेष ओढा असे, आणि कोणी प्रसिद्ध साधु-संत आला तर त्याचें दर्शन घेण्याची साहजिकच तिला उत्कंठा असे. मी तिला परावृत्त करण्याचा प्रयत्न करीं, तरीहि तिच्या मनाचा कल त्या बाजूस झुकतच असे. तिचा हिरमोड करण्याची माझी इच्छा नव्हती आणि म्हणून तिची इच्छा व दत्तोपंतांचा आग्रह यांचा मान ठेवण्यासाठीं त्यांच्या आमंत्रणाचा मी स्वीकार केला आणि भल्या पहाटेस स्नान वगैरे उरकून मी व माझी पत्नी रावसाहेब डी. लक्ष्मीनारायण यांच्या बंगल्यावरील दत्तोपंतांच्या बिऱ्हाडीं पोंचलों.

ती वेळ सकाळची सात साडेसातची होती. महाराज नुकतेच स्मश्रु करावयास बसले असल्याची मला खबर लागली. कुतूहल म्हणून मी महाराजांचा स्मश्रुविधि पाहावयास गेलों. महाराज एका चांदीच्या चौरंगावर विराजमान् झाले होते. अंगांत उंची रेशमी शर्ट किंवा सदरा होता. तलम सुताचें मोठें करवतकांठी धोतर ते नेसले होते. बोटांत मौल्यवान् खड्यांच्या अंगठ्या झळकत होत्या. चौरंगाच्या बाजूस एक नवा करकरीत लालभडक पुणेरी जोडाहि होता. महाराजांच्या भोंवतीं त्यांच्या शिष्यवृंदांनीं कोंडाळें केलें होतें आणि या कोंडाळयासभोंवतीं साठ सत्तर भक्तांचा–म्हणजे बघ्यांचा–वेढा पडला होता. मीहि त्या गर्दीत सामिल झालों व महाराजांच्या हजामतीची मौज पाहूं लागलों. महाराजांचीच स्मश्रु ती! तेव्हां ती पाहण्यास इतकी गर्दी लोटली नसती तरच नवल! स्मश्रूला लागणारीं सर्व आयुधें एकजात चांदीचीं होतीं. वस्तऱ्याचें पातें व त्याची धार तिखट करण्याकरतां लागणारी सिल्ली व चामड्याचा पट्टा चांदीचा चालण्यासारखा नव्हता ही मोठ्या खेदाची गोष्ट होती! साबणाचीहि तीच गत. बिचारा न्हावी! वस्तऱ्याला पट्टयावर तिखट करून तो वस्तरा महाराजांच्या डोक्यास लावतो न लावतो तोंच भोंवतालच्या शिष्यवरांनीं एकदम मोठ्यानें ओरडावें 'अरे, हळू! जरा संभाळून.' बिचारा नापित! ह्या ओरडण्यानें घाबरून गर्भगळितच होई! व पुढें काय करावें हें सुचेनासें होऊन तो गोंधळून जाई व पांच दहा सेकंदें स्वस्थ राही! पुन्हा वस्तरा लावला कीं पुन्हा कोणातरी हळव्या शिष्याची 'हळू, हळू' म्हणून धमकावणी आलीच! अशा थाटांत सुमारें अर्ध्या-पाऊण तासानंतर महाराजांचा स्मश्रुसमारंभ एकदांचा समाप्त झाला आणि तदनंतर सुगंधी तेलाचें मर्दन-मालिश झाल्यावर महाराज स्नान करण्यासाठीं उठले.

स्नानाचें वर्णन मी विशेष पाल्हाळानें करण्याच्या भानगडींत पडत नाहीं. राजा गोपीचंदाच्या स्नानाचें चित्र बहुधा पुष्कळांच्या अवलोकनांत असेलच. त्यांत आणि महाराजांच्या स्नानविधींत विशेष अंतर नव्हतें.

महाराज एका चौरंगावर विराजमान झाले होते, एका कोपऱ्यांत एक भली मोठी कढई ऊन्ह पाण्यानें भरलेली होती आणि स्त्री–पुरुष भक्तगण महाराजांच्या डोक्यावर घागरीवर घागरी आणून ओतीत होते. कोणी महाराजांचें अंग चोळीत होते, कोणी पाय चोळीत होते तर कोणी डोकें चोळीत होते. एकंदर देखावा नयनमनोहर व प्रेक्षणीय (?) होता!

स्नानविधि आटोपला. तीर्थग्रहण झालें. महाराज उंची पितांबर नेसले. शिष्यांकरवीं त्यांच्या अंगांत उंची रेशमीं शर्ट (सदरा) चढविला गेला आणि चांदीच्या खडावा पायांत चटकवीत महाराज पूजेस येऊन बसले. पूजा यथासांग झाली. पूजेचा व विशेषतः शेवटचा आरतीचा थाट अपूर्व होता. दोनशें अडीचशें लोकांनीं सामुदायिकरीत्या उंच सुरांत म्हटलेल्या त्या आरत्यांनीं व त्या मंत्रपुष्पानें सारें वातावरण दुमदुमून गेलें.

पूजा आटोपली आणि प्रसादाची वेळ आली. पाट रांगोळ्या मांडून तयार होत्या. मंडळी जमूं लागली. जमलेली मंडळी आपापल्या दर्जा-प्रमाणें जागा अडवूं लागली. आम्हीहि कोठें बसावें या विचारांत घुटमळत होतों. इतक्यांत एका शिष्यवरानें आमचीं पानें एका बाजूस निराळीं मांडलीं असल्याचें आम्हांस सांगितलें. मी आश्चर्यचकितच झालों! आम्ही सारस्वत–शेणवी–म्हणून इतर श्रेष्ठ (?) ब्राह्मणांच्या पंक्तीपासून आमचीं पानें वेगळीं मांडण्यांत आलीं होतीं! संतांच्या दरबारांतील हा 'समभाव' पाहून माझ्या तळपायाची आग मस्तकास गेली! अशा प्रकारें अपमानित प्रसाद ग्रहण करणें माझ्या मनाला मुळींच रुचलें नाहीं. रागाच्या भरांतच दत्तोपंतांस कळवून मी परत मुक्कामावर आलों. दत्तोपंतांस माझी ही वागणुक आवडली नाहीं. त्यांनीं मला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्या पोकळ प्रयत्नानें माझें मन वळलें नाहीं. ह्या अन्यायाचा प्रतिकार करणें हेंच मला इष्ट वाटलें. प्रतिकाराचा एवढा एकच मार्ग मला उपलब्ध होता. दत्तोपंतांच्या पत्नीनें मला दूध पोहे दिले. पंचपक्वान्नांच्या–नारायण महारा-

जांच्या–प्रसादापेक्षां ते शतपटीनें गोड व रुचकर होते. माझ्या पत्नीलाहि मी प्रसादाला जाऊं दिलें नाहीं हें सांगणें नलगे.

भोजनोत्तर महाराज मऊ मऊ गाद्या घातलेल्या छप्परपलंगावर वामकुक्षी करते झाले. वामकुक्षी चार साडेचार पावेतों झाली आणि नंतर महाराजांच्या दर्शन समारंभाला सुरवात झाली. स्त्री–पुरुष–मुलें यांची दर्शनाकरतां तोबागर्दी उडाली होती. महाराज पलंगावरच आडवे पहुडले होते आणि दर्शनोत्सुक भक्तगण हार, श्रीफळ, मिठाई, फळफळावळ घेऊन महाराजांच्या दर्शनास दाटीवाटीनें एकामागून एक व क्वचित् इतरांना रेटीत गर्दींतून मार्ग काढून जात होते. स्त्रियांना अर्थातच अग्रपूजेचा मान मिळत होता हें निराळें सांगणें नकोच.

संध्याकाळीं साडेसात आठ वाजतां भजनाचा कार्यक्रम होता. दत्तोपंतांच्या आग्रहाखातर मीहि त्यांच्याबरोबर गेलों. भजनास अलोट जनसमुदाय लोटला होता. भजन चालू झालें. महाराजांचा पत्ता नव्हता. शिष्यगणच भजन करीत होता. सुमारें अर्ध्या–पाऊण तासानंतर महाराजांची स्वारी आली. गालिच्यावर लोडाशीं टेकून बसली. भजन चालूच होतें. महाराजांनीं भजन म्हणण्यांत भाग घेतला नाहीं. ते फक्त आमच्यासारखेंच श्रोत्याचें काम करीत होते. सुरू झाल्यापासून तासभराच्या आंत भजन आटोपलें. जमलेली मंडळी महाराजांच्या पायांवर डोकें ठेवून आपापल्या घरीं जावयास निघाली. इतक्यांत बैठकीबाहेर कोपऱ्यांत बसलेला एक अस्पृश्य म्हातारा दोन पैशांचा हार आणि एक लहानसा नारळ घेऊन महाराजांचें दर्शन घेण्याकरतां बैठकीवर येऊं लागला, आणि...अरे बाप रे! त्याला महाराजांचे रोखानें येत असलेला पाहतांच महाराजांचा शिष्यगण एकदम खवळला! कांहीं शिष्य खेकसून त्या गरीबाच्या अंगावर धांवले व दोन चार अभद्र शिव्या हांसडून त्याला त्यांनीं तेथेंच अडविलें! अस्पृश्यानें स्वहस्तें महाराजांना हार घालणें म्हणजे केवढें धार्ष्ट्य! केवढा अधर्म!! केवढें महत्पाप!!! केवढें अब्रह्मण्य!!! महाराजांना विटाळ व्हावयाचा! त्यांचें सर्व पावित्र्यच जणूं

नष्ट व्हावयाचें ! विचाऱ्यानें अत्यंत काकुळतीनें महाराजांच्या दर्शनाची व त्यांच्या पायांवर डोकें ठेवण्याची आपली अनिवार इच्छा त्या शिष्यवरांना निवेदन केली; परंतु त्याला कुत्र्यासारखें झिडकारण्यांत येऊन त्याच्या हातांतील हार व नारळ हिसकण्यांत आला व ' तुझ्या वतीनें तो आम्ही महाराजांस घालतों ' असें त्याला सांगण्यांत आलें ! बिचाऱ्याची घोर निराशा झाली ! त्याच्या सर्व सद्भावनांची राख रांगोळी झाली ! त्याचे डोळे पाण्यानें डबडबून आले, परंतु त्या शिष्यशत्रुवांना त्याची तिळमात्रहि दया आली नाहीं ! महाराज बैठकीवरच बसलेले होते व हा सर्व प्रकार ते उघड्या डोळ्यांनीं पाहात होते परंतु अत्यंत खेदाची व शरमेची गोष्ट ही कीं त्यांनीं एका शब्दानें देखील आपल्या शिष्यांस त्यांच्या ह्या अमानुष अत्याचारापासून परावृत्त केलें नाहीं ! धन्य ते महाराज ! आणि त्याहून धन्य त्यांचा शिष्यगण !!

हें सर्व दृश्य पाहून माझ्या अंगाचा तिळपापड झाला. माझें हृदय पिळवटून निघालें व अशा सत्पुरुषाचे ठायीं आदर आणि सद्भाव उत्पन्न होण्याऐवजीं तिरस्कार मात्र उत्पन्न झाला !

सर्वांभूतीं समभाव, देहाविषयीं अनासक्ति आणि दीन दुबळ्यांविषयीं कळवळा व आत्मीयता ह्या तुकोबारायांनीं वर्णिलेल्या संतांच्या गुणांपैकीं एकाहि गुणाचा अंश मला त्या बारा चौदा तासांत महाराजांच्या ठायीं आढळला नाहीं. दिवसभराच्या एकूण घटनांवर विचार करीत करीत खिन्न मनानें मी घरीं परतलों !

## सॉव्हरिन्स : ५१ :

' दानं भोगो नाशः तिस्रो गतयः भवंति वित्तस्य
यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीयाः गतिर्भवति । '

मनुष्य सारी धडपड करतो ती पैसा मिळविण्यासाठीं, सुखानें जगण्यासाठीं. पैशानें सुख मिळतें हें कांहीं अंशीं सत्य आहे. पैशानें अनेक

अडचणी दूर करतां येतील पण पैशानें समाधान मिळेलच असें मात्र नाहीं. पैसा हें आयुष्याचें साध्य नसून साधन आहे. मिळत असलेल्या पैशाचा योग्य विनियोग आणि समाधानी वृत्ति हाच सुखाचा खरा मूलमंत्र आहे.

कामटीस येऊन मला दोन वर्षें होत आलीं होतीं. मला आतां दरमहा पंचेचाळीस रुपये पगार मिळत होता. या अल्प प्राप्तींतहि मी सुखासमाधानानें माझ्या संसाराचा गाडा हांकीत होतों. मिळणाऱ्या पगारांतून दर महिन्याला निदान पांच सात रुपये तरी मी मागें टाकीत असें. त्यावेळीं सॉव्हरिन्चें नाणें प्रचारांत होतें. शिलकेंत पंधरा रुपये सांचले कीं त्यांचा एक सॉव्हरिन् खरेदी करावा असा आमचा परिपाठ होता. अशा प्रकारें जवळ जवळ चौदा पंधरा सॉव्हरिन्स आमच्यापाशीं जमले होते. कृपणाला आपल्या धनराशीकडे पाहण्यांत समाधान असतें तसें हे सॉव्हरिन्स पाहिले कीं आम्हालाहि—कृपणाप्रमाणें नव्हे परंतु—आमच्या मितव्ययाचें समाधान खास होत असे. हीच रकम सेव्हिंग बॅन्केंत ठेवली असती तर वर्षाकांठीं दोन तीन रुपयांनीं तरी ती वाढली असती खरी, परंतु सुवर्णाचा लोभ कांहीं और असतो !

याच सुमारास आमच्या काकांनीं वऱ्हाणपूरची बोहरा हॉस्पिटल्ची नोकरी सोडली व तेथेंच खानगी दवाखाना काढला. नवीन दवाखाना उघडावयाचा म्हणजे पैशाची गरज ही लागणारच. वास्तविक माझ्या मानानें काकांची प्राप्ती त्यावेळीं चांगली होती परंतु त्यांजकडे दवाखान्यास लागणारें भांडवल पुरेसें नव्हतें हें खरें. माझ्या वडिलांकडून पैसे मागविण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्याला तशीं कारणेंहि होतीं. साहजिकच त्यांनीं मजकडे पैशाची मागणी केली. माझें उत्पन्न त्यांच्या प्राप्तीच्या मानानें फारच कमी होतें अशा स्थितींत मजजवळ पैसे शिल्लक असणें संभवनीय नव्हतें हें त्यांना माहीत नव्हतें असें नाहीं. परंतु त्याबरोबरच माझें जें कांहीं मूल्यमापन त्यांनीं आपल्या मनाशीं केलें होतें त्यावरून मजकडून पैसे निश्चित मिळतील असा त्यांना भरंवसा वाटत असावा. त्यांचें पत्र येतांच काय करावें या

पेचांत मी पडलों. काकांचें पत्र पत्नीला दाखविलें. ‘ आपल्याकडे पैसे कोठें आहेत ? ’ पत्नीनें सरळ प्रश्न केला. मी म्हटलें ‘ पंधरा सॉव्हरिन्स तुमच्याकडे आहेत ना ? त्यांनीं त्यांची थोडीबहुत तरी गरज भागूं शकेल. ’ मोठ्या कष्टानें–पोटास चिमटा घेऊन व इतर सुखांवर पाणी सोडून–जमविलेलें सोनें अशा रीतीनें हातचें घालविण्याची कल्पना माझ्या पत्नीस पसंत पडेना. ‘ सॉव्हरिन्स पुन्हा जमवितां येतील परंतु यावेळीं आपण काकांस मदत केली नाहीं–नकार दिला–तर तो मात्र आपल्या जन्मास पुरेल ’ असा मुद्दा मी पुढें मांडला. ‘ तुम्हाला काय करावयाचें असेल तें करा.’ तिनें फणकाऱ्यानेंच उत्तर दिलें व रागारागानेंच सॉव्हरिन्सची डबी मजपुढें आणून टाकली. मी निमूट्यानें डबी उचलली, पोस्टांत गेलों आणि इन्शुअर्ड पार्सलनें सॉव्हरिन्स ब्ऱ्हाणपुरास रवाना केले. सॉव्हरिन्स गेले पण पुढें दोन तीन दिवस आमचा दोघांचा अबोला मात्र राहिला !

रुसवा दोन दिवसांनीं विरून गेला परंतु वेळीं काकांच्या उपयोगीं पडल्याचें समाधान मात्र अजूनहि आमच्या दोघांच्या मनाला प्रसन्नता आणतें !

## उन्ह-पाऊस : ५२ :

> ‘ सारें जग आशेवर जगत आहे. आशा जगाचा प्राण आहे. उद्यांची आशा ठेवून मनुष्य आजचें दुःख सहन करीत असतो. ’ –साने गुरुजी ( रामाचा शेला )

माझ्या नोकरीला आतां तिसरें वर्ष चालू होतें. कामटीस आल्यावर मी पुन्हा लंडन चेंबर ऑफ कॉमर्सच्या परीक्षेस बसून मे १९१० मध्यें तींत उत्तीर्णहि झालों होतों. मुंबईस जाण्याचें माझें ध्येय आतां पूर्णपणें साध्य झालें होतें. पब्लिक् वर्क्स डिपार्टमेन्टमध्यें मी नोकरीस होतों हें मागें आलेंच आहे. या नोकरींत शिरतांना खात्याच्या मुख्य अधिकाऱ्याजवळ प्रगट केलेली पी. डब्ल्यू. डी. चा आकाउन्टन्ट होण्याची माझी महत्वाकांक्षा सफल

होण्याची संधि आतां आली होती. त्या दृष्टीनें ऑफिसमधील एकूण एक शाखांतील कामांची माहिती मी परिश्रमपूर्वक आत्मसात् करून घेतली होती. अधिकारी वर्ग माझ्या कामावर सर्वतोपरी खुष होता. अकाउन्टन्टची जागा मिळण्यासाठीं खात्यातर्फे घेतली जाणारी रिझर्व्ह अकाउन्ट्स क्लार्कची परीक्षा द्यावी लागे. परंतु लंडन् चेंबर ऑफ कॉमर्सची 'बुक्-कीपिंग व अकाउन्टन्सीची परीक्षा पास असलेल्यांना पी. डब्ल्यू. डी. मॅन्युअल्प्रमाणें या परीक्षेची माफी मिळत असे. मध्यवर्ती सरकारकडे अर्ज केला म्हणजे ह्या परीक्षेच्या माफीचा दाखला मिळे. दाखला मिळाल्यापासून सहा महिने उमेदवारी करावी लागे व नंतर अकाउन्टन्टची जागा मिळत असे. माझी लंडन् चेंबर ऑफ कॉमर्सची परीक्षा पास होतांच या माफीसाठीं मी अर्ज केला आणि वरिष्ठाच्या अत्युत्तम शिफारशीसह तो तारीख ११ आक्टोबर १९१० रोजीं पुढें रवाना झाला. सुदैवानें थोड्याच दिवसांत परीक्षेच्या माफीचा दाखलाहि मला मिळाला. माझा आनंद त्रिभुवनांत मावेना. माझी महत्वाकांक्षा सफल झाली. मी कृतकृत्य झालों. हातीं घेतलेल्या कामीं इतकें त्वरित यश आलेलें पाहून मला धन्यता वाटली. माझे अधिकारी व बरोबरीचा कारकूनवर्ग या सर्वांनाच आनंद झाला. सर्वांनीं माझें हार्दिक अभिनंदन केलें. या आनंदाप्रीत्यर्थ कारकून बंधूंनीं मजकडे मिठाईची मागणी केली आणि मीहि अत्यंत आनंदानें लागलीच ती पूर्ण केली. सर्वांचीं तोंडें गोड झालीं. सर्वांनीं मला शुभाशिर्वाद दिले.

तथापि ओठांशीं आलेलें पोटांत जाईतों अनेक विघ्नें मध्यें येतात! दुर्दैव म्हणून कांहीं असतेंच ना? तें तर आमच्या पांचवीस पुजलेलें! 'आपण प्रयत्न करतों, धडपडतों परंतु कांहीं अज्ञात शक्ति आपल्यास कोठें तरी भलतीकडेच ओढून नेत असतात!' 'मानवी जीवन म्हणजे आपले प्रयत्न व या अज्ञात शक्ति यांच्यांतील संघर्षाचें फलित होय. आपल्या विजयांतच आपण बेहोप असतों, परंतु अकस्मात् प्रचंड वारे येतात आणि आपलें सर्व यश धुळीस मिळवितात!' माझेंहि असेंच झालें. परीक्षेची माफी मिळाल्याच्या

आनंदांत मी अगदीं चूर होतों. पुढील भव्य मनोरे रचीत होतों, इतक्यांत मध्यवर्ति सरकारकडून कांहींएक कारण न दर्शवितां मला दिलेली परीक्षेच्या माफीची सवलत काढून घेतल्याचें पत्र आलें ! ह्या पत्रानें मजवर वज्राघात झाला ! मी हतबुद्ध होऊन गेलों. माझे सर्व मनोरथ धुळीस मिळाले-रसातळास गेले ! मन विषण्ण झालें. कांहीं काम सुचेना, कशांतच मन लागेना. डोकें संतापानें भणाणून गेलें. रागाच्या आणि उद्वेगाच्या भरांत राजीनामा देऊन तात्काल सेवामुक्त होण्याचे विचारहि डोक्यांत थैमान घालूं लागले. परंतु असा अविचार न करण्याविषयीं हितचिंतकांनीं सल्ला दिल्यावरून तो बेत मी रहित केला. हिंदुस्तान सरकारच्या ह्या लहरी व अन्याय्य हुकमाविरुद्ध मी पुष्कळ झगडलों; परंतु पहिला हुकुम रद्द करण्याचें कांहींहि कारण न दाखवितां 'नवीन हुकूमच कायम ठेवण्यांत येत आहे, त्यांत कांहीं बदल करतां येत नाहीं,' असें बेजबाबदार उत्तर मला मिळालें ! पी. डब्ल्यू. डी. चा अकाउन्टन्ट होण्याचें माझें स्वप्न अशा प्रकारें हवेंत विरून गेलें !!

## सत्य-असत्याचा संघर्ष : ५३ :

'सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्नब्रूयात्सत्यमप्रियम्
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ।'

—महाभारत.

पी. डब्ल्यू. डी. चा अकाउन्टन्ट होण्याच्या माझ्या महत्वाकांक्षेला खो बसल्याकारणानें त्या नोकरीवरून माझें मन उडालें होतें. परीक्षेची माफी मिळण्याचा माझा हक्क असतां डिपार्टमेन्टच्या परीक्षेस बसणें मी मानहानीचें समजत होतों आणि तेवढ्याचसाठीं त्या परीक्षेस बसावयास मी तयार नव्हतों. इरिगेशन् ऑफिसमध्यें केवळ कारकून म्हणून काम करण्यांत आतां माझ्या दृष्टीनें कांहीं राम नव्हता आणि म्हणून जी विद्या आपण संपादन केली तिचा उपयोग होईल अशा ठिकाणीं नोकरी मिळविण्याच्या उद्योगाला मी लागलों.

दैनिक स्टेटसमन्, पायोनिअर, टाइम्स ऑफ इंडिया ह्या पत्रांचे रकाने रोज चाळावे, ' पाहिजेत ' च्या जाहिराती धुंडाळाव्या आणि त्यांत आपल्या योग्य जागा आहे असें आढळल्यास अर्ज धाडावे असा सपाटा मी लावला होता. नागपूरच्या सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस् क्लबची एक जाहिरात एके दिवशीं माझ्या अवलोकनांत आली आणि मी त्या जागेकरतां अर्ज पाठविला. थोडेच दिवसांत त्या क्लबच्या चिटणीसाकडून भेटावयास येण्याबद्दल मला पत्र आलें. क्लबचे चिटणीस अलाहाबाद बँकेच्या नागपूर शाखेचे एजन्ट होते. मी त्यांना भेटलों. औपचारिक प्रश्नोत्तरांनंतर त्यांनीं हिशेबी ज्ञानासंबंधी माझी प्रत्यक्ष चांचणी घ्यावयास प्रारंभ केला. त्या विषयांतील बरेचसे अवघड व गुंतागुंतीचे प्रश्न त्यांनीं मला विचारले व मी माझ्या बुद्धीप्रमाणें त्यांचीं समर्पक उत्तरेंहि दिलीं. चार दिवसांनीं निकाल कळवितों असें सांगून त्यांनीं मला निरोप दिला.

सुमारें दहा बारा दिवसांनीं सी. पी. क्लबच्या चिटणीसाकडून मला तार आली. तींत दरमहा साठ रुपयांवर माझी नेमणूक केली असून मी ताबडतोब कामावर रुजू व्हावें असें लिहिलें होतें. तार पाहून मला आनंद होणें स्वाभाविक होतें. परंतु ह्या जागेवर तात्काल रुजू होण्याच्या मार्गांत एक मोठी अडचण होती. मी सरकारी कचेरींत नोकर होतों. नियमाप्रमाणें एक महिन्याची नोटीस दिल्याशिवाय ती जागा मला सोडतां येत नव्हती व तसें करणें योग्यहि नव्हतें. नवीन जागेवर ताबडतोब रुजू होणें तर आवश्यक होतें. हीं दोन्ही कशीं साधणार? शेवटीं सी. पी. क्लबच्या चिटणीसांस मी तारेनें कळविलें कीं ' मी जागा पत्करावयास तयार आहे परंतु ताबडतोब कामावर रुजू होणें मात्र मला शक्य नाहीं, कारण माझ्या सध्याच्या मालकांना मला एक महिन्याची नोटीस द्यावी लागेल, तेव्हां एक महिना पावेतों आपण थांबावयास तयार असल्यास मजला तसें तारेनें कळवावें म्हणजे मी राजीनामा देण्याची व्यवस्था करीन. ' त्यांना माझी अडचण सयुक्तिक वाटली व त्यांनीं एक महिना थांबण्याचें कबूल केलें.

मी राजीनामा देणार, इतक्यांत सुरक्षिततेच्या दृष्टीनें एक कल्पना मला सुचली. इरिगेशन ऑफिसचा एकदम राजीनामा देण्यापेक्षां नव्या जागेवर जाऊन एक महिना नवीन कामाचा अनुभव घ्यावा आणि काम आपल्या आटोक्यांतील आहे असें दिसतांच इरिगेशन ऑफिसमधील जागेचा, एक महिन्याची नोटीस देऊन, राजीनामा द्यावा. परंतु यदाकदाचित् नवीन काम आपल्या आटोक्यांतील नाहीं असें आढळलें तर ककूला एक महिन्याची नोटिस देऊन पुन्हा आपल्या पहिल्या जागेवर दाखल व्हावें म्हणजे कोणत्याहि प्रकारें आपलें नुकसान होणार नाहीं. दोन अडीच महिन्यांची माझी हक्काची रजा शिल्लकहि होती. वरील विचार पक्का होतांच दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेसाठीं मी अर्ज दिला. आपल्या ऑफिसांतील माझ्यासारखा एक उपयुक्त कारकून हातचा दवडण्याची आमच्या अकाउन्टन्टची इच्छा नव्हती म्हणून मला रजा देण्याच्या कामीं निरनिराळ्या सबबींवर त्यांनीं अडथळे आणिले, त्यामुळें आमच्या वरिष्ठानें मी मागितलेली रजा नामंजूर केली. हें एक नवीनच विघ्न उभें राहिलें ! काय करावें कांहीं सुचेना. ह्या अडचणींतून तांतडीनें मार्ग काढणें अगत्याचें होतें. शेवटीं आमच्या वरिष्ठाला ( एक्झिक्यूटिव्ह एन्जिनियरला परभारें भेटण्याचें ठरवून दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी त्यांच्या बंगल्यावर पोंचलों. साहेब बंगल्यावर बहुधा कोणा कारकुनाची भेट घेत नसत आणि म्हणून आपल्यालाहि निराशेनें परत यावें लागेल अशी मनांत धाकधुक होतीच. परंतु यावेळीं दैव जोरावर होतें. वर्दी जातांच साहेबांनीं मला बोलाविलें व बंगल्यावर येण्याचें कारण विचारलें. ' मी दोन महिन्यांची हक्काची रजा मागितली ती नामंजूर करण्यांत आली, तो संबंधांत आपल्याशीं मला थोडें बोलावयाचें आहे ' असें मी त्यांना सांगितलें. ' दोन महिन्यांची इतकी मोठी रजा कशाला पाहिजे ? ' साहेबांनीं प्रश्न केला. अर्जांत ' खानगी कामाकरतां ' एवढेंच मी लिहिलें होतें. कांहीं देखील न लपवितां मी माझा बेत साहेबांना सांगितला. ते म्हणाले ' मग तूं आतांहि जाऊं शकतोस. मी तुला आज जावयास परवानगी देतों. त्याला दोन

महिन्यांच्या रजेची काय आवश्यकता आहे ? दोन महिन्याची रजा मागण्यांतला माझा हेतु मी साहेबांना अधिक स्पष्ट करून सांगितला तेव्हां ते म्हणाले 'हें होणें शक्य नाहीं. तुला इथली नोकरी सोडून जावयाचें असल्यास तूं खुशाल जा, परंतु मग पुन्हा तुला या नोकरीवर परत येतां येणार नाहीं.' मी थोडा वेळ विचारांत पडलों आणि नंतर म्हटलें 'साहेब, माफी असावी, पण खरें बोलण्याबद्दलची ही शिक्षा आहे ?' साहेबांनीं विचारलें 'तें कसें ?' मी म्हटलें 'मी आपल्यास खरी खरी परिस्थिति सांगितली ही माझी चूक झाली. ती न सांगतां दुसरें कांहीं तरी लटकेंच कारण सांगून मी एक महिन्याचीच रजा मागितली असती म्हणजे ती आपण खुशीनें दिली असती, आणि ही सुटी संपण्याच्या सुमारास मी आपणास एक तार ठोकून दुसऱ्या कोणत्याहि खोट्या सबबीवर रजावाढीची मागणी केली असती तर त्यालाहि आपण विनतक्रार मंजूरी दिली असती. आतांपावेतों अनेकांच्या रजा आपण अशा वाढविल्या आहेत हें आपल्या स्मरणांत असेलच. मी आपणांस प्रारंभींच खरी परिस्थिती सांगितली त्याचें प्रायश्चित्त मला रजा न मिळण्यांत होत आहे ! हा अन्याय आहे असें आपल्यास वाटत नाहीं का ?' साहेबांना माझें म्हणणें तात्काळ पटलें. टेबलावर जोरानें मूठ आपटून ते म्हणाले 'Yes babu, I know I have been fooled like that many a times before Have you brought your application ?' मी लागलीच रजेचा अर्ज पुढें केला. साहेबांनीं दोन महिन्यांची रजा तात्काल मंजूर केली आणि तारीख १ ऑक्टोबर १९१२ रोजीं मी नागपुरास माझ्या नव्या जागेवर रुजूहि झालों. विजय सत्याचा कीं माझ्या धाडसाचा झाला कोण जाणे !!

* * *

> 'पहिला एकच प्याला—मग तो कोणत्या का निमित्तानें असेना—ज्यानें एकदां घेतला तो दारूचा कायमचा गुलाम झाला! दारूची सवय सुटण्याचा काळ ती लागण्यापूर्वींचाच काय तो असतो.' —गडकरी.

नागपूरला येऊन माझ्या नवीन कामाचा चार्ज घेतल्याला थोडेच दिवस झाले होते. कामाचा जम चांगला बसत चालला होता. क्लबच्या हिशेबाचा, फार निकड असलेला, आढावा मी गेल्यानंतर थोड्याच दिवसांत तयार करून दिला आणि मुंबईच्या ए. एफ. फर्ग्युसन् आणि कंपनीसारख्या प्रख्यात हिशेब तपासनीसांनी तो जशाचा तसा पास केला, ह्यामुळें क्लबचे चिटणीस माझ्या कामावर खुश होते. काम आपल्या आटोक्यांतलें आहे हें दिसतांच मी इरिगेशन् ऑफिसचा राजीनामा वेळेवर पाठवून दिला, आणि इरिगेशन् ऑफिसचा व कामटीचा माझा संबंध कायमचा तुटला.

क्लबच्या कचेरींत आम्ही दोनच कारकून. मी हेडक्लार्क व अकाउन्टन्ट आणि दुसरा माझा मदतनीस (असिस्टन्ट). ऑफिसच्या वेळा एका पंधरावड्यास सकाळीं साडेदहा ते पांच व दुसऱ्या पंधरावड्यास दुपारीं अडीच ते रात्रीं साडेआठ अशा असत. सी. पी. क्लब् हा तेथील सिव्हिल् व मिलिटरी (मुल्की व लष्करी) इंग्रज अधिकाऱ्यांचा क्लब् असल्यानें उत्तमातल्या उत्तम अशा सर्व सुखसोईंनीं सज्ज होता. दारूबंदीचें वेड त्यावेळीं नसल्यानें क्लबचें तळघर उंची उंची मद्यांनीं खचून भरलेलें असे आणि त्यांचा खपहि अजस्र असे. नागपूरला उन्हाळा अतिशय कडक. मीं सिताबर्डीवर राहात होतों आणि माझें ऑफिस तेथून जवळ जवळ तीन साडेतीन मैल दूर तेलनखेडी टेकड वर होतें. लॉटरींत एक रुपयाला मिळालेली सायकल यावेळीं मजजवळ होती त्यामुळें ऑफिसचें हें अंतर मला विशेष जाणवत नसे. परंतु ऐन दोनप्रहरीं दोन वाजतां नागपूरच्या कडक व रखरखीत उन्हांत सायकलवरून तेलनखेडीस जाणें म्हणजे भयंकर शिक्षा असे. क्लबला पोंचेपावेतों जीव

अगदीं घामाघुम आणि कासाविस होऊन जाई. हुश्श हुश्श करीत तास अर्धा तास खुर्चीत बसून पंख्याखालीं विश्रांति घेतली म्हणजे मग कोठें थोडें बरें वाटे.

एके दिवशीं मी असाच उन्हांतून थकून भागून आलों होतों व खुर्चीवर रेलून पंख्याचा वारा खात बसलों होतों. उन्हाची झळ लागल्यानें डोकें बरेंच चढलें होतें व भयंकर दुखूं लागलें होतें म्हणून मी डोकें दाबून धरलें होतें. इतक्यांत क्लबचा बारमन् ( क्लबच्या सभासदांस मद्याचे पेले भरून देणारा नोकर ) कांहीं कामानिमित्त तेथें आला. बारमन् पंजाबी मुसलमान होता. शरीरानें धिप्पाड, उंचीला सहा फूट, रुबाबदार दाढीमिशा, स्वभावानें दिलदार व मिठास जबान असलेली अशी ही व्यक्ति होती. मला डोकें दाबून बसलेला पाहून बारमननें 'क्यों बाबूजी, आप आज ऐसे कैसे बैठे हैं ?' असा मला सवाल केला. माझें डोकें विलक्षण दुखत असल्याचें मी त्याला सांगितलें. 'साब, फिर मुझे क्यों नही बोले ? मेरेपास सिरदर्दकी अक्सीर दवा है. अभी लाता हूं.' असें म्हणून तो लागलीच गेला आणि तीन चार मिनिटांत व्हिस्कीचा एक हाफ् पेग्, थंडगार सोड्याची बाटली व एक ग्लास घेऊन तातडीनें आला. पेग् माझ्या टेबलावर ठेवून तो मला म्हणाला 'बाबूजी यह दवा लो, आपका सिरदर्द दो मिनट में भाग जावेगा.' मद्याला मी आजपावेतों स्पर्श केला नव्हता. मला तसा कधीं प्रसंगहि आला नव्हता. तथाकथित सभ्य ( civilized society ) समाजाचा मला संपर्कहि नव्हता. अशा प्रकारचें सामाजिक जीवन ( social life ) मला अजून-पावेतों माहीतच नव्हतें. माझे परिचित असे जे थोडेबहुत स्नेहीसोबती होते ते अगदींच सोवळ्या पंथांतले. ह्यामुळें दारूपासून मी फार दूर होतों. बारमननें आणलेला तो पेग् पाहतांच माझें डोकें उतरण्याऐवजीं अधिकच चढलें. मी बारमनला म्हटलें 'बारमन्, तुम क्या मुझे बच्चा समजते हो ? मैं शराब को छीता नहीं. ले जाव यह चीज मेरे सामनेसे. और याद रक्खो आइंदा ऐसी चीज मेरे सामने कभी लाना नहीं.' बिचारा बारमन् माझ्या

या शब्दांनीं सर्दच झाला. शरमिंदा होऊन तो म्हणाला 'साहब, मुझे माफ करो. लेकिन आपके पहिले के बाबू तो कई बोतलें मेरेसे ले जाया करते थे.' मी म्हणालों 'ले जाते होंगे, लेकिन् मेरेसे फिर कभीभी ऐसी बात करना नहीं.' बारमन्नें ओळखलें कीं आपली डाळ येथें शिजणार नाहीं. सुरलोकांत राहून सुरेशीं वैर करणारा हा प्राणी विलक्षण असला पाहिजे अशी त्याची खात्री झाली. त्यानें एक मोठा आदबशीर सलाम केला व खिन्न मनानें पेग परत नेला.

व्हिस्कीच्या त्या अर्ध्या पेगचा त्या दिवशीं मी स्वीकार केला असता तर न जाणों पुढील तीन वर्षांच्या कालांत किती पेग माझ्या घशाखालीं उतरले असते आणि मी कुठल्या कुठें वाहवलों असतों ! त्या दिवशींचा तो एकच प्याला सर्वस्वी माझ्या अधःपाताला कदाचित् कारण झाला असता ! परंतु सुदैवानें तसें व्हावयाचें नव्हतें म्हणूनच मी बचावलों व दारूच्या महासागरांत तीन वर्षें काढूनहि कोरडाच्या कोरडाच राहिलों !

## A LIE. : ५५ :

> ' ज्याला स्वाभिमान आहे तो मरण पत्करतो पण दीनबाणी
> स्थिति पत्करत नाहीं. अग्नि विझून जातो पण थंड कधीं
> होत नाहीं. '
> —हितोपदेश.

सी. पी. क्लबमध्यें काम करावयास लागून मला वर्ष दीड वर्ष झालें होतें. कामासंबंधी तक्रार करावयास क्लबच्या चिटणीसांस यत्किंचित्‌हि जागा नव्हती. क्लबच्या मॅनेजिंग कमिटीची बैठक महिन्यांतून एक वेळ भरत असे व तिजपुढें बैठकीच्या दिवसापावेतोंचें आयव्ययपत्रक व देण्याघेण्याचा तक्ता चिटणीस सादर करीत असे. ह्या पत्रकांची पूर्वतयारी अर्थातच मला करावी लागे आणि ती करावयास निदान दोन दिवसांचा तरी अवधि लागत असे.

आमचे चिटणीस टेनिसचे विशेष षोकी होते. संध्याकाळीं पांचच्या सुमारास ते बॅन्केंतून येत व रॅकेट घेऊन सरळ कोर्टावर जात. जर मला कांहीं विशेष सूचना करावयाच्या असल्या तर त्या ते खेळावयास जातांनाच करीत. एके दिवशीं संध्याकाळीं साहेब आले, त्यांनीं आपली रॅकेट उचलली व जातां जातां अमुक दिवशीं मॅनेजिंग कमिटीची बैठक बोलावण्याची नोटिस लिहून तयार ठेवण्याविषयीं मला सांगितलें. खेळून येतांच ते सरळ बारवर गेले. लिहून तयार ठेवलेली नोटिस त्यांच्या सहीकरतां चपराशाबरोबर मी त्यांजकडे पाठविली कमिटीच्या कांहीं सभासदांना चिटणीसांनीं ठरविलेला बैठकीचा दिवस सोईचा नसावा म्हणून बैठक चार सहा दिवस पुढें ढकलावी असा त्या सर्वांचा विचार ठरला असावा. आमच्या चिटणीसांनीं ती नोटिस सही न करतां तशीच परत पाठविली व असा निरोपहि पाठविला कीं थोड्या वेळानें ते स्वतः येऊन पुढील तारीख सांगतील. परत आलेली नोटिस मी माझ्या पॅड-खालीं ठेवून दिली. साहेब थोड्या वेळानें आले, आपल्या टेबलावर काम करावयास बसले परंतु मीटिंगसंबंधानें मला एक अक्षर देखील बोलले नाहींत. या बाबतींत मी होऊन त्यांना विचारण्याचें मला कांहीं कारण नव्हतें. ह्या गोष्टीला पांच सहा दिवस होऊन गेले आणि एके दिवशीं संध्याकाळीं खेळून येतांच साहेबांनीं 'Babu, are all the papers ready ?' म्हणून मला प्रश्न केला. 'What papers Sir ?' मी विचारलें. 'Meeting papers' साहेब उत्तरले. 'No Sir' मी म्हटलें. यावर साहेब गुरगुरले 'Why not ? Don't you know that the meeting was to be held today ?' मी म्हटलें 'No Sir. You never told me so, nor was the notice sent round.' यावर साहेब अधिकच गरम होऊन म्हणाले 'Babu, how do you say that ?' 'Because you never told me that.' मी उत्तर दिलें. साहेब लागलीच गरजले 'I did tell you Babu. You are telling a lie.' साहेबांनीं हे शब्द उच्चारतांच माझ्या मस्तकांत विजेचा झटका बसल्यासारखें झालें ! मी

संतापानें लाल झालों. माझे डोळे गरगर फिरूं लागले. शरीराला कंप सुटला. साहेबानें खोटेपणाचा मजवर केलेला आरोप मला मुळींच सहन झाला नाहीं. संतापाच्या भरांतच मी म्हटलें 'It is the other way, sir. But since you think that I am a liar, I am not fit to remain here, any longer. Here are your books. I don't want to serve you any more,' असें म्हणूनच मी थांबलों नाहीं तर माझ्या ताब्यांत असलेलीं कॅशबुक, लेजर्स वगैरे हिशेबाचीं सर्व जाडीं जाडीं पुस्तकें मी साहेबाच्या टेबलावर जोरानें फेकलीं व टोपी घालून मी जावयास निघालों. माझा हा आवेश पाहून मात्र साहेब चपापले आणि सूर खालीं उतरून मला म्हणाले 'But Babu, can you not prepare the statements now ?' मी म्हटलें 'No, not, until and unless you take your words back.' साहेबांच्या मनांतील किल्मिष अजूनहि पूर्णपणें निघालें नव्हतें. हा सर्व देखावा विस्मयानें पाहात क्लबचा युरेजिअन् स्टयुअर्ड आणि चपराशी समोरच उभे होते. साहेबांनीं चपराशाला विचारलें 'हमने तुमको बाबूको देनेके लिये नोटिस दिया था ?' 'जी साहब' चपरासी उत्तरला. 'मीटिंग आज होगा ऐसा तुमने बाबूसे कहाथा ?' साहेबांनीं विचारलें. 'नहीं साब.' चपरासी म्हणाला. 'क्यों नहीं बोला ?' साहेब दरडावले. 'आपने तारीख के बारे में मुझसे कुछ नहीं कहाथा. आप खुद बांबूसे बोलेंगे ऐसा आपने फरमाया था' चपराशानें उत्तर दिलें. चपराशाचे हे शब्द कानीं पडतांच साहेब अगदीं गार झाले! त्यांचा चेहरा तात्काल उतरला! ते वरमले व मजकडे वळून म्हणाले 'Babu, I am sorry. I thought I had told you about today's meeting. Any way could you now please prepare the statements ?'

जेवढा धडा शिकवावयाचा तेवढा मी साहेबाला शिकवला होता. याहून अधिक ताणण्यांत मौजहि नव्हती. म्हणून मी म्हटलें 'I shall try but

I can't guarantee.' 'Well, please try.' साहेब बोलले. जे आंकडे तयार करावयास कमींत कमी दोन दिवस लागत ते सर्व आंकडे तासाभरांत करणें जवळ जवळ अशक्य होतें; तथापि मीटिंगचें काम अडणार नाहीं एवढ्यापुरते आंकडे संक्षिप्तांत एका तासाच्या आंत मी साहेबास तयार करून दिले आणि त्या दिवशीची मीटिंग बिन्बोभाट पार पडली. साहेब मात्र माझ्याशीं बोलण्यांत तेव्हांपासून बराच सावधपणा बाळगूं लागले!

## माझे स्नेही : ५६ :

नागपुरास आल्यानंतर पहिले पांच सहा महिने कचेरीच्या वेळीं कचेरीस जावें व इतर फावल्या वेळीं घरापुढील अंगण उघडें पडलें होतें त्याचें बगीच्यांत रूपांतर करावें या कामांत माझा वेळ केव्हां निघून जाई तें मला कळत देखील नसे. या अवधींत निरनिराळ्या व्यवसायांतील अनेक व्यक्तींशीं माझा परिचय होत गेला ज्ञातिबांधवांकडे माझा विशेष ओढा असे हें मागें मी सांगितलेंच आहे. सर्व ज्ञातिबांधवांना महिन्यांतून निदान एक वेळ तरी एकत्र बोलवावें, कांहीं सामाजिक व बौद्धिक गोष्टींची चर्चा करावी, चहा वगैरे घ्यावा असा उपक्रम मी कामटीस आल्यापासून सुरू केला होता. हाच क्रम विस्तृत प्रमाणांत अमलांत आणण्याची संधि मला नागपुरांत प्राप्त झाली. तेथें सारस्वत ब्राह्मणांचीं घरें कामटीच्या मानानें बरींच म्हणजे अजमासें पंधरा-वीस होतीं. ह्या सर्वांचा एकत्र येण्याचा योग क्वचितच-लग्न मुंजीच्या प्रसंगींच काय तो-येत असे; आणि म्हणून त्यांना एकत्र आणण्याच्या हेतूनें एके दिवशीं माझ्या येथें त्या सर्वांना मी आमंत्रण दिलें, आणि सर्वांच्या संमतीनें एका शुभ मुहूर्तीं (१९१३) नागपूरच्या 'सारस्वत समाजाची' स्थापना केली. प्रत्येक लहान मोठ्या संस्थेंत मतभेदाचे कमी अधिक वारे वहात असतातच. जिवंतपणाचें तें एक लक्षण आहे. परंतु हे मतभेद विकोपास न जाऊं देतां हा समाज पुढें दोन अडीच वर्षें-मी नागपुरास असे पावेतों-उत्तम प्रकारें चालला. त्याचें धुरीणत्व मजकडे असण्याचें सौभाग्य मला

लाभलें होतें. हा अभिनव उपक्रम सर्वांना फलप्रद ठरला व एकमेकांत आपुलकीची भावना निर्माण करण्यास या समाजाचा बहुमोल उपयोग झाला.

नियमित व अल्प प्राप्तीच्या लहान लहान कुटुंबांना सलोख्यानें व एकमेकांच्या सहकार्यानें राहण्याशिवाय गत्यंतर नसतें; त्याशिवाय त्यांचें जीवन सुखी होण्याचा सुतराम् संभव नसतो. नागपुरास ' सारस्वत समाज ' स्थापन होण्याच्या पूर्वीपासून व नंतरहि ज्या कुटुंबांशीं माझा परिचय वाढत गेला त्यांत प्रामुख्यानें श्रीयुत विश्वनाथ राघोबा रेगे व श्रीयुत गोविंद सदाशिव कुळकर्णी ह्या दोन प्रेमळ, स्वार्थत्यागी व सच्छील कुटुंबांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. एकमेकांस एकमेकांपासून सुख लाभावें, सर्वांचे संसार सुखासमाधानानें व एकोप्यानें चालावे ह्या कांहीं अंशीं व्यापक स्वार्थी हेतूनें एकत्र आलेलीं आमचीं ( रेगे, कुळकर्णी व पिंगे ) तीन्ही कुटुंबें थोड्याच अवधींत निराळीं अशीं न राहतां, परकीपणा विसरून, तीं जणूं एकाच कुटुंबाचे घटक बनलीं. एकाचें सुख तेंच तिघांचें सुख, एकाचें दुःख तेंच तिघांचें दुःख, एकावर आपत्ति तीच तिघांवरहि आपत्ति, असें आम्हां तीन्ही कुटुंबांचें वर्तन असे. माझ्या उण्यापुऱ्या तीन वर्षांच्या नागपूरच्या वास्तव्यांत आम्ही तिघे इतरांच्या दृष्टीनें एकाच कुटुंबाचे घटक गणले जाऊं लागलों होतों. आम्ही तिघेहि मूळचे कोंकणांतले रत्नागिरी जिल्ह्यांतले राहणारे. सरासरी एकाच वयाचे. तिघांचीहि सांपत्तिक स्थिति सामान्यतः सारखीच. तिघेहि जवळ जवळ सारख्याच परिस्थितींत उपजीविकेकरतां घरून बाहेर पडलेले, आणि तिघांचेहि स्वभाव मिळते जुळते. इतके सर्व योग जमल्यावर आम्ही तिघेहि एकरूप झालों नसतों तरच नवल. आमच्या तिघांच्याहि गृहिणी या सहकार्यांत आमच्याशीं समरस होत्या. आमच्यांत मतभेद कधींच होत नसत असें नाहीं. आम्हां तिघांत मी तापट स्वभावाचा, परंतु एकमेकांच्या मतभेदांविषयीं पूर्ण आदर ठेवून व मतभेद दूर करण्याचा सतत प्रयत्न करीत आम्ही आमचें सांसारिक जीवन अतीव आनंदानें व एकदिलानें जगत होतों. प्रत्येकजण आपापल्यापरी मस्त होता; सुखांत होता. प्रत्येकानें आपला व्यवसाय

सांभाळावा, चोखपणानें व प्रामाणिकपणानें अंगीकृत सेवा बजवावी व उरलेला वेळ एकमेकांच्या संगतींत आणि सान्निध्यांत प्रेमानें व आपलेपणानें घालवावा असा आमचा नित्यक्रम असे. मी सप्टेंबर १९१५ मध्यें नागपूर सोडलें, परंतु आजतागाईत या दोघांचे व माझे स्नेहसंबंध पूर्वीचेच कायम आहेत. नागपुरास ह्या दोन सुहृदांच्या संगतींत घालविलेला काल आठवला म्हणजे मन अजून सुखसागरांत पोहूं लागतें व प्रसन्न होतें; परंतु लागलीच ' ते हि नो दिवसा गताः ' असें वाटून मनाला खिन्नताहि येते !

नागपूरच्या माझ्या तीन वर्षांच्या वास्तव्यांत वरील दोघांव्यतिरिक्त आणखी एका व्यक्तीशीं आमचा तिघांचाहि अति निकटचा संबंध आला. ती व्यक्ति म्हणजे श्रीयुत रामचंद्र गोविंद पांढरीपांडे. मी खाणावळींत जेवावयास जात असें तेथें त्यांना मी प्रथम पाहिलें. खाणावळींत अनेक ठिकाणचे व विविध स्वभावाचे लोक जेवावयास येत. जेवण चालू असतां अनेक विषयांवर त्यांच्या गप्पागोष्टी व चर्चा चालत असत. रामभाऊ पांढरीपांडे या गप्पागोष्टींत किंवा चर्चेत कधींच भाग घेत नसत. मीहि खाणावळींत पाय ठेवल्यापासून तों जेवून बाहेर पडेपावेतों तोंडावाटें कधीं ब्र काढीत नसें. या एकाच विचित्र गोष्टीमुळें आम्हा दोघांहि मुक्यांचें परस्परांना एक प्रकारचें आकर्षण वाटूं लागलें. एके दिवशीं खाणावळींतून बाहेर पडल्यावर मी रामभाऊशीं बोलण्याचें धाडस केलें. कदाचित् तेहि याच संधीची वाट पाहात असावे. कारण मी त्यांच्याशीं बोलण्याची प्रस्तावना करतांच ते म्हणाले ' मिस्टर, तुम्हांस कदाचित् खरें वाटणार नाहीं पण कधींपासून तुमच्याशीं ओळख करून घेण्याची मी संधि पाहात होतों. अनायासें ती आज तुम्ही आणून दिली. ' मी रामभाऊंना घरीं घेऊन गेलों व जणूं फार दिवसांच्या प्रेमळ मित्रांप्रमाणें आम्ही मनसोक्त गप्पागोष्टी केल्या. एका दिवसाच्या संभाषणांतच असें आढळून आलें कीं खाणावळींत मुकस्तंभ बसणारी ही व्यक्ति अघळपघळ बोलणारी आहे एवढेंच नव्हे तर ती सामान्य कोटींतील नसून बऱ्याच वरच्या पातळींतील आहे. ' साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ' ह्यांचें

रामभाऊ एक प्रतीक होते. शरीरानें सुदृढ, अंतःकरणानें अत्यंत प्रेमळ व उदार, बोलण्यांत गोड, सभ्य व विचारशील, विवाहबंधनानें न जखडलेले असे हे असामान्य गृहस्थ थोड्याच अवधींत आमच्याशीं समरस झाल्यास काय नवल ? मी नागपूर सोडलें तरी रामभाऊशीं माझे संबंध त्यांच्या अंतकाल-पावेतों ( ९-१२-१९४८ ) अत्यंत सलोख्याचे व प्रेमाचे होते. असा हा आमचा जिवलग स्नेही क्षयरोगाला बळी पडावा व कालानें आमच्यांतून त्याला अकालीं हिरावून न्यावें याहून अधिक दुःखद घटना ती कोणती !

## ‘ ते कोण कीं दुर्मति ! ’ : ५७ :

सी. पी. क्लबमध्यें काम करावयास लागून मला आतां दोन वर्षें होत आलीं होतीं. कामावर लागू करण्याच्या वेळीं क्लबच्या चिटणीसांनीं माझें काम पाहून वर्षभरानें मला पगारांत योग्य बढती देण्याचें आश्वासन दिलें होतें. परंतु दोन वर्षें होऊन गेलीं तरीहि बढतीसंबंधी आमचे चिटणीस चकार शब्द देखील काढीनात ! त्यांच्या आश्वासनाचें मी त्यांना अनेकवार स्मरण दिलें. एक दोन वेळां तोंडी विचारणाहि केली तेव्हां त्यांनीं मला असें सांगितलें कीं माझे अर्ज व्यवस्थापक मंडळाच्या कमिटीसमोर ठेविले परंतु व्यवस्थापक मंडळ तूर्त त्यावर विचार करावयास तयार नाहीं. दोन वर्षे-पावेतों वाट पाहून व अर्ज करून करून मी आतां अगदीं कंटाळून गेलों होतों; निराश झालों होतों. मन विलक्षण अस्थिर झालें होतें. इमानेंइतबारें काम करूनहि त्याचें चीज होत नसलेलें पाहून मन अगदीं विटून गेलें होतें. तरीहि प्रत्येक महिन्यास लेखी स्मरणपत्र देण्याचा क्रम मी चालू ठेवलाच होता.

या नोकरीवरून माझें मन उडाल्यामुळें मी दुसऱ्या चांगल्या जागेच्या शोधांत होतों. निरनिराळ्या ठिकाणीं अर्ज पाठविण्यास मी सुरवातहि केली होती. बालाघाटच्या डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बॅन्कमध्यें मॅनेजरची जागा

रिकामी असल्याची मला बातमी लागली. त्या जागेकरतां मी अर्ज लिहिला आणि तो शिफारशीसह पुढें रवाना करण्याकरतां ता. २७ ऑक्टोबर १९१४ रोजीं क्लबच्या चिटणीसाकडे दिला. चिटणीसांनीं हा अर्ज आपल्या शिफारशीसह पुढें पाठविण्याचें मला आश्वासन देऊन तो ठेवून घेतला. ह्यानंतर दोन दिवसांनीं मी क्लबच्या चिटणीसाकडे मुद्दाम टेलिफोनवर चौकशी केली असतां त्यांनीं तो अर्ज आपल्या शिफारशीसह बालाघाट बॅन्केकडे रवाना केल्याचें मला सांगितलें. या गोष्टीला पांच सहा दिवस लोटले. एके दिवशीं मी कचेरींत काम करीत बसलों असतां चिटणीसांना त्यांच्या कांहीं खानगी कागदांची गरज लागली. ते कागद त्यांच्या मेजावरील पेपर-ट्रेमधून काढून चपराशाबरोबर बॅन्केंत पाठवून देण्याविषयीं मला त्यांनीं फोन केला. चिटणीसांच्या टेबलावरील कागदांना मी कधींहि हात लावीत नसें. फोनवरून त्यांचा निरोप आला म्हणून त्यादिवशीं मी त्यांच्या कागदांना मी प्रथमच हात लावला व त्यांनीं सांगितलेला कागद शोधूं लागलों. त्यांना पाहिजे असलेला कागद तर सांपडलाच परंतु त्याबरोबरच कोलंबसाला लागला नसेल एवढा महान् अद्भुत शोधहि मला लागला आणि मी आश्चर्यानें स्तंभितच झालों! हा शोध एवढा भयंकर व विस्मयकारक होता कीं त्यानें माझी मति गुंग होऊन गेली! बढतीकरतां मी आजपावेतों केलेले सर्व अर्ज त्या पेपर-ट्रेमध्यें कुजत पडले होते, एवढेंच नव्हे तर बालाघाट बॅन्केच्या जागेकरतां मी दिलेला अर्जहि त्या टोपलींतच धूळ खात पडला होता!! हें पाहून माझ्या मनाची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी! माझें पित्त खवळलें. कामावर माझें मुळींच लक्ष लागेना. युरोपिअन् लोकांची दानत चोख व शुद्ध असते, वर्तनानें ते सरळ, प्रामाणिक आणि सच्च्या दिलाचे असतात, खोट्याची त्यांना चीड असते असा लौकिक मी ऐकत आलों होतों, परंतु ह्या गृहस्थाच्या बाबतींत तो समज सपशेल खोटा ठरला! माझें डोकें संतापानें भडकून गेलें. त्या गृहस्थाला खाऊं का गिळूं असें मला झालें.

साहेबाच्या टेबलावरील कागदांत मॅनेजिंगकमिटीचें ठरावपुस्तकहि होतें. माझ्या बढतीच्या अर्जाचा उल्लेख ठराव पुस्तकांत कोठेंहि नाहीं ह्याची मी

खात्री करून घेतली आणि माझे सर्व अर्ज मी त्या ट्रेमधून काढून घेतले. तो दिवस तसाच जाऊं दिला. दुसऱ्या दिवशीं साहेबांची व माझी ऑफिसांत भेट झाली त्यावेळीं मी त्यांना माझ्या बढतीच्या अर्जाचें काय झालें म्हणून विचारलें. नित्याच्या रिवाजाप्रमाणें त्यांनीं कमिटीकडे बोट दाखविलें. मला तें सहन झालें नाहीं. आदल्या दिवसापासून ज्वालामुखी धुमसत होताच. मी थोड्या चढत्या सुरांतच साहेबांस म्हटलें ‘ साहेब, अशा प्रकारें माझ्या डोळ्यांत धूळ फेकणें आपणासारख्यास शोभतें का ? ’ साहेब कुर्‍यांतच म्हणाले ‘ म्हणजे ? ’ मी म्हटलें ‘ म्हणजे काय हें आपल्या मनालाच विचारा. ’ इतकें म्हणूनच मी थांबलों नाहीं तर पूर्वदिवशीं सांपडलेले सर्व अर्ज मी त्यांच्या टेबलावर फेकले व म्हटलें ‘ हे अर्जच माझ्या म्हणण्याचा अर्थ आपणास स्पष्टपणें सांगतील. आपण अशा रीतीनें मला फसवाल, माझें नुकसान कराल अशी मला कल्पना देखील नव्हती ! अतःपर मी आपणावर कसा विश्वास ठेवावा ? ’ विचारा साहेब बर्फाप्रमाणें थिजून गेला ! उत्तर द्यावयास त्याचेजवळ कांहीं नव्हतेंच !!

## ‘ साहसे श्रीः प्रतिवसति ’ : ५८ :

सी. पी. क्लबच्या चिटणीसाच्या कुटिल वर्तनाचा मला तिटकारा आला होता. त्याचें कपट उघडकीस आणल्यानंतर तो अतःपर माझ्याशीं भलेपणानें वागेल हें सुतराम् संभवनीय नव्हतें. दुसरी नोकरी पाहण्याच्या उद्योगास मी यापूर्वीच लागलों होतों. बालाघाट बॅन्केच्या जागेचा माझा प्रयत्न चिटणीसाच्या लबाडीमुळें व वशील्याच्या अभावीं वांया गेला होता. नागपूरच्या उन्हाळ्यालाहि मी त्रासलों होतों व समशीतोष्ण अशा एखाद्या जागीं नोकरी पहावी ह्या विचारांत होतों. हा हेतु मी माझ्या आप्तेष्टांनाहि कळविला होता. मुंबई हें व्यापाराचें मोठें केंद्र. माझ्यायोग्य जागा मला तेथें मिळण्यास अडचण पडली नसती, परंतु मुंबईचें हवामान माझ्या प्रकृतीस मानवत नव्हतें म्हणून मुंबईस नोकरी न करण्याचा माझा संकल्प होता.

निरनिराळ्या ठिकाणीं अर्ज पाठविणें चालूच होतें. याच वेळीं होळकर सरकार गॅझेटमध्यें प्रसिद्ध झालेल्या एका जाहिरातीचें कात्रण माझ्या शालकांनीं मजकडे पाठविलें. इंदूरला नुकत्याच स्थापन झालेल्या हुकमचंद मिलसाठीं एका चांगल्या अनुभवी अकाउन्टन्टची आवश्यकता होती व त्याची ती जाहिरात होती. जाहिरातीचे खालीं मॅनेजर म्हणून के. डी. पुराणिक अशी सही होती. अकाउन्टन्टची जागा, इंदूरसारखें उत्तम हवेचें ठिकाण आणि ब्राह्मण मॅनेजर, हा त्रिवेणी संगम जुळत असलेला पाहून माझें मन हुरळलें व मी लागलीच त्या जागेसाठीं अर्ज पाठविला. मिलचे हिशेब ठेवण्याचा मला अनुभव नव्हता, तथापि हिशेब ठेवण्याचें सर्वसामान्य तत्व एकच असल्यानें व सी. पी. क्लबचे तीन वर्षांचे आढावे (Balance Sheets) मी यशस्वीपणें तयार केले असल्यानें माझ्या कार्यशक्तीवर माझा पूर्ण विश्वास होता व नवीन परिस्थितीशीं जुळवून घेण्यांत मला विशेष अडचण पडेल असें मला वाटत नव्हतें. थोडेंबहुत साहस तर होतेंच, परंतु 'साहसे श्रीः प्रतिवसति' हें तत्वहि मला माहीत होतें आणि म्हणून एवढें साहस करण्याची माझी तयारीहि होती.

इंदुरास अर्ज पाठविल्यातारखेपासून सुमारें एक महिनापावतों माझ्या अर्जाचें उत्तर अथवा पोंचहि आली नाही. मीहि त्याची विशेष काळजी केली नाहीं. प्रत्येक अर्जाची पोंच किंवा उत्तर येतेंच असें थोडेंच आहे ? परंतु एक महिन्यानंतर एके दिवशीं अचानक श्रीयुत पुराणिक यांची मला तार आली; तींत महिना सत्तर रुपये पगारावर व सहा महिन्याच्या प्रोबेशनवर ( कसोटीवर ) जागा पत्करावयास तयार असल्यास तावडतोब कामावर रुजू व्हावें असें लिहिलें होतें. मला अत्यानंद झाला. जागा पत्करावयास मी उत्सुक होतों व प्रोबेशनलाहि मी घाबरत नव्हतों, परंतु तावडतोब कामावर रुजू होणें मात्र मला शक्य नव्हतें. कारण सी. पी. क्लबला शिरस्त्याची एक महिन्याची नोटिस दिल्याशिवाय त्यांची नोकरी

सोडणें मला योग्य वाटत नव्हतें. श्रीयुत पुराणिक यांस त्याप्रमाणें मी तारेनें कळविलें आणि त्यांनीं एक महिना वाट पाहण्याचें मान्य केलें. त्यांची तार मिळतांच मी सी. पी. क्लबच्या चिटणीसास ता. २३ ऑगस्ट १९१५ रोजीं १ महिन्याची नोटिस दिली. ही नोटिस मिळतांच क्लबच्या चिटणीसांनीं माझ्या पगारांत ताबडतोब वाढ करण्याचें आमिष मला दाखविलें! परंतु नागपूर व सी. पी. क्लब दोन्ही सोडण्याचा मीं निश्चयच केला होता. म्हणून कितीहि वाढावा दिला तरी माझी आतां आपल्या हाताखालीं काम करण्याची यत्किंचित्‌देखील इच्छा नाहीं' असें मी चिटणीसांस स्पष्ट सांगितलें. त्यांचा निरुपाय झाला व ता. १७ सप्टेंबर १९१५ रोजीं मी क्लबमधून सेवानिवृत्त झालों. एक दोन दिवस स्नेहीसोबत्यांचे निरोप घेण्यांत घालवून रविवार, तारीख १९ सप्टेंबर १९१५ रोजीं मी नागपूर सोडलें व दुसऱ्या दिवशीं इंदुरास येऊन दाखल झालों.

## दोन पत्रें : ५९ :

मनुष्य सद्धेतुपूर्वक एखादें कृत्य करावयास प्रवृत्त होतो, परंतु त्याच्या दुर्भाग्यानें तें कृत्य केल्याचा आनंद मिळण्याऐवजीं त्याचें दुःख वाढविण्यास मात्र तें कारणीभूत होतें व असें झालें म्हणजे जगांत कसें वागावें हेंच त्याला कळेनासें होतें!

[१]

माझ्या वडिलांकडून मला आलेलें पत्र :—

'धार, ता. २३।७।१५

अनेक आशिर्वाद उपर,

तुमचें ता. २० चें पत्र पोंचलें. चि. मंगेशसंबंधानें मी कांहीं विशेष लिहूं शकत नाहीं. त्यानें आपल्या बाबतींत मला कांहीं विचारलेलें नाहीं. परभारें त्यानें तुम्ही व सखाराम व चि. शांतू व आपला बंधु यांच्याशीं

काय बोलणें अगर पत्रव्यवहार केला याची मला माहिती नाहीं. तसेंच त्या पत्रव्यवहारावरून काय निकाल करून घेतला याचीहि माहिती नाहीं. तुम्ही सर्वांनींमिळून जर त्याची जबाबदारी अंगावर घेतली असेल तर ती जबाबदारी अखेरपर्यंत पूरी करणें तुम्हां सर्वांकडे आहे; मजकडे कांहीं नाहीं. इतक्यावरून त्याला पुढें शिक्षण मिळूं नये असा माझा हेतु नव्हता. कसेंहि करून त्यास पुढचें शिक्षण देण्याची तजवीज सर्वांचा विचार घेऊन केली असती, परंतु त्यानें व त्याच्या बंधूनें कोणीहि मला एका शब्दानें विचारिलेलें नाहीं. परभारें तुम्हां सर्वांचा पत्रव्यवहार होऊन जें कांहीं ठरलें आहे तें पुरें पाडणें तुम्हां सर्वांकडे आहे. तो गेल्यापासून पोंचल्याबद्दल-सुद्धां त्याचें पत्र नाहीं. तो व तुम्ही आतां सज्ञान आहां. तुम्हाला माझ्या सल्ल्याची जरूर आहे असें मला वाटत नाहीं; आणि असती तर तुम्हां तिघांपैकीं एकानें तरी माझ्या कानांवर ही गोष्ट घातली असती.

'दरमहा प्रत्येकीं रु. ११ खाणावळीचे देऊन उभयतां खाणावळींत आहों' असें कळविलें, त्यास या गोष्टीचा विचार आपल्या प्राप्तीच्या व खर्चाच्या मानानें प्रथमच करावयास पाहिजे होता. आतां वचन दिल्यावर तो विचार काय उपयोगाचा? माझ्यासारख्यानें यांत मत देणें म्हणजे दोषास कारण होणार व लोकांत हसें व्हावयाचें; त्या अर्थीं स्वस्थ बसावें व काय होतें तें पहावें असें मला वाटतें.'

[२]

वरील पत्रास माझें गेलेलें उत्तर :—

'सिताबर्डी, नागपूर.
ता. २९–७–१९१५
५–८–१९१५

वडिलांचे सेवेसी कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष. आपलें ता. २३ चें पत्र पावलें. मजकूर समजला व थोडेसें वाईटहि वाटलें. असो.

चिरंजीव मंगेश याचे बाबतींत प्रत्येकाचा थोडासा गैरसमज झालेला दिसतो. त्यानें मला पत्र लिहिलें व त्याचे जवाबानंतर तो पुढच्या शिक्षणाकरतां येथें आला तो आपल्या सर्वत्रांच्या विचारानेंच आला अशी माझी पूर्ण समजूत होती. आपल्याला त्यानें ह्या संबंधानें कांहींच विचारलें किंवा सांगितलें नाहीं असें आपल्या लिहिल्यावरूनच समजतें. तोंपावेतों मला ह्या गोष्टीची गंधवार्ताहि नव्हती.

' नुसता जेवणाचा खर्च मी सोशीन, बाकी लागणारा एकूण सर्व खर्च आपला भाऊ, शांतू आणि काका ह्या तिघांकडून मिळत असल्यास तूं इकडे येण्याचें करावें ' हें त्याला लिहिण्यांत मी माझ्या शिरावर विशेष व न सोसणारी जबाबदारी घेतली असें नव्हतें. चि. अनंत ( माझा दुसरा आतेभाऊ ) हा येथें असतां त्याला जेवणाला जो खर्च लागत असे तोच मंगेश यास लागेल हें अगदीं उघड आहे. अनंताचा जेवणाचा खर्च जर दोन वर्षं मला झेंपत होता तर मंगेशच्या जेवणाचा खर्च सोसण्याला मी नाहीं म्हणणें केव्हांहि बरें झालें नसतें. मी नाहीं म्हटलें असतें तर मात्र तें वाईटपणाला कारण झालें असतें. बरें, त्या बाबतींत आपल्यास न लिहिण्यास व आपली सल्ला न घेण्यास ' मी आतां स्वतंत्र झालों व आतां आपल्या सल्ल्याची मला गरज उरली नाहीं ' असें जें लिहिलें आहे तें मात्र खरें नाहीं. आपलीं सदरहु अक्षरें वाचून मला अत्यंत वाईट वाटलें, इतकेंच नव्हे तर डोळयांतून प्रत्यक्ष टिपेंहि आलीं...त्यानें ज्यावेळीं मला पत्र लिहून काय मदत करूं शकाल असें विचारलें त्यावेळीं येथील कॉलेजांतील मुलांची भरती होत चालली होती, इतकेंच नव्हे तर कित्येक मुलें ॲडमिशन् नाहीं म्हणून परतहि गेलीं. अशा स्थितींत जर त्याचें येथें यावयाचें ठरलें असेल, तर विनाकारण विलंब होईल व त्यांत त्याला ॲडमिशन मिळणार नाहीं हें जाणून मी त्याला ताबडतोब पत्र लिहिलें, इतकेंच नव्हे तर त्यानंतर दोन तीन दिवसांनीं लागलीच दोन जरूरी कार्डें, एक बैतुलचे पत्त्यावर व एक धारचे पत्त्यावर ( आपल्याला पाठविलेल्या पत्रांतून ) लिहून, ॲडमिशन बंद होत आहे, येणें असेल तर लवकर यावें

म्हणून लिहिलीं. त्याचें कार्ड आल्यावर आपल्याला लिहून नंतर आठ दिवसांनीं, आपला जबाब आल्यावर, त्याला लिहीन असें म्हटलें असतें तर त्याला कदाचित् परत जावें लागलें असतें हा माझा समज. त्यांत म्हणजे स्वतंत्र रीतीनें वागण्याच्या उद्देशानें आपल्यास लिहिलें नाहीं असें मुळींच नव्हतें. शिवाय तो इकडे येत आहे हा आपली सल्ला न घेतां किंवा आपल्या विचाराविरुद्ध हेंहि मला मुळींच माहीत नव्हतें. असो. अशी स्थिति असतां आपण आपली जी समजूत करून घेतली त्याला नाइलाज आहे व अद्यापहि आपली तशी समजूत असल्यास मी आपली क्षमा मागतों.

मी प्रत्येकीं जेवणाला ११ रुपये देत आहें असें लिहिण्यांत ते देण्याला मी कुरकुर करीत आहे असा माझा मुळींच हेतु नव्हता. जर अनंत येथेंच असता तर त्याचेकरतां मला अकरा रुपये द्यावेच लागले असते. माझे लिहिण्याचा उद्देश एवढाच होता कीं मला शक्य ती मदत मी करीत आहे, पण इतर दोघांनीं कबूल केलेली मदत जर वेळेवर न पाठविली तर मात्र मला जड जाईल व त्रास होईल. असो.

कळावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

आ. आ.

# टप्पा चौथा.

## सेव्य-सेवक कीं पिता-पुत्र : ६० :

सेवावृत्ति–नोकरी–म्हणजे पारतंत्र्याचें व जुलमाचें माहेरघर. या जुलमी जीवनांत वरिष्ठाच्या सुलतानशाहीपुढें माणसाला नमावें लागतें आणि वरिष्ठा-विषयीं त्याच्या मनांत तिरस्कारबुद्धि ठाण मांडून बसते. या सर्वसाधारण अनुभवाला जर कोठें अपवाद आढळला तर तें केवळ भाग्यच !

हुकमचंद मिलच्या अकाउन्टन्टच्या जागेकरतां मी अर्ज केला आणि सुदैवानें ती जागा मला मिळालीहि. पुराणिक ह्या आडनांवावरून मिलचे मॅनेजर बहुधा दक्षिणी ब्राह्मण असावे असें मी अनुमान बांधिलें होतें तें खरें ठरलें. सन १९०३ पासून १९०६ पावेतोंचा काल मी इंदुरास कॉलेजांत घालविला असला तरी गांवांतील कोणाशीं मी परिचित नव्हतों. पुराणिकां-बद्दल मला कांहींदेखील माहिती नव्हती. मला देऊं केलेली जागा पत्क-रल्याचें त्यांना मी तारेनें कळविलें व नंतर माझ्या सविस्तर अटींचें एक बरेंच मोठें रीतसर ( ऑफिशिअल् ) पत्र मी त्यांनां पाठविलें. या पत्राच्या मागो-मागच मी एक खानगी पत्रहि त्यांना लिहिलें. पूर्वपरिचय नसतां एकदम खानगी नात्यानें पत्र लिहीत असल्याबद्दल क्षमा मागून अकाउन्टन्टच्या जागे-वर माझी निवड केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद दिले होते. कामाच्या बरे-वाईटपणाबद्दल मी स्वतः लिहिण्यापेक्षां माझें कामच आपणास सांगेल असेंहि त्यांत मी ध्वनित केलें होतें आणि नंतर तें पत्र लिहिण्याच्या माझ्या प्रधान हेतूकडे वळलों होतों. मी त्यांच्या हाताखालीं अकाउन्टन्ट म्हणून काम करावयास येत असलों तरी नोकरीच्या वेळचा सेव्य–सेवक संबंध सोडून इतर वेळीं त्यांनीं मजवर पितृवत् प्रेम ठेवावें अशी मी त्यांना नम्रतापूर्वक विनंति केली होती.

सोमवार, ता. २० सप्टेंबर १९१५ ला मी इंदुरास येऊन पोंचलों व एक दिवस विश्रांति घेऊन ता. २२ रोजीं मी पुराणिकसाहेबांस भेटावयास

त्यांच्या घरीं गेलों. तो अनंतचतुर्दशीचा दिवस होता. कचेरीस सुट्टी होती. पुराणिक साहेब त्यांचे मित्र श्री. विनायकराव निगोजकर यांजकडे गेले होते. मी तेथें गेलों. ते बाहेरच्या ओसरींत एका लाकडी तख्तावर बसले होते. त्यांना मी पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें. त्यांचा उंच भव्य बांधा, मजबूत शरीरयष्टि, रुबाबदार मिशा, गोल चेहरा, रुंद कपाळ व मुद्रेवरील प्रशांत भाव पाहून प्रथमदर्शनींच माझें मन प्रसन्न झालें व आदरानें भारावलें आणि नंतरच्या त्यांच्या थोड्याशाच पण शांत व प्रेमळ भाषणानें हा आदर दुणावला.

दुसऱ्या दिवसापासून मी कामावर रुजू झालों. मिलच्या प्रारंभापासूनचे सर्व हिशेब मला तयार करावयाचे होते. या कामाची अत्यंत निकड होती. हें काम अवघ्या एक महिन्याच्या आंत पूर्ण करून त्यावर ऑडिटर्सच्या पसंतीचें शिक्कामोर्तब आणावयासाठीं तारीख २४ ऑक्टोबर १९१५ ला मी मुंबईस रवानाहि झालों व इतक्या थोड्या अवधींत तयार केलेल्या कामांत कांहींहि दोष न काढतां मेसर्स ए. एफ. फर्ग्युसन आणि कंपनीसारख्या प्रसिद्ध हिशेब तपासनीसांनीं त्यावर आपलें शिक्कामोर्तब केलें हें नमूद करण्यास मला आनंद व अभिमान वाटतो.

कामावर रुजू झाल्यापासून एक महिन्याच्या आंतच ह्याप्रमाणें माझ्या कामाची परीक्षा मी दिली होती. मला सहा महिन्यांच्या प्रोबेशनवर नेमण्यांत आलें होतें. ऑडिटर्सचें शिक्कामोर्तब आणल्यानंतर कांहीं दिवसांनीं प्रोबेशनची अजूनहि आवश्यकता उरली आहे का ? असा प्रश्न मी पुराणिक साहेबांस केला. पुराणिक साहेब मला एवढेंच म्हणाले ‘ मिस्टर पिंगे, घाई करूं नका. प्रोबेशनची गरज मुळींच उरलेली नाहीं, तथापि ह्या मारवाड्यांशीं जरा दमानेंच घेतलें पाहिजे. ’ त्यांच्या सांगण्यावर विसंबून मी स्वस्थ राहिलों आणि त्याचें फळहि मला यथासमयीं मिळालें.

पुराणिक साहेब यांच्या सौजन्यपूर्ण आणि प्रेमळ वागणुकीनें केवळ मीच नव्हे तर मिलमधील एकूणएक कामगार खुश होते आणि त्यांच्या हाताखालीं

काम करण्याचें सौभाग्य प्राप्त झाल्याबद्दल स्वतःस धन्य मानीत होते. आपल्या शांत स्वभावानें आणि प्रेमळ वागणुकीनें त्यांनीं सर्वांचीं मनें आपणांकडे ओढून घेतलीं होतीं. त्यांनीं कोणास कधींहि दुखविलें नाहीं. जवळ जवळ दहा वर्षे त्यांच्या हाताखालीं काम करण्याची अमूल्य संधि मला मिळाली. ह्या दहा वर्षांच्या दीर्घ कालांत त्यांनीं माझें पितृवत् पालन केलें असें मी म्हटलें तर त्यांत मुळींच अतिशयोक्ति नाहीं. ह्या दीर्घ कालावधींत कामासंबंधानें नसली तरी माझ्या तापट स्वभावासंबंधानें तक्रार करण्यास त्यांना जागा होती. परंतु कित्येक प्रसंगीं त्यांनीं माझा रागीट स्वभाव व त्यापासून उद्भवणारे अनिष्ट परिणाम प्रेमळ पित्याप्रमाणें दृष्टिआड करून नव्हे, त्यांवर पांघरूण घालून–मला जन्माचें ऋणी करून ठेविलें आहे, इतकेंच नव्हे, तर माझ्या स्वभावांत परिवर्तन करण्याचा स्वतःच्या आचरणानें त्यांनीं धडा घालून दिला आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरहि आज २८-२९ वर्षें त्यांचें व माझें नातें पिता–पुत्राचेंच राहिलें आहे आणि त्याबद्दल मी स्वतःला भाग्यवान् समजतों.

## स्वर्ग-सुख : ६१ :

‘ जो एकरूप सुख–दुःखपणीं गडी तो ’

—वामन पंडित.

आयुष्याच्या मार्गक्रमणांत अनेकांशीं आपला सहवास घडतो परंतु केवळ सहवासानें ते आपले मित्र होतातच असें मात्र नव्हे. वर्षानुवर्षे सहवास घडूनहि मित्रभाव उद्भवत नाहीं. मैत्री होण्यास परस्परांबद्दल आदर, अकृत्रिम प्रेम, एकमेकांच्या आपत्तींत समरस होण्याची त्यागवृत्ति, एकमेकांचें पाऊल चुकत असल्यास योग्य सल्ला देऊन तें सुमार्गावर आणण्याची धमक, परस्परांतील दोष उघडपणें दाखवून ते सुधारण्याची प्रभावी शक्ति या महान् गुणांची जोड लागते.

इंदुरास आल्यापासून निरनिराळ्या कारणांनीं अनेक लोकांशीं माझा परिचय होऊं लागला. ह्या परिचयांत ताकापुरतें रामायणच असे. मैत्री करण्यासारखे गुण त्यांच्यांत क्वचितच आढळत. कदाचित् हा माझ्या स्वभावांतील दोष असण्याचाहि संभव आहे. परंतु कोणाशीं जास्त लगट करण्याची किंवा अघळ पघळ व वायफळ बोलण्याची माझी वृत्तीच नाहीं. वरीलपैकीं थोडेबहुत गुण कोणांत वैशिष्ट्यानें जोंपावेतों आढळत नाहींत तोंपावेतों चालू व्यवहारापुरत्या परिचयांतच मी समाधान मानीत असें.

कर्मधर्म संयोगानें इंदुरास एका व्यक्तीनें मात्र प्रथमपरिचयांतच माझें मन आपल्याकडे आकर्षून घेतलें. हे गृहस्थ म्हणजे कै. केशव भास्कर कोचरेकर होत. जेल रोडवर ते माझ्या शेजारच्याच घरांत राहात असत. कै. नरहर गणेश ऊर्फ मन्याभाऊ कोठारी हे माझे जवळचे नातेवाईक. त्यांचा व केशवरावांचा स्नेह होता. मन्याभाऊबरोबर मी प्रथम केशवरावांस भेटावयास गेलों. प्रथमदर्शनींच त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप मजवर पडली व त्यांच्याविषयीं मला एक प्रकारचा आदर वाटूं लागला. कां, तें सांगतां येणें कठिण आहे. मन्याभाऊंनीं माझी केशवरावांशीं ओळख करून देतांच ते म्हणाले ' मीं ह्यांना पूर्वीपासूनच ओळखतों. त्यांना भेटण्याची मला तीव्र उत्कंठा होती ती मात्र आज पूर्ण झाल्यामुळें मला अतिशय आनंद होत आहे. ' केशवरावांनीं मला पूर्वी कधींच पाहिलें नसतां ' मी यांना पूर्वीपासूनच ओळखतों ' असें ते कसें म्हणतात या शंकेनें मी बुचकळ्यांत पडलों. इतक्यांत ते म्हणाले ' येथील सारस्वत ब्रह्मसमूहाच्या वार्षिकोत्सव प्रसंगीं तुम्ही पाठविलेल्या कवितांनीं मला तुमची ओळख करून दिली होती. प्रत्यक्ष भेटीचा योग मात्र आज येत आहे. ' ह्यानंतर आम्ही बराच वेळ बोलत बसलों होतों. त्या अवधींत आमचीं दोघांचींहि मनें एकमेकांत मिसळलीं. एकमेकांस एकमेकांची खूण पटली–ओळख पटली–असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्या दिवसापासून आम्हां दोघांचा स्नेह वाढतच गेला–नव्हे, स्नेहाचें रूपांतर थोड्याच कालांत एकरूपतेंत झालें. आमच्यामध्यें दुजाभाव उरला नव्हता. केशवराव म्हणजे मी, आणि मी म्हणजे केशव-

राव असें समीकरण त्यावेळीं इंदुरांतील कित्येकांच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहिलें नसेल. आमच्या स्नेहास सीमा नव्हती. तो अमर्याद होता. अकृत्रिम होता. आमचे विचार, आचार, ध्येयें, भावना, दुःखें व सुखें एकरूप बनलीं होतीं. आम्ही एकमेकांस भेटलों नाहीं, तास दोन तास बसून सुख-दुःखाच्या पुढील वाटचालीच्या, ध्येयपूर्तीच्या, जनरहाटीच्या इत्यादि सुखसंवादांत घालविले नाहींत असा एक दिवस देखील जात नसे. एखादे दिवशीं बोलावयास कांहीं विषय नसलाच तर वेळीं आम्ही एकमेकांच्या शेजारीं तास तास, दोन दोन तास स्वस्थ बसून आत्मचिंतनांत घालविलेले मला आठवतात.

केशवराव म्हणजे माझ्या सुखाचा, माझ्या आनंदाचा अनुपम आणि अमूल्य ठेवा होता. उच्च ध्येयांनीं भारलेल्या ह्या ध्येयवादी, असामान्य व्यक्तीच्या सान्निध्यांत आपला काळ घालविणें म्हणजे अखिल जगाला विसरून स्वर्गसुखाचा अमृतानुभव घेण्याइतकें मला सुखदायी वाटत होतें! सन् १९१५ पासून १९२५ पर्यंत मी हें अद्वितीय स्वर्गसुख लुटीत होतों. ह्या कालांत आम्ही उभयतांनीं मिळून विविध सामाजिक कार्यांत पुढाकार घेतला, खांद्याला खांदा भिडवून अनेक उपयुक्त कामें केलीं, पुढील कामांचे मनोरे रचिले व आयुष्याचीं ध्येयें निर्धारित केलीं. परंतु मानवी जीवन हें छायाप्रकाशाचें रहाटगाडगें आहे. कांहीं कारणानें या सुखांत पुढें अंतर पडलें हा दैवदुर्विलास होय!

## वादळ

: ६२ :

आप्तेष्ट व स्नेहीसोबती ह्यांची खरी पारख संकटाच्या वेळींच होत असते. पुष्कळ वेळां आप्तांपेक्षां—स्वकीयांपेक्षां—परकेच सहस्रपटीनें उपयोगी पडल्याचें अनुभवास येतें!

ऑक्टोबर १९१६ च्या सुमारास माझ्या पत्नीच्या प्रसूतीचे दिवस भरत होते. घरांत दुसरें कोणी बाई माणूस नसल्यानें तिच्या बाळंतपणाची

समाधानकारक सोय करणें भाग होतें. अशा वेळीं आप्तस्वकीयांस सोडून इतर कोणाकडे धांव घेणार ? प्रसूतीला दोन तीन महिन्यांचा अवकाश असतांनाच अगोदरपासून सावध असावें म्हणून प्रथम बऱ्हाणपुरास माझ्या काकांना पत्र लिहून माझी अडचण मी त्यांजपुढें मांडिली. त्यांच्याकडून उत्तर आलें तें असें: —

' बऱ्हाणपूर,
२८-६-१६

...आपलें पत्र पोंचलें. इंदुराप्रमाणें येथेंहि प्लेग व कॉलरा सुरू आहे, तेव्हां आपले पत्राचें उत्तर काय देऊं हेंच कळत नाहीं. ती. सौ. मातोश्रीस पाठविली असती परंतु तिचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. अशा स्थितींतसुद्धां आपण चि. सौ. सीताबाईला येथें पाठवाल तर माझेकडून जेवढें होण्यासारखें असेल तेवढें मी करीन.

आपला
वि. ना. पिंगे.'

काकांना माझ्या काकीस इंदुरास पाठवितां आलें नसतें असें नाहीं परंतु त्यासंबंधी मात्र त्यांनीं मुग्धता स्वीकारली. ह्यावेळीं इंदुरासहि तुरळक प्लेग होता. बऱ्हाणपुरास प्लेग आणि कॉलराहि होता तेव्हां बऱ्हाणपुरास पाठविणें म्हणजे आगींतून निघून फुफाट्यांत पडण्यासारखें झालें असतें. म्हणून मीं धारेस वडिलांकडे पत्रानें विचारणा केली. त्याचें उत्तर मातोश्रीकडून आलें तें येणेंप्रमाणें:—

' धार, १८-८-१६

'...इकडे यावयाचें असल्यास माझा कांहीं नकार नाहीं. मात्र माझ्या एकटीच्या हातून झेंपणार नाहीं. मला बसल्या जागेवरून उठवत नाही असे पाय दुखत असतात. ह्याकरितां धाकटे मामीस विनंति करून दोन महिन्यांकरतां आपले बरोबर घेऊन यावी...

ताई.'

ह्या उत्तरानें मला चीडच आली. ह्या पत्राला उत्तर पाठविण्याच्या भानगडींत मी पडलों नाहीं. धारेस बाळतपणाची कांहीं सोय होऊं शकत नाहीं असा ह्या पत्राचा सरळ अर्थ होता. पत्नीच्या मामीला बरोबर देऊन तिला धारेस पाठवावयाचें त्यापेक्षां मामींनां बोलावून इंदुरासच बाळंतपण करणें अधिक सोईचें होईल ह्या विचारानें त्यांनाहि मी पत्र लिहिलें. मामी महेश्वरास होत्या. त्यांच्याकडूनहि कांहीं ना कांहीं अडचणच पुढें करण्यांत आली. दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्यांत अर्थ उरला नव्हता आणि म्हणून मला पुढील उद्योगास लवकर लागणें प्राप्त होतें.

घरीं शक्य नसल्यानें दवाखान्यांत बाळंतपण करण्याशिवाय आतां गत्यंतर नव्हतें. सरकारी दवाखान्यांतील व्यवस्थेसंबंधी माझा अनुकूल ग्रह नव्हता. 'अडला हरी...' या न्यायानें नाइलाज म्हणून दवाखान्याचा आश्रय घेण्याचें मला ठरवावें लागलें. तारीख ३० ऑगस्ट १९१६ रोजीं महाराजा तुकोजीराव हॉस्पिटलमधील हेडनर्स श्री. लक्ष्मीबाई वराडकर यांना मी भेटलों. माझी अडचण त्यांना सांगितली. त्यांनीं अत्यंत उदार मनानें अगदीं घरच्यासारखी सर्व व्यवस्था करण्याचें मोठ्या खुशीनें मान्य केलें, एवढेंच नव्हे तर बाळंतपणाच्या दहा दिवसांतील पथ्याचें वगैरे सर्व आपल्या घरून पुरविण्याचें त्यांनीं स्वखुशीनें आपल्या शिरावर घेतलें. माझ्या डोक्यावरचा भार बराच हलका झाला. दिवस भरत येतांच कुटुंबाला दवाखान्यांत पाठवीन असें सांगून मी परत आलों. तारीख ८ सप्टेंबर १९१६ रोजीं मी पत्नीला दवाखान्यांत पोंचविलें व घराच्या आसपास उंदीर पडत असल्यानें दोन तीन वर्षांच्या छोट्या इंदूसह मी खजूरी बाजारांत मेहुण्याच्या घरीं राहावयास गेलों.

वरील घटनेच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे ता. ९ सप्टेंबर १९१६ रोजीं संध्याकाळीं मी नुकता कोठें कचेरींतून आलों होतों, इतक्यांत माझे वडील दत्त म्हणून मजसमोर उभे! कांहीं पूर्वसूचना नसतां एकाएकीं त्यांना आलेले पाहून मी आश्चर्यचकितच झालों! वडिलांनीं कोट, रुमाल काढला, हातपाय

भुतले, चहा घेतला आणि नंतर सूनबाई कोठें आहेत म्हणून चौकशी केली. ‘ तिला कालच दवाखान्यांत पाठविली ’ मी उत्तर दिलें. ‘ तिला बाळंतपणा-करतां धारेस घेऊन जाण्यासाठीं मी आलों आहें; तिला दवाखान्यांतून बोला-वून घे ’ वडील म्हणाले. मी म्हटलें ‘ तें आतां शक्य नाहीं. महिनाभरा-पूर्वी ताईकडून पत्र आलें त्यांत तिनें आपली अडचण मला कळविली होती, त्यामुळें मला दुसरी व्यवस्था करणें भाग पडलें. केलेल्या व्यवस्थेंत आतां ढवळाढवळ किंवा फिरवाफिरव करणें योग्य होणार नाहीं व माझ्या शब्दालाहि कांहीं किंमत राहणार नाहीं. ’ हें ऐकतांच माझे वडील अतिशय संतापले. मर्मभेदक शब्दांनीं त्यांनीं माझी मनसोक्त संभावना केली. मी स्तब्ध पण माझ्या निश्चयावर दृढ होतों. आपल्या रागावण्याचा अथवा कटु बोलण्याचा मजवर कांहींच परिणाम होत नाहीं हें पाहिल्यावर ते म्हणाले ‘ निदान इंदूला तरी मजबरोबर पाठव. ’ मी स्तब्ध होतों तरी अंतर्यामीं माझा पाराहि बराच चढला होता. रागाच्या झटक्यांतच मी म्हटलें ‘ तिलाहि पाठविणें शक्य नाहीं. जेथें मी तेथें ती. तुमच्या अडचणींत आणखी भर कशाला ? मलाहि येथें वेळ घालवावयास कोणीतरी पाहिजेच. ’ ह्या उत्तरानें ते अधि-कच खवळले. तोंडास येईल तें बोलले आणि अखेरीस ‘ मी आजपासून तुझें तोंड पाहणार नाहीं, माझा एक मुलगा मेला असेंच मी समजेन ’ असें म्हणून लागलीच त्यांनीं आपला कोट चढविला, रुमाल डोक्यास बांधला व ते धारला रवाना झाले !

## विकार आणि विचार : ६३ :

विकार प्रबळ झाला, विचारास फाटा देऊन माणूस विकाराच्या आहारीं गेला कीं त्याला पश्चात्तापाची पाळी यावयाचीच.

फेब्रुवारी १९१६ त आमच्या ऑफिसमध्यें श्रीयुत सखाराम दौलतराव राजे यांची हेड्क्लार्क म्हणून नेमणूक झाली. वेतन व अधिकारानें ते मजपेक्षां

वरच्या श्रेणींत होते. हेडक्लार्क म्हणून द्यावयाचा तो योग्य मान मी त्यांना देत असे. ज्या कामाकरतां म्हणून त्यांची नेमणूक झाली होती त्याला मात्र ते तितकेसे पात्र नव्हते, ह्यामुळें कचेरींत त्यांचा जेवढा वचक असावा–जेवढा प्रभाव पडावा–तेवढा पडत नसे. गृहस्थ स्वभावानें गरीब व रंगेल, वयानें साठीच्या जवळपास, शरीरानें प्रशस्त, शिक्षण व सामान्य ज्ञानांत यथा तथा आणि बुद्धीनें मंद होता. मिलमध्यें तयार होणाऱ्या मालाचीं रोजचीं व महिनमहा पत्रकें तयार करण्यापलीकडे इतर कामाची विशेष माहिती त्यांना नव्हतीच म्हटलें तरी चालेल. त्यामुळें हाताखालच्या लोकांवर त्यांचा प्रभाव पडणें शक्यच नव्हतें. कसेंहि असलें तरी शिस्त म्हणून त्यांना योग्य तो मान देणें मी माझें कर्तव्य समजत असें. माझा आणि मॅनेजरचा संबंध विशेष येई, कारण हिशेबासंबंधी सर्व जबाबदारी मजवर असल्यानें त्यासंबंधीचे सर्व कागदपत्र मजकडेच येत आणि मलाच ते निकालांत काढावे लागत. माझा आणि मॅनेजरचा आपल्या स्वतःपेक्षां अधिक संबंध येणें श्री. राजे ह्यांना खपत नव्हतें. त्यामुळें माझ्यासंबंधानें त्यांच्या मनांत तेढ व असूया घर करूं लागली. ह्यांत आणखी भर घालावयास नवीनच आलेले स्टोअर-कीपरहि त्यांना थोडाबहुत हातभार लावीत असावे. श्रीयुत राजे ह्यांच्या कामांतील गलथानपणा व अव्यवस्था दिवसेंदिवस अधिकाधिक नजरेस येत गेल्यानें ता. १८ नवंबर १९१६ रोजीं मॅनेजर ह्यांनीं स्टोअर्स व स्टेशनरी संबंधीचे सर्व कागदपत्र हेड् क्लार्ककडे न जातां परभारें मजकडेच येत जावे असा हुकुम काढला. श्रीयुत राजे ह्यांना ह्या हुकमानें मजविषयीं अधिकच वैषम्य वाटूं लागलें. त्यांच्या अधिकारांत मी हस्तक्षेप करीत आहे असा त्यांचा ग्रह झाला; त्यामुळें आपला कमीपणा झाल्यासारखें त्यांना वाटलें. स्टोअरकीपरनेंहि त्यांत भर घातली असावी. मॅनेजरांना कांहींतरी समजावून मीच मुद्दाम असा हुकुम काढविला अशी त्यांची समजूत झाली. हा हुकुम पाहून राजेसाहेबांचें पित्त खवळलें. त्यांच्यांतील असूयेनें पेट घेतला आणि ते माझ्याशीं पूर्वीप्रमाणें वागतनासे झाले.

एके दिवशीं ( ता. १९ डिसेंबर १९१६ ) मी ऑफिसला येतांच राजेसाहेबांनीं कांहींतरी कुरापत काढली व माझ्याशीं भांडावयाचा चंग बांधला. मला प्रथम त्याचा अर्थच कळेना. मी त्यां समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. मूळचे थंड प्रकृतीचे असूनहि राजेसाहेब त्या दिवशीं इतके भडकले कीं मी स्तिमितच झालों ! माझें म्हणणें ऐकावयालाच ते तयार नव्हते. मी विलक्षण संतापी, परंतु त्या दिवशीं माझा संताप मी कसा आवरूं शकलों हें माझें मलाच कळेना. मॅनेजरनीं तो हुकुम काढण्यांत माझा काडीइतका देखील संबंध नव्हता. हें नानाप्रकारांनीं राजे ह्यांना समजावण्याचा मी प्रयत्न केला परंतु त्यांचा संताप त्या दिवशीं इतका अनावर झाला होता—इतका पराकोटीला पोंचला होता—कीं त्या संतापाच्या भरांत त्यांनीं आपल्या टेबलावरील रूळ मजवर उगारला ! इतकें झालें तरी मी थंडपणेंच त्यांना म्हटलें ‘ मिस्टर राजे, तुम्ही ऑफिसमधील मुख्य अधिकारी, तुम्हांला हें वर्तन शोभत नाहीं. तथापि तुम्हाला खुमखुमीच असेल तर आपली हौस अवश्य भागवून घ्या; पण लक्ष्यांत ठेवा कीं ह्याचे परिणाम तुम्हांला भोगावे लागतील. ’ इतकें म्हटल्यावर मात्र राजेसाहेब थोडे भानावर आले व त्यांनीं आपला हात मागें घेतला. ऑफिसमधील सर्व मंडळी हा हास्यास्पद प्रकार गंभीरतेनें पाहात होती !

हा अपमान मला मुळींच सहन होण्यासारखा नव्हता. मॅनेजर ऑफिसमध्यें येतांच हा सर्व प्रकार मी त्यांच्या नजरेस आणिला. राजे ह्यांचा संताप आतां बराच निवळला होता. विकाराची जागा विचारानें घेतली होती. मॅनेजरसमोर त्यांनीं आपली चूक कबूल केली, खेद प्रगट केला व पुन्हा असें न करण्याची हमीहि दिली. परंतु तेवढ्यानें माझें समाधान झालें नाहीं. राजे ह्यांनीं केलेल्या माझ्या अपमानाबद्दल माझी क्षमा मागितली पाहिजे असा मी आग्रह धरिला. मॅनेजरकडून त्यांना तशी समज मिळाली. राजे ह्यांनीं एक दिवस विचार करण्यांत घालविला आणि दुसऱ्या दिवशीं ( ता. २१ डिसेंबर १९१६ ) सकाळीं आपल्या एका स्नेह्याला बरोबर घेऊन ते माझ्या

घरीं आले व आपल्या गैरवर्तनाबद्दल त्यांनीं माझी सपशेल क्षमा मागितली. पुढें सात आठ वर्षें मात्र राजेसाहेब ह्यांचें वर्तन माझ्याशीं फारच उत्तम होतें इतकेंच नव्हे, तर अनेक प्रसंगीं मलाच त्यांच्या मुख्य सल्लागाराचा मान मिळत असे !

## आपला धर्म : ६४ :

'जोडोनियां धन उत्तम वेव्हारें
उदास विचारें वेच करी ॥'

—तुकाराम.

माणसाची श्रीमंती धनाच्या परिमाणापेक्षा अंतःकरणांतील औदार्याच्या परिमाणावरूनच मोजली पाहिजे. तारीख १५ जुलई १९१७ ची गोष्ट. सकाळीं चहा घेऊन नुकताच मी वर्तमानपत्र वाचीत बसलों होतों. साधारण बारा तेरा वर्षांचीं दोन मुलें मजकडे आलीं. ह्या दोन्ही मुलांना मी माझ्या शालकांकडे पाहिलें होतें. कोणीकडे आलां म्हणून चौकशी करतां त्यांच्या-पैकीं एकानें आपल्या अश्रूंनींच उत्तर दिलें ! दुसरा स्तब्धच होता. त्याच्या अश्रूंनीं मीहि गोंधळलों. भावनेचा पहिला भर ओसरल्यावर थोडासा गोंजारून मजकडे येण्याचें कारण पुन्हा मी त्याला विचारलें. रडत रडतच तो म्हणाला 'मला शाळेंत शिकावयाचें आहे. तुम्ही मला आपल्या घरीं ठेवून घ्याल का ?' हीं मुलें माझ्या शालकाकडे शिकावयास होतीं हें मला माहीत होतें, म्हणून मी त्याला म्हटलें 'तुम्ही बापूभय्याकडे होतां ना ? मग आतां मजकडे कां येऊं चाहतां ? मी तुम्हाला माझ्यायेथें ठेवून घेतलें तर त्यांना वाईट नाहीं का वाटणार ?' तो म्हणाला 'त्यांनीं कालपासून आम्हाला बंद केलें आहे.' मी विचारलें 'कां ?' 'उगीच' तो म्हणाला मी म्हटलें 'उगीच कारणावांचून कोण बंद करील ? तुम्ही त्यांचा कांहीं अपराध केला असेल.' त्या मुलानें पुन्हा डोळ्यांत आसवें आणून म्हटलें 'नाहीं, आम्ही कांहीं देखील गुन्हा केलेला नाहीं, परंतु उद्यांपासून 'तुमची

व्यवस्था तुम्ही पहा ' असें त्यांनीं आम्हांस सांगितलें आहे. ' मला याचा अर्थ कळेना. मुलें गरीब व सालस आहेत हें मला माहीत होतें. अशा मुलांना आमच्या शालकांनीं आपल्या घरून जा म्हणून सांगावयास काय कारण झालें असावें याचा मला कांहींच उलगडा होईना. त्यांना ह्याचें कारण विचारण्यांत अर्थ नव्हता, कारण त्यांच्याकडून सरळ उत्तर मुळींच मिळालें नसतें याचा मला नित्याचा अनुभव होता.

मला त्या मुलांची कींव आली. होतकरू, आईबाप नसलेलीं लहान मुलें शिकावयाची उत्कट इच्छा असून केवळ गरीबीमुळें आणि मदतीच्या अभावीं वांया जाणार ही कल्पना मला सहन होईना. मी श्रीमंत नव्हतों. आपला कांहीं संबंध नसलेलीं मुलें पोसण्याला मी जहागिरदार, इनामदार अथवा धनाढ्य शेट सावकारहि नव्हतों. मला त्यावेळीं अवघे नव्वद रुपये पगार मिळत होता. तिन्हाईत मुलांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण होईपावेतों पोसण्याइतकें सामर्थ्य माझ्यामध्यें नव्हतें; परंतु या होतकरू मुलांना त्यावेळीं आश्रय दिला नाहीं तर त्यांचें आयुष्य फुकट जाईल ही तळमळ मनास पोळूं लागली. मला स्वस्थ बसवेना. अशा कामीं मदत करणें, अशा गरजवंतांना–उद्योन्मुख होतकरू तरुणांना–हात देणें हाच आपला धर्म होय असें माझी मनोदेवता मला सांगूं लागली. आपल्यालाच आणखी एकादा मुलगा असता तर आपण त्याची नसती का कशीबशी सोय केली, असा विचार मनांत प्रबल होऊं लागला. पण ह्या कामीं मी एकटाच निर्णयात्मक उत्तर देऊं शकत नव्हतों. घर–संसार-आम्हा दोघांचा–पतिपत्नीचा–होता. असली बिकट जबाबदारी शिरावर घ्यावयाची तर त्या कामीं पत्नीचा सल्ला घेणें अत्यावश्यक होतें; म्हणून मी तिला बाहेर बोलाविलें व त्या मुलांची सर्व हकीकत तिच्या कानांवर घातली. तीहि माझ्या विचाराशीं उदार मनानें सहमत झाली. तिची संमति मिळतांच मी त्या पहिल्या मुलाला म्हटलें ' मी तुला माझ्या येथें ठेवून घेईन परंतु कांहीं अटी तुला कटाक्षानें पाळाव्या लागतील. पहिली गोष्ट ही कीं तुला माझ्यायेथील शिस्तीचें कडक पालन करावें लागेल.

आपल्या अभ्यासाव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि भानगडींत तुला पडतां येणार नाहीं आणि आम्हीं जें जाडेंभरडें, शिळेंपाकें अन्न खाऊं तें तुला खावें लागेल.' त्या मुलानें हें सर्व मान्य केलें आणि त्याच दिवसापासून तो माझ्या कुटुंबांतील एक घटक बनला. इंग्रजी दुसरींत अथवा तिसरींत असणारा हा मुलगा बी. ए. होईपावेतों मजकडेच राहिला. तो आतां मध्यभारतांत नायब तहसिलदाराच्या हुद्यावर आहे व सुखानें आपला संसार करीत आहे.

## समाज-सवा : ६५ :

संपूर्ण जीवन हें मानवजन्माचें अंतिम होय. व्यक्ति, कुटुंब, समाज, राष्ट्र व मानवता ह्या संपूर्ण जीवनाच्या मर्यादा होत. शिक्षण, संस्कार, व जागृति ह्यांनीं हळू हळू व्यापक होत जाणारी दृष्टि असली तर तिच्या टप्प्यांत ह्या मर्यादा येतात व त्या अनुरोधानें माणूस आपलें कार्यक्षेत्र वाढवीत जातो. अशा तऱ्हेनें जीवन संपूर्ण करणें हेंच जीवितकर्तव्य होय.

वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाला थोडी स्थिरता लाभतांच कर्तव्यदृष्टीनें मी समाजसेवेला सुरवात केली. माझी करमणूक, माझा व्यायाम, माझें रीक्रिएशन सर्व कांहीं समाजाची बनेल ती निष्ठापूर्वक सेवा, हेंच मी मानीत आलों आहें आणि त्यांतच मला अपार आनंद अनुभवण्यास मिळत आहे.

संयुक्त-गौड-सारस्वत परिषदेचें अधिवेशन एप्रिल १९१६ मध्यें इंदुरास व्हावयाचें असल्यानें ह्या परिषदेच्या कामीं मी आपणास गुंतवून घेतलें. परिषद यशस्वीपणें पार पडली आणि त्या उत्साहांतूनच श्रीयुत मेघश्याम भगवंत रेगे, विश्वनाथ गणपत दळवी, केशव भास्कर कोचरेकर, माधव गोविंद केकरे यांच्या प्रेरणेनें ' सारस्वत ब्रदरहुड ' ह्या संस्थेचा जन्म झाला ( ७-५-१९१६ ). तिचें चालकत्व मी आणि केशवराव कोचरेकर यांजवर येऊन पडलें. परंतु ही संस्था अल्पजीवि ठरली. तीन वर्षांनीं तिच्यांतूनच ' सारस्वत मित्रमंडळ ' या संस्थेचा उगम झाला ( ता. १४

जुलई १९१९ ). ह्या संस्थेंत श्रीयुत मे. भ. रेगे, केशवराव कोचरेकर, न. ग. ऊर्फ मन्याभाऊ कोठारी, मा. गो. केकरे, अनंत गणेश शेलेंकर, नारायण आबाजी गीरकर, नारायण यशवंत वागळे इत्यादींच्या सहकार्यानें आम्ही पुढें पंधरा वीस वर्षे पुष्कळ उपयुक्त कामें केलीं. परंतु एवढ्यानें माझी भूक भागेना. कारण ह्या संस्थेचें कार्यक्षेत्र अगदींच मर्यादित होतें. इंदूर परस्पर सहकारी पेढी ह्या नांवाची सहकारी तत्वांवर स्थापन झालेली एक संस्था किल्ल्यावर काम करीत असल्याचें मला कळलें. ह्या संस्थेंत काम करावयास मला भरपूर वाव मिळूं शकेल असें वाटल्यावरून सन् १९१८ मध्यें मी ह्या संस्थेचा सभासद झालों व तिच्या कामांत विशेषत्वानें लक्ष घालूं लागलों आणि तेव्हांपासून आजपावेतों ह्या संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर व इतर निरनिराळ्या पदांवर राहून मी तिची यथाशक्ति सेवा करीत आलों आहे. तदनंतर हळू हळू इंदुरांतील इतरहि अनेक संस्थांची* सेवा करण्याची संधि मला लाभली. हीं कामें करीत असतां मला अनेक कटु अनुभव आले. व्यक्ति-व्यक्तींत प्रामाणिक मतभेद हे असणारच. हे प्रामाणिक मतभेद बाजूस ठेवले तरीहि इतर निरनिराळ्या बाबतींत कित्येक वेळां अनिष्ट प्रकार नजरेस येत गेल्यानें कित्येक कार्यकर्त्यांवर मला अनेक वेळां प्रखर टीका करावी लागली, कित्येकांवर कठोर मर्माघात करावे लागले, अनेकांशी वाईटपणा पत्करावा लागला, अनेकांचीं मनें दुखवावीं लागलीं आणि अनेक अपमानहि सहन करावे लागले. परंतु केवळ कर्तव्यावर दृष्टि ठेवूनच मी या सर्व गोष्टी सहन केल्या.

---

*( १ ) सारस्वत ब्रह्म-समूह. ( २ ) महाराष्ट्र ब्राह्मण सभा, ( ३ ) इन्दोर जनरल लायब्ररी, ( ४ ) महाराष्ट्र ब्राह्मण सहाय्यक पेढी, ( ५ ) इन्दोर स्वदेशी को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स, ( ६ ) इन्दोर सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, ( ७ ) इन्दोर प्रीमियर को-ऑपरेटिव्ह बँक, ( ८ ) हुकुमचंद मिल्स कर्मचारी परस्पर सहकारी संस्था, ( ९ ) महाराष्ट्र साहित्य सभा, ( १० ) महाराष्ट्र ब्राह्मण सभा कुटुंब सहाय्यक द्रव्यनिधि ( ११ ) कोचरेकर स्मारक बाल-मंदिर, ( १२ ) सहकारी उपनगर मंडल, ( १३ ) मध्यभारत केन्द्रीय सहकारी संस्था, ( १४ ) मध्यभारत मराठी साहित्य परिषद इत्यादि.

ह्या अनेक संस्थांतून काम करीत असतां खऱ्या सेवाभावाचा बहुतांशीं मला अभावच दिसून आला ! कोणाचेंहि अंतःकरण दुखविण्याची किंवा कोणावरहि वैय्यक्तिक आरोप करण्याची माझी इच्छा नाहीं, तथापि मला अत्यंत खेदानें म्हणावें लागतें कीं निरनिराळया संस्थांतून ज्या अनेक कार्य-कर्त्यांशीं माझा संबंध आला त्यांपैकीं बहुसंख्य व्यक्तींच्या ठायीं स्वतंत्र व निर्भीड विचारसरणी, कर्तव्यनिष्ठा, सेवाभाव, निःस्सीम निःस्वार्थता यांचा अभावच प्रकर्षे करून प्रत्ययास आला !! कार्यक्षम, निरलस, निष्ठावंत, स्वार्थत्यागी, प्रामाणिक व सेवाभावी कार्यकर्ते आपल्या संस्थांस विपुलतेनें लाभतील तेव्हांच आपल्या राष्ट्राचा खरा भाग्योदय जवळ येईल.

## हृदय-पालट : ६६ :

ह्या आठवणींत मला वडिलांकडून आलेलीं चार पत्रें दिलीं आहेत. अगदीं लहानपणापासून तों मी घर सोडून निघून जाईपावेतों वडिलांची माझ्याशीं फार कठोरपणाची वागणूक राहिली. तोंवर त्यांना माझ्यांत दोषां-व्यतिरिक्त कांहीं दिसलेंच नाहीं. परंतु कोणत्याहि स्थितींत घराकडे परत न वळण्याचा माझा निश्चय मी कांटेकोरपणें टिकविणार हें दिसून आल्यावर व कांहीं वर्षांचा काळ लोटल्यावर मजमध्यें दोषांबरोबर कांहीं गुणहि आहेत हें त्यांना उमगूं लागल्याची साक्ष हीं पत्रें देत आहेत, इतकेंच नव्हे तर ज्या पितृवात्सल्याची खरी वाण मला बालपणीं भासली त्या वात्सल्याच्या छटा उशीरां कां होईना पण ह्या पत्रांतून जागजागीं उमटल्या आहेत, आणि म्हणून हीं पत्रें देण्याचा मोह आवरत नाहीं. वडिलांच्या घराकडे पाठ फिरविल्यास सन १९२० अखेर चौदा-पंधरा वर्षे झालीं होतीं. आंतरिक प्रक्रियेनें मजबद्दलची त्यांची दृष्टि निवळूं लागण्यास इतकीं वर्षे लागलीं !

[ १ ]

'धार, २९-१-१८

अनेक आशिर्वाद उपर......माझी प्रकृति पूर्वी दहा वर्षाखालीं ज्या आजाराचें ऑपरेशन करून घेतलें होतें तोच आजार पुन्हा उत्पन्न झाल्यामुळें चांगली राहात नाहीं. डॉक्टरचे मतें पुन्हा ऑपरेशन् करून घेणें योग्य. तत्राप माझ्या प्रकृतिमानावरून व मनाच्या स्थितीवरून ऑपरेशन् करून घेण्यांत हितकर परिणाम होईल किंवा नाहीं याचा भरंवसा नाहीं. तरी उपाय हा केलाच पाहिजे......परिणाम इष्ट झाला नाहीं तर मनांतील हेतु मनांत राहून जातील व तसें होणें निदान मला बरें वाटत नाहीं. करितां मी येथून ऑपरेशनकरतां निघून जाण्याचे पूर्वी मला भेटून असलेला व्यवहार समजून घेण्याची व्यवस्था करण्यांत यावी.

वेळेनुसार झालेल्या खटक्यानें मनाचा झालेला निश्चय अनेक कारणांनीं ढीला पडून आज हें पत्र मुद्दाम लिहीत आहें. पूर्ण विचार करून काय तें करावें. आज बिछान्यावर पडून राहण्यासारखी माझी तब्रियत आहे असें मात्र नाहीं. सबब न गडबडतां आपल्या सवडीनें भेटून जाण्याचें करावें...... माझ्या आजाराबद्दल अद्याप घरांतील कोणा मंडळीस माहीत नाहीं. भेटीअंतीं सर्व कळेल......कळावें हे आशिर्वाद.'

[ २ ]

'धार, २६-१०-१९१८

आशिर्वाद उपर,

...मला सुचविणें म्हणून इतकेंच कीं आपली प्रकृति मूळची अशक्त असून घरच्या स्वतःच्या व इतर मंडळीकरतां आपण उन्हातान्हांतून हल्लीं अतिश्रम करीत आहांत हें चांगलें नाहीं. आपले हातून लोकांस होईल तितकी मदत केली पाहिजे हें खरें, तत्राप आपली प्रकृति पाहून मदत करणें योग्य. यासाठीं तुम्ही स्वतः आपले प्रकृतीस संभाळून लोकांचे मदतीकडे लक्ष दिल्यास बरें होईल....'

[ ३ ]

' धार, १-५-१९

अनेक आशिर्वाद उपर. आपलें पत्र बरेच दिवसांत नाहीं तें यावें. मागील एक दोन पत्रांत मागितलेला खुलासा आलेला नाहीं तो मिळावा अशी माझी इच्छा आहे. टाटा मिलच्या घेतलेल्या शेअर्सकरतां आपल्या कडची किती रकम खर्च झाली तो अंक व मार्गे डिसेंबर महिन्यांत नागपूरहून मागविलेल्या संत्र्यांच्या कामीं किती खर्च आपणांस आला तो अंक व थोडे दिवसांखालीं चि. सौ. आनंदीबाई वगैरे मंडळीस बऱ्हाणपुरीं जाऊन येथें रवाना करीपर्यंत जो खर्च आपल्यास आला असेल त्या सर्वांचा अंक मिळोन एक टांचण आपल्या-कडून मला मिळावें अशी इच्छा आहे.

वरील खुलासा मागविला म्हणोन वाईट वाटण्याचें कारण नाहीं. तुम्ही आपल्या प्राप्तींतोन खर्च करावा आणि बाकीच्यांनीं स्वस्थ बसावें हें मला बरें वाटत नाहीं. यासाठीं मुद्दाम लिहिलें आहे...वरील खुलासा करण्यास अनमान करूं नये.

एप्रिल महिन्याची रकम ( फॅमिली फंड ) आपल्याकडून आली नाहीं. खर्चाचे अडचणीमुळें आली नसावी. आपण चुकणार नाहीं अशी खात्री आहे. ...कळावें हे आशिर्वाद. '

[ ४ ]

' धार, २-११-२०

अनेक आशिर्वाद विशेष. आपली प्रकृति मूळची क्षीण, त्यांत कामाची दगदग. तशांत हल्लीं ज्वर येऊन प्रकृति नादुरुस्त जाहली आहे. शीर सलामत असेल तर पगड्या पंचायशीं मिळूं शकतील. महिना दोन महिने विश्रांति घेऊन चांगल्या हवेवर राहिल्याशिवाय प्रकृति सुधरण्याचा असंभव आहे. माझ्या मतें तुम्ही दोन तीन महिन्यांची रजा घेऊन स्वस्थ चांगल्या हवेच्या ठिकाणीं कोणचीहि दगदग न करतां विश्रांति घ्यावी....आपल्यास

विश्रांतीच्या दिवसांत होणाऱ्या खर्चाची अडचण विलकुल भासूं नये. त्या खर्चाची रु. ५०० पर्यंतची तजवीज करून ठेवली आहे. आपलें उत्तर येतांच रक्कम आपल्याकडे पोहोंचती करण्याचें करीन.... '

## भजनी-मंडळ : ६७ :

' काय धोविलें बाहेरी । मन मळलें अंतरीं ॥
सांडी व्यापार दंभाचा । शुद्ध करी रे मन वाचा ॥
... ...
काय बा करिसी टाळ आणि मृदंग
जेथें पांडुरंग रंगला नाहीं ॥
—तुकाराम.

दिवसाच्या चोवीस तासांपैकीं निदान कांहीं क्षण तरी ईश्वरचिंतनांत घालविणें आवश्यक आहे. चित्तशुद्धीचें तें सुलभ साधन आहे असें विचारवंत भाविक मानतात. मात्र त्यासाठीं ज्या मार्गाचें अवलंबन केलेलें बहुशा आढळतें त्यांत खऱ्या ईश्वरचिंतनापेक्षां त्याचें अवडंबरच अधिक असतें !

ईश्वरभक्तीकडे माझा कल कमीच. मी कट्टर नास्तिकांत अथवा निरीश्वरवाद्यांत मोडत नाहीं. तथापि भजन पूजनाकडे माझा ओढा कधींच नव्हता. माझे मित्र श्री. केशवराव कोचरेकर हे पिंडानें आस्तिक होते. भक्तिमार्गाकडे त्यांचा विशेष ओढा असे. त्यांच्या सान्निध्यांत आल्यापासून निरनिराळ्या विषयांवर चर्चा करण्यांत ज्याप्रमाणें आम्ही वेळ घालवीत असूं त्याप्रमाणेंच ईश्वरभजनांत निदान आठवड्यांतून एक दिवस तरी थोडा काळ घालवावा ह्या सदच्छिनें प्रत्येक गुरुवारीं तास दीड तास भजन करण्याचा परिपाठ त्यांनीं सन १९१८ च्या प्रारंभीं सुरू केला. त्यांचें मन दुखवूं नये म्हणून व ' तुमचा विश्वास नसला तरी अनुभव घेऊन तर पहा ' ह्या त्यांच्या आग्रहाला मान देण्यासाठीं मीहि दर गुरुवारीं एकतारी व चिपळ्या घेऊन त्यांच्यावरोबर भजन करूं लागलों. ते भजनांत रंगून जात, व तल्लीन होत.

परंतु माझें मन मात्र चौफेर नाना विचारांत भटकत राही! हळू हळू आम्हाला आणखी भक्त येऊन मिळाल्यानें आमचें भजनीमंडळ बरेंच फुगलें व त्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला! आमच्या दोघांच्या भजनांत जी शुचिता, भव्यता, उत्कटता व गांभीर्य अनुभवास येई त्याचा लोप झाला व आमच्या भजनीमंडळाला गाण्याच्या बैठकीचें स्वरूप येत चाललें! भजनांतील उत्कटता, भाविकता, एकतानता, गांभीर्य सर्व कोठल्या कोठें विरून गेलें!!

ह्याच भजनी मंडळांतून पुढें कृष्णजन्माष्टमीच्या सप्ताहाचा आणि वार्षिक उत्सवाचा उगम झाला. एक दोन वर्षे हा उत्सव भजनी मंडळाचे सभासद स्वतःच्या प्राप्तींतून वर्गणी गोळा करून, केवळ खानगी स्वरूपाचा उत्सव म्हणून, करीत असत; परंतु पुढें पुढें त्याला सार्वजनिक बाजारी स्वरूप येत चाललें! ह्या वातावरणाचा आम्हा दोघांसहि उबग आला होता. परंतु स्नेहांत बिघाड येऊं नये ह्या हेतूनें कांहीं वर्षे ह्या उत्सवाशीं आम्ही दोघांनीं नाममात्र संबंध ठेविला होता; परंतु त्याचें बाजारी, नाटकी व दांभिक स्वरूप वाढतच चालल्याचें पाहून शेवटीं ह्या उत्सवांतून आम्ही दोघांनींहि सर्वस्वी आपलें अंग काढून घेतलें!

## ' लोभ मूलानि पापानि ' : ६८ :

सन १९१९ च्या प्रारंभीं अकाउन्टन्टच्या जागेवरून ऑफिस सुपरिन्टेन्डन्टच्या जागेवर माझी बढती झाली. ह्या जागेचा चार्ज घेतल्यानंतर एकेका खात्याची तपासणी करण्यास मी सुरवात केली. प्रथम स्टोअर्सची तपासणी झाली. तेथें अनेक अपप्रकार आणि लबाड्या उघडकीस आल्या व त्याचा परिणाम स्टोअरकीपरला कमी करण्यांत झाला. साहजिकच ह्याची धडकी इतर खात्यांतून काम करणारांनाहि बसली. ह्यानंतर दोन चार दिवसांनीं मिलचा टाइमकीपर मजकडे आला व त्याचें खातें तपासावयास मी केव्हां येणार म्हणून मला विचारूं लागला. 'मी पूर्वसूचना देऊन येणार नाहीं. मला सवड मिळेल तेव्हां मी येईन ' असें उत्तर मी त्याला दिलें.

माझी रात्रीं झोंपावयाची वेळ नऊ आणि साडेनऊच्या दरम्यानची असे. नऊ वाजतांचे सुमारास आम्ही आमचे बाहेरील दरवाजे बंद करून घेत असूं. तारीख ८ फेब्रुवारी १९१९ रोजीं रात्रीं नित्याप्रमाणें दरवाजे बंद केल्यानंतर पांच एक मिनिटांनीं बाहेरचें दार वाजलें. कोण आहे हें पाहण्याकरतां मी दार उघडलें व पाहतों तों तोच आमच्या मिलचा टाइमकीपर! ऑफिसच्या कामाकरतां मी कधींहि कोणाहि इसमास माझ्या घरीं बोलावीत नसें, तेव्हां हा गृहस्थ इतक्या रात्रीं मजकडे कां आला ह्याची मला कांहींच कल्पना येईना. मी त्याला वर बोलाविलें आणि अशा भलत्या वेळीं येण्याचें कारण त्याला विचारलें. 'उगीच सहज आलों' असें तो बोलला, परंतु लागलीच तो पुढें म्हणाला 'आपसे कुछ खानगी और कॉनफिडेन्शिअल् बातें करनी हैं.' कावऱ्या बावऱ्या मुद्रेनें इकडे तिकडे पाहात तो पुढें म्हणाला 'आसपास और तो कोई नहीं है?' मी म्हटलें 'कोई नहीं.' नंतर त्यानें लहानशा पगारांत माझें कसें भागतें, माझा खर्चवेच कसा चालतो ह्याची चौकशी केली. मिळत असलेल्या प्राप्तींत माझा संसार सुखानें चालत असल्याचें मी त्याला सांगितलें. 'नहीं साब, मैं जानता हूं किस तकलीफसे कम आमदनीमें आपको गुजारा करना पडता होगा. आपकी यह तकलीफ मिटानेके गरजसे मैं आज इसवख्त आपके पास आया हूं.' असें म्हणून पांचशें रुपयांच्या नोटा काढून त्यानें माझ्या टेबलावर ठेवल्या. त्याचे हे शब्द ऐकतांच व त्या नोटा पाहतांच माझें पित्त खवळलें. संतापानें लाल होऊन मी म्हणालों 'तुमने क्या समझा मुझको? मुझे ऐसी बात कहनेमें तुम्हे जराभी शर्म नही आती? इस जालमें फसाके तुम मुझे मोल लेना चाहते हो? निकलो, अभीके अभी तुम यहांसे चले जाव. निकलो, उठो.' ह्या अकल्पित अपेक्षाभंगानें तो सर्दच झाला. आपला डाव सर्वस्वी फसल्याचें त्याच्या ध्यानीं आलें. तरीहि पैसे स्वीकारण्याविषयीं तो बेशरमपणें मला आग्रह करीतच होता. दोन श्रीमुखांत भडकवून त्याला तेथून घालवून द्यावें असें मला वाटलें. परंतु तें माझ्या शक्तीबाहेरचें काम होतें. कारण तो गृहस्थ

चांगला धट्टाकट्टा व माझ्याहून तिप्पट बलवान् होता. असला अतिप्रसंग करण्याचें धाडस केलें असतें तर त्यानें एका क्षणांत माझी मेंदीच केली असती. तथापि पाप भित्रें असतें हें मला माहीत होतें आणि म्हणून धीर करून मी कडाडलों ' तुम जाते हो या नहीं ? वरना, तुमको जबरदस्ती निकाल देना पडेगा और इसका नतीजाभी तुमको भुगतना पडेगा. ' तो गृहस्थ गयावया करून म्हणाला ' साहब मेरी गल्ती हुई. मुझे माफ करना. मैं जाता हूं लेकिन् बराय मेहरबानी इसकी जिक्र किसीसे करना नहीं, वरना इन्दोरमेसे मुझे मूंह काला करना पडेगा. ' मी म्हटलें ' वह तुम जानो, लेकिन् अभी यहांसे नीचे उतरो. ' इतकें म्हटल्यावर स्वारी एवढेसें तोंड करून जिना उतरून गेली व माझा जीव खालीं पडला.

दुसऱ्या दिवशीं प्रथम मॅनेजरच्या बंगल्यावर जाऊन ही सर्व हकीगत मी त्यांना निवेदन केली आणि नंतर मी ऑफिसमध्यें आलों तों सदरहु इसमाची चौकशी करण्याकरतां त्याच्या घरून एक गृहस्थ मजकडे आले व आदल्या रात्रीपासून तो घरीं न आल्याचें सांगूं लागले. टाइमकीपरच्या ऑफिसमध्यें चौकशी करतां सकाळपासून तो कामावर आला नसल्याचें समजलें. त्या इसमानें पुन्हा मिलमध्यें तोंड दाखविलें नाहीं. माझ्या घरून निघाल्यावर आपल्या घरीं न जातां तो परस्पर पसार झाला होता !

## मृत्यूच्या दाढेंतून : ६९ :

माझ्या पत्नीच्या प्रसूतीचे दिवस जवळ आले होते. पूर्वीच्या अनुभवानें मी आतां शहाणा झालों होतों, म्हणून ह्यावेळीं घरींच बाळंतपण करावयाचें ठरविलें होतें. रविवार, ता २ मे १९२० चा दिवस. रात्रीं साडेदहा, अकराची वेळ. पत्नीला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. नर्सला बोलावणें पाठविलें, परंतु ती येण्यापूर्वींच पावणेबारा वाजतां बेशुद्ध अवस्थेंतच माझी पत्नी प्रसूत झाली. घरांत बाईमाणूस कोणीच नव्हतें. पत्नीची ही अवस्था ऐकतांच वाड्यांतील सात आठ बायका गोळा झाल्या परंतु नुसतें ' अग बाई आतां

काय करावं ? आतां काय करावं ? ' अशी काव काव करण्यापलीकडे कोणीहि जवळ जाऊन तिला शिवून कांहीं मदत करण्यास पुढें सरसावेना ! पत्नी बेशुद्धावस्थेंतच जमिनीवर निःश्चेष्ट पडली होती आणि त्या बाया माणुसकी सोडून नुसत्या काव काव करीत होत्या ! मला मनस्वी चीड आली. रागारागानेंच मी स्वतः पुढें झालों, पत्नीला उचलून खाटेवर निजविलें आणि जमलेल्या बायांस गर्दी कमी करण्यास थोड्या कठोर शब्दांनींच सांगून प्राथमिक उपचारास सुरवात केली. थोड्या वेळानें ती शुद्धीवर आली. नर्सहि इतक्यांत येऊन पोंचली आणि तिनें पुढील सर्व व्यवस्था केली.

नंतरचे दोन तीन दिवस बरे गेले, परंतु चवथ्या दिवसापासून ( ५ मे १९२० ) माझ्या पत्नीला ताप येऊं लागला. लेडीडॉक्टरला बोलाविलें. साधा ताप समजून तिनें उपचार चालू ठेवला, परंतु ताप मुळींच उतरेना. उलट तो वाढत वाढत १०५° पावेतों गेला. पांचव्या दिवशीं (९ मे १९२०) रात्रीं तिची प्रकृति घटकापळाची झाली ! लेडीडॉक्टर व इतर डॉक्टर्स सर्वांनीं हात टेकले व ते निराश होऊन परत गेले. मी आणि गंगाधर नाडकर्णी—घरीं शिकावयास राहिलेला मुलगा—बावरलेल्या मनःस्थितींत तिच्या उशाशीं अश्रु ढाळीत बसलों होतों ! रात्र सुखरूप पार पडेल अशी आम्हाला आशा नव्हती. सर्वत्र भयाण, भकास, अंधारमय भासत होतें. केवळ नशीबावर हवाला ठेवून आणि पुढील भवितव्याकडे दृष्टि लावून आम्ही सचिंत बसलों होतों. काळ आलेला स्पष्ट दिसत होता पण वेळ आली नव्हती !

पहाट झाली, साडेपांच वाजले, आणि कपडे करून मी तडक डॉक्टर प्रभाकर रामकृष्ण भांडारकर ( त्या वेळचे होम मिनिस्टर ) ह्यांच्या बंगल्यावर गेलों. होम मिनिस्टर झाल्यापासून ते कोठेंहि वैद्यकीय सल्लागार म्हणून जात नसत. परंतु आमच्या कुटुंबाशीं असलेला लोभ व ऋणानुबंध लक्षांत घेऊन ते तिला पहावयास आले. एकंदर परिस्थिति काळजीपूर्वक पाहिल्यावर ते स्पष्ट शब्दांत मला म्हणाले ' केस हाताबाहेर गेलेली आहे. असाध्य आहे. मी प्रयत्न करतों, परंतु निश्चित कांही सांगूं शकत नाहीं. तुमची बायको जगली

तर केवळ तुमचें भाग्य.' डॉ. भांडारकरांच्या पहिल्या दिवशींच्या प्रयत्नांनीं तापास थोडासा उतार पडून माझ्या पत्नीनें दोनप्रहरनंतर डोळे उघडले. आमच्या जिवांत जीव आला. माझ्या पत्नीला त्यांनीं काळाच्या दाढेंतून ओढून काढलें होतें! त्यांच्या कधींहि न फिटणाऱ्या उपकारांस आणि आमच्या दुथडी वाहणाऱ्या आनंदास सीमा नव्हती.

## त्रिकोण

: ७० :

सन १९२४ च्या सुरवातीस श्री. वेंगुर्लेकर यांचें–मी राहात असलेलें–घर त्यांना स्वतःला राहावयास पाहिजे असल्याकारणानें मला सोडावें लागलें व वेंगुर्लेकरांच्या शेजारींच असलेलें, माझे मित्र केशवराव कोचरेकर यांच्या मेहुण्यांचें श्री. गोविंद कृष्ण भेंडे यांचें, घर मीं भाड्यानें घेतलें. ह्या घरांत बऱ्याच गैरसोई होत्या; तथापि केशवरावांचा निकट सहवास ही फार मोठी सोय मला तेथें लाभणार होती, म्हणून इतर गैरसोईकडे मी तितकेसें लक्ष दिलें नाहीं. ह्या घरांत येऊन थोडे दिवस लोटले नाहींत तोंच एका मोरीच्या दुरुस्तीवरून भेंडे व मी ह्यांच्यांत बराच वाद माजला आणि तें प्रकरण शेवटीं बरेंच विकोपास गेलें. माझी बाजू रास्त व न्याय्य होती परंतु केवळ केशवरावांचे व माझे संबंध लक्ष्यांत आणून मी पडतें घेऊन भेंडे यांच्या जुलमी वर्तनाकडे काणाडोळा करीत होतों. ह्या वादांत कोचरेकरांची स्थिति मात्र केविलवाणी झाली होती. एकीकडे बहीण व मेहुणे व दुसरीकडे एक जिवलग मित्र अशा कोंडींत ते सांपडले होते. निःस्पृहपणें आणि निःपक्षपातीपणानें ते ह्या प्रश्नाकडे पाहावयास समर्थ होते, परंतु Blood is thicker than water हेंच शेवटीं खरें ठरलें व त्यांनीं ही कोंडी फोडण्याच्या हेतूनें मला खालील पत्र लिहिलें:—

'Strictly personal'

जुना तोफखाना, इंदोर
३० मार्च १९२५

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. दुर्दैवानें नाइलाजानें मला आज हें पत्र लिहावें लागत आहे याबद्दल वाईट वाटतें परंतु कर्तव्य म्हणून करणें प्राप्त आहे.

आज जवळ जवळ चार पांच महिने माझ्या घरच्या मंडळीचीं व आपलीं भांडणें चाललीं आहेत. त्याची सर्व हकीकत निरनिराळया sources नीं माझ्या कानांवर येत असूनसुद्धां मी एका पत्रापलीकडे जास्त कांहीं आपल्याशीं बोललों नाहीं किंवा लिहिलें नाहीं. कारण हें, कीं त्या बोलण्याचा किंवा लिहिण्याचा उपयोग होईल ही मला आशा नव्हती व नाहीं. माझ्या थोड्या वर्षांच्या आपल्या अनुभवांत एक गोष्ट चांगली निदर्शनास आली ती ही कीं आपण प्रश्नाची एकच बाजू पाहूं शकतां. दुसऱ्या बाजूमध्यें कांहीं सत्यांश आहे हें पाहण्याची आपल्याला सवय नाहीं. त्यामुळें आपला आणि कोणाचा बेबनाव झाला तर त्याला आपल्याकडून इतका छळ सोसावा लागतो कीं तिऱ्हाइतालासुद्धां त्या वर्तनाचें आश्चर्य वाटतें. माझ्या डोळयांसमोर अशीं दोन चार तरी उदाहरणें आहेत. तेव्हां ह्या बाबतींत लिहून दुसरी बाजू मी आपणाला समजावूं शकेन ही आशाच नव्हती. उलट चाललेला छळ वाढत्या प्रमाणावर चालेल ह्याबद्दल माझी खात्री होती व आहे.

दुसरें न लिहिण्याचें कारण थोडें sentimental होतें. मी आपणांस सांगून आपलें, माझें व माझ्या घरच्या मंडळीचें नातें लक्ष्यांत आणून देऊन आपल्या वागणुकीमध्यें फरक करावयास सांगणें, यांत काय मौज ? ज्या गोष्टी एकमेकांच्या sentiment करतां न सांगतां व्हावयास पाहिजेत त्या सांगून झाल्या, तरी त्यांत मोठेपणा कोणता ? मी जर आपल्या जागीं असतों तर इतका प्रसंगच येऊं दिला नसता. आपली मंडळी तीच माझी मंडळी, माझ्या घरच्या मंडळींना जो मान द्यावयाचा तोच आपल्या मंडळींना द्यावयाचा, आपल्या घरच्या मंडळीविरुद्ध अगदीं जवळच्या मित्रापलीकडे कोठेंहि ब्र काढावयाचा नाहीं, मग निंदा अथवा अपमानास्पद भाषा कोठची ! त्याच प्रमाणें आपल्या मित्राच्या मंडळीसंबंधानें करावयाचें, पण त्यांच्याविरुद्ध cudgle म्हणून घ्यावयाचें नाहीं, ही माझी मित्रत्वाची कल्पना. ही भाषा या पत्रापुरतीच नसून याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न मी करीत आलों आहे. अर्थात् थोड्याबहुत प्रमाणानें तशाच प्रकारची वागणुक मी माझ्या जवळच्या

मित्रांकडून अपेक्षिली तर त्यांत कांहीं असाधारण आहे असें मला वाटत नाहीं. मित्रानें मित्राला मात्र कुरवाळलें आणि तो ज्यांच्यावर प्रेम करतो किंवा जे त्याच्यावर प्रेम करतात त्यांना लाथाडलें तर त्या मैत्रींत रहस्य तें कोणतें !

तिसरें कारण suffering मध्यें एक प्रकारची मौज वाटते. आणि तें suffering ज्याला आपण आपला संबंध जडल्यापासून आपलें सर्वस्व मानीत आलों त्याच्याकडून आलें तर शेवटपर्यंत सहन करण्यांत विशेष मौज आहे.

माझ्या suffering ची कल्पना दुसऱ्याला कदाचितच होईल. मनाच्या व शरीराच्या ज्या स्थितींत शांततेची अत्यंत आवश्यकता त्याच वेळीं अंतःकरणांत इंगळ्या लागलेल्या. आनंद मिळावा व मानसिक स्थितींत फरक पडावा म्हणून इंदोरला आलों तों आता इंदूरपेक्षां दुसरें कोणतेंहि ठिकाणं कितीतरी बरें असें वाटूं लागलें. मित्रांच्या व घरच्या मंडळीच्या प्रेमानें मी सजीव झालों असतों तर त्याची ही स्थिति.

ज्याच्याजवळ राहण्यानेंच माझ्या health मध्यें कितीतरी फरक पडला असता त्याच्या घरीं जाऊन पूर्वीप्रमाणें मोकळेपणानें वागणें तर दूरच, पण त्याच्याशीं बोलणेंसुद्धां आज अशक्य झालें आहे.

घर तर मला नाहींसेंच झालें आहे. माझ्या मेहुण्यांना व बहिणीला मला तोंड दाखविण्याची लाज वाटूं लागली आहे. मी इंदूरला आल्यापासून एक दोन वेळां खेरीजकरून त्या घराची पायरीसुद्धां चढलों नाहीं. बरें, बंधूकडे राहावें तर तेथेंसुद्धां तोंड वर करावयाला जागा राहिली नाहीं. कशी राहील ? ज्याचे व माझे relations सगळ्या इंदूरला माहीत आहेत, ज्याच्याकरतां मी वेळेला माझ्या घरच्यां मंडळीला व इतर मित्रांना दूर केलें, ज्याच्याकरतां थोडासा अन्याय झालेला पाहून मी घरच्या मंडळीशीं भांडलों व जवळ जवळ सहा महिने अबोला धरला, ज्याला माझ्या घरीं शक्य तेवढी चांगली वागणुक मिळावी म्हणून अट्टहास केला, जो माझ्या जागीं माझ्या घरच्या मंडळीला असेल ही माझी आशा आणि ज्याच्या मैत्रीमध्यें मला एक प्रकारचा

गर्व वाटत असे त्यानेंच आपल्या सर्व परिवारासह माझ्या sentiment ची कोणत्याहि प्रकारें पर्वा न करतां माझ्या बहिणीला व मेहुण्याला—नव्हे माझ्या foster parents ना—वाटेल त्याप्रमाणें छळण्याला, त्यांची बदनामी करण्याचा विडा उचलला. अशा स्थितींत मला माझ्या घरच्या मंडळींत उजळ माथ्यानें कसें राहतां येईल ?

घरच्या मंडळीचा चाललेला छळ तो माझाच छळ आणि तो निमूटपणें सहन करणेंच बरें; व त्याप्रमाणें मी माझ्या मनाची तयारी केली होती. यासंबंधानें इतरांकडे तर बोलावयाचें नाहींच परंतु आपल्यालासुद्धां एका शब्दानेंहि दर्शवावयाचें नाहीं हा मी निश्चय केला होता.

परंतु या भांडणांत मी एकटाच नाहीं. दुसरेहि आहेत. त्यांचीहि माझ्यासारखीच तयारी असावयाला पाहिजे होती. परंतु दुर्दैवानें ती तितकी नाहीं. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच की त्यांनीं शक्य तेवढी झीज या प्रकरणांत सोसली आहे व आपल्या अडचणीच्या वेळीं अडवून न धरतां मदत केली आहे. आपल्या कल्पनेप्रमाणें त्यांना सर्व सुखसोयी करून देतां आल्या असत्या तर बरें होतें परंतु त्यांचा त्याला नाइलाज होता. असो. माझ्या मेहुण्यावर या सर्व भांडणाचा इतका परिणाम झाला आहे कीं त्यांच्या health संबंधानें मला व माझ्या घरच्या मंडळींना विशेष काळजी वाटूं लागली आहे. हें लिहिण्याचा उद्देश आपल्या मनांत आम्हांविषयीं सहानुभूति उत्पन्न करावी व आपल्याला आपल्या ठरविलेल्या निश्चयापासून परावृत्त करावें हा नसून माझ्या ह्या पत्राचें, त्यांतील मजकुराचें व माझ्या वर्तणुकीचें स्पष्टिकरण व्हावें हा आहे. माझा निश्चय suffer करीत राहण्याचा यामुळें मला मोडावा लागत आहे.

आपल्याला घरामध्यें जागा देण्यांत ज्याअर्थी मी कारण झालों त्या-अर्थी आतां तें घर रिकामें करून देण्याची जबाबदारी माझ्यावरच आहे आणि ती मला घेतली पाहिजे. Health च्या सबबीवर ती टाळतां येत नाहीं.

ह्याकरतां जें काय करावें लागेल —देहत्यागसुद्धां— तें करण्याची मी तयारी केली आहे. जिवंत राहून मेलेल्याप्रमाणें आपल्याच मंडळीचा छळ चाललेला पाहण्यापेक्षां जबाबदारींतून मोकळें होण्याकरतां खटपट केलेली बरी. मग त्यांत कांहींहि होवो. कांहींहि झालें तरी त्यांत आनंद आहे, कारण तें सर्व आपल्या मित्राच्या लीलेकरितां —हट्टाकरितां— आहे

सामोपचारानें सर्व गोष्टी जुळून आल्या तर तें मला पाहिजेच आहे. त्यापासून मला जितका आनंद होईल तितका दुसऱ्या कोणालाहि होणें शक्य नाहीं. परंतु दुर्दैवानें तसें न झालें तर मला दुसऱ्या दोन उपायांपैकीं एकाचें अवलंबन करणें प्राप्त होईल

पहिला कोर्टांत फिर्याद करून घर रिकामें करून घेणें. परंतु या उपायाचा विचारसुद्धां मला कसासाच वाटतो. ज्याच्या गळयामध्यें गळा घालून मी इतके दिवस वागलों व राहिलेलें थोडेंफार आयुष्य तशाच रीतीनें घालवावयाचें हा मनाचा निश्चय, ज्याच्याशीं वितुष्ट ही कल्पनासुद्धां मनाला असह्य होते त्याच्याच विरुद्ध कोर्टांत फिर्याद करूं ?

दुसरा आणखी एक उपाय आहे. जगाच्या दृष्टीनें तो डरफोकपणाचा आहे, परंतु मला तो चांगला वाटतो. माझ्या स्वभावाशीं व आपल्या आजपावेतोंच्या relations शीं तो जुळणारा आहे. तो म्हणजे महात्मा गांधींनीं घालून दिलेला fast चा मार्ग होय. आपल्याला पाहिजे तितका अवकाश देऊन नंतर आपण जागा सोडीपावेतों fast करावयाचा. आपण जागा सोडाल किंवा नाहीं, माझा देह राहील किंवा नाहीं या दृष्टीनें या प्रश्नाकडे पाहावयाचें नाहीं. यानें स्वतःचें Purification होऊन माझ्या वडील मंडळीला जो त्यांच्या म्हातारपणीं त्रास मजकडून पोंचला त्या पापाचें निरसन होईल.

काय करावयाचें तें आपलें उत्तर आल्यावर ठरवीन व आपल्याला कळवून विचारून करीन.

जास्त या पत्रांत लिहिण्यासारखें काय आहे? आपल्या relations मध्यें जगताच्या दृष्टीनें जरी यापुढें फरक दिसला तरी अंतःकरणांतून तेच राहतील.......या आयुष्यांत आलेला दुःखद प्रसंग आपण ज्या ज्या आयुष्यांत जवळ येऊं त्या त्या आयुष्यांत न येवो व आपण जवळ आल्यानंतर आमरणान्त एकमेकांच्या मैत्रीचा आनंद एकमेकांना मिळो अशी प्रार्थना करून हें लांबलचक पत्र संपवितों.

तुमचा

केशवराव.'

... ... ...

वरील पत्र पाहून मी हतबुद्धच झालों. उत्तर ल्याहावें कीं न लिहावें, लिहावें तर काय लिहावें, या विचारांत मी होतों तोंच केशवरावांकडून स्मरणपत्रहि आलें आणि मग मला उत्तर पाठवावेंच लागलें. मी उत्तर पाठविलें तें असें :-

'९३ तोफखाना इंदूर.

ता. ४-४-१९२५

मि. रा. रा. केशवराव कोम्बरेकर, यांसी

कृ. सा. न. वि. वि. आपलें ता. ३० चें पत्र बाळूनें ३१-३-२५ रोजीं आणून दिलें. आपल्या पत्राचें उत्तर द्यावें किंवा न द्यावें या विचारांत तीन दिवस व तीन रात्री घालविल्यावर जबाब देणेंच योग्य असें वाटल्यावरून उत्तर लिहीत आहें.

आपल्या सध्याच्या नाजुक मनःस्थितीला भेंडे व मी यांमधील वादाच्या विषयानें न त्रासवावें म्हणूनच मी स्तब्धता स्वीकारली होती. तथापि तिचा जो विपरीत परिणाम व्हावयाचा तो झालेला स्पष्ट दिसतच आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

आपण आपल्या पत्रांत केलेलीं विधानें सर्वस्वी निराधार असून केवळ एकतर्फी व विचार न करतां केलेलीं आहेत असें मला दुःखानें ल्याहावें लागत आहे.

आपण लिहिल्याप्रमाणें मी प्रश्नाची एकच बाजू पाहूं शकतों ही माझ्या स्वभावांतील गोम आपण दहा वर्षांच्या परिचयानें शोधून काढल्याबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं, परंतु त्याचबरोबर दहा वर्षांपेक्षां कितीतरी पटीनें जास्त वर्षे ज्यांचा व आपला संबंध जडला आहे अशा भेंड्यांच्या स्वभावाची आपण अद्याप छाननी करूं शकलां नाहीं याचें मात्र मला अत्यंत आश्चर्य वाटत आहे ! जर आपण ती छाननी करूं शकलां असतां व शांत चित्तानें प्रस्तुत वादाकडे पाहिलें असतें तर जो स्वभावदोष आपण मजवर लादीत आहां त्यांतून निदान आपण तरी मुक्त झालां असतां. प्रस्तुत वादाला भेंड्यांनीं किंवा भेंड्यांसारखेंच बोलणाऱ्या व भेंडेस्वरूप असणाऱ्या इतर कोणीतरी आपणांस तिखटमीठ लावून सांगितलेल्या बाजूशिवाय दुसरीहि कांहींतरी बाजू खास असावयास पाहिजे असें निदान आपल्यासारख्या विवेकी मनुष्यास तरी वाटावयास पाहिजे होतें; व दुसरी बाजू ऐकून किंवा पाहून मग वाटेल तीं विधानें त्यानें केलीं असतीं तर हरकत नव्हती. परंतु मनुष्य एकदां विकार-वश झाला म्हणजे तेथें विचारास जागाच राहात नाहीं, व सध्याच्या बाबतींत आपलीहि तशीच स्थिति झाली आहे असें मला खेदानें लिहावें लागत आहे याबद्दल माफी असावी. आपण दुसरी बाजू पाहण्याचा किंवा ऐकण्याचा प्रयत्न केला असता तर मला खात्री आहे कीं आपण लिहिलेलें पत्र लिहि-ण्याचा प्रसंगच आपल्यास आला नसता.

आपण आपल्या पत्रांत केलेलीं सर्व विधानें खोडून काढण्याचा प्रयत्न करूं गेल्यास पत्राचीं पन्नास पानें ल्याहावीं लागतील; तितकीं लिहिण्याची माझ्या सध्याच्या मनःस्थितींत मला शक्ति नाहीं व आपल्यालाहि तीं वाचण्याची मी तसदी देऊं चहात नाही.

माझें कर्तव्य म्हणून वादाची दुसरी बाजू शक्य तितक्या थोड्या शब्दांत आपल्या नजरेस आणणें मला भाग आहे.

मी भेंड्यांशीं कधींच भांडण केलें नाहीं व करूं चाहात नाहीं. भेंडे यांनीं सर्व गांवभर-ज्याच्या ज्याच्याशीं म्हणून त्यांना बोलतां येईल त्यांज-

कडे–माझी जी नालस्ती चालविली आहे ती जर प्रत्यक्ष आपल्या कानांवर येईल तर आपणहि कानांत बोटेंच घालाल ! त्यांनीं सोडलेला आपल्या तोंडाचा पट्टा, ते प्रत्यहीं वाहात असलेली शिव्यांची लाखोली यास प्रत्यक्ष प्रमाण ८–१५ दिवसांपूर्वींचा भर रस्त्यावरील तमाशा ज्या ५०–६० लोकांनीं पाहिला आहे त्यांस पूर्णपणें मिळालें आहे व आपल्यासहि मिळालें असतें ! माझ्याकडून अशा तऱ्हेचें निंद्य वर्तन झालेलें निदान हा क्षणपावेतों तरी आठवत नाहीं. केवळ तुमच्या व माझ्या relations मुळेंच आजपावेतों हा सर्व अपमान मी मुकाट्यानें–एक शब्दहि न बोलतां–सहन केला; एऱ्हवीं याचा बंदोबस्त मला यापूर्वीच करतां आला असता.

त्यांचा छळ मी मांडला आहे असेंहि एक विधान आपण आपल्या पत्रांत केलें आहे. यालाहि उत्तर एवढेंच आहे कीं आपण प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूकडे ढुंकूनहि पाहिलेलें नाहीं. मनुष्य आपण होऊन आपल्यावर आपत्ति ओढवून घेऊं लागल्यास त्याला दुसऱ्याचा काय इलाज ? असें करण्यानें इतरेजनांची sympathy मिळत असल्यास नकळे !

खरा वाद म्हणजे बाहेरच्या गॅलरींतील मोरी वापरण्याचा. ज्यावेळीं दुर्दैवानें या घरांत आम्ही राहावयास आलों त्यावेळीं आपण किंवा भेंडे या दोघांपैकीं एकानेंहि ती मोरी बिलकुल वापरावयाची नाहीं, ती मोरी बंद आहे असें समजावयाचें असें मजला सांगितलेलें नव्हतें. अशा परिस्थितींत आठ महिनेपावेतों ती मोरी वापरांत असतां आठ महिन्यांनंतर 'ती मोरी बिलकुल बंद करा' म्हणून सांगण्याचा भेंडे यांस कोणत्या मार्शल लॉनें अधिकार पोंचतो हें मला कळत नाहीं.

सदरहु मोरीची किती गरज आहे याबद्दल विस्तारानें लिहिण्याची आवश्यकता दिसत नाहीं. माझ्यायेथें येणाऱ्या मराठा, मुसलमान, पारसी किंवा गुजराथी तिऱ्हाईत गृहस्थांना हात धुण्याकरतां स्वयंपाकघरांत किंवा बायकांचे अंगावरून मधल्या घरांत जा म्हणून सांगणें कदाचित् भेंडे यांना

पसंत असेल तथापि तें आपल्यास कितपत आवडेल याचा आपणच शांत चित्तानें विचार करावा. तथापि मधली मोरी आम्हीं करवून घेतल्या दिवसापासून गॅलरींतील मोरी क्वचित् प्रसंगींच वापरली जाते हें आपल्यास माहीत असेलच, किंवा आपण फिरावयास जातां तेव्हां पाहिलें असतें तर आपल्या नजरेस आलें असतें. केवळ हक्काकरतां न भांडतां शक्य तोंपावेतों मधली मोरी वापरावयास जी आम्ही सुरवात केली होती ती sentiment याच दृष्टीनें, याचीहि साक्ष आपले व माझे कॉमन् स्नेही देऊं शकतील.

इतकें असूनहि मोरी बिलकुल बंद करण्याचा भेंड्यांचा लेखी मार्शल हुकुम आल्यावर 'सेंटिमेन्ट'चा विचार करूनच जितके सौम्यपणानें त्यांना उत्तर देणें शक्य होतें तितक्या सौम्यपणानें उत्तर देऊन आमची अडचण त्यांना दर्शविण्यांत आली. याला भेंड्यांकडून आलेलें उत्तर जर आपण वाचून पाहिलें असतें तर आपणहि तोंडांत बोटेंच घातलीं असतीं. या वेळींहि आपल्या 'सेन्टिमेन्ट' कडे पाहूनच त्या पत्राला उत्तर न देतां मी स्तब्ध राहिलों.

त्यानंतर भेंडे यांचें तिसरें पत्र रजिस्टर्ड पोस्टानें आलेलें वरच्या पत्रावरहि ताण आहे, कारण त्यांत अवांतर भलत्या सलत्या गोष्टी तर आहेतच पण त्यांत त्यांनीं मला मारण्याचीहि धमकी घातली आहे! अशा स्थितींतहि मी केवळ आपल्या 'सेन्टिमेन्ट' कडे दृष्टि देऊनच स्तब्धता स्वीकारली व त्यांना एका शब्दानेंहि उत्तर दिलें नाहीं.

पुढचा म्युनिसिपल् सेक्रेटरी मोका पाहावयास आल्यावेळचा प्रकार, भेंड्यांनीं आपली विटाळलेली जीभ व त्यांनीं लाखों लोकांसमोर मला वाहिलेला शिव्यांचा भडिमार आणि त्यावेळी 'सेन्टिमेन्ट' कडेच लक्ष देऊन मी ठेवलेली असामान्य स्तब्धता हीं म्युनिसिपल सेक्रेटरी व इतर साठ सत्तर लोक यांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे.

इतकें असूनहि आपण मला दोषी ठरवून मी 'भेंड्यांना छळण्याचा व त्यांची बदनामी करण्याचा विडा उचलिला' असें विधान करतां याला काय म्हणावें! केवळ दुर्दैव, यापलीकडे दुसरें काय!

प्रश्न काय तो बाहेरच्या मोरीच्या नळाचा होता. ज्याप्रमाणें मधल्या मोरीचा नळ, आम्हांस गरज असल्यामुळें, आम्ही आमच्या स्वतःच्या खर्चानें लावून घेतला होता त्याचप्रमाणें बाहेरच्या गॅलरींतील मोरीलाहि—आम्हाला गरज असल्यामुळें—आम्ही आमच्या स्वतःच्या खर्चानें नळ लावून घ्यावयास केव्हांहि तयार होतों व अद्यापहि आहोंत. भेंड्यांना त्याबद्दल एक पैचीहि तोशीस लागूं देण्याची आमची इच्छा नव्हती व नाहीं, आणि मी राऊला आपल्यास तसें समक्ष सांगितलेंहि होतें. अशी स्थिति असतां 'आम्ही भेंड्यांना खर्चांत टाकूं चाहतों व आमच्या कल्पनेप्रमाणें सर्व सुखसोयी करून मागतों' हा दोषारोप कितपत यथार्थ आहे याची आपण स्वतःशींच कल्पना करावी.

आणखीहि या बाबतींत पुष्कळशा गोष्टी लिहिण्यासारख्या आहेत, परंतु कोळसा जितका उगाळावा तितका काळाच!

वरील हकीगत वाचूनहि आम्ही 'भेंड्यांना छळण्याचा विडा उचलला आहे' असें आपलें मन आपल्यास सांगत असल्यास त्याला मात्र 'दृष्टिदोष' यापलीकडे दुसरें काय नांव देणार? आणि 'Blood is thicker than water' यापलीकडे काय म्हणणार!

आपली मित्रत्वाची कल्पना निःसंशय उच्च आहे. दिलगिरीची गोष्ट आहे कीं आपल्या मित्रत्वाच्या कसाला मी उतरलों नाहीं! प्रत्येकाला या कसाला उतरणें शक्यहि नाहीं; तथापि वर दिलेल्या थोड्याशा हकीगतीवरून आपल्या ध्यानीं आलें असेलच कीं आपणा दोघांच्या मित्रत्वाचा विचार माझे-समोर नसता तर चाललेल्या सर्व प्रकरणांत मी आतांपावेतों जी स्तब्धता स्वीकारली ती कधींच स्वीकारली नसती, इतकेंच नव्हे तर या प्रकरणाला सध्या आलें आहे याहून फारच निराळें स्वरूप आलें असतें.

आपलें suffering चें तत्वहि फार उदात्त आहे यांत तिळप्राय शंका नाहीं. आपल्याइतका जरी नाहीं तरी अल्पांशानें कां होईना या बाबतींत

मी suffering चा अनुभव घेतला आहे व अद्याप घेत आहे असें माझी मनोदेवता मला सांगत आहे. डिग्रीमध्यें फरक असण्याचा संभव आहे.

आपल्या मानसिक व्यथेबद्दल मलाहि कींव येते. पण जेथें विचार न करतांच एक ठाम मत बनवून मनाला अस्थिर करून ' अंतःकरणांत इंगळया ' लावून घ्यावयाच्या तेथें इतरांचा कितपत इलाज चालणार ! आपण असें वागण्यानें दुसऱ्यांचे अंतःकरणालाहि आपण ' इंगळयांनीं ' पोळत आहां याची जाणीव आपणास नाहीं याबद्दल मात्र अत्यंत वाईट वाटून ऊर भडभडून येत आहे व हें लिहीत असतां डोळ्यांतून प्रत्यक्ष टिपें पडत आहेत ! असो. भाग्य आपलें !

' सामोपचारानें सर्व गोष्टी जुळून याव्या ' हीच माझीहि इच्छा व म्हणूनच वाजवी किंवा गैरवाजवी याचा विचार न करतां नळाला लागणारा सर्व खर्च मी स्वतः द्यावयास तयार होतों व आहें. असें असतांहि चाललेल्या गोष्टी या माझ्या ' लीला ' व माझा ' हट्ट ' आहे असें आपलें मन आपल्यास ग्वाही देईल असें मला वाटत नाहीं. तथापि कोणी सांगावें ?

वरील हकीगत वाचूनहि मीच सर्वस्वीं दोषी आहें अशी आपली समजूत कायम राहिल्यास पुढचे मार्ग आपण सुचविलेले आहेत. पहिला फिर्यादीचा व दुसरा Fast करून self purification चा. मुळींच अस्तित्वांत नसलेली गोष्ट, आहे असें गृहीत धरून मग त्यावर सात मजली इमारत उचलणें, याचप्रमाणें आपलें हें self purification आहे अशी माझी अल्प समजूत आहे. जें पाप आपल्या हातून झालें असें आपण समजत आहां तें खास आपल्या हातून झालें आहे याची अगोदर आपण पूर्ण खात्री करून घ्यावी, आणि अशी आपली बालंबाल खात्री झाली तर मग आपण वाटेल तेवढें self purifiction करावें.

मी घर सोडीपावेतों fast करावयाचा आपला निर्धार स्तुत्य (?) आहे ! परंतु आपल्यास बहुधा ही संधि यावयाची नाहीं अशी मला धास्ती

वाटते. आपल्या मेहुण्यांनीं मार्शल लॉ पुकारल्या दिवसापासूनच आम्ही दुसऱ्या घराचे शोधांत आहों व बहुधा लवकरच हें घर सोडून भेंड्यांना त्यांच्या होत असणाऱ्या 'छळांतून व नालस्तींतून' मुक्त करूं व आपल्यास fast करून गांधींचें नांव पुढें चालविण्याच्या आलेल्या सुसंधीचा लाभ आम्ही दुष्टाव्यानें आपणांस घेऊं देणार नाहीं अशी उमेद आहे.

आपल्या उभयतांच्या relation च्या पुढील तरतुदीनें तर, आपल्या अलीकडील वर्तनानें अगोदरच पोळलेल्या माझ्या अंतःकरणावर मिठाचें पाणी ओतलें आहे! असो, आपली मर्जी! त्याला उत्तर अश्रूंपलीकडे कांहीं नाहीं व ते मी यथेच्छ–मनसोक्त–ढाळले आहेत. हें पत्र लिहितां लिहितां ढाळीत आहें व पुढेंहि सारखे ढाळीत राहीन!

कळावें हे विनंती.

आपला
दत्तात्रय रा. पिंगे.

... ... ...

वरील पत्रानंतर पांचच दिवसांनीं तारीख ९ एप्रिल १९२५ रोजीं मी भेंडे यांचें घर सोडलें खरें, परंतु त्या दिवसापासून माझे व कोचरेकरांचे संबंध पुष्कळ अंशीं दुरावले ते दुरावलेच! नाना प्रयत्न करूनहि ते पूर्ववत् सांधले गेले नाहींत! कांचेला एकदां तडा गेला म्हणजे ती कांच पुन्हा सांधणें अशक्य असतें! बाह्यतः आम्ही कितीहि एकजीव दिसत असलों तरी अंतरींचा पूर्वीचा ओलावा आटला तो आटलाच!!

## पुन्हा सोवळें : ७१ :

'ऐसें कैसें रे सोवळें। शिवतां होतसे ओवळें
स्नानसंध्या टिळे माळा। पोटीं क्रोधाचा उमाळा
बाह्य केली झळफळ। देह बुद्धीचा विटाळ.'

—रामदास.

सोवळें ओवळें, टिळे माळा, भस्माचे पट्टे, आरत्या, धुपारत्या अशासारख्या बाह्य उपाधींतच आमचा धर्म गुरफटलेला ! मनःशुद्धि, पावित्र्य यांचा जेथें गंधहि नाहीं तेथें हीं बाह्य अवडंबरें काय कामाचीं ? 'नाहीं निर्मळ जीवन काय करील साबण ?'

माझ्या थोरल्या मेहुण्याच्या मुलीचें लग्न सोमवार, तारीख ३ मे १९२६ रोजीं झालें. ह्या लग्नाचें प्रयोजन दुसऱ्या दिवशीं होतें. लग्नाचे वऱ्हाडी व इतर निमंत्रित मंडळी उंची उंची कद पीतांबर नेसून आपापल्या स्थानीं येऊन बसत होते. मी वडील जांवई म्हणून माझा पाट नूतन जामाताचे शेजारींच मांडला होता. सोवळ्याचा मला पूर्वींपासूनच तिटकारा असल्यानें मी सोवळें न नेसतां धूतवस्त्रानेंच माझ्या पाटावर आलों. मी ओवळ्यानेंच पंक्तींत आलेला पाहून आमच्या मेहुण्याचें पित्त खवळलें. माझ्या धाकट्या मेहुण्यानें मला सोवळें नेसण्याची हळूच सूचना केली. मी त्यांना म्हटलें 'सोवळें नेसण्याची सक्ती असल्यास मी सोवळें मुळींच नेसणार नाहीं.' आमचे मोठे मेहुणे जवळच उभे होते, ते म्हणाले 'तुम्हाला सोवळें नेसावेंच लागेल.' हे शब्द मला बरेच झोंबले. मी म्हटलें 'निमंत्रित एकूण मंडळी सोवळें नेसणार असतील तर मला सोवळें नेसावयास हरकत नाहीं, परंतु कांहीं मंडळी ओवळ्यानें बसणारी दिसत असतां मजवरच सोवळ्याची सक्ती कां ? मी हा जुलूम कदापि सहन करणार नाहीं.' यावर आमचे मेहुणे एकदम उसळले आणि सर्वांसमोर कडाडले 'सोवळें नेसणार नसाल तर येथें जेवावयास मिळणार नाहीं.' हे उद्धट आणि उपमर्दकारक शब्द कानीं पडतांच माझें पित्त भडकलें. माझ्या काळजाचे शतशः तुकडे झाले ! अंगाची लाही लाही झाली. तळपायाची आग मस्तकास गेली. माझ्या मेहुण्यास खाऊं का गिळूं असें मला होऊन गेलें. त्यांच्या उर्मटपणाबद्दल मी त्यांची यथेच्छ निर्भत्सना केली आणि 'तुमच्यायेथील अपमानित अन्नाचे तुकडे मोडण्याइतकी किंवा तुमच्या घृणित अन्नावर जगण्याइतकी कंगाल व लाचार वृत्ति माझ्यांत नाहीं; मी अशा अन्नावर लाथ मारतों.' असें बोलून

लागलीच त्याच क्षणीं माझ्या पत्नीला ( त्यांच्या सख्ख्या वहिणीला ) घेऊन मी आपल्या घरीं आलों.

वरील घटनेनंतर २०–२२ वर्षें मी व माझ्या कुटुंबांतील कोणीहि त्यांच्या घराची पायरी चढला नाहीं किंवा त्यांच्याशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेविला नाहीं. मात्र अपवाद म्हणून ह्या बावीस वर्षांत फक्त दोन वेळां हा निर्धार मोडून आम्ही त्यांच्या घरीं गेलों होतों. एकदां ते स्वतः बिछान्यावर आसन्नमरण पडले असतां व एकदां त्यांची पत्नी निवर्तली त्या दिवशीं.

## सेवाधर्मः परम गहनो... : ७२ :

नोकरी म्हणजे प्रत्यक्ष गुलामगिरी ! ह्या गुलामगिरीसारखें अपमानित जिणें अन्य कोणतेंहि नाहीं !

तारीख २६ डिसेंबर १९२६ ची गोष्ट. कचेरींत मी काम करीत बसलों असतां स्टोअर्सचें एक बिल सहीकरितां मजकडे आलें. बिलांत मला कांहीं शंका आल्यामुळें मी तें खुलाशाकरतां परत स्टोअर्समध्यें पाठविलें. या दरम्यान ज्या इसमानें तें बिल सहीकरतां मजकडे आणिलें होतें तो बिलाकरतां घाई करूं लागला. ' बिलासंबंधी मला कांहीं शंका असल्यानें मी तें चौकशीकरतां स्टोअर्समध्यें पाठविलें आहे. थोडा वेळ थांब ' असें मी त्याला सांगितलें. तो इसम संस्थानांतील एका बड्या अफसराचा चपराशी होता. त्याला हा विलंब कुठला सहन व्हावयाला ? कुर्ह्यांतच तो म्हणाला ' तें बिल अमुक अमुक साहेबांचें आहे. लवकर सही करून द्या. ' चपराशाचें हें वर्तन मला आवडलें नाहीं. मी म्हटलें ' अमुक अमुक साहेब असोत किंवा इतर कोणी असो, ज्या चौकशीकरतां मी बिल परत पाठविलें आहे ती चौकशी पूर्ण होऊन तें परत येईपावेतों मला कांहीं करतां येणार नाहीं.' माझें हें उत्तर ऐकून चपरासी महाशयाचा मिजास गेला. आपला - छे, आपल्या अधिकाऱ्याचाच अपमान झाल्यासारखें त्याला वाटलें व फणकाऱ्यानेंच तो निघून गेला.

दुसरे दिवशीं सकाळीं सहा साडेसहा वाजतां माझ्या मालकाचें मला तांतडीचें बोलावणें आल्यावरून मी त्यांच्या कोठीवर गेलों. पाहतों तों तेथें त्या चपराशाचे अधिकारी अगोदरच येऊन बसलेले. मालकांनीं मला आदल्या-दिवशींची बिलासंबंधीची हकीगत विचारली व त्या अधिकाऱ्याचा मी अपमान केला असल्याचा दोषारोपहि मजवर केला. घडलेली साद्यंत हकीगत मी त्यांना माझ्या बाजूनें निवेदन केली व त्या अधिकाऱ्याचा मी मुळींच अपमान केला नसल्याचें त्यांना सांगितलें. माझ्या खुलाशानें मालकाचें समाधन झालें नाहीं. मालक म्हणाले 'तुम्ही यांचा अपमान जरूर केला आहे, तेव्हां तुम्ही यांची क्षमा मागितली पाहिजे.' मालकांच्या हुकमाप्रमाणें त्या अधिकाऱ्याची क्षमा मागण्यास मी मुळींच तयार नव्हतों. कोणताहि अपराध न करतां व आपलें कर्तव्य योग्य प्रकारें बजावीत असतां केवळ सरकारी अधिकाऱ्याला खुश ठेवावयाचें म्हणून मला त्याची क्षमा मागावयास सांगणें हें अत्यंत अन्याय्य, जुलमाचें व अपमानास्पद होतें. मी क्षमा मागण्याचें साफ नाकारलें. मालकांना बराच राग आला हुकमाची अवज्ञा त्यांना सहन झाली नाहीं. निश्चयाच्या सुरांत व किंचित् करड्या आवाजांत ते म्हणाले 'तुम्हांला यांची क्षमा मागावी लागेल.' मलाहि त्वेष चढला होता. मी म्हटलें 'साहेब, प्राण गेला तरी मी ह्यांची क्षमा मागणार नाहीं. याचा परिणाम काय होईल ह्याची मला जाणीव आहे. कदाचित् मला आपण कामावरून काढूनहि टाकाल. आपण मला तूपरोटी देत असाल. परमात्मा मला कोठेंहि निदान कोरडी भाकरी तरी निश्चित देईल. परंतु कांहींसुद्धां अपराध नसतां या गृहस्थाची क्षमा मी मुळींच मागणार नाहीं.' मालकांचा हा धडधडीत अपमान होता. त्यांनीं एकवार मजकडे रोखून पाहिलें व ते म्हणाले 'तुम्ही फारच धिटाईनें बोलतां आहां. तूर्त तुम्ही जा, मागाहून पाहूं.' मी त्यांच्याकडे पाठ फिरविली व प्रक्षुब्ध मनःस्थितींत घरीं परतलों.

रोजच्या वेळेस मीं कचेरीस गेलों. जीव धाकधुक करीतच होता. आजपासून आपला व ह्या कचेरीचा ऋणानुबंध निश्चित सुटणार अशी

जवळ जवळ मनाची खात्री होती, आणि प्रतिक्षणीं मी मालकाच्या हुकमाची प्रतिक्षा करीत होतों. परतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं माझ्या बरखास्तीचा हुकुमहि मालकाकडून आला नाहीं किंवा त्या अधिकाऱ्याची क्षमा मागण्याचा आग्रहहि पुन्हा मला झाला नाहीं.

## मरणं प्रकृतिः शरीरिणाम्		: ७३ :

गुरुवार, तारीख ९ मार्च १९३३ रोजीं सकाळीं दहा अकराचे सुमारास धारहून, 'वडील ज्वरानें अत्यवस्थ असल्यानें तावडतोब धारेस निघून या' अशी तार आली. तार मिळतांच मी व माझी पत्नी लागलीच धारेस जावयास निघालों. वडिलांना ता ६ मार्चला थंडी देऊन ताप आला आणि तेव्हां-पासून ताप १०५° पावेतों चढला तो नॉर्मलवर आला नव्हता, एवढेंच नव्हे तर ता. ८ पासून त्यांच्या उजव्या फुफ्फुसामध्यें निमोनियाचा प्रादुर्भाव झालेला आढळून आला. मी आलेला पाहून त्यांना फार समाधान झालेलें दिसलें व तसें त्यांनीं बोलूनहि दाखविलें, परंतु मनांतून ते बरेच अस्वस्थ झालेले दिसत होते. कदाचित् ह्या आजारांतून आपण उठूं किंवा नाहीं याबद्दल त्यांचे मनांत खळबळ चालू असावी. मी त्यांना पुष्कळ धीर दिला. परंतु त्यांची एकंदर अवस्था पाहून माझें मनहि मला अस्वस्थ व बेचैन करीत होतें. मी धारेस पोंचलों त्या दिवशीं वडिलांची प्रकृति त्यांतल्या त्यांत बरी होती, परंतु पुढें मात्र ती अधिकच बिघडत गेली. आजाराच्या पांचव्या दिवसापासून म्हणजे मी धारेस पोंचलों त्याच्या दुसऱ्या दिवसा-पासून त्यांची जीभ अडखळूं लागली व त्याच्या दुसऱ्या दिवसापासून वात बळावत जाऊन शुद्ध जवळ जवळ नाहींशींच झाली ( १२-३-१९३३ ) आणि एकंदर परिस्थिति कठिण दिसूं लागली. रात्रंदिवस एकसारखा वडिलांचे उशाशीं बसून मी त्यांची सेवा सुश्रूषा करीत होतों. माझे धाकटे बंधु, काका व आतेभाऊ यांना तारा केल्या होत्या. रायपूरहून बंधु ता. १२ ला आले. बऱ्हाणपूर जवळ असूनहि काका मात्र आले नाहींत. आते-

भाऊहि आले नाहींत. ता. १३ रोजीं रात्रीं वडिलांची प्रकृति अत्यंत अत्यवस्थ झाली व रात्रीं बाराचे सुमारास त्यांच्या नाड्या बंद पडल्या सारख्या वाटल्या. आमच्या तोंडचें पाणी पळालें! डॉक्टरनीं इंजेक्शन्स दिलीं, व अमळशानें पुन्हा शरीरांत थोडी धुगधुगी दिसूं लागली. आमच्या जिवांत जीव आला.

माझे बंधु रायपूरहून ता. १२ ला आले होते. ता. १३ च्या रात्रीची वडिलांची स्थिति त्यांनीं प्रत्यक्ष पाहिली होती. वडील फार तर एखाद दुसऱ्या दिवसाचेच सोबती होते हें स्पष्ट होतें. असें असूनहि रजा नाहीं ह्या सबबीवर ते परत रायपुरास जावयास निघाले! रजा वाढवून घेऊन आणखी एक दोन दिवस राहण्याविषयीं सर्वांनीं त्यांना पराकाष्ठेचा आग्रह केला. डॉक्टरनींहि त्यांना आर्जवून सांगितलें परंतु त्याचा यत्किंचित्हि परिणाम न होतां आमचे बंधुराज वडिलांना आसन्नमरण स्थितींत सोडून ता. १४ ला सकाळीं रायपुरास निघून गेले!

ता. १४ व १५ हे दोन दिवस वडिलांनीं अंतकाळचे यातनांत केवळ बेशुद्धावस्थेंत व इंजेक्शनांच्या बळावर काढले. ता. १५ चे संध्याकाळ-पासून मात्र प्रकृति अधिकाधिक बिघडत चालली. अंतकाळचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. डॉक्टरचीं इंजेक्शनें निर्बल ठरूं लागलीं. मी त्यांच्या उशाशीं बसून खिन्न मनानें आणि जड अंतःकरणानें त्यांची तगमग असहाय दृष्टीनें पाहात होतों! अखेर सर्व मानवी उपाय थकले, देवाघरचें बोलावणें आलें, काळानें आपले पाश आवळले आणि गुरुवार, ता. १६ मार्च १९३३, फाल्गुन वद्य ५ शके १८५४ रोजीं पहाटे ४ वाजून ५३ मिनिटांवर वडिलांनीं शेवटचा श्वास सोडला व आपली इहलोकींची यात्रा संपविली! मी सुन्न मनानें उठलों, माझें भारावलेलें मस्तक त्यांच्या पायांवर ठेवलें व सद्गदित अंतःकरणानें त्यांना अखेरचा प्रणाम केला!!

पैसा हें जगांतील बहुतेक सर्व द्वंद्वांचें मूळ आहे. पैशासाठीं जगांत नानाप्रकारचे अनर्थ घडत असतात. पैशापायीं मनुष्य रक्ताचेंहि नातें पायां-खालीं तुडवितो, मग समाज, धर्म, देश, राष्ट्र यांच्याविषयींचें व्यापक नातें तर विचारावयासच नको. न्याय, नीति, सत्य असत्य सर्व कांहीं तो विसरतो व माणुसकीसहि पारखा होतो !

माझे वडील ता. १६ मार्च १९३३ रोजीं निवर्तले. वडील आसन्नमरण असल्या स्थितींतच आमचे बंधु सर्वांचे आग्रहास न जुमानतां रायपुरास निघून गेले हें मागें आलेंच आहे. ह्यानंतर अवघ्या दीड महिन्यानें ( ५ मे १९३३ ) त्यांचें मला पत्र आलें त्यांत वडिलार्जित इस्टेटीची काय व्यवस्था केली म्हणून मला विचारणा करण्यांत आली होती. वडील गेल्याला पुरता दीड महिनाहि लोटला नव्हता, आमचीं सर्वांचींच मनें शोकग्रस्त होतीं अशा स्थितींत तें पत्र पाहून मला चमत्कारिक वाटलें. तरीहि ' मला माझ्या कामामुळें फुरसत किंवा रजा मुळींच मिळत नाहीं; तुम्हांला उन्हाळ्याची महिना दोन महिने सुट्टी असते तेव्हां तुम्ही कोंकणांत जाऊन तेथील जमीनजुमला इत्यादींची सर्व व्यवस्था पाहिल्यास बरें होईल ' असें पत्र मी त्यांना लिहिलें. पुन्हा तारीख १२ सप्टेंबर १९३३ चें त्यांचें आणखी एक पत्र आलें. त्यांत त्यांनीं मला लिहिलें कीं वडिलांनीं मृत्युपत्रांत इंदूरच्या घरांतील अर्धे घर स्वतःस दिलें आहे असें ऐकतों तरी या बाबतींत काय व्यवस्था करण्याचें योजिलें आहे तें लिहावें म्हणजे त्याप्रमाणें कांहीं कागदपत्र करणें जरूर असल्यास ते करून टाकूं. ही उतावीळ पाहून मला बरें वाटलें नाहीं, म्हणून मी ह्या पत्राचें उत्तर पाठविलें नाहीं. यावर त्यांचेकडून ता. २३ ऑक्टोबर १९३३ चें एक धमकीवजा स्मरणपत्र आलें. हें पत्र पाहून साहजिकच मला राग आला व ता ३१ ऑक्टोबर रोजीं त्या पत्राला मी खुलासेवार उत्तर लिहिलें त्यांतील महत्वाचा भाग येणेंप्रमाणें होता:—

‘ आपल्या एकंदर इस्टेटीसंबंधी वडिलांनीं कोणतेहि कागदपत्र मला कधींहि दाखविले नाहींत, व मीहि ते पाहण्याची किंवा समजून घेण्याची कधींच खटपट केली नव्हती. ऐकिवानें जी कांहीं माहिती आपल्यास असेल त्याहून पुष्कळच कमी माहिती मला आहे......मला स्वतःला तिकडे जाऊन सगळी माहिती घेण्यास व तिकडील सर्व व्यवस्था लावण्यास बिलकुल सवड नाहीं. आपणास पुष्कळ मोठमोठ्या सुट्टया असतात, तेव्हां आपण स्वतः जाऊन सर्व चौकशी करून योग्य ती व्यवस्था करावी असें मी गेल्या पत्रीं आपणांस लिहिलें होतें. ह्या पत्राला एक अवाक्षरानेंहि जबाब न देतां आपण पुन्हा पुन्हा तेथील व्यवस्थेबद्दल काय केलें म्हणून मला विचारतां याचा अर्थ काय तो आपणच जाणावा.

आपल्या पत्रावरून असें आढळतें कीं वडिलांनीं मृत्युपत्र केलें आहे. हा वेळपावेतों मला स्वतःला सदरहु मृत्युपत्रासंबंधी कांहींच माहिती नाहीं. सदरहु मृत्युपत्र केव्हां केलें गेलें, तें कोठें आहे, त्यांत इतर आणखी काय काय बाबी आहेत मला कांहींच माहिती नाहीं. वडील आसन्नमरण स्थितींत असतां त्यांचें प्राणोत्क्रमण होईपावेतों फक्त एक दिवस देखील थांबण्यास आपणास फुरसत झाली नाहीं. नंतरहि उत्तरक्रिया कोठें केली, तिला काय खर्च आला वगैरेबद्दल चौकशी करावयाला व झालेल्या खर्चांत शक्य तो हातभार लावण्यास आपल्यास फुरसत आणि सवड सांपडली नाहीं आणि त्यांच्या मृत्युपत्रांतील एका कलमाच्या अम्मलबजावणीकरतां मात्र आपले तगाद्यांवर तगादे चालू आहेत !......

सदरहु मृत्युपत्र आपल्याकडे असल्यास तें मजकडे तावडतोब पाठवून द्यावें, म्हणजे तें पाहून मग पुढें त्याप्रमाणें जी कांहीं योग्य अम्मलबजावणी करावयाची ती करावयास मला बरें पडेल. ’

ह्या पत्राला आमच्या बंधूकडून ता. ४ नवंबर १९२३ चें जें उत्तर आलें तें कुत्सित आणि विपरीत मनाचा एक अस्सल व अजब नमुना होता !

त्यांतील कांहीं मजकूर तर कोणाहि सहृदय माणसाचे काळजास घरे पाडणारा व माणुसकीस लाजविणारा होता ! ते लिहितातः—

'मी धारहून येतांना मातोश्रीकडे पन्नास रुपये देऊन आलों होतों व त्याचा पुढें उपयोग व्हावा म्हणून ती रकम ठेविली होती. वडिलांचें श्राद्ध व दिवस करण्याची आपणास ऐपत नाहीं याची मला मुळींच कल्पना नव्हती व आपणहि मला त्या बाबतींत कांहीं लिहिलें नाहीं....'

माझा प्रत्यक्ष पाठचा भाऊ, पण हा मजकूर वाचून त्याचा मला तिट-काराच आला ! उत्तर पाठवावें न पाठवावें याबद्दल बराच विचार केल्यावर शेवटीं ह्या पत्रास मी उत्तर दिलें ( १५ नवंबर १९३२ ). त्यांतील मुद्याचा भाग असाः—

'...वडीलांनीं मागें ठेवलेल्या इस्टेटीबद्दल वास्तपुस्त करण्यांत व तिच्या हिश्शाबद्दलचे कागदपत्र करण्यासंबंधी आपण जी उत्कंठा दाखविली त्याच्या निदान शतांशानें तरी त्यांच्या क्रियाकर्मान्तराकरतां दाखविली काय ? आणि आपलें तें कर्तव्य होतें किंवा नव्हतें असा माझा उघड उघड आणि स्पष्ट सवाल असतां तो बाजूस ठेवून ' मातोश्रीकडे मी पन्नास रुपये देऊन आलों होतों व त्याचा पुढें उपयोग व्हावा म्हणून ती रकम ठेविली होती. वडिलांचें श्राद्ध व दिवस करण्याची आपल्यास ऐपत नाहीं याची मला मुळींच कल्पना नव्हती...' असले किळसवाणे शब्द लिहितां तेव्हां या अकलेला काय म्हणावें ! मातोश्रीकडे आपण देऊन आलेले पन्नास रुपये हे मरणोन्मुख पडलेल्या आपल्या वडिलांचे उत्तरक्रियेकरतां आपण आपल्या मातोश्रीकडे ठेविले होते हें वाचून कोणाहि मनुष्याचे अंगावर शहारे आल्या-वांचून राहणार नाहींत ! माणुसकीचा अभाव असणारांची गोष्ट निराळी. वडील मरणोन्मुख असतां व त्यांना मृत्यूचे दाढेंत न जाऊं देण्यासाठीं शक्य ते सर्व मानवी प्रयत्न चालू असतांच्यावेळीं त्यांचे क्रियाकर्मान्तराकरतां म्हणून आपल्या मातोश्रीकडे पन्नास रुपयांची रकम देऊन आपण आपल्या कर्तव्यांतून

आणि पितृऋणांतून मुक्त होण्याचें शतकृत्य केल्याचें आज आपल्या पत्रावरून कळत आहे ! आपल्या हीन मनोवृत्तीची याहून दुसरी साक्ष ती काय पाहिजे ? '

ह्या पत्रानंतर दोन तीन महिने आमचे बंधु स्वस्थ होते. परंतु इस्टेटीचा हक्क त्यांना स्वस्थ बसूं देईना ! त्यांचें ता. २५ मार्च १९३४ चें पुन्हा एक पत्र मला आलें, त्यांत ते म्हणतातः—

' आपण व मातोश्री यांचे विचारें धार व इंदूर येथील घरांच्या व इतर बाबतींत काय करावयाचें ठरलें तें मला लिहावें. मीं व माझीं मुलें अगदींच निराश्रित राहूं नयेत असें मला वाटतें. '

हें पत्र वाचून त्यांच्या मनाची मला कींव आली ! ता. ३ एप्रिल १९३४ रोजीं मी त्यांना उत्तर पाठविलेंः—

' ... आपण व आपलीं मुलें निराश्रित राहूं नयेत या हेतूनें धार व इंदूर येथील वडिलार्जित इस्टेटीची मृत्युपत्राप्रमाणें व्यवस्था करण्याविषयीं पुन्हा आपला तगादा पाहून खेद व परमावधीचें आश्चर्य वाटतें. आपल्या या अनुकंपनीय स्थितीबद्दल आपली कींव करावीशी वाटते ! परमेश्वरकृपेनें आणि वडिलांचे पुण्याईनें काकासाहेब व मी या दोघांहीपेक्षां हजारपटीनें आपण सुस्थितींत असतां वडिलार्जित इस्टेटीपैकीं जो कांहीं अल्पस्वल्प अंश आपल्या वांट्यास येणार असेल तो लवकर आपल्यास न मिळाल्यास आपण व आपलीं मुलें निराश्रित राहतील अशी आपण जी भीति व्यक्त केली आहे ती पाहून आपलें मन कशाचें बनलें आहे याची कल्पना करवत नाहीं ! असली दुष्ट आणि भिकार कल्पना आपल्या मनास शिवावयास देखील नको होती. ... अशी अमंगळ वासना आपल्यास कां व्हावी कळत नाहीं ! वडिलार्जित इस्टेटीचे आपल्या हिस्शाकरतां एवढें उताविळ होण्याचें कारण नाहीं. तथापि आपल्यास विशेष उताविळ असल्यास आपण ती. ताईला लिहून तिजकडून पाहिजे असलेली सर्व माहिती व मृत्युपत्र मागवून आपण योग्य ती

सर्व व्यवस्था करावी. माझी त्याला मुळींच हरकत नाहीं. परमेश्वरानें मला दिलेल्या परिस्थितींत मी संतुष्ट आहे.'

माझ्या ह्या पत्राचा परिणाम म्हणून असो, अथवा अन्य कांहीं कारणानें असो पण ह्यानंतर जवळ जवळ एक वर्षभर हा पत्रव्यवहार बंद होता. परंतु फार दिवस स्वस्थ बसणें आमच्या बंधूनां शक्य नव्हतें. ता. १० जून १९३५ च्या पत्रानें त्यांनीं पुन्हा तोच विषय उकरून काढला. पुन्हा पुन्हा त्याच त्याच गोष्टी लिहिण्याचा मलाहि वीट आला होता. शेवटीं मी त्यांना या विषयांतलें अखेरचें पत्र पाठविलें (ता. १८ जून १९३५) तें असें:—

'... इंदूरच्या घरापैकीं अर्ध्या हिस्शाबद्दलचा प्रश्न आपण पुन्हा उपस्थित करून त्या बाबतींत मी काय करावयाचें ठरविलें म्हणून आपण पुन्हा पृच्छा केली आहे. ह्या संबंधांत मी माझ्या पूर्वीच्या म्हणजे ता. ३१-१०-३३, ता. १५-११-३३ व तारीख ३-४-३४ च्या पत्रांत अगदीं स्पष्ट खुलासा केलेला आहे. तरीहि 'आपल्या मुलांचे बाबतींत अन्याय होतो असें मनास टोंचूं लागलें म्हणून' पुन्हा आपण तोच प्रश्न विचारीत आहां. आपल्या किंवा आपल्या मुलांच्या बाबतींत थोडादेखील अन्याय व्हावा अशी माझी यत्किंचित्‌हि इच्छा नाहीं. तथापि या संबंधांत जें कांहीं करावयाचें तें योग्य मार्गानें झालेलें बरें आणि म्हणून यापूर्वीच, वर निर्दिष्ट केलेल्या तीन्ही पत्रांत जो कांहीं खुलासा करावयाचा तो मी अगदीं स्पष्टपणें केला होता. तथापि पुन्हा एकवार मला जो कांहीं खुलासा करावयाचा तो करीत आहें, आणि तो येणेंप्रमाणें:—

(१) वडिलांनीं मृत्युपत्र केलें असल्यास तें अस्सल मृत्युपत्र वडील मुलगा व वारस या नात्यानें मजकडे यावयास पाहिजे होतें असें मला वाटतें, परंतु तें अद्यापपावेतों मला मिळालेलें नाहीं. मृत्युपत्र केलें असल्यास तें माझे हातीं आलें म्हणजे मग तें पाहून त्याची योग्य ती अम्मलबजावणी करण्याचा विचार करतां येईल.

(२) मृत्युपत्र केलें आहे किंवा नाहीं, केलें असल्यास तें कोठें आहे, तें मजकडे कां आलें नाहीं वगैरेबद्दल मी चौकशी करूं इच्छीत नाहीं व मला त्याची गरजहि नाहीं. आपल्यास आवश्यकता असल्यास आपण अस्सल मृत्युपत्र मिळवून तें मजकडे पाठविण्याची तजवीज करावी.

(३) इंदूर येथील घराप्रीत्यर्थ माझे लागलेले पैसे परत करून सर्व घर आजहि खुद्द आपण किंवा जे कोणी त्याचे वास्तविक कायदेशीर हक्कदार असतील त्यांनीं आपले स्वाधीन करून घेतल्यास त्याला माझी मुळींच हरकत नाहीं.

(४) सदरहु घराला वडिलांनीं लावलेल्या पैशांत कोणाचा किती हिस्सा त्यांनीं ठेवला आहे किंवा कायद्यानें कोणाला किती हिस्सा येतो किंवा येईल हें जरी मला माहीत नाहीं तरीहि घराच्या त्या हिश्शाकरतां किंवा वांटणीकरतां झगडत बसण्याची किंवा आशा करीत बसण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. आपण या सर्व भानगडी हातीं घेऊन निकालांत लावीत असल्यास जरूर लावाव्या. त्याला माझी मुळींच हरकत नाहीं. मला स्वतःला इतका वेळहि नाहीं आणि त्या हिश्शाचा किंवा वांटणीचा लोभहि नाहीं. करितां आपणच या सर्व भानगडी निकालास लावाव्या व आपल्या मुलांच्या बाबतींत अन्याय होत असल्याची जी टोंचणी आपल्या मनास लागली आहे ती होईल तितके लवकर दूर करून घ्यावी.'

ह्या पत्राचे उत्तरांत त्यांच्याकडून एक गलिच्छ पत्र आलें. त्याचें उत्तर पाठविणें मला प्रशस्त वाटलें नाहीं. नंतर आठ नऊ महिने पत्रव्यवहार बंद होता. पण पुन्हा त्यांच्या वृत्तीनें उचल खाल्ली आणि मला त्यांनीं पुन्हा एक वेडें वांकडें पत्र लिहिलें ( ता. २६ मे १९३६ ), इतकेंच नव्हे तर त्याचें उत्तर न आल्यास फिर्याद करण्याची धमकीहि दिली ! ह्या धमकीला भिऊन जाण्याइतका कमकुवत मी नव्हतों. ह्या पत्रासहि उत्तर न देण्याचाच निर्णय मी घेतला आणि न्यायकोर्टाची पायरी चढण्याचा मार्ग त्यांना मोकळा करून दिला.

ह्यानंतर अनेक वजनदार मध्यस्थांमार्फत मजवर दडपण आणण्याचा त्यांनीं प्रयत्न करून पाहिला. सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर व मी माझ्या भूमिकेवरून एक तसूभरहि इकडे तिकडे सरकावयास तयार नाहीं असें दिसून आल्यावर त्यांनीं मजवर दावा मांडण्याचा प्रयत्न केल्याचेंहि माझ्या कानांवर आलें; परंतु कां असेल तें असो पण अखेरीस दावा मांडला गेला नाहीं एवढें खरें !

ह्यानंतर सुमारें दोन वर्षे ते अगदीं स्तब्ध होते. मीहि त्यांना पत्र न पाठविण्याचा निश्चय केला होता. दोन वर्षांनीं अचानक त्यांचें एक पत्र आलें ( ता. १५ मार्च १९३८ ). ह्या पत्रांत त्यांनीं रायपुरास नवीन बांधलेल्या घराच्या वास्तुशांतीकरतां आम्हांला निमंत्रण करून पुढें लिहिलें होतें 'It is a nice occasion for us all to meet, forget and forgive and re-establish good will and friendly relations. I have wiped out my past and have approached you with a clean slate. Hope you appreciate my sincerity and are willing to respond. Let not past or future worry you.. I have given up my interest in the property at Indore and Dhar and can say so in writing if you wish to have one.

ह्या पत्राला मी खालील उत्तर पाठविलें:—

' १२, म्युनिसिपल ऑफिस रोड,
इंदूर सिटी, ता. २६ मार्च १९३८

चि. तात्या मु. रायपूर, यास

अनेक आशिर्वाद विशेष. बरेच दिवसांनीं आलेलें आपलें ता. १५ चें पत्र मिळालें. रायपूरला आपण घर बांधलें असून त्याचे वास्तुशांतीकरतां आम्ही तिकडे यावें अशी आपली इच्छा असल्याचें समजलें. ... जाण्यायेण्यांत दीड-दोनशें रुपये खर्च करण्याइतकें वास्तुशांतीचें महत्व नाहीं. बांधलेलें घर

आपणां सर्वांत्रांस लाभदायक व यशदायक होवो अशी आम्हा सर्वांची हार्दिक इच्छा आहे.

मागील सर्व पत्रव्यवहार विसरून पूर्ववत् प्रेमानें आणि सलोख्यानें पूर्व-संबंध चालू ठेवण्याचा आपला झालेला निश्चय वाचून समाधान झालें. झालेल्या सर्व गोष्टी मीहि पूर्णपणें विसरून गेलों आहे अशी मी आपल्यास खात्री देतों.

आपला,
अण्णा

इतकें झालें तरी त्यांच्या मनांतील किंतु अजूनहि मिटला नव्हता. जुलई १९३९ मध्यें पुन्हा त्यांच्या विकारानें उसळी मारली. मी त्यांच्या पत्राला योग्य तें उत्तर पाठविलें आणि हें प्रकरण तात्पुरतें तरी मिटल्या-सारखें झालें.

ह्यानंतर ता. २२ फेब्रुवारी १९४४ रोजीं कांहीं जरूरी कामानिमित्य माझे बंधु रतलामला जाण्याकरतां म्हणून इंदुरास आले. मी त्यांना घेण्याकरतां स्टेशनवर गेलों होतों. स्टेशनवरून घरीं येतांच आम्ही दोघां बंधूनीं एक-मेकांस अभावितपणें कडकडून मिठ्या मारल्या व अंतःकरणांतील सर्व खळमळ अश्रुरूपानें धुऊन टाकला. एक शब्दहि आम्हा दोघांच्या तोंडावाटे निघाला नाहीं. अश्रूंनीं अश्रूंना आपला आशय सांगितला आणि अकरा वर्षांच्या दीर्घ कालांत सांचलेलीं सर्व किल्मिषें त्या उष्ण अश्रूंमध्यें क्षणार्धांत वितळून गेलीं !

## विफलाशा : ७५ :

सारें जग आशेवर जगत आहे. आशा जगाचा प्राण आहे. ज्यांची आशा ठेवून शेतकरी शेतें पेरतात, क्रान्तिकारी क्रान्ति करतात. परंतु आपल्या

सर्व आशा सफल होतातच असें नाहीं. आशेची ही विफलता मनुष्याला पुष्कळ वेळां हतबल करते व दैववादी बनविते !

शिक्षण संपविल्यानंतर कांहींतरी स्वतंत्र धंदा करावा म्हणून शक्य तितके प्रयत्न मी केले परंतु ते सर्व निष्फळ ठरले ! अधिक साहस केलें असतें, अधिक चिकाटी व नेट धरला असता तर कदाचित् तशा परिस्थितींतूनहि मार्ग निघाला असता. परंतु तितकें साहस, धडाडी व चिकाटी माझ्यांत नव्हती असेंच म्हटलें पाहिजे. माझ्या जागीं एखादा, व्यापारी मनोवृत्तीच्या परंपरेंतला, मारवाड्याचा, गुजराथ्याचा अथवा बोहऱ्याचा मुलगा असता तर त्यानें मी हार खाल्ली तशी हार कधींहि खाल्ली नसती. परंतु मी पडलों दक्षिणी ' पंडत ' ! ही धडाडी मी कोठून आणणार ? अर्थात् गुलामगिरीकडे—कारकुनीकडे—मी झुकलों यांत नवल नाहीं.

गुलामगिरींत आयुष्य घालविण्याचा आपणांवर प्रसंग आला, आपल्याला स्वतंत्र धंद्यांत पडणें साध्य झालें नाहीं तरी आपल्या तीन मुलांपैकीं एखाद्यास तरी व्यापारांत किंवा स्वतंत्र धंद्यांत गुंतवावें ही माझी आत्यंतिक इच्छा होती. माझा वडील मुलगा प्रभाकर ऊर्फ बबन सन १९२६ मध्यें मॅट्रिक झाला व त्याच्या पुढील शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला, त्यावेळीं त्याला व्यापारांत घालावें असें मला मनापासून वाटत होतें. परंतु ही इच्छा अमलांत आणण्याची मला शक्यताच नव्हती. कारण हा मुलगा वयाच्या चौथ्या महिन्यापासूनच त्याच्या आजा आजीकडे वाढलेला, त्यांनींच त्याला लहानाचा मोठा केलेला व तेच त्याच्या पुढच्या सर्व शिक्षणाची जबाबदारी सांभाळणारे. अशा स्थितींत त्याला व्यापारांत गुंतविण्याची भाषा मी वडिलांकडे काढली असती तर मोजाच्या मशीनच्या बाबतींत सन १९०९ मध्यें ओढवलेला प्रसंग पुन्हा सन १९२६ मध्यें मजवर ओढवण्याचा अधिक संभव होता. अर्थात् मूग गिळून स्वस्थ बसणेंच मला प्राप्त होतें व बी. ए., एल एल., बी., एम्. बी. बी. एस्. अशा जाड्या जाड्या पदव्यांकडे बोट दाखविणें मला भाग होतें ! साहजिकच त्याच्या बाबतींत माझ्या इच्छेला वाव नव्हता. हा मुलगा

सन १९३३ मध्यें बी. ए. झाला. त्यानें नोकरींत गुंतूं नये, एल्. एल्., बी होऊन स्वतंत्रपणें वकीली करावी व आपल्या आजोबाची गादी पुढें चालवावी असाहि मी शिकस्तीचा प्रयत्न केला, परंतु तोहि निष्फळ ठरला व माझ्या इच्छेविरुद्ध त्यानें गुलामगिरींतच स्वतःला जखडून घेतलें !

माझा दुसरा मुलगा मधुकर सन १९३४ मध्यें मॅट्रिक झाला. ह्या मुलाला बी. ए., एम्. ए. करण्यापेक्षां स्वतंत्र धंद्यांत गुंतवावें ह्या दृष्टीनें बऱ्याच लहान मोठ्या धंद्यांचा मी विचार केला व त्याला दंतवैद्य बनवावें असें ठरविलें आणि त्याप्रमाणें ता. ८ जानेवारी १९३५ रोजीं त्याला कराचीस पाठविलें. ह्या शिक्षणासाठीं तीन साडेतीन हजार रुपये खर्च झाले व तो L. D. Sc. चा डिप्लोमा घेऊन मे १९३६ मध्यें इंदुरास परत आला. त्यानें लहानशा प्रमाणावर दंतवैद्याचा दवाखाना उघडून प्रॅक्टिसला सुरवात करावी, हळू हळू तो वाढवावा व नंतर दवाखान्यालाच जोडून दंतवैद्यकीचें साहित्य व उपकरणें पुरविणारें दुकानहि काढावें अशी माझी इच्छा. परंतु— !! आणि हें 'परंतु' च जेथें तेथें घात करतें ! आमच्या चिरंजीवांना माझी ही वेडी कल्पना रुचली नाहीं. सर्व अद्यावत् साधनें व उपकरणें यांनीं सज्ज असा दवाखाना पाहिजे असा त्याचा आग्रह पडला. माझ्या मर्यादित प्राप्तींत त्याचेकरतां केला होता त्याहून अधिक खर्च करणें माझ्या शक्तीबाहेरचें होतें आणि उपलब्ध असलेल्या अल्प साधनांनीं धंदा सुरू करून तो हळू हळू वाढविण्याची त्याची तयारी नव्हती. त्याच्या धंद्यांत त्याला गुंतविण्याकरतां केलेले इतर सर्व प्रयत्नहि निष्फळ ठरले ! त्याला दंतवैद्य बनविण्यांत खर्च केलेली सर्व रकम वांया गेली व ह्या मुलानें तरी स्वतंत्र धंद्यांत पडावें म्हणून बाळगलेल्या माझ्या सर्व आशा धुळीस मिळाल्या !!

राहतां राहिले आमचे तिसरे चिरंजीव मंगेश ऊर्फ बाळ. हा मुलगा लहानपणापासूनच खडतर भाग्याचा ! शाळेंतील दोन अडीचशें मुलांबरोबर सहलीस गेला असतां वयाच्या चौदाव्या वर्षीं तो कालाकुंड येथें रेलवेच्या पुला-वरून पाय घसरून तीस पस्तीस फूट खालीं खडकावर पडला ( गुरुवार,

ता. २८ नवंबर १९३५ ) व त्या अपघातांत दोन तीन ठिकाणीं त्याच्या हातापायाचीं हाडें मोडलीं व पाठीला झालेली जखम दूषित होऊन त्याला धनुर्वात झाला; त्यामुळें तीन महिनेपावेतों त्याला दवाखान्यांत पडून राहावें लागलें. या भयंकर आजारांत त्याचा पुनर्जन्मच झाला. त्यांतून उठून तो थोडा सावरतो न सावरतो तोंच ॲपेन्डिसायटिसचा विकार उद्भवून त्याला ऑपरेशन्च्या दिव्यांतून जावें लागलें ( ता. १६ नवंबर १९३९ ). ह्या आजारांतून तो जरा वर डोकें काढतो न काढतो तों त्याच्या जांघेंत एक मोठी गांठ झाल्यानें तिचें ऑपरेशन् करावें लागलें ( ता. १६ मे १९४१ ), आणि या नंतर थोड्याच दिवसांनीं पुन्हा चौदा दिवसांच्या विषमज्वरानें त्याला पछाडलें ! ह्या अशा लागोपाठच्या प्राणघातक आजारांनीं तो अगदीं जर्जर होऊन गेला असल्यानें त्याचें शिक्षण मागें पडलें व शालेय अभ्यासांत त्याची विशेष प्रगति होऊं शकली नाहीं. मुलगा वयांत आलेला, शिक्षणांत मागासलेला तेव्हां ह्याचें आतां काय करावें हा अवघड प्रश्न मजपुढें उभा होता. स्वतंत्र धंद्याचें वेड अजूनहि माझ्या डोक्यांतून गेलें नव्हतें. ह्या मुलाला हातीं धरून कांहीं करतां येईल तर पाहावें ह्या हेतूनें त्याला मी येथील गंभीरमल इंडस्ट्रियल् स्कूलमध्यें इलेक्ट्रिक वायरमन्च्या कोर्सकरतां दाखल केलें ( ता. २२ फेब्रुवारी १९४३ ). वायरमन्ची परीक्षा पास झाल्यावर ' इलेक्ट्रिक् कॉन्ट्रॅक्टर ' म्हणून त्याला स्वतंत्र धंदा करतां येईल व नंतर एखादें इलेक्ट्रिक् सामानाचें लहानसें दुकानहि त्याला घालून देतां येईल हा माझा त्याला वायरमन्च्या कोर्सला पाठविण्यामागील हेतु होता. परंतु याहि मुलानें माझ्या इच्छा आकांक्षांचें खोबरें केलें ! ज्या कोर्सकरतां त्याला गंभीरमल इंडस्ट्रियल् स्कूलमध्यें दाखल केलें होतें त्या कोर्सच्या अभ्यासाकडे त्याचें मुळींच लक्ष्य लागेना. रोज जाण्यायेण्याचे हेलपाटे मात्र तो घेत होता एवढेंच. पुढें तर त्यानें क्लासला जाणेंहि बंद केलें. अशा रीतीनें ह्या मुलाबद्दलच्या आमच्या आशेलाहि हरताळ फासला गेला !!

सन् १९४० च्या डिसेंबरमधील गोष्ट. माझें आजारीपण, घरांतील विवंचना आणि बाहेरील कामांची दगदग ह्यांनीं मला अगदीं उबग आला होता. या वातावरणापासून कोठें तरी दूर दूर एकांत स्थळीं जाऊन महिना दोन महिने स्वस्थ विश्रांति घ्यावी अशी मनाला सारखी तळमळ लागली होती. कातून गेलेल्या मनाला अशा विश्रांतीनें आणि एकान्तानें थोडा तरी विरंगुळा मिळेल असें वाटत होतें. विचार करतां करतां इंदूरपासून सुमारें आठशें नऊशें मैल दूर असलेल्या मालवण या समुद्रकिनाऱ्याचे ठिकाणीं जाऊन महिना दीड महिना एकट्यानेंच काढण्याचा मी बेत केला.

फेरफटका करावयास पिंगट–पांढऱ्या वाळूचा सुंदर आणि दूरवर पसरलेला विशाल व सपाट समुद्रकिनारा, मला विशेष प्रिय असणारे विपुल ताजे मासे, किनाऱ्यालगतच्या नारळी पोफळीच्या चेतोहर राया, श्री शिवछत्रपतीचें प्रत्यहीं स्मरण करून देणारें सिंधुदुर्गासारखें उत्साहप्रवर्तक पवित्र स्थान, सांस्कृतिक व शैक्षणिक दृष्ट्या कोंकणांतील बऱ्याच वरच्या श्रेणीचें –माझ्या जन्मभूमीपासून अवघ्या दहा अकरा मैलांवर असलेलें–तालुक्याचें ठिकाण ह्या सर्व दृष्टींनीं मालवण हें गांव मी पसंत केलें होतें. मालवणास माझ्या परिचयाचें कोणीच नव्हतें. एका स्नेह्यामार्फत तेथील एक प्रसिद्ध वकील व सामाजिक कार्यकर्ते श्रीयुत दत्तात्रय मधुसूदन ऊर्फ दादा साळगांवकर यांची मी पत्रानेंच ओळख करून घेतली व मजकरतां एक भाड्याची खोली आणि खाणावळीमार्फत जेवण यांची व्यवस्था करण्याविषयीं मी त्यांना पत्रानें विनंति केली.

माझा बेत जेव्हां मी पत्नीचे कानांवर घातला तेव्हां आश्चर्यानेंच ती उद्गारली 'तुम्ही! आणि एकटे राहणार? शक्य नाहीं हें.' मी आवेशानें म्हणालों 'तें सिद्ध करून दाखविण्याकरतांच मी हा बेत केला

आहे.' ती कांहींशा उपहासानेंच म्हणाली 'पाहूंया, तुमचा बेत कितपत तडीस जातो तें.' हो–नाहीं करतां करतां शेवटीं या अभिनव बेताला तिची संमति तर मी मिळविली. मात्र त्यांत एक तडजोड ठरली. तिनें मजबरोबर कोल्हापूरपावेतों चलावयाचें, तिनें कोल्हापुरास आपल्या मुलींकडे राहावयाचें व मी एकट्यानेंच पुढें मालवणास जावयाचें.

ता. १६ डिसेंबरला आम्ही कोल्हापुरास पोंचलों. दोन दिवस मुलींकडे मुक्काम करून मी लागलीच पुढें मालवणास रवाना झालों. कोल्हापुराहून मालवण ९० मैल आहे. मोटर बसनें सकाळीं ११ वाजतां निघून संध्याकाळीं ४॥-५ चे सुमारास मी मालवणास पोंचलों. दादा साळगांवकर यांनीं माझें उत्तम स्वागत केलें व मी त्यांच्या घरींच राहावें म्हणून त्यांनीं मला पुष्कळ आग्रह केला. माझा व त्यांचा पूर्वींचा मुळींच परिचय नसल्यामुळें त्यांच्या सौजन्याचा असा फायदा घेणें व आपला भार त्यांच्यावर टाकणें मला बरें वाटलें नाहीं. शिवाय एकान्तांत काल घालविण्याचे विचारानें मी तेथें गेलों होतों. त्यांच्या घरीं राहिल्यास मला पाहिजे असलेला एकांत मिळणें शक्य होणार नाहीं अशीही मला भीति वाटली; म्हणून भाड्यानें खोली घेऊन निराळें राहण्याचा माझा आग्रह मी कायम ठेवला. साळगांवकर यांच्या घराशेजारींच एक लहानसें घर मिळालें. (घर मालक श्रीयुत भाऊसाहेब कामत यांनीं आपल्या उदार स्वभावास अनुसरून घराचें भाडें नंतर आमच्याकडून घेतलें नाहीं ही गोष्ट वेगळी) आणि मी मालवणास पोंचलों त्याचे तिसरे दिवशीं त्या घरांत निवासास गेलों.

पहांटे साडेपांच सहा वाजतां उठून सूर्योदयापूर्वीं समुद्रकिनाऱ्यावर फिरावयास जावें, सागरावरून वहात येणाऱ्या मंद शीतल आल्हादकारक वायूचें अपार सुख अनुभवावें, वाऱ्याशीं खेळत किनाऱ्यावर येऊन स्वैर सळसळणाऱ्या मंद मृदु लहरींशीं क्रीडा करावी, नानाविध रंगीबेरंगी शंख शिंपले गोळा करावे, अफाट नील सागरपृष्ठावर प्रातःकाळच्या कोंवळ्या

रविकिरणांनीं पसरलेल्या सुवर्णकांतीची विलोभनीय शोभा मनमुराद लुटावी सात साडेसात वाजतां परत येऊन चहा घ्यावा, स्नान उरकून वर्तमानपत्रें चाळावीं, दहा साडेदहा वाजतां खाणावळींतून जेवणाचा डब्बा आला कीं जेवण उरकावें, एखादें पुस्तक वाचतां वाचतां तास दीड तास वामकुक्षी करावी पुन्हा पुस्तक वाचीत पडावें आणि संध्याकाळीं दादा कोर्टांतून आले म्हणजे त्यांचेबरोबर समुद्रावर फिरावयास जावें असा माझा नित्यक्रम सुरू झाला. दोन तीन दिवस याप्रमाणें बरे गेले, परंतु हळूहळू मनाला एक प्रकारची अस्वस्थता, एक प्रकारची हुरहूर वाटूं लागली ! कुठेंतरी कांहींतरी न्यून आहे असें जाणवूं लागलें. मनाला चुकल्या चुकल्यासारखें होऊं लागलें ! नित्यक्रम यथासांग चालू असत, परंतु जेवावयाला बसलों म्हणजे मात्र अन्नाचा घांस घशाखालीं उतरेनासाच होई आणि मग डब्यांतील सर्व अन्न तसेंच राही ! भांडीं घांसावयास येणाऱ्या मोलकरणीच्या ही गोष्ट ध्यानीं यावयास उशीर लागला नाहीं. रोज रोज अन्नानें भरलेला डबा आपल्या घरीं घेऊन जाणें तिच्या ज़िवावर येऊं लागलें. शेवटीं तिनें दादांच्या बहिणीला ही गोष्ट सांगितली व मग ती दादांच्या कानांवर गेली. संध्याकाळीं फिरावयास जातांना दादांनीं हळूच मला विचारलें ' मी ऐकतों कीं दोन तीन दिवसांपासून तुम्ही जेवत नाहीं, तुमची प्रकृति बरी नाहीं का ? त्यांना काय उत्तर द्यावें हेंच मला कळेना. आपल्या मनची व्यथा त्यांना कशी सांगावी हा पेंच मला पडला. त्यांनीं फारच आग्रह धरल्यावर मी त्यांना म्हणालों ' माझी शारीरिक प्रकृति तशी बरी आहे परंतु मानसिक प्रकृतींत मात्र थोडा बिघाड झाल्यासारखा वाटतो खरा. एकटें राहण्याच्या विचारानें मी येथें आलों, परंतु तो विचार फार काल टिकाव धरूं शकेल असें वाटत नाहीं. एकटें बसून जेवण्याची मला सवय नाहीं. जेवतेवेळीं माझ्या शेजारीं माझी पत्नी बसलेली असते व समोर आणि आजूबाजूला मुलें, नातवंडें असतात. येथें एकटें बसून जेवण्याचा प्रयत्न करतों पण घशाखालीं घांस उतरतच नाहीं. मनाच्या या दुबळेपणाला मी तरी काय करूं ! ' दादा म्हणाले ' मग तुम्ही तुमच्या पत्नीला येथें बोलावून कां घेत नाहीं ? ' मी म्हटलें ' तें खरें, पण

ज्या हिरीरीनें व ज्या अभिमानानें एकटें राहण्याचा निश्चय करून मी येथें आलों तो हेतूच मग विफल होत नाहीं का ? तसें करणें म्हणजे सपशेल पराभव पत्करून फजीतीला आव्हान देणेंच होय.' दादा हंसून म्हणाले 'वेडे आहां तुम्ही. यांत कसली आली फजीती, आणि कसला पराजय ?' बुडत्याला काडीचा आधार! नाक मुठींत धरून लागलीच मी कोल्हापूरला तार केली आणि दुसऱ्याच दिवशीं, म्हणजे मी मालवणास पोंचलों त्याच्या बरोबर आठव्या दिवशीं, संध्याकाळीं केवळ माझी पत्नीच नव्हे तर जावई, मुलगी व नातवंडेंहि मालवणास येऊन दाखल झालीं.

सारें घर भरून गेलें. माझें वैराग्य पार कोठल्या कोठें पळालें आणि एकांत अल्पजीवि ठरला. जामात वगैरे मंडळी तीन चार दिवसांनीं परत कोल्हापुरास गेली. माझी मंदावलेली भूक चांगलीच प्रज्ज्वलित झाली व पुढील पंधरावडा आम्ही पतिपत्नींनीं साळगांवकर कुटुंबाचे गोड आणि प्रेमळ सहवासांत अत्यंत आनंदांत घालविला.

अशा प्रकारें आमच्या वैराग्याचा व एकान्तवासाच्या हौसेचा बोजवारा उडाला; इतकेंच नव्हे तर एक प्रबल अस्त्र मी आपण होऊन माझ्या पत्नीचे हातीं नित्याकरतां दिलें !

## संधि : ७७ :

तारीख ४ मे १९२६ रोजीं माझ्या शालकाशीं झालेल्या बेबनावाची हकीगत मागें ( प्रसंग ७१ ) आलीच आहे. त्यानंतर २०–२१ वर्षें मी त्यांच्या घराची पायरी चढलों नव्हतों व तेहि माझ्या घरीं आले नव्हते, इतकेंच नव्हे तर आपल्या मुलांमाणसांनाहि त्यांनीं आमच्या घरीं फिरकूं दिलें नव्हतें. आईवडिलांची सक्त मनाई होती तरी त्यांचा मोठा मुलगा प्रभाकर आपल्या आतेला ( माझ्या पत्नीला ) व मला भेटल्याशिवाय राहात नसे. आम्हां दोघांकडे त्याचा फार ओढा होता. आम्हीहि त्याला आमच्या

मुलाप्रमाणेंच मानीत असूं. आम्हां दोघांवर त्याची निःसीम भक्ति होती. आठवड्यांतून निदान एक वेळ तरी आम्हांस भेटल्याशिवाय आणि मनमोकळेपणानें आमच्याशीं गप्पागप्पा केल्याशिवाय त्याला चैनच पडत नसे. मुलगा मोठा मनमिळावू, गोड स्वभावाचा आणि दिलदार होता. हा मुलगा बी. ए., बी. कॉम्. झाल्यावर आम्हां कांहींजणांच्या सल्ल्यानें–वडिलांच्या इच्छेविरुद्ध–मुंबईस नोकरीस गेला. वास्तविक त्याचें खरें हित कशांत आहे याचा पूर्ण विचार करूनच आम्ही त्याला तशी सल्ला दिली होती, परंतु ती आमच्या शालकांना मानवण्यासारखी नव्हती, त्यामुळें त्यांचें मन आमच्याविषयीं अधिकच कलुषित झालें होतें !

हा मुलगा मुंबईस गेला तरी त्याचीं नित्य नियमानें मला पत्रें येत असत व मीहि मुंबईस गेलों म्हणजे न चुकतां त्याला भेटत असें. फेब्रुवारी १९४७ मध्यें मुंबईंत या मुलाचा विवाह व्हावयाचें ठरलें, त्यावेळीं त्यानें एक अत्यंत आग्रहाचें पत्र लिहून आम्हां दोघांनांहि लग्नास अगत्यपूर्वक येण्याची विनंति केली. एकवीस वर्षांत आमच्या घराची पायरी न चढलेले आमचे शालकहि ह्यावेळीं आमचे घरीं आले व शिरस्त्याचें लग्नाचें आमंत्रण देऊन गेले. गेल्या एकवीस वर्षांचे संबंध लक्ष्यांत घेतां ' लग्नास येईन ' असें त्यांना मी सांगणें शक्यच नव्हतें. कांहीं खऱ्या खोट्या सबबी सांगून आम्हीं त्यांना वाटेस लावलें.

येथवर तर ठीक झालें, परंतु प्रभाकरानें जें अत्याग्रहाचें पत्र पाठविलें होतें त्याचें काय ? हा आम्हांपुढें मोठा बिकट पेच होता. स्वाभिमान आणि निर्हेतुक प्रेम यांच्या रस्सीखेंचींत-ओढाताणींत-आम्ही सांपडलों होतों. दोन चार दिवस मनांत सारखा झगडा चालू होता. ज्या मुलानें आम्हांस मात्यापित्याप्रमाणें मानलें, समजूं लागल्यापासून ज्यानें आपल्या आई वडिलांच्या रोषास न जुमानतां आमच्यावर निर्हेतुक आणि निःस्सीम प्रेम केलें त्याच्या लग्नास न जाणें व उभयतां वधुवरांवर शुभाशिर्वादाच्या अक्षता न टाकणें आम्हां दोघांसहि रुचेना. शेवटीं त्याच्याकरतां म्हणून आपला स्वाभिमान

व अपमान विसरून लग्नास जाणें अत्यावश्यक आहे असाच आमच्या उभय-तांच्या मनानें कौल दिला. विचारानें विकारावर विजय मिळविला. वृथा-भिमानावर प्रेमानें मात केली !

लग्नाचें सर्व वऱ्हाड अगोदरच मुंबईस रवाना झालें होतें. आम्ही लग्नास येणार नाहीं अशीच शालकांसह पुष्कळांची वालंबाल खात्री होती. ह्या सर्वांना चकित करण्याकरतां म्हणूनच कीं काय आम्ही (मी, पत्नी आणि दोन मुलगे) लग्नाच्या आदल्या दिवशीं ( ५ फेब्रुवारी १९४७ ) प्रातःकाळीं सहा साडेसहा वाजतां मुंबईस विवाहाचे जानोशांत जाऊन दाखल झालों. सर्व मंडळी आम्हांस पाहून आश्चर्यानें स्तिमितच झाली. प्रभाकराचें हृदय आनंदानें फुलून गेलें.

ह्या खेपेस मात्र आमच्या शालकांनीं आम्हांस सन्मानानें आणि आदरानें वागविलें. सर्व लग्नविधि यथासांग व निर्विघ्नपणें पार पडला. आमच्या शालकांचा व प्रभाकराचा निरोप घेऊन आम्ही परत इंदुरास आलों.

अत्यंत आनंदाचे अथवा दुःखाचे प्रसंग जुने हेवे दावे विसरण्याचे कामीं फार उपयुक्त व अनुकूल असतात. प्रभाकराच्या विवाहाचे निमित्तानें मागील सर्व प्रकारावर पडदा टाकून एकवीस वर्षांनीं पुनश्च प्रस्थापित झालेले सलोख्याचे संबंध तसेच चालू ठेवण्याचा मी मनाशीं संकल्प केला व तेव्हां-पासून आम्ही (मी व माझे मेहुणे) पुन्हां एकमेकांशीं बोलूं चालूं लागलों व एकमेकांचे घरीं येऊं जाऊं लागलों आणि या विवाहामुळें आमचे दुरावलेले संबंध पुनश्च सांधले गेले !

## स्वार्थलोलुप : ७८ :

समाजकार्य ही सुळावरची पोळी आहे. परंतु समाजसेवेच्या आखाड्यांत उतरलेल्या कित्येक बहाद्दरांना याची गंधवार्ताहि नसते ! समाजसेवेचें व्रत

अति खडतर आहे, याची जाणीव फार थोड्यांना असते. स्वार्थत्याग हें समाजसेवेचें मूळ अधिष्टान होय.

आपल्या दैनंदिन व्यावसायिक जीवनाबरोबरच सामाजिक जीवन जगणेंहि आवश्यक आहे असें मला विचार करण्याची पात्रता आल्यावेळेपासूनच वाटत असे. ज्या समाजांत आपण जन्म घेतों, रात्रंदिवस वावरतों त्या समाजाचें फार मोठें ऋण आपल्यावर असतें. या ऋणाची अंशतः तरी, तन-मन-धनानें फेड करणें आपलें आद्य कर्तव्य आहे अशी माझी भावना होती आणि म्हणूनच सन १९१२ पासून मी वैशिष्ट्येंकरून ह्या दिशेनें पाऊल टाकलें व अल्पस्वल्प जनसेवेस नागपूरपासून मी प्रारंभ केला व इंदुरास आल्यानंतर सन १९१६ पासून मी तिकडे अधिक लक्ष्य पुरविलें. गेल्या ३८ वर्षांच्या प्रदीर्घ कालांत इंदुरांतील अनेक लहान मोठ्या सार्वजनिक संस्थांची यथाशक्ति स्वार्थनिरपेक्ष सेवा करण्याचा मी प्रयत्न केला व अजूनहि करीत आहें. हें कार्य करीत असतांना मी कांहीं स्नेही मिळविले व कांहीं गमावलेहि.

अशा अनेक संस्थांत काम करीत असतां ज्या एका संस्थेंत मी प्रमुख पदावर होतों त्या संस्थेची व्हावी तशी प्रगति होत नव्हती. ह्याला अनेक कारणें व अनंत अपरिहार्य अडचणी होत्या. हीं सर्व कारणें व अडचणी माझ्या एका वकील स्नेह्याला पूर्णपणें अवगत नव्हत्या असें नाहीं. एके दिवशीं ( ता. २१ एप्रिल १९४८ ) ह्या वकील स्नेह्याचे घरीं आम्ही बोलत बसलों असतां या संस्थेच्या गोष्टी निघाल्या व ' ही संस्था कांहीं काम करीत नाहीं, तिच्यांत तुम्ही जीव आणूं शकत नाहीं तर त्या जागेस चिकटून तरी कशाला राहिला आहां ? त्यापेक्षां राजीनामा देऊन दुसऱ्या योग्य माणसाला वाव कां देत नाहीं ? ' असा सवाल त्यांनीं मला केला. संस्थेच्या त्यावेळच्या परिस्थितींत मी राजीनामा देऊन वेगळा झालों असतां संस्थेवर त्याचा किती अनिष्ट परिणाम होईल याचें स्पष्टिकरण करण्याचा माझ्या मगदुराप्रमाणें मी प्रयत्न केला, परंतु तें त्यांना पटलें नाहीं व ती जागा न सोडण्यामागें माझा कांहीं तरी स्वार्थी हेतु असला पाहिजे असा घाणेरडा आरोप

त्यांनीं मजवर केला ! ज्याला माझ्या कामाची, वर्तनाची व दानतीची गेलीं कित्येक वर्षें पूर्ण जाणीव होती अशा निकटच्या स्नेह्याकडून असल्या प्रकारचा गलिच्छ व अनुदार आरोप मजवर झालेला पाहून मला तीव्र संताप आला. माझें मस्तक भणाणून गेलें. अशा तऱ्हेच्या आरोपाची माझ्या कट्ट्या शत्रूकडूनहि मी कधीं अपेक्षा केली नव्हती. असें असतां त्यांनीं असला घाणेरडा आरोप मजवर केलेला पाहून त्यांच्याशीं पुढें एक शब्दहि बोलण्याची इच्छा मला झाली नाहीं. ज्याचा माझा गेल्या कित्येक वर्षांचा सहवास, ज्याच्या खांद्याला खांदा भिडवून मी अनेक सार्वजनिक संस्थांतून बरोबरीनें कामें केलीं, ज्याला माझ्या प्रामाणिकपणाविषयींची बालंबाल खात्री त्या मनुष्यानें मजवर स्वार्थलोलुपतेचा आरोप करावा याची मला विलक्षण चीड आली ! रागाच्या आवेशांतच मी त्यांना एवढेंच म्हटलें कीं ' आपल्यासारख्या क्षुद्र मनोवृत्तीच्या माणसापासून दोन पावलें दूर राहणेंच बरें ! ' आणि नंतर एक क्षणभरहि तेथें न थांबतां ताडकन् उठून मी घरीं निघून आलों !

वरील घटनेनंतर जवळ जवळ एक वर्षपावेतों मी ह्या गृहस्थांच्या घरीं गेलों नाहीं किंवा त्यांच्याशीं कधीं संभाषणहि केलें नाहीं. या अवधींत माझ्या रागाचा पारा थोडा उतरला होता आणि त्या गृहस्थांनाहि त्यांनीं उच्चारलेल्या शब्दांबद्दल खेद व पश्चात्ताप होत असल्याचें स्पष्ट दिसून येत होतें. या एवढ्याशा तडक-फडक प्रसंगानें इतके दिवसांचे जुने संबंध कायमचे तोडून टाकणें इष्ट नाहीं हें आम्हां दोघांनाहि पटलें, आणि हळू हळू आम्ही दोघे पुन्हा एकत्र आलों, इतकेंच नव्हे तर ज्या संस्थेसंबंधानें त्यांनीं मला वृथा दोष दिला होता त्याच संस्थेंत हातांत हात घालून काम करूं लागलों. हे गृहस्थ म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून माझे मित्र सद्भाऊ फडणीस होत.

अनुक्रम
दिनां
क्रमां

' कार्येषु मंत्री करणेषु दासी । भोज्येषु माता शयनेषु रंभा ।
धर्मानुकूला क्षमया धरित्री । भार्याच षाड्गुण्यवतीह दुर्लभा ।। '
—सुभाषित.

येथवर माझ्या आयुष्यांतील बऱ्याच निवडक आठवणी लिहिण्याचा मी प्रयत्न केला परंतु प्रस्तुत आठवण लिहिणें मात्र मला अत्यंत अवघड वाटत आहे. याचें मुख्य कारण असें कीं आतांपावेतोंच्या प्रत्येक आठवणीमागें एक एकाच विशिष्ट घटनेची पार्श्वभूमि होती. परंतु वैवाहिक जीवनांतील प्रसंग व आठवणी इतक्या विविध व असंख्यात असतात आणि त्या एकमेकांत इतक्या मिसळून गेलेल्या असतात कीं त्यांतून विशिष्ट घटनांची निवड करणें अत्यंत कठिण—अत्यंत दुर्घट—असतें आणि म्हणूनच हा भाग लिहावयास घेतांना माझा अगदीं गोंधळ उडाला आहे व काय लिहूं आणि काय नको असें झालें आहे.

आमचा विवाह फेब्रुवारी १९०२ मध्यें झाला. विवाहसमयीं माझ्या पत्नीचें वय फार तर ११–१२ वर्षांचें असावें. विवाह म्हणजे काय, विवाहामुळें आपल्या शिरावर येणाऱ्या जबाबदाऱ्या किती मोठ्या व बिकट असतात ह्याची पुसट देखील कल्पना त्यावेळीं तिला असण्याचा संभव नव्हता. तिच्याहून पांच सहा वर्षांनीं मी मोठा. मलाच त्याची जाणीव नव्हती तर अकरा बारा वर्षांच्या परकरी पोरीला तो कोठून असणार ? पन्नास पंचावन वर्षांपूर्वीच्या काळांत मुलींना शाळेंत क्वचितच पाठविलें जाई आणि तशांत आमच्या श्वशुराचें कुटुंब अस्सल सनातनी. त्यामुळें विवाहापूर्वी शालेय शिक्षणाचा तिला मुळींच संस्कार नव्हता. साधी अक्षरओळख देखील नव्हती. ही अक्षरओळख लग्नानंतर तीन चार वर्षांनीं करून देण्याचा योग आला, परंतु हें काम वडील मातोश्रींच्या देखत करणें मला शक्यच नव्हतें. अर्थात् झोंप मोडून रात्रीचे वेळीं मला तें करावें लागे. तिला अक्षर-

ओळख झाली व थोडेंबहुत लिहितां वाचतांहि येऊं लागलें, परंतु मामुली वाचनापलीकडे तिच्या शिक्षणाची मजल गेली नाहीं. वाचनापलीकडे शिक्षणाची विशेष अभिरुची तिच्यांत कधींच उत्पन्न झाली नाहीं. पुस्तकी शिक्षणाचा अभाव असला तरी तिची वैचारिक पातळी इतकी वरच्या प्रतीची होती व आहे कीं चांगल्या चांगल्या सुशिक्षितांतहि ती आढळणार नाहीं. संसारांतील सुग्रणपणा, स्वच्छता, नीटनेटकेपणा, टापटीप, शिस्त, मितव्यय या सर्वांत तिचा दर्जा फार वरचा आहे, इतकेंच काय पण मी हातीं घेतलेल्या कोणत्याहि सामाजिक कार्यांत देखील मला तिची पूर्ण सहानुभूति मिळत आली आहे.

सांसारिक जीवनांत सर्वांचे अनुभवास येणारे खटके, रुसवे फुगवे, कलह-भांडणें आमच्यांत होत नसत असें नाहीं. घटकेंत ऊन्ह आणि घटकेंत पाऊस असे अनेक प्रसंग आम्ही अनुभविले आहेत व त्यांतील मौज लुटली आहे. वाढत्या वयाचे मानानें त्यांचें प्रमाण आतां फार कमी असेल एवढेंच; आणि अशा रुसव्या फुगव्यांशिवाय संसाराची खरी लज्जत चाखतां येत नाहीं! संसारांत पत्नी ही केवळ भोग्य वस्तु नसून तिचें स्थान प्रेमळ सहचरीचें व सुयोग्य मार्गदर्शिकेचें आहे. पत्नीच घराची खरी शोभा-खरी गृहलक्ष्मी-असते. हीं स्थानेंहि माझ्या पत्नीनें यथायोग्य भूषविलीं आहेत याचा मला नितांत आदर आणि अभिमान वाटतो. आल्यागेल्याचें आदरातिथ्य व सर्वांशीं प्रेमळ वागणुक यांबद्दल जीं अनेक प्रशस्तिपत्रें मला वेळोवेळीं आलीं आहेत त्या सर्वांचें श्रेय माझ्या पत्नीला आहे. तिच्या संपूर्ण व स्वयंप्रेरित सहकाराशिवाय मला हें कदापि शक्य झालें नसतें. प्राप्त परिस्थितींत समाधान मानून सत्याची कांस न सोडतां व आपला स्वाभिमान सातत्यानें टिकवून संसाराचा गाडा कौशल्यानें हांकण्यांत तिनें संपूर्ण यश मिळविलें आहे. आपल्या शक्त्यनुसार -नव्हे शक्तीपलीकडेहि–द्रव्यद्वारें अथवा अन्य प्रकारें इतरांना मदत करण्यास तिनें कधींहि मागें पुढें पाहिलें नाहीं. माझी पत्नी म्हणजे खरोखरच एक आदर्श सुगृहिणी आहे. माझ्या जीवनांतील सौख्याचा व यशाचा केवढा तरी मोठा वांटा तिचा आहे. तिची स्फूर्ति व तिचा सहकार

नसता तर मी आज निराळयाच परिस्थितींत असतों व माझ्या जीवनाचा ओघ कोठल्या कोठें वहात गेला असता कोणास ठाऊक! माझ्या अनेक दोषांवर तिनें उदारपणें पांघरूण घातलें आहे. अशी प्रेमळ, स्फूर्तिदायक, सद्‌गुणी सहचरी–पसंतीला मुळींदेखील जागा नसल्या स्थितींत–मला केवळ दैवयोगानेंच लाभली हें माझें पूर्वसंचितच म्हटलें पाहिजे. माझ्या विवाहाचा फांसा केवळ दैवानेंच सुलटा पडला हें मी माझें महद्‌भाग्य समजतों.

माझ्या व पत्नीच्या धार्मिक भावनांत महदंतर होतें व आहे. तरीहि एकमेकांच्या भावनांबद्दल पूर्ण आदर बाळगून परस्परांच्या धर्मभावना आम्ही केव्हांहि दुखविल्या नाहींत. सततच्या आजारीपणामुळें तिचा स्वभाव अलीकडे थोडा चिरचिरा झाला आहे खरा परंतु तो चिरचिरेपणा क्षणभरापुरताच असतो. ती वेळ गेली कीं पुन्हा लागलीच थोड्या वेळानें तिच्यांतील स्वाभाविक प्रेमळपणा ओसंडत असलेला दिसेल. माझी पत्नी म्हणजे कुटुंबांतील लहानांपासून थोरांपर्यंत प्रत्येकास व इतर परिचितांसहि हवी हवीशी वाटणारी एक असामान्य व्यक्ति आहे. मला लाभलेला तो एक अमूल्य ठेवा आहे–नव्हे तेंच माझ्या वैवाहिक जीवनाचें सारसर्वस्व आहे.

इत्यलम्

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ९००८
विभाग
क्रमांक
नों. दि. २८/१/९१/५४
1228
REFBK-0008224